**(सभापतीस्थानी तालिका सभापती, श्रीमती सुधा जोशी)**

**विधेयकांबाबत**

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : काल आपण सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 91-महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक सुरु केले होते व त्यावर सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार हे आपले विचार मांडत होते. त्यामुळे ते ऑनलेग आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदया, आज सुरुवातीला वि.स.वि.क्रमांक 89 वर चर्चा व्हावयास हवी. कारण, नंतर वेळ मिळत नाही.

**तालिका सभापती** : काल आपण वि.स.वि.क्रमांक 91 वर चर्चा करत होतो. सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार हे ऑनलेग होते. परंतु, ते आता सभागृहात उपस्थित नाहीत व संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय देखील सभागृहात उपस्थित नाहीत. जर सभागृहाने परवानगी दिली तर आपण पुढील बिल चर्चेसाठी घ्यावे काय ? किंवा सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार हे येईपर्यन्त इतर कोणा सन्माननीय सदस्यांना वि.स.वि.क्रमांक 91 वर बोलावयाचे असेल तर त्यांनी बोलावे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, काल वि.स.वि.क्रमांक 89 वर चर्चा अपुरी राहिलेली आहे. त्या विधेयकावर आता सभागृहात चर्चेला सुरुवात करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : विधेयक क्रमांक 89 संबंधी काल सन्माननीय उपसभापती यांनी असे सांगितले होते की, सभापती महोदयांशी चर्चा करुन रुलिंग देण्यात येईल. त्यानंतर आपण वि.स.वि.क्रमांक 91 चर्चेसाठी घेतले होते व त्यावर आणि सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार हे ऑन लेग होते. आता संबंधित खात्याचे मंत्रीमहोदय या ठिकाणी उपस्थित झाले आहेत. तेंव्हा, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे इतर कोणा सन्माननीय सदस्यांना विधेयक क्रमांक 91 वर आपले विचार मांडावयाचे असतील तर ते त्यांनी मांडावे. सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार आल्यानंतर आपण त्यांना संधी देऊ.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, सभागृहात कोरम नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (अर्थमंत्री) : सभापती महोदया, आता आपण सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 96-महाराष्ट्र लॉट-यांवरील कर विधेयक चर्चेला घेऊ.

**तालिका सभापती** : सभागृहात कोरम झालेला आहे. आता आपण वि.स.वि.क्रमांक 91 वर चर्चा सुरु करु. मी हे बिल आता पुकारले आहे. जर यावर सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे नसतील तर आपण ते विधेयक मंजूर करु.

यानंतर श्री.बोरले..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XCI OF 2006

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOCAL AUTHORITY MEMBERS' DISQUALIFICATION ACT, 1986.)

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत करण्यात आला)

**तालिका सभापती** : मी वि.स.वि.क्रमांक 91 पुकारलेले आहे. ज्या सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे असेल त्यांनी बोलावे.

श्री.विनांद तावडे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब या विधेयकावर बोलणार आहेत.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी बोलावे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, आज वि.स.वि. क्रमांक 89 पास झाले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहामध्ये काय चालले आहे ? सभागृहाचे कामकाज कायदे, नियम, प्रथा, परंपरेप्रमाणे चालते. पण माननीय मंत्री महोदय उभे राहून आज हे विधेयक पास झाले पाहिजे, असे दमबाजी करुन बोलत आहेत.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी दमबाजी केलेली नाही. माननीय मंत्री महोदय आपण कृपया खाली बसावे.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून बोलत असतांना माननीय श्री.चंद्रकांत हंडोरे उभे राहून विरोधी सदस्यांना उद्देशून काही बोलतात......अडथळा....)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय श्री.चंद्रकांत हंडोरे दादागिरीने बोलत आहेत.

( ...गोंधळ...)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब आपण कृपया खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदय कोणाला दम देत आहेत ?

( दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य व मंत्री महोदय माननीय सभापतींच्या आसनाजवळ उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : कृपा करुन सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सभागृहामध्ये हे काय चालले आहे ?

**तालिका सभापती** : कृपा करुन कोणीही वेलमध्ये उभे राहू नये. आपण सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब आपण विधेयकावर बोला.

( ...गोंधळ... )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदय आमच्या अंगावर धावून येतात.

**तालिका सभापती** : सभापती उभे असतांना कोणीही उभे राहू नये. सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी - माननीय सभापती )

( विरोधी पक्ष सदस्य आपल्या जागेवर उभे राहून बोलत असतात .... अडथळा ...)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी प्रथम आपापल्या जागेवर बसावे, शांत व्हावे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आज सकाळी 10 वाजल्यापासून जे विशेष कामकाज आपल्याला करावयाचे आहे त्यामध्ये या ठिकाणी असणाऱ्या कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजाप्रमाणे जे पहिले विधेयक दाखविले आहे त्या अनुषंगाने आपणास चर्चा करावयाची आहे. याबाबतीत मला वाटते सन्माननीय मंत्री महोदय श्री.हंडोरे यांनी काही बोलून आपल्या भावना व्यक्त केल्या असतील, तरीही याबाबत मी असा निर्णय देतो आहे की, कार्यक्रम पत्रिकेवर क्रमांक 1 वर दाखविलेले सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 91 हे आपल्याला सुरू करावयाचे आहे. तत्पूर्वी मी येथे नेमके काय घडलेले आहे त्यासंबंधात आपणापैकी कोणाही एका सदस्यांकडून समजून घेईन. त्यासाठी प्रथमत: मी सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांना परवानगी देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, तालिका सभापतींनी सभागृहाच्या कामकाजाला सुरूवात करताना विधानसभा विधेयक क्रमांक 91 पुकारले. पण त्यावर काल सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांचे भाषण अर्धवट असताना म्हणजे ते on leg असल्यामुळे आणि आता ते सभागृहात उपस्थित झालेले नसल्याने तालिका सभापतींनी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना या विधेयकावर बोलण्यास परवानगी दिली. त्यानंतर .. सभापती महोदय, वाटल्यास आपण रेकॉर्ड पहावे, .. या सभागृहामध्ये माननीय मंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना उद्देशून 'तू काय करतोस, तू काय करणार ? अशा प्रकारे एकदम "अरे-तुरे-ची भाषा वापरली. साहजिकच आमच्याकडील सदस्य त्याचा विरोध करीत 'वेल'मध्ये आले. त्याबरोबर मंत्री महोदय देखील 'वेल'मध्ये आले आणि दादागिरी करू लागले. सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या या वागणुकीवर आमचा आक्षेप आहे. त्याबद्दल मंत्री महोदयांनी सदस्यांची आणि सभागृहाची माफी मागितली पाहिजे. सभागृहामध्ये सदस्यांना "अरे-तुरे"च्या भाषेमध्ये बोलणे सभ्यतेला धरून नाही, योग्य नाही. सभापती महोदय, विधानसभा विधेयक 89 हे जादूटोणा संबंधातील विधेयक असून त्या विधेयकाला आम्ही विरोध करीत आहोत म्हणजे आमचा जादूटोण्याला पाठिंबा आहे असे नाही. आम्ही अंधश्रद्धेला खतपाणी घालतो वा घालू इच्छित आहोत असे नाही. आम्ही प्रतिगामी आहोत असेही नाही.

...... सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या संदर्भातील वस्तुस्थिती अशी आहे की, सभागृह सुरू झाले तेव्हा सभागृहामध्ये गणसंख्या देखील पुरेशी नव्हती. दरम्यान तालिका सभापतींनी आजच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 91 चर्चेसाठी पुकारले. तत्पूर्वी काल माननीय उपसभापतींनी जादूटोणासंबंधातील विधानसभा विधेयक क्रमांक 89 च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी जो युक्तिवाद केला तो माननीय सभापतींसमोर म्हणजेच आपल्या समोर मांडला जाईल आणि आपण त्याबाबत काय तो निर्णय घ्याल असे सांगितले होते आणि ती चर्चा तेथेच थांबविली व विधानसभा विधेयक क्रमांक 91 चर्चेसाठी घेतले. त्यावर सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी आपले भाषण सुरू केले आणि सभागृहाची बैठक माननीय उपसभापतींनी स्थगित केली व हे विधेयक उद्या म्हणजे आज सकाळी घेतले जाईल असे जाहीर केले. त्याप्रमाणे आज तालिका सभापतींनी या विधेयकावरील चर्चेला सुरूवात केली तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार उपस्थित नसल्याने सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना बोलण्यास सांगितले. दरम्यान माननीय मंत्री श्री.हंडोरे यांनी तालिका सभापतींना उद्देशून त्यांच्या विभागाचे विधेयक, वि.स.वि.89 हे आजच्या आजच संमत झाले पाहिजे असे सांगितले. त्यांनी ज्या पद्धतीने हे सांगितले ते आम्हा सदस्यांना योग्य वाटले नाही म्हणून सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी त्याबद्दल आक्षेप घेतला त्यावेळी माननीय मंत्री श्री.हंडोरे सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना उद्देशून 'अरे-तुरे'च्या भाषेमध्ये जे काही बोलले ते तर आणखी आक्षेपार्ह आहे आणि ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे. तेव्हा त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या त्या वर्तनाबद्दल दिलगिरी व्यक्त केली पाहिजे एवढेच आमचे म्हणणे आहे.

**सभापती** : आता मी सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना याबाबत काही सांगावयाचे असल्यास मी त्यांना परवानगी देतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे उभे होते आणि त्यावेळी माननीय मंत्री श्री.हंडोरे हे जादूटोणा संबंधातील वि.स.वि.क्र.89 हे आपण आज मंजूर करावे एवढ्याच स्वरूपाचे तालिका सभापतींना सांगत होते. ....

( विरोधी पक्ष सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा .... )

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी मला पूर्णपणे बोलू द्यावे. ...

( यानंतर श्री.सरफरे .....डी 1 ...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : मंत्रिमहोदय जर इतक्या सौम्य भाषेमध्ये बोलले असतील तर आम्ही इतक्या तीव्र प्रतिक्रिया देऊ कां?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते उभे राहिले त्यावेळी माननीय तालिका सभापतींनी माननीय सदस्यांना सांगितले की, तुम्ही बिलावर बोला. त्यानंतर माननीय सदस्यांनी सांगितले की, मी या विधेयकावर माझे विचार मांडतो. दरम्यानच्या काळात माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे उभे राहिले आणि त्यांनी माननीय तालिका सभापतींना हात जोडून सांगितले की, हे विधेयक अनेक काळापासून प्रलंबित आहे. अर्थात, ते बोलत असतांना त्यांचा आवाज थोडा मोठा होता. त्या आवाजामुळे माननीय सदस्यांचा गैरसमज झाला असेल. आणि म्हणून माझी सदनाला विनंती आहे की, हे विधेयक बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे म्हणून ते आज मंजूर करावे. जी काही शाब्दिक चकमक घडली असली तरी सभागृहापुढे हे महत्वाचे विधेयक आहे. या शाब्दिक चकमकीमुळे जर कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर .... असे करीत माननीय मंत्रिमहोदय माननीय तालिका सभापतींकडे येऊन सांगत होते की, हे विधेयक आज चर्चेला घ्यावे आणि मंजूर करावे. अशापध्दतीने ते सांगत होते.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला शांतपणे आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणावयाची आहे...

**सभापती :** माननीय सदस्य श्री. रावतेजी आपण कृपया खाली बसावे. मंत्रिमहोदय, आपल्याला काही स्पष्टीकरण करावयाचे असेल तर ते करण्याअगोदर माननीय सभापतींची परवानगी घेतली पाहिजे. तशाप्रकारे आपण परवानगी न घेता बोलावयास सुरुवात करणे ही सभागृहाची प्रथा नाही. माननीय सभापतींची आपण परवानगी मागितली पाहिजे, आणि त्यांनी परवानगी दिल्यानंतर आपण बोलावयास उभे राहिले पाहिजे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, त्यावेळी मी माईकवर बोलत नव्हतो. माननीय तालिका सभापतींना मी असे म्हटले की, गेल्या कित्येक दिवसांपासून हे विधेयक सातत्याने पुढे ढकलले जात आहे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,....

**सभापती** : Hon. Member, I would allow you to speak afterwards.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, हे विधेयक सातत्याने पुढे ढकलले जात आहे म्हणून आज हे विधेयक चर्चेला घ्यावे अशी मी माननीय तालिका सभापतींकडे विनंती केली आणि मी खाली बसलो. त्यावेळी काही माननीय सदस्यांनी कॉमेंट्स केले. आणि मग माननीय तालिका सभापती म्हणाल्या की, अगोदर आपण विधेयक क्रमांक 91 घेऊ या. त्या दरम्यान माननीय तालिका सभापतींनी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना तुम्ही विधेयकावर बोला असे सांगितले. त्यावेळी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना विधेयकाचे पेपर्स सापडत नव्हते. त्यामध्ये बराच वेळ गेला. म्हणून मी माननीय तालिका सभापतींना सांगितले की, या विधेयकावर आज चर्चा होणे आवश्यक आहे. त्यावर माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते उठले आणि त्यांनी ऑब्जेक्शन घ्यायला सुरुवात केली. मुळात माझा आवाज मोठा असल्यामुळे त्यांचा काहीतरी गैरसमज झाला असेल तर तो दूर करावा. मी त्यांना असे काहीही बोललो नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री तथा अंधश्रध्दा, जादूटोणा या विधेयकाचे प्रवर्तक असे म्हणाले, त्यावर माननीय सदस्य श्री.रावते उठले.... मुळात सभागृहामध्ये माननीय मंत्र्यांनी असत्य बोलावे याची मला अत्यंत लाज वाटते. मी विधेयकावर बोलावयास उभा होतो , त्यावेळी माझा चष्मा मला सापडत नव्हता. त्यावेळी माननीय तालिका सभापती म्हणाल्या की, माननीय सदस्य श्री. रावते आपण विधेयकावर बोलता कां? त्यावेळी मला चष्मा सापडत नाही एवढेच मी म्हणालो. त्यावेळी सन्माननीय मंत्री उभे राहिले आणि म्हणाले की, काही झाले तरी आजच्या आज विधेयक क्र. 89 हे संमत झाले पाहिजे. मी मंत्रिमहोदयांना म्हटले की, हा तुमचा विषय नाही. त्यावेळी मंत्रिमहोदय मला उद्देशून असे म्हणाले की, "तू काय समजतोस स्वत:ला" असे म्हणून त्यांनी सुरुवात केली....

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मी असे काहीही बोललो नाही...

(गोंधळ)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण कॅसेट तपासून बघावी...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...अडथळा....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे रहातात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे ऐकून घेतो. कृपया बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : 'तू स्वत:ला काय समजतोस" असेही ते म्हणाले. ते असे बोलले नाही असे सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी उठून सांगावे. तसे असेल तर मी लोटांगण घालेन. त्यांची दादागिरी माफ करेन. परंतु त्यांनी दादागिरीची भाषा केली ती सहन केली जाणार नाही. सभापती महोदय, मंत्री महोदय, स्वत: उभे राहून "तू काय समजतोस अमुक आहे तमुक आहे...", अशाप्रकारची अरेतूरेची त्यांनी भाषा केली. आम्ही 15 वर्षापूर्वीपासून दोघेही जुने मित्र आहोत. ते आणि मी अरे तूरेच्याच भाषेमध्ये बाहेर बोलतो. परंतु सदनामध्ये अशी भाषा वापरणे योग्य नाही. मंत्रीमहोदय ज्या टोनमध्ये बोलले ते फार गंभीर आहे. त्यामध्ये गर्भीत अर्थ असा की, या बिलाला विरोध केला तर ठोकून काढू, अशी प्रवृती दर्शविणारे त्यांचे भाष्य आहे. अशाप्रकारे बेकायदेशीर घटना घडल्या तर त्याचे पडसाद महाराष्ट्रामध्ये उमटले तर पीठासीन अधिकारी म्हणून आपल्या दृष्टीने ते योग्य होणार नाही. त्यांनी त्यांची यातून प्रवृत्ती दाखविल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. या संदर्भाने माफी मागायची की नाही, हा सरकारचा प्रश्न आहे. मी गरम डोक्याचा माणूस आहे, मी शासनामध्ये मंत्री असताना, मी अशाप्रकारे केव्हा वागलो नाही, तसे वागणे बरोबर नाही. मी एवढेच निदर्शनास आणून देतो की, जे झाले ते गैर झालेले आहे.

श्री.चंद्रकांत हांडोरे : सन्माननीय सदस्य श्री.रावते हे माझे जुने मित्र आहेत. मी मुंबईचा महापौर होतो तेही महापौर होते...

श्री.पांडुरंग फुंडकर : हा जो काही प्रकार घडला त्यावेळी मी सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. परंतु आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे काही सांगितले, माहिती दिली त्यावरून हा जो प्रकार झाला तो चांगला नाही. कारण हे सर्वोच्च सभागृह आहे,असे आपण मानतो. सभागृहामध्ये जी काही चर्चा होते ती येथील स्टेटसला धरून झाली पाहिजे, सभागृहाचा डोकोरम पाळला पाहिजे. मंत्री महोदय, आपले बील मंजूर व्हावे म्हणून आग्रह धरू शकतात. परंतु आग्रह धरत असतांना विरोधी पक्षाच्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे नाही, हे योग्य नाही. मंत्री महोदयांना हे बीले लवकर मंजूर करण्याचा आग्रह असेल तर मागच्या डिसेंबरच्या

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ D/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू...

अधिवेशनामध्ये गृहनिर्माण सोसायट्यांच्या संबंधात 73 क्रमांकाचे बील आलेले होते, ते अजूनही कामकाजामध्ये दाखविले जात नाही ? आता समोर असलेल्या बिलाची शासनाला घाई झालेली आहे. परंतु या बिलावर चर्चा ही झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे. मंत्री महोदयांना बील चर्चा न करता मंजूर करून घ्यावयाचे असेल तर ते होणार नाही. मंत्री महोदय ज्या पध्दतीने बोलतात, ते योग्य नाही, त्यांचा दबाव कोणी मानणार नाही. मंत्री महोदय काही बोलले असतील तर त्यांनी त्यांचे शब्द परत घ्यावे, तसे त्यांनी बोलणे हे संयुक्तिक होणार नाही. त्यांनी आपले शब्द परत घेतले पाहिजेत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. चंद्रकांत हंडोरे हे सभागृहाबाहेर मित्र आहेत. त्यांनी त्यांचे सभागृहाबाहेरचे मैत्रीचे नाते या सभागृहातही कायम ठेवावे अशी विनंती आहे. सभापती महोदय, आपण सभागृहाचे पुढचे कामकाज सुरु करावे अशी विनंती करतो.

**सभापती** : तुम्ही त्यांना सुध्दा सांगावयास हरकत नाही. यासंदर्भात निर्णय देत असताना मी एकच सांगेन की, कोणत्याही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना किंवा माननीय मंत्रिमहोदयांना एखादी बाब या ठिकाणी मांडावयाची असेल तर ती मांडण्याच्या अगोदर पीठासीन अधिकाऱ्यांची परवानगी घेऊनच त्यांना ती बाब मांडण्यासाठी उभे राहता येईल. या ठिकाणी मला असे दिसते की, माननीय तालिका सभापती महोदया या ठिकाणी आल्यानंतर माननीय समाजकल्याण मंत्री या ठिकाणी त्यांची परवानगी न घेता बोलण्यासाठी उठले असतील तर ती आपल्या प्रथा-परंपरेमध्ये बसणारी बाब नाही. या अनुषंगाने मी त्यांना सांगेन की, याबाबतीत त्यांनी नोंद घेणे गरजेचे आहे. अनवधानाने त्यांचा आवाज मोठा निघाला असेल तर सभागृहाची एकंदर प्रतिष्ठा राखण्याकरिता त्यांनी तो शब्दही पाठीमागे घेणे गरजेचे आहे. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगेन की, याबाबतीतील संपूर्ण कामकाज मी पाहीन आणि जे अयोग्य असेल ते कामकाजातून काढून टाकीन आणि जे योग्य असेल ते कामकाजामध्ये ठेवीन. सभापतींची परवानगी घेण्याच्या अगोदर माननीय मंत्रिमहोदयांनी बोलण्यास सुरुवात केली त्याबाबतीत मी त्यांना समज देतो. इतरवेळा आपला आवाज कितीही मोठा असला तरी मंत्री किंवा शासन म्हणून ज्यावेळी या ठिकाणी बोलण्यासाठी उभे राहता त्यावेळी आवाज बऱ्यापैकी खालच्या पट्टीत ठेवण्याची आपण सातत्याने काळजी घ्यावी एवढेच मी सांगेन. यानंतर सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 91 यावरील चर्चेला पुढे सुरुवात करु. आवाज मृदू असावा असे मी आता जे सांगितले ते माझे सांगणे दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या बाबतीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ KTG/ D/ MHM/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आपल्या वडीलधाऱ्या अधिकारामध्ये आपण अत्यंत मृदू शब्दात शांतपणाने माननीय मंत्रिमहोदयांना सल्ला दिला. आपण आदेश दिला नाही...

**सभापती** : मी त्यांना समज दिली.

श्री. दिवाकर रावते : आपण त्यांना सांगितले. असे दोन्ही बाजूकडून होता कामा नये असे आपण सांगितले. अयोग्य शब्द आले असतील तर ते मागे घेतले जावेत. माझ्या बोलण्यातून असा कोणताही वेडावाकडा शब्द गेलेला नाही.

**सभापती** : काही वेळा आवाज मोठा होतो.

श्री. दिवाकर रावते : मी त्यावर सुध्दा बोलणार आहे.

**सभापती** : आता आपण त्यावर न बोललेले बरे. आपण बिलावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी वेडावाकडा शब्द बोललो नसल्यामुळे शब्द मागे घेण्याचा प्रश्न येत नाही. कामकाजामध्ये तसे जर आढळून आले तर अवश्य ते शब्द काढावेत किंवा आमच्या निदर्शनास आणून द्यावेत. आवाज चढविण्याच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर एखादा विषय मांडताना ज्या अविर्भावात सन्माननीय सदस्य बोलत असतील त्या अविर्भावाप्रमाणे आवाजाचा चढउतार होत असतो. आपला विषय मांडण्याकरिता आवाजाचा उपयोग केला जाणार आहे. आवाजच जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. आवाजच माणसाला घडवतो. मूल जन्माला आल्यानंतर आवाजामुळेच तो घडतो. वडिलांच्या धाकाच्या आवाजातून मुलांमध्ये शिस्त निर्माण होते. त्यामुळे आवाजाचे मोल मोठे आहे. हे मी पीठासीन अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून देत आहे.

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी वि.स.वि.क्र. 91 च्या संदर्भात बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, या बिलावर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार ऑनलेग होते असे सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. ते आमची तंगडीत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ MHM/

श्री. दिवाकर रावते ...

तंगडी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. माननीय मंत्रिमहोदय बसून असे म्हणाले की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार ऑनलेग होते. पण ते ऑनलेग नव्हते. मी ऑनलेग होतो. म्हणूनच मी म्हणालो की, ते आमची तंगडीत तंगडी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. श्री. मधुकर सरपोतदार हे आमचे जेष्ठ नेते आहेत. त्यांच्याच सल्ल्याने मी या ठिकाणी बोलण्यासाठी उभा राहात असतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी बिलावर बोलावे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 10:30

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदया, या बिलामध्ये अत्यंत महत्वाचा आणि चांगला क्लॉज आहे. उद्देश आणि कारणे यामध्ये नमूद केलेले आहे की, पक्षांतर करणा-या व्यक्तीस किमानपक्षी विद्यमान संसदीय सभागृहाचा उर्वरित कालावधी किंवा पुढील नवीन निवडणूक होईपर्यन्तचा कालावधी या पैकी जे आधी घडेल त्या कालावधी पर्यन्त कोणतेही सार्वजनिक पद किंवा लाभकारी राजकीय पद धारण करण्यास मनाई करणारी तरतूद या बिलामध्ये करण्यात आलेली आहे. आता सार्वजनिक पद म्हणजे आमदारकीचे पद, नगरसेवक पद, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती सदस्य पद ही सार्वजनिक पदे आहेत काय ? तसे असेल तर मग ही पदे कोणालाही धारण करता येणार नाहीत. आता निवडणुका जाहीर झाल्यानसत्या तर मी एक याचिका दाखल करणार होतो. पक्षात फूट पडल्यामुळे निर्माण होणा-या अनर्हतेचा हा प्रश्न आहे. एक गट 2/3 संख्येने फुटला तर त्या पक्षाला दुस-या पक्षात विलीन व्हावे लागेल. त्या पक्षाला स्वतंत्रपणे बसता येणार नाही. घटनेमध्ये नव्याने केलेल्या सुधारणेमुळे आता "अ" किंवा "ब" गट करता येणार नाही. 1992मध्ये श्री. छगन भुजबळ यांच्या काळात जे घडले होते तसे आता घडणार नाही. काल या सदनामध्ये नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या संदर्भात जे बिल पास केले ते अत्यंत चांगले असे बिल होते. त्याची उपयुक्तता 10 वर्षांनी सिध्द होईल. तीन पक्षाचे तीन-तीन नगरसेवक निवडून आले तर बहुमत कोणाला मिळेल असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला होता. एकदा कायदा केल्यानंतर त्यातील त्रुटी जसजशा निदर्शनास येतील त्यानुसार त्यामध्ये सुधारणा होत जाईल. लोकशाही प्रगल्भ होण्याची ही प्रक्रिया आहे. केन्द्राने अशा प्रकारचा कायदा केल्यामुळे राज्यानेही तो करणे अभिप्रेतच आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षाने आपली पाठ थोपटून घेण्याचे कारण नाही. देशामध्ये लोकशाही राज्यव्यवस्थेचा काही बाबतीत दुरुपयोग होत चाललेला आहे हे केन्द्र सरकारच्या निदर्शनास आलेले आहे. ॲम्बिशिअस नेते, त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर असलेल्या पैशांच्या राशीमुळे, कोणालाही विकत घेऊ लागले आहेत. ते या लोकशाहीचे मातेरे-पोतेरे करायला लागले आहेत. सर्वसामान्य माणसाला लोकशाहीमध्ये टिकवायचे असेल, लोकशाहीमध्ये सर्वसामान्य माणसांचे प्रतिनिधित्व निर्माण करावयाचे असेल तर अशा प्रवृत्तीवर निर्बंध आणणे अत्यंत आवश्यक आहे. यासंबंधी मी वेळोवेळी माझी मते या सदनामध्ये परखडपणे मांडलेली आहेत. एखादा फुटला तर त्याला मर्ज व्हावे लागेल. पण यापुढे त्याला मर्ज होता येईल का ? ज्या पक्षाने निवडून दिले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

त्या पक्षाशी त्याला बेईमानी करता येणार नाही. कचरपट्टीमध्ये असलेल्या माणसाला येथपर्यन्त आणल्यानंतर तो पक्षाशी बेईमानी करु शकेल काय ? मी राजेश खन्ना हा नायक असलेल्या चित्रपटाचे एक उदाहरण देतो. त्या चित्रपटामध्ये नायक हा नाभिक असतो. एका राजकीय पक्षाचा मोठा पुढारी त्या गावामध्ये येतो. त्याला झोप लागते. झोपेत तो दाढी करायची आहे असे सांगतो. मग या प्रसिध्द नाभिकाला बोलावले जाते. तो त्या पुढा-याची झोपमोड होऊ न देता दाढी करतो. पुढारी उठल्या नंतर त्याला आश्चर्य वाटते. एवढ्या सफाईने दाढी करणारा नाभिक जगामध्ये आहे काय ? असा प्रश्न त्याला पडतो.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

म्हणजे ज्यावेळेला राजकीय प्रश्न निर्माण होतो की, कोणाला तिकीट द्यायचे, तिकीट मिळविण्यासाठी इतकी भांडणे होतात, निर्णय घेता येत नाही. तो निर्णय घेतो, मैं उसी को टिकट दूंगा जिसनें मेरी नींद मे दाढी बनायी है. त्या नाभिकाला तो उभा करतो. तो नाभिक निवडून येतो, आमदार बनतो. त्याच्यानंतर तो आपल्या कुशाग्र बुध्दिने संपूर्ण राज्याचा ताबा घेऊन मुख्यमंत्री बनतो. आज का एमएलए या नावाचा तो चित्रपट होता. म्हणजे सामान्य माणसामध्ये किती मोठी क्षमता असते, जर राजकीय क्षेत्रात त्याला वाव दिला तर? लॉटरीच्या बिलावर बोलताना अधिकाऱ्याला वाव दिला तर तो लॉटरीवाल्याला किती मोठा करु शकतो हे मी सांगणार आहे.

सभापती महोदया, ही अशी जी राजकीयदृष्ट्या ॲम्बिशस नसलेली माणसे लोकशाहीमध्ये काही करतात. या बिलाचे महत्व काय? तुम्ही एखाद्या पक्षामध्ये मर्ज झाला तर तुम्हाला हा पक्ष सोडून मर्ज होण्यापुरतेच मर्यादित असेल. परंतु त्या कालावधीपुरते, ५ वर्ष, ३ वर्षे जो काळ शिल्लक असेल त्या कालावधीमध्ये मर्ज झालेल्या कोणत्याही सदस्याला कोणतेही पद भूषण करता येणार नाही. म्हणजे त्याला जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद, विषय समितीचे सभापती पद स्वीकारता येणार नाही. तो नव्याने मर्ज झालेल्या पक्षाचा एक साधारण सदस्य असेल इतके हे बिल महत्वाचे आहे. हे जर महत्वाचे असेल तर त्याला लोकशाहीमध्ये मोल एवढ्याकरीता आहे की, हे स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता आहे की विधिमंडळाकरीता? विधिमंडळाकरीता नाही. माझे हेच म्हणणे आहे, एखाद्याने माझे जमत नाही, या पक्षाशी जमत नाही म्हणून राजीनामा दिला. मी दुसऱ्या पक्षात गेलो. त्या पक्षात जात असताना पुन्हा मी निवडणूक लढविण्यास उभा राहतो. तेव्हाही मी तोच होतो. असे असताना निवडणुकीसाठी एवढा मोठा खर्च जनतेच्या खिशातून करावयाचा का? घटनेच्या तरतुदीप्रमाणे, निवडणूक आयोगाप्रमाणे जर व्हॅकेन्सी निर्माण झाली तर ती भरली पाहिजे. ठराविक मुदतीत भरली पाहिजे. सहा महिन्याच्या आत पोटनिवडणूक घेतली जाते. तेव्हा ज्याने ही निवडणूक लादली त्याला पुन्हा पुढची टर्म पूर्ण होईपर्यंत ६ वर्षाकरीता निवडणूक लढविता येणार नाही, दुसरा कोणीही लढवू शकेल अशा प्रकारचे निर्बंध जोपर्यंत येत नाहीत, हेच निर्बंध आता विधिमंडळामध्ये, विधानसभेकरीता जोपर्यंत येत नाहीत तोपर्यंत आया राम-गया राम हा जो विषय आहे, वादविवादातून माझ्या भविष्याकरीता जो विषय आहे, माझे पटत नाही म्हणून मला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

स्वीकारा हा जो विषय आहे हा विषय लोकशाहीमध्ये थांबविण्याकरीता महत्वाचा आहे. विधिमंडळाच्या पातळीपर्यंत तो यावा. लोकसभेबाबत बोलता येणार नाही. तो कायदा झाला म्हणून विधिमंडळाकरीता करता येईल व तो करणे आवश्यक आहे. दोन गोष्टी अशा घडतात आणि सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी याच्याशी सहमत होतील. हा टिकेचा किंवा असूयेचा विषय नसतो. माझ्यासारखा माणूस ४० वर्षे एका संघटनेमध्ये रात्रंदिवस काम करीत असतो, काम करता करता कार्यकर्ते घडवित असतो. त्या कार्यकर्त्यांना मी भविष्य देणार नसेल तर तो माझा पराभव आहे. नेत्याने कार्यकर्त्यांना घडविणे हे कोणत्याही पक्षामध्ये नेतृत्वाचे काम असते. मी ते आयुष्यभर करीत आलो. एखादी प्रभावशाली व्यक्ती माझ्या पक्षामध्ये येते, त्याच्याबरोबर सगळी महत्वाची स्थाने ग्रहण करीत जाते तेव्हा पक्षामध्ये आलेली ही सूज लोकांना सुखावह वाटते. कारण डोंगरे बालामृत घेतल्यानंतर बाळ जसे गुटगुटीत होते त्याप्रमाणे हे घडत असते. मात्र जे उपेक्षित होतात, त्यावेळी लोकशाहीमध्ये जे रात्रंदिवस पक्षासाठी झटतात त्यांच्यावर अन्याय घडत असतो. म्हणून मग ही प्रक्रिया विधिमंडळापर्यंत येऊन पोहोचली तर विधिमंडळामध्ये सर्वच पक्षाच्या नेत्यांना चिंता करावी लागणार नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अशा सदस्याने जर राजीनामा दिला आणि निवडणूका लागल्या तर या सदस्याला त्याचा कार्यकाळ संपेपर्यंत, पुढील पाच वर्षे निवडणूकीला उभे राहता येणार नाही. निवडणूक लागल्यानंतर त्या निवडणूकीमध्ये तो उपमेदवार सोडून दुस-या ऊमेदवारांना निवडणूकीसाठी उभे राहता येईल. लाभासाठी, सत्तेसाठी आज लोक काहीही करण्यास तयार आहेत. यासंदर्भात आपल्याला मी हरियाणा राज्याचे उदाहरण देऊ इच्छितो. हरियाणामध्ये सत्तेसाठी आणि लाभासाठी पूर्ण मंत्रीमंडळ गेले आणि त्यांनी या संधीचा फायदा घेतला. खरे म्हणजे हरियाणापासूनच या प्रथेला सुरुवात झालेली आहे. आपल्या घटनेनुसार आपल्याकडे लोकशाही पध्दत रुजलेली आहे. जगात सर्वात मोठी लोकशाही ही आपल्या देशात आहे. आपल्या देशात विविध जाती-धर्माचे-पंथाचे लोक असतांना सुध्दा आपल्या देशात लोकशाही आहे. आपल्या देशात विविध जाती धर्माचे लोक असतांना सुध्दा लोकशाही फोफावते आहे हे पाहून जगातील अनेक देश आश्चर्यचकीत होतात. त्यामुळे आपल्या देशातील लोकशाही अजून सुदृढ व्हावी यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीच्या संदर्भात या बिलाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारचा निर्णय घेतला जात आहे व तो स्वागतार्ह आहे. सभापती महोदया, या बिलाच्या संदर्भात माझी विनंती आहे की, या विधेयकाच्या संदर्भात जो कायदा आहे तो केंद्रशासनाचा आहे. त्यामुळे तशाच प्रकारचा कायदा आपल्या विधीमंडळात आणण्याची आवश्यकता आहे. या कायद्यामुळे सत्व, तत्व आणि पैशाच्या जोरावर त्याला त्या वर्षी तरी निवडणूक लढविता येणार नाही. पक्षाचे कार्यकर्ते प्रामाणिकपणे काम करीत असतात त्यांच्यावर अशा लोकांमुळे परिणाम होतो. असे होऊ नये म्हणून जो सदस्य राजीनामा देतो, ज्या सदस्यामुळे मध्यावधी निवडणूका घ्याव्या लागतात अशा सदस्याला त्या मध्यावधी निवडणूकामध्ये भाग घेता येणार नाही. यासाठी विधीमंडळात बिल आणण्याची नितांत आवश्यकता आहे अशी मी या बिलाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो. ज्यांच्या राजीनाम्यामुळे निवडणूका लादल्या जातात, ज्यांच्या राजीनाम्यामुळे त्या निवडणूकीचा भार जनतेला सहन करावा लागतो अशा मध्यावधी निवडणूकीत त्या सदस्याला उभे राहता येणार नाही यासाठी कायदा आणण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपल्या राज्यात जळगावमधून या प्रकरणाला सुरुवात झालेली आहे आणि सर्वत्र त्याचे लोण पसरते आहे. त्यानंतर हे लोण नगरमध्ये सुध्दा गेले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यामुळे ही पध्दती शासनाच्या दृष्टीने, लोकशाहीच्या दृष्टीने निश्चितच चांगली नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेबांनी सांगितले होते की, पक्षाचे उमेदवार असले पाहिजेत, अपक्ष उमेदवार नको. परंतु सभापती महोदय, घटनेनुसार आपल्याला हे करणे शक्य नाही. असे जर करावयाचे असेल तर त्यासाठी आपल्याला घटनेमध्येच दुरुस्ती करावी लागेल. त्यामुळे मला असे वाटते की, यामध्ये इमबॅलन्स होणार नाही याचीही काळजी घेण्याची आवश्यकता आहे. राजीनामा दिलेल्या सदस्याला त्याचा कार्यकाळ संपेपर्यंत दुसरी निवडणूक लढविता येणार नाही अशा प्रकारची तरतूद कायद्यात करणे आवश्यक आहे. असे जर झाले तर आपली लोकशाही निकोप आणि सुदृढ होऊ शकेल, तसेच असे केले तर ते देशाच्या दृष्टीने आणि लोकाशाहीच्या दृष्टीने चांगले होईल अशी सूचना करुन या विधेयकाचे मनापासून स्वागत करतो व दोन शब्द पूर्ण करतो.

------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 91- महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता(सुधारणा) विधेयक, 2006 आणल्याबद्दल मी त्यांचे सुरुवातीलाच स्वागत करतो. मला वाटते अशाच प्रकारचे बील मध्यंतरी सुध्दा आणले होते व त्यामध्ये तरतुदीही करण्यात आल्या होत्या. परंतु यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, हे बिल पूर्णत्वास जाईल यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. पक्षांतर करण्यासाठी 1/3 ची पध्दत होती. आताच्या बिलामध्ये पक्षाने दिलेल्या निर्देशाच्या विरुध्द सदस्य गेला तर मतदानापसून किंवा वर्जनापासून पंधरा दिवसांच्या आत, अशा राजकीय पक्षाने किंवा आघाडीने किंवा फ्रंटने किंवा व्यक्तीने किंवा प्राधिका-याने असे मतदानाचे किंवा वर्जनाचे कृत्य क्षमापित केलेले नसेल तर, तो सभासद किंवा सदस्य राहण्यास अनर्ह होईल. निवडून आलेला सदस्य जर 15 दिवसात पक्ष किंवा आघाडी सोबतची संलग्नता सादर केली नाही आणि त्या पक्षाचे / आघाडीच्या आदेशाचे पालन केले नाही तर त्याचे सदस्यत्व रद्द होईल असे म्हटले आहे. या संदर्भातील जो कायदा आहे तो केद्रशासनाचा आहे त्यामुळे त्या कायद्याचे आपण आपल्या विधानसभेत अनुकरण केले पाहिजे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.अरविंद सावंत.........

एखादा आपले स्वत्व आणि तत्व सोडून सत्तेचे पद मिळणार म्हणून पक्षांतर करीत असतो. जर एखाद्याला खरोखरच पक्षातून बाहेर जायचे झाले तर त्याने सदस्यत्व रद्द झाले तरी हरकत नाही पण मी स्वत्व गमावणार नाही या कारणातून कोणी राजीनामा दिला तर आपण समजू शकतो. पण अशी वस्तुस्थिती घडत नाही. आता आपण स्थानिक प्राधिकरणांमध्ये पक्षांतरास बंदी करणारे विधेयक आणलेले आहे. अशाप्रकारचा कायदा विधिमंडळाला देखील लागू झाला पाहिजे.सभापती महोदय,ज्याप्रमाणे राज्यसभेची निवडणूक खुले मतदानपध्दतीने होते त्याप्रमाणे विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये सुध्दा खुले मतदान पध्दत आणली पाहिजे.जेणेकरुन घोडेबाजारास आळा बसू शकेल.

सभापती महोदय, महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाचे विधेयक केंद्रांत अजून आलेले नाही. प्रत्येकवेळी त्याची चालढकल होते. महिलांच्या आरक्षणाबाबत लोकांसमोर एक बोलायचे आणि पाठीमागे एक बोलायचे त्यामुळे हे विधेयक अजूनपर्यंत केंद्रात आलेले नाही. विधानसभेद्वारा निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात केंद्राचा कायदा असला तरी राज्य सरकारकडून तशाप्रकारची शिफारस आपण केंद्राला करु शकतो. नगरपालिका, जिल्हापरिषदांसाठी पक्षांतरबंदी लागू केलेली आहे. त्याप्रमाणे विधानसभेसाठी देखील ही तरतूद लागू करावी अशाप्रकारची शिफारस आपल्याकडून केली जावी. सरकारने हे विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी हे विधेयक आणल्याबद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. या देशात "आयाराम-गयाराम"ची संस्कृती सुरु झालेली आहे त्यास कुठेतरी पायबंद घालण्याचा प्रयत्न या विधेयकातून झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी एक अतिशय महत्वाचा मुद्दा याठिकाणी मांडला त्याचे मी समर्थन करीत आहे. काही मंडळी वर्षानुवर्षे ज्या पक्षात राहिलेली असतात अशी मंडळी सत्तेसाठी तो पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जातात. त्यांना अचानकपणे साक्षात्कार होतो. त्यांच्या विचारात अचानक परिवर्तन झाले अशी भूमिका घेऊन ते पक्षांतर करतात. ही मंडळी तत्वासाठी पक्षांतर करीत नाहीत तर सत्तेसाठी पक्षांतर करतात. दुर्दैवाने आपल्याकडे अशी तरतूद आहे की, सहा महिने कोणताही सदस्य दोन्ही सभागृहाचा सदस्य नसला तरी त्यास सत्तेवर राहता येते. याचा फायदा ही मंडळी घेतात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये त्या त्या पक्षाच्या सदस्यांनी आपण कोणाला मत दिले ते खुलेपणाने दाखविले पाहिजे तीच पध्दती विधानपरिषदेच्या बाबतीत सुध्दा लागू झाली पाहिजे. मी राज्यसभेच्या निवडणुकीच्यावेळी एजंट होतो. ज्यांनी पक्षांतर केले ते मनाने दुसऱ्या पक्षात होते. पण जे मूळ पक्षात होते त्यांनासुध्दा कायद्यान्वये पक्षाने ठरवून दिलेल्या उमेदवाराला मतदान करावे लागले. हे आपण यावेळी झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत पाहिले. अशाचप्रकारचा कायदा विधिमंडळात देखील संमत करण्यात यावा. म्हणजे आयाराम-गयाराम संस्कृतीस, जे सत्तेच्या भूकेपोटी पक्षांतर करतात त्यास कुठेतरी पायबंद बसेल.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

म्हणून तशा पध्दतीची जी सूचना माननीय श्री.दिवाकर रावते यांनी दिलेली आहे, त्याचे मी पूर्णपणे समर्थन करतो. या बिलाच्या बाबतीत आपण परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे. असे एक परिपूर्ण बिल या सभागृहाच्या माध्यमातून आपण परत आणावे व त्याबाबत केंद्र सरकारकडे शिफारस करावी, अशी विनंती करतो.

धन्यवाद !

-------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, हे बिल अतिशय चांगले असून हे बिल याठिकाणी आणल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु बिलातील खंड 3 (क) मध्ये असे म्हटले आहे की, " ज्या दिनांकास तो एखाद्या स्थानिक प्राधिकरणाची निवडणूक लढवील व तो निवडून आल्याचे जाहीर होईल तो दिनांक, यांपैकी जो आधीचा असेल अशा दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता, कोणतेही लाभकारी राजकीय पद धारण करण्यासदेखील अनर्ह होईल." परंतु त्याला आपल्या महामंडळाचे अध्यक्ष होता येईल. त्यामुळे याबाबतीत आपण स्पष्टीकरण द्यावे. अशी पदे सोय करण्यासाठीच असतात. त्याने राजीनामा दिला तरी त्यास महामंडळाचे पद देता येईल व त्यादृष्टीने त्यास लाल दिव्याची गाडी मिळेल, कॅबिनेट मंत्रिपदाचा किंवा राज्य मंत्रिपदाचा दर्जा मिळेल. त्यामुळे याबाबतीत मार्गदर्शन व्हावे. दुसरे असे की, हे बिल स्वर्गीय राजीव गांधी यांनी सुरुवातीस आणले. परंतु त्यानंतरच्या वाईट अनुभवातून आपण हे बिल परिपक्वतेतून राज्यांनी, केंद्राने केले. परंतु आपण यामध्ये 2 मर्जरला परवानगी दिलेली आहे. आता आणलेले बिल चांगले आहे, परंतु हे बिल आणखी परिपक्व करुन याठिकाणी आणावे. कारण, मला निवडून आणण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतलेले असतात, परंतु याठिकाणी भविष्यात मर्जर अलाऊ करावयाचा असेल तर तो पक्षाचा राजीनामा देऊन दुस-या पक्षात जातो. अशाचप्रकारे हरियाणाचे भजनलाल हे दुसऱ्या पक्षात गेले, ते 1/3 नाही, 2/3 नाही तर 100 टक्के लोकांना घेऊन मोठा गाजावाजा करीत सत्तेच्या सिंहासनावर जाऊन बसले. त्यामुळे या बिलावर आपण परत सर्वंकष विचार करुन ते परिपूर्ण असे करुन पुढच्या वेळी याठिकाणी आणावे, असे मला वाटते. पुन्हा एकदा एक चांगले बिल याठिकाणी आणल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

धन्यवाद !

--------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था): माननीय सभापति महोदय, सन् 2006 के वि.स.वि. क्रमांक 91 पर अपने विचार रखने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं. सभापति महोदय, सबसे पहले मैं इस बिल का स्वागत करता हूं, लेकिन एक बात मैं यहां पर अवश्य कहना चाहूगा कि यहां पर जो बिल आते हैं वे सभी बिल जिला परिषद और नगर परिषद सदस्यों पर ही बंधन लगाने के लिए आते हैं, विधान सभा और विधान परिषद सदस्यों पर बंधन लगाने के लिए कोई बिल यहा ंपर नहीं लाया जाता. सिर्फ नगर परिषद और जिला परिषद के बारे में ही यहां पर टीका टिप्पणी की जाती है. उदाहरण के लिए कहा जाए तो महिलाओं के 33 प्रतिशत आरक्षण की बात यहां पर कही जा सकती है. महिलाओं को 33 प्रतिशत आरक्षण देने का कानून जिला परिषद और नगर परिषद में ही लागू है, वह कानून विधान सभा, विधान परिषद और संसद के बारे में लागू नहीं किया गया है. वास्तविक स्थिति यह है कि विधान परिषछ, विधान सभा और संसद में काफी पढ़े लिखे लोग रहते हैं तथा नगर परिषद और जिला परिषद में आज भी काफी लोग अनपढ़ हैं. उन सदस्यों के बारे में जब कोई केस चलता है तो कलेक्टर के पास से उसका कोई डिसीजन जल्दी से नहीं लगता है. मुझे कहना है कि इस तरह का रुल बनाया जाना चाहिए, जिससे किसी भी केस का रिजल्ट कलेक्टर के पास से दो-तीन महीने में आ जाये. वहां पर यदि कोई सदस्य डिस्क्वालिफाय हुआ तो उसका रिजल्ट कई-कई महीने तक नहीं आता है. वहां पर फैमिली प्लानिंग का कानून भी लागू किया गया है. उस कानून में निश्चित वर्ष दिया गया है कि उस वर्ष के बाद यदि किसी ने बच्चा पैदा किया तो वह व्यक्ति नगर परिषद और जिला परिषद का सदस्य नहीं रह सकता. मैं कहना चाहता हूं कि यह कानून विधान सभा और विधान परिषद सदस्यों के बारे में लागू क्यों नहीं किया जाता ? हर बार सभी बंधन अपने से छोटे लोंगों पर ही क्यों लागू किए जाते हैं. यह तो उसी तरह की बात हो गयी जिस तरह से एक दारु पीने वाला बाप अपने बेटे को कहता है कि तू दारु मत पी. ऐसा करना ठीक नहीं है.

माननीय सभापति महोदय, मेरा संबंध नगर परिषद से रहा है. हम नगर परिषद में खरीदी करते हैं तो उसका ऑडिट होता है. मैंने एक बार नगर परिषद में रेन कोट खरीदी किए और उसकी कोटेशन 10 हजार रुपए की आयी तो ऑडिटर ने ऑडिट करते समय कहा कि यह गलत

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुदीन जव्हेरी....

हुआ है. इसलिए उस समय मुझसे 10 हजार रुपए वसूल किए गए. सभापति महोदय, मैं कहना चाहता हूं कि हो सकता है कि वे रेन कोट 10 हजार रुपए के नहीं होंगे, लेकिन वे रेन कोट 9 हजार रुपए या 8 हजार रुपए कीमत के तो अवश्य रहे होंगे, ऐसा होने के बाद भी मुझ से पूरे 10 हजार रुपए वसूल किए गए. मैं बताना चाहूंगा कि इस तरह से वहां के लोगों पर अन्याय होता रहता है. मुझे पूछना है कि इस तरह का बंधन मंत्रियों के बारे में क्यों नहीं है. आज जिला परिषद की पूरी खरीदी मुंबई से होती है, दवाई खरीदनी हो, सीमेंट खरीदनी हो, मशीनरी खरीदनी हो या दूसरी चीजें खरीदनी हो, उन सब चीजों की खरीदी मुंबई से होती है. एक हजार रुपए की मशीनरी की खरीद 10 हजार रुपए में होती है. मुझे पूछना है कि उनका ऑडिट क्यों नहीं होता है ? यदि हम कोई कायदा बनाते हैं तो वह कायदा हम खुद पर लागू क्यों नहीं करते हैं. यहां पर भी करोड़ों रुपए का भ्रष्टाचार होता है. नगर परिषद की हालत आज यह है कि यदि किसी सदस्य की मृत्यु हो जाती है तो उसकी वसूली उसके परिवार के सदस्यों से होती है. इन सब चीजों की वजह से उन लोगों की प्रॉपर्टी ट्रांस्फर नहीं हो रही है. मैं इस बिल का स्वागत करता हूं लेकिन मुझे यही कहना है कि हमारी भी कुछ जवाबदारी है, आमदार, खासदार और मंत्रियों के बारे में भी ऑडिट करने का कानून लागू होना चाहिए. इतना कहते हुए मैं इस बिल का स्वागत करता हूं. धन्वाद.

-0-

इसके बाद श्री गागरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGS/ MHM/ D/ यापूर्वी श्री. गागरे.... 11:00

श्री.राजेश टोपे..... ( पुढे सुरु )

2/3 च्या माध्यमातून मर्जर करता येईल. कोणत्याही परिस्थितीत काही विशिष्ट संख्येच्या माध्यमातून पुन्हा दुसऱ्या पक्षात जाण्यास प्रतिबंध या बिलाच्या माध्यमातून करण्यात येईल त्यासाठी हे बील मंजूर करावे अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचा भाग झाले.

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 91-महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 91संमत झाले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

M-2....

**पृ.शी.**: लॉटऱ्यांवरील कर विधेयक

**मु.शी.**: L.A. BILL NO. XCI OF 2006

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOCAL AUTHORITY MEMBERS' DISQUALIFICATION ACT, 1986.)

श्री. जयंत पाटील ( अर्थमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 96. लॉटऱ्यांवरील कर बसविण्यासाठी व तो गोळा करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 96. लॉटऱ्यांवरील कर बसविण्यासाठी व तो गोळा करण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयका संबंधी मंत्री महोदयांनी थोडक्यात पार्श्वभूमी विषद करावी.

श्री. जयंत पाटील : महाराष्ट्र लॉटरीवरील कर अधिनियम 2006 चे विधेयक सभागृहात मांडण्यासाठी मी उभा आहे. 31 मार्च 2004 पर्यंत लॉटऱ्यांच्या उलाढालीवर कर लावण्यात येत होता. आता एप्रिल 2005 पासून पुढील अंमलबजावणी सुरु झाली आहे. मूल्यवर्धीत करामध्ये लॉटरी नसल्यामुळे तेव्हापासून आजतागायत महाराष्ट्र शासनाला लॉटऱ्यांवरील करापासून कुठलाही महसूल मिळत नव्हता त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक 96 हे मी आपल्या अनुमतीने मांडतो. या करापासून महाराष्ट्र राज्याला दरवर्षी 150 कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची शक्यता आहे. तसेच या करामुळे राज्यात भरमसाठ चालणाऱ्या दोन अंकी लॉटऱ्यांना आळा घालणे हे या टॅक्सचे उदिष्ट आहे. कर मिळविणे हा दुय्यम हेतू आहे. दर पंधरा-पंधरा मिनिटांनी चालणाऱ्या लॉटऱ्यांची संख्या वाढलेली आहे. हे सर्व बंद करण्यासाठी आपण ॲडव्होकेट जनरल, विधी व न्याय विभाग वगैरे सर्वांचा सल्ला घेतला. या सर्वांचे असे मत पडले की, राज्यात जोपर्यंत एखादी तरी लॉटरी चालू आहे तोपर्यंत तुम्ही एखाद्या विशिष्ट लॉटरीवर बंदी आणू शकणार नाही.

यानंतर श्री. रोझेकर.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.......

कारण महाराष्ट्र सरकारची लॉटरी विक्री करणारे हजारो लोक महाराष्ट्रात आहेत. मधल्या काळामध्ये म्हणजे सन 2002 च्या दरम्यान ज्यावेळी सन 1999 च्या नंतर पहिल्यांदा असे निदर्शनास आले की, या राज्यामध्ये पर राज्यातील 2/3 अंकी लॉट-या मोठया प्रमाणात चालू आहेत. म्हणून मी चौकशी केली की, आपल्या आणि परराज्यातील एकूण लॉटरी विक्रीमध्ये महाराष्ट्र सरकारचा शेअर किती आहे ? असे लक्षात आले की, आपला शेअर अगदी कमी आहे. एकूण ट्रॅन्झॅक्शन 2 ते 3 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असतांना आपला वाटा अतिशय कमी आहे. यावर उपाय म्हणून लॉटरी ॲक्टच्या कलम 9 मध्ये आपण बदल केला व 2 व 3 अंकी लॉट-यांवर बंदी घातली. त्यावेळी 2 व 3 अंकी लॉट-या या नॉर्थ ईस्ट स्टेटच्या होत्या म्हणून यासंबंधीचे अपील गोहत्ती उच्च न्यायालयामध्ये गेले. आपणही त्या ठिकाणी आपली बाजू मांडल्यानंतर नियम 9 रद्द करावा, अशा प्रकारचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला. पुढे मग फुल बेंचसमोर हे अपील गेले. ते छोटे राज्य असल्यामुळे न्याय व्यवस्थेबाबत मी काही बोलू इच्छित नाही. त्या ठिकाणीही आपले म्हणणे अमान्य करण्यात आले. मग परराज्यातील 2 व 3 अंकी लॉट-या चालू असल्यामुळे आपल्या राज्याचा बिझ नेस कमी होत चालला होता त्यामुळे राज्य सरकारनेही 2 व 3 अंकी लॉट-या सुरु केल्या. अर्थातच राज्य सरकारचा शेअर वाढला, 2 ते 6 कोटी रुपये असलेले उत्पन्न 35 कोटी रुपयांपर्यन्त वाढले. त्यानंतर आपल्या 2 व 3 अंकी लॉट-या, परराज्यातील 2 व 3 अंकी लॉट-या या इंटरनेटवर विकण्याची पध्दत सुरु झाली. त्यामुळे तरुण मुलांची लॉटरी घेण्याची संख्या वाढली, यासंदर्भातील पडसाद विधिमंडळातही उमटले. सगळयांच्या भावना अशा होत्या की, या लॉट-या थांबविल्या पाहिजेत. सकाळी 6 वाजता मुले जातात, लॉट-या काढतात, 15 मिनिटांनी लॉट-यांचा ड्रॉ येतो, त्यामुळे हे थांबविणे आवश्यक झाले होते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यासंदर्भात विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात आला. त्यांनी असा सल्ला दिला की, एकतर ब्लॅंकेट बॅन करावा लागेल किंवा डिटरन्ट टॅक्स बसवावा लागेल. म्हणून आपण हा कायदा आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यानुसार कल्पना ही आहे की, मधल्या काळात सर्वोच्च न्यायालयाने लॉटरीसंदर्भात एक निकाल दिला. लॉटरी ही विक्री करातील मालाच्या व्याख्येत बसत नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 28/04/2006 च्या निकालात म्हटले आहे.

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) N-2

SRR/ KGS/ MAP/ 11:05

श्री.जयंत पाटील...........

विक्रीकर बसविता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निवाडा दिल्यामुळे आपण आता ड्रॉ काढण्यावर टॅक्स बसविण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपला हा प्रयत्न करण्याची आवश्यकता ही आहे की, या राज्यामध्ये जे 15/15 मिनिटांचे ड्रॉ होतात त्यामुळे येथील तरुण मुले ॲडिक्ट होतात. मागच्या काळात बुलढाणा शहरामध्ये पोलिसांनी लॉटरी विक्रेत्यांवर मोठया प्रमाणात धाडी टाकल्या. परंतु या धाडी महाराष्ट्र राज्य सरकारच्या लॉटरी विक्रेत्यांवर पडल्या. खरे तर या धाडी परराज्यातील लॉटरी विक्रेत्यांवर पडावयास हव्या होत्या. त्यानंतर आपण असा विचार केला आणि संबंधितांना विनंती केली की, महाराष्ट्र सरकारच्या लॉट-या विकणारे जसे आहेत तसेच परराज्यातील आहेत त्यांच्यावरही रेड टाकावी. पंजाबमध्ये अशी परिस्थिती आहे की, परराज्यातील लॉटरी विक्रेत्यांना त्या ठिकाणी येऊच देत नाहीत. त्यामुळे त्या राज्याला 100 ते 150 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. आपला प्रयत्न हा आहे की, परराज्यातील लॉटरी विक्री कमी व्हावी. आपल्या राज्यातील लॉट-या चालल्या तर आपण एकवेळ समजू शकतो. तसेच, मुलांचे ॲडिक्शन कमी झाले पाहिजे. यामुळे या दुरुस्तीअन्वये आपण असे ठरवित आहोत की, साप्ताहिक लॉट-यांवर 50 हजार रुपये, पाक्षिक लॉट-यांवर 1 लाख रुपये, मासिक लॉट-यांवर 2 लाख रुपये आणि भव्यतम लॉट-यांवर 10 लाख रुपये टॅक्स लावावा.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील..........

मध्यंतरी राज्यातील प्रमुख लॉटरी विक्रेत्यांची बैठक बोलाविण्यात आली होती. त्यांना सांगण्यात आले की, सकाळपासून लॉटरीची विक्री सुरु होते ती दुपारी 1 वाजेपासून सुरु करावी. त्यांना टाईम रेग्युलेशन ठरवून दिले. लॉटरी विक्रेत्यांनी टॅक्स भरला पाहिजे. मागे आपण एक विधेयक मागे घेतले होते. ते विधेयक पुन्हा आणून त्या विधेयकाला सर्वांची मान्यता घेतली पाहिजे. मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांबरोबर एक बैठक घेतली. आम्ही दोघांनी राज्यातील लॉटरी विक्रेत्यांना सांगितले की, जे ॲडिक्शन होते ते 10-15 मिनिटांच्या लॉट-यांमुळे होते, ही आपली भूमिका होती. कर्नाटकमध्ये पूर्वी 4,200 ड्रॉ निघायचे. अशा स्वरुपाचे टॅक्स लावल्यानंतर कर्नाटक सरकारच्या ऐरियामध्ये 700 च्या दरम्यान डॉ निघतात. टॅक्स बसविल्यानंतर ड्रॉची संख्या कमी होते हा अनुभव पंजाब आणि कर्नाटकमध्ये आहे. पंजाबमध्ये दुस-या राज्यांच्या लॉट-या चालत नाहीत. यामध्ये समाजातील मुले ॲडिक्ट होऊ नये हा महत्वाचा भाग आहे. राज्य सरकारने लॉट-यांवर टॅक्स लावल्यामुळे तूट कशी होते हे त्यांना समजले व त्यानंतर काहींनी व्यवसाय सोडून दिला तर काही तो करीत आहेत. मागच्या काळात राज्य सरकारचा लॉटरीतील शेअर कमी असतांना या राज्यात दुस-या राज्यातील लॉट-या चालत होत्या. हे असे चालत असेल तर ते थांबले पाहिजे. दोन-तीन डिजीटच्या लॉट-या कमी झाल्या तर ओरिजिनल ट्रॅडिशनल लॉट-या चालतील. तेव्हा या विधेयकावर चर्चा करुन सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

--------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचीत) : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. विधेयक आणण्याचा उद्देश सांगतांना माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करतांना मंत्री महोदयांनी सरकार महसूल जमा करण्याचा प्रामुख्याने प्रयत्न करीत असते हे सांगितले. महसूल जमा करण्यासाठी ज्या अडचणी आहेत त्या दूर व्हाव्यात यासाठी हे विधेयक आणलेले आहे असे माननीय मंत्री महोदयांच्या निवेदनावरुन आणि विधेयक वाचल्यानंतर माझा समज झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये जुगारी प्रवृत्ती मोडून काढावी असे सरकारला वाटते. जुगारी प्रवृत्ती मोडता येत नसेल तर महसूल कसा वाढवावा ही चिंता आपण व्यक्त केली. विधेयकाचे उद्देश व कारणे यामध्ये असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र राज्यात लॉट-यांची खरेदी-विक्री करीत असलेल्या किंवा लॉटरी योजना चालवीत असलेल्या प्रवर्तकांची सक्तीने नोंदणी करण्याची तरतूद आहे." पुढे असे म्हटलेले आहे की, लॉटरी योजनांवर कर बसवणे व तो गोळा करणे आणि प्रवर्तकाकडून कराची आगाऊ रक्कम घेणे या बाबींसाठी तरतूद करणे." प्रवर्तकाकडून कराची आगाऊ रक्कम घेणे हे मला कळलेले नाही. समजा मी जर लॉटरी व्हेंडर असेल तर मी या वर्षाला एवढया लॉट-या विकल्या, मी सरकारकडे आगाऊ रक्कम भरली. मी जास्त तिकिटे मागविणार नाही. मी रक्कम भरलेली आहे त्याचे बॅलन्सशिट कसे ठेवणार ? हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

त्याबद्दल आपण वाटल्यास नंतर सांगावे. ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यामध्ये असे आहे की, सगळ्या राज्यातील लॉटऱ्यांचे घाऊक एजंटस् आहेत त्यांना पुढील आठवड्यामध्ये माझी ही ही लॉटरी येते आहे असे सांगितले तर त्यापूर्वी 8 दिवस अगोदर त्यांनी त्यासाठीचे 50 हजार आगाऊ भरायचे. त्यांनी 50 हजार रूपये भरल्याशिवाय त्यांनी महाराष्ट्रातील सेल चालू करावयाचा नाही असे त्यांना सांगितलेले आहे. ॲडव्हान्स त्यांच्याकडून यासाठी घ्यायचा की यनंतर मग कर घेण्याची, त्यांचा हिशोब घेण्याची गरज नाही. ...

श्री. दिवाकर रावते : मार्टीन हा एकच तर एजंट आहे ...

श्री. जयंत पाटील : नाही. त्यामध्ये वेगवेगळे असे 17 लोक आहेत. मार्टीन म्हणून जो होता तो आता लॉटरीचा धंदा सोडून निघून गेलेला आहे.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती डॉ.वसंत पवार )**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, म्हणजे लमसम घ्या आणि पाहिजे ते करा असेच आपले सांगणे आहे. अर्थात ते तसे असेलच असे नाही वा तसे ते असेल असा आमचा दावाही नाही. पण 50 हजार आगाऊ भरायचे आणि मग बाकी कर वगैरेचा हिशोब ठेवण्याचीही गरज नाही. म्हणून लमसम पैसे आगाऊ भरा असे आपण त्यांना सांगितले आहे असे मला वाटते. त्यांनी जेवढ्या लॉटऱ्या ते विकत असतील त्या प्रत्येकावर कर लावण्यापेक्षा एकदम एक रकमी कर आगाऊ आपण त्यांच्याकडून घेत आहात असा आम्ही यातून अर्थ घेतो आहोत. आता त्यावरील सेल्स टॅक्सचा तर प्रश्नच येत नाही. कोर्टाकडूनच त्याबाबत निकाल दिलेला आहे. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, यामध्ये मला ज्या उणीवा दिसतात त्या मी आपल्याला सांगतो आहे. आता यातील जुगार हा जो विषय आहे त्यावर मी नंतर बोलणार आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मला बोलण्याची जी काही स्फूर्ती आलेली आहे ती या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी बसलेले असल्याने आलेली आहे. त्यांचे सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व त्याला कारणीभूत आहे. तालिका सभापती महोदय, आपण देखील त्यामध्ये समाविष्ट आहात. अशा प्रकारे सगळी स्फूर्तीस्थाने समोर असल्यानेच बोलावयास बरे वाटते. सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी हे खालच्या सदनातून निवृत्त झाल्यानंतर आता आपल्या या

....... पीपी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सदनामध्ये आले आहेत हा आमच्या सदनाचा गौरवच आहे असे मी समजतो. त्याबद्दल त्यांचे नेते माननीय श्री.शरद पवार यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण या सदनामध्ये विद्वत्तेचा सन्मान नेहमीच होतो. तालिका सभापती महोदय, आपल्यालाही येथे येण्याची संधी तशी उशीरानेच मिळालेली आहे. असो. सभापती महोदय, या विधेयकात (ग) मध्ये आपण म्हटले आहे की, प्रवर्तकाकडून देय असलेल्या कराचे वार्षिक निर्धारण करण्यासाठी तरतूद करणे. आताच आपण असे म्हटले की, कोणती लॉटरी येणार आहे, मग ती 1 लाखाची असो वा दोन लाखाची असो, नवीन लॉटरी असेल वा सोडत असेल तर त्याप्रमाणे आगाऊ अशी काही रक्कम त्याने भरायची आहे. त्याअगोदर (ख) मध्ये म्हटले आहे की, लॉटरी योजनांवर कर बसविणे व तो गोळा करणे आणि प्रवर्तकाकडून कराची आगाऊ रक्क्म घेणे या बाबींसाठी तरतूद करणे. आता या दोन्ही एकमेकांशी विसंगत वाटतात. तुम्ही दोन महिन्यांनी येणाऱ्या लॉटरीवर, एक आठवड्याच्या लाूटरीवर कर घेणार असाल तर असे असताना वार्षिक निर्धारण हा विषय काय आहे ? सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये याबाबत खुलासा करावा. मी काही अकौंटींगमधील तज्ज्ञ नाहीत. त्यामुळे मला हे समजण्यास जरा कठीण जाते आहे एवढेच. सभापती महोदय, पुढे (घ) मध्ये आपण म्हटले आहे की, विवक्षित परिस्थितीमध्ये कराची वसुली करण्यासाठी विशेष वसुली पद्धतीची तरतूद करणे. आणि (ड) मध्ये म्हटले आहे की, या अधिनियमाच्या तरतुदींचा भंग केल्याबद्दल शास्ती बसविण्याची व शिक्षा करण्याची तरतूद करणे. सभापती महोदय, हा क्लॉज बरोबर आहे. राज्याला जे फसवितात त्यांच्यावर निर्बंध आणि नियंत्रण हे असलेच पाहिजे.

( यानंतर श्री. सरफरे .....क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, काल मी माननीय श्री. नरेंद्र मोदी यांची प्रशासनावर किती पकड आहे हे सांगत होतो. मंत्र्यांवरही त्यांची पकड आहे. असे ऐकले होते की, देशामध्ये तीन मुख्यमंत्री कार्यक्षम म्हटले जातात. त्यामध्ये माननीय श्री. नरेंद्र मोदी हे नंबर वन आहेत. त्यांचा नोकरशाहीवर पगडा आहे. एका व्यक्तीने सांगितले की, ते माझे मामा आहेत, त्यांचे भाडे पध्दतीवर नियंत्रण आहे. तुम्ही जर आपली जागा भाडयाने दिली तर सरकारला कळविले पाहिजे. त्यामधून सरकारला कर मिळाला पाहिजे असे माझ्या मामाने सांगितले. त्यानंतर त्याने भाडयाने घर घेतले.दुसऱ्या आठवडयात त्याला कर भरला नाही म्हणून दहा हजार रुपयांचा दंड लागला. माझ्या मामाच्या अधिकाऱ्यांकडून तो वसूल केला गेला. अशाप्रकारे प्रशासनावर कायद्याची पकड आहे. शासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये सुध्दा कारवाई करण्याची ताकद असली पाहिजे. एखादी गोष्ट केली नाही तर काय होईल अशी भीती असली पाहिजे. शेवटी सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीवर प्रशासन चालते. आपण जे काम, कर्म करतो त्याप्रमाणे आपले अधिकारी बोलत असतात, वागत असतात. तुम्ही हा क्लॉज घातल्यामुळे आम्हाला त्याची भीती वाटायला लागली आहे. या क्लॉजमुळे भ्रष्टाचाराला नक्की वाव निर्माण केला आहे. आपण क्लॉजमध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्र राज्यात लॉटरीच्या योजनांची थेट खरेदी-विक्री करत नसेल किंवा ती चालवीत नसेल त्या सरकारने किंवा देशाने त्यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यात लॉटरीच्या तिकिटांची खरेदी विक्री करण्याकरीता राज्यातील पहिला आयातक म्हणून ज्या व्यक्तीची नियुक्ती केली असेल", महाराष्ट्रातील सर्व लॉटरी विक्रेते हे नोंदणीकृत असतील. त्या व्यतिरिक्त असतील तर ते कायद्याच्या बडग्याखाली येतील. आपण याठिकाणी हे चांगले काम केले आहे. परंतु नोंदणीकृत विक्रेता ज्यावेळी बेकायदेशीर काम करील त्यावेळी या धंद्याच्या माध्यमातून भ्रष्टाचार बोकाळेल.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, एका तहसिलदाराच्या घरावर रेड टाकण्यात आली, त्यामध्ये कोटयावधी रुपयांची रक्कम प्राप्त झाली. यासंबंधी सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. त्यावेळी सुदैवाने माननीय महसूल मंत्री सभागृहामध्ये बसले होते. आपल्या खात्याचा मंत्री जर कोटयाधीश असेल तर त्या खात्याचे अधिकारी कसे असतील? शीतावरुन भाताची परिक्षा. हे राज्य कसे चालले आहे? राज्याच्या प्रशासनावर तुमची पकड पाहिजे. आपल्याला माहीत आहे, एखादा सामान्य माणसाचे किंवा आमदाराचे पैसे दिल्याशिवाय काम होत नाही, ते काम नाकारले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Q 2

DGS/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

जाते अशी आजची परिस्थिती असून ती वाईट आहे. अशाप्रकारे नोकरशाहीमध्ये भ्रष्टाचार बोकाळला आहे. ज्यावेळी आपण अशाप्रकारचा कायदा करतो त्यावेळी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून ज्या गोष्टी घडतात त्याला आळा घालण्यासाठी या तरतुदीचा फायदा किती होत असतो? या सदनामध्ये माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी 2 हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण मांडले होते. ते कोटयावधी रुपये वसूल झाले की नाही मला कळले नाही. तुमचे आणि त्यांचे बाहेर काय बोलणे झाले ते मला समजले नाही. परंतु सदनामध्ये त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये तुम्ही त्यांना 20 कोटी रुपये देणार होता. इनफार्मामधील 2 हजार कोटींचा तो भ्रष्टाचार होता. त्याबाबत 10 टक्क्याप्रमाणे 20 कोटी रुपये त्यांना मिळणार होते. त्यांनी चोरी उघडकीस आणली होती. त्यावेळी ते म्हणाले की, माननीय श्री. देशमुख साहेब तुम्ही व्यवस्थित उत्तर देता. तेव्हा त्यांना काय वाटले माहीत नाही. ते खालच्या सदनामधून वरच्या सदनामध्ये आले आणि म्हणाले की, मी उत्तर देतो. त्यावेळी त्यांचे भाषण पाऊण तास चालले. ज्यावेळी 2 ते 3 हजार कोटी रुपयांच्या चोरीचे प्रकरण उघडकीस येते त्यावेळी त्यामध्ये माफियाचा हात असतो. त्याठिकाणी तुमची आणि आमची त्यांना रोखण्याची ताकद नसते. आज राजकारणात जगायचे असेल तर माफियाला शरण गेल्याशिवाय जगता येत नाही हे दुर्दैव आहे. हा कोटयावधींचा व्यवसाय आहे, कसला व्यवसाय आहे?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (पुढे सुरू....

सभापती महोदय, महाराष्ट्र शासन फुले, शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेते. गोरगरीब जनतेला यापासून वाचवायचे असेल असे करणे बरोबर नाही. आज विदर्भातील 4 लाख कुटुंबे "अ" गटातील आहेत. ज्यांना खायला अन्नही मिळत नाही अशी 9 लाख कुटुंबे "ब" गटामध्ये आहेत. त्यांना "अ" गटामध्ये जाता येत नाही, अशी परिस्थिती आहे. याबाबतचा जागतिक सर्व्हे झालेला आहे. ग्रामीण भागातील आमच्या आया,बहिणींचे हाल होत आहेत याची आपल्याला कल्पना आहे. ग्रामीण भागातील तरुण जुगार, लॉटरी, दारू, याच्या मागे लागलेला आहे. याच संदर्भाने आपण डान्सबार बंदीचा कायदा केलेला होता. दुर्दैवाने त्यामध्ये आपल्याला यश आलेले नाही. तरी सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काहीही झाले तरी ही संस्कृती बंद झाली पाहिजे. यासाठी पुन्हा त्या कायद्यामध्ये सुधारणा करायच्या असतील त्या करू असे सांगितले. त्यांच्या या प्रयत्नाला आपण सर्वांनी साथ दिली पाहिजे. ऑन लाईन लॉटरी ही सिंगल डिजिट होती ती डबल डिजिट केलेली आहे. या ऑन लाईन लॉटरीचा चार ते पाच हजार कोटीचा राज्यभरातील रोजचा व्यवसाय आहे. ऑन लाईन लॉटरी आल्यामुळे कल्याण मटका पूर्वी दोनवेळा निघत होता तो आता पाच वेळा निघायला लागलेला आहे. माननीय शिवसेना प्रमुखांनी दसरा मेळाव्यामध्ये मटका बंदीच्या संबंधात सांगितले. मी शिवसैनिक म्हणून दादर येथील गोखले रोड भागामध्ये लहानाचा मोठा झालो. त्या भागामध्ये "कल्याण मटका" चालू होता. त्या ठिकाणी लहान मुले सकाळपासून संध्याकाळपर्यन्त मटका खेळत असत. ही माझ्यासमोर सर्वात चिड आणणारी बाब होती. माननीय शिवसेना प्रमुखांनी दसरा मेळाव्यामध्ये मटका बंदीचा विचार बोलून दाखविल्यानंतर बेफाम झालो होतो. लगेचच मी माझ्या भागातील मटका बंद करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस मला साथ मिळायला पाहिजे होती ती मिळाली नाही. कारण अशप्रकारच्या सगळीकडे प्रवृत्ती असतात. मी रोज मटकाच्या ठिकाणी जाऊन उभे रहात होतो. शेवटी मटका बंद पाडला. त्या ठिकाणी पुढे भाड्याच्या जागेमध्ये मटका चालविला जात होता.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

माझ्याबद्दल पोलीस स्टेशनमध्ये विनयभंगाची तक्रार दिली. त्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनचे इन्चार्ज श्री. गुप्ते होते. ते म्हणाले की, श्री. दिवाकर रावते हे मारामारी करतील आणखी काही करतील पण असे कृत्य करणार नाहीत. त्यामुळे तुम्ही अशी तक्रार करु नका. श्री. कल्याण भगत हे माझ्यासोबत पोलीस स्टेशनला आले. तेथील मटका कायमचा बंद पडला. त्यानंतर तो मटका कधीच चालू झाला नाही. गावागावातील मटका बंद करण्याची घोषणा श्री. गोपीनाथ मुंडे यांनी केली होती. परंतु इच्छा असताना तसे करणे शक्य होत नाही. त्याचा टर्नओव्हर 2 ते 3 कोटीचा होता. ऑन लाईन लॉटरीला मान्यता देत असताना आणि त्यासंदर्भात बोलत असताना कल्याण मटका सुध्दा रेग्युलराईज करुन टाका. तो मटका बंद करता येत नसेल तर रेग्युलराईज करुन टाका. नंतर राजकीय कार्यकर्त्यांचे खिशे भरण्याचे थांबतील. अवैध धंदे बंद करा नाही तर आम्ही उपोषणाला बसतो अशा प्रकारच्या धमक्या आम्ही रोज देतो. नंतर त्या आंदोलनाचे काय झाले कळत नाही. आपला अनुभव असा आहे की, आजही महाराष्ट्रामध्ये ज्यांच्या सचोटीबद्दल आपल्याला शंका घेता येणार नाही असे चांगले अधिकारी मला माहीत आहेत. एखादा नवीन एस.पी. आला की, तो आपला दंडुका उगारतो. सर्व अवैध धंदे बंद करा, मटका बंद करा असे सांगतो. एक दोन महिने मटका बंद होतो. जनतेमध्ये त्या एस.पी.चे कौतुक होते. त्यानंतर पुन्हा सगळीकडे ते सर्व चालू होते परंतु कोणालाच काही कळत नाही. कारण खालची यंत्रणा एवढी सडलेली आणि हप्तेबाज झालेली आहे की, एस.पी.च्या मनात कितीही असले तरी ते त्याप्रमाणे करु शकत नाहीत. ऑन लाईन लॉटरी हा दुसरा मटकाच आहे. कल्याण मटक्याचे काय करणार ? तो मटका रेग्युलराईज करा. दारुवरील एक्साईजचे उत्पन्न वाढले. गेल्यावर्षी 1200 कोटी रुपये दारुवरील एक्साईजचे उत्पन्न वाढले असे या सदनामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले. एकदा विषारी दारु पिऊन काही माणसे मृत पावली. संबंधित मंत्री श्री. गणेश नाईक उपस्थित होते. श्री. आर. आर. पाटील यांनी सांगितले की, यापुढे महाराष्ट्रामध्ये हातभट्टी दिसणार नाही. त्यांची तशी इच्छा असणार. मी त्यांच्या इच्छेबद्दल शंका घेणार नाही. परंतु खालची यंत्रणा एवढी सडलेली आहे की, तुम्ही ते थांबवू शकत नाही. त्याचा परिणाम काही ठिकाणी झाला. मला

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MAP

श्री. दिवाकर रावते ....

अभिमानाने सांगितले पाहिजे. त्याचा इतका परिणाम झाला की, हातभट्टी बंद करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे शासनाचा 1200 कोटी रुपयांचा रेव्हेन्यू वाढला. हातभट्टीची दारु पिणारे ही दारु प्यावयास लागले. तुमच्या राज्याचे काय काय कौतुक सांगावे ? कल्याण मटक्याच्या बाबतीत सांगावयाचे तर डान्सबारने घरे उद्ध्वस्त होत असतील तर या कल्याण मटक्याने दहापट घरे उद्ध्वस्त होत आहेत. सर्वच लोक डान्सबारमध्ये जाऊ शकत नाहीत. ज्यांच्याकडे चोरीचा माल आहे, ज्यांनी प्रचंड दरोडे घातलेले आहेत आणि ज्यांना पैशाची उधळपट्टी करावयाची आहे असे लोक डान्सबारमध्ये जातात. ज्यांना ते परवडत नाही ते कल्याण मटका आणि ऑन लाईन लॉटरीकडे जातात. सभापती महोदय, केंद्र शासनाचा 1998 चा लॉटरी रेग्युलेशन ॲक्ट आहे. मघाशी केंद्र सरकारच्या कायद्याचा ऊहापोह झाला. त्या कायद्यामध्ये असे म्हटले आहे की,"Any lottery can be run only under rule (4)".यामध्ये अनेक ए, बी, सी, डी अशी पोटकलमे दिलेली आहेत. कोणती लॉटरी राज्यामध्ये चालवावी यासंबंधी केंद्र शासनाने कायदा करुन नियम बनविलेले आहेत आणि सरकारला निश्चितपणे मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेली आहेत. यासंदर्भातील जे नियम आहेत ते सगळे नियम मी वाचत नाही. सगळे नियम सांगण्यास अडीच ते तीन तास लागतील.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

हे एवढे सोपे नाही. प्रत्येक वेळी कशाच्या तरी आड जाऊन सांगणे हा भाग वेगळा. आपल्या राज्यात ऑन लाईन डिजिटल लॉटरी मोठ्या प्रमाणावर चालते. ऑनलाईन सिंगल डिजिट लॉटरी, इन्स्टण्ट लॉटरी याबाबतीत केन्द्र सरकारच्या कायद्यातील कलम 4(अ)मध्ये मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. 4(ब)मध्ये सगळया लॉट-यांची तिकिटे ही राज्य सरकारने छापली पाहिजेत असे निर्बंध घातलेले आहेत. मग ती साधी लॉटरी असो, ऑन लाईन डिजिटल लॉटरी असो की 15 मिनिटांची इन्स्टण्ट लॉटरी असो. राज्य सरकारने छापलेल्या टिकिटावर विभागाने ठरविलेला लोगो आणि विभागप्रमुखाची सही असली पाहिजे. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकिटावर विभागप्रमुखाची सही असते त्या प्रमाणे बाकीच्या तिकिटावर देखील लोगो आणि विभाग प्रमुखाच्या सह्या असल्या पाहिजेत. लॉटरीच्या संदर्भात केन्द्र शासनाने कायद्याने काही निर्बंध घालून दिलेले आहेत. कलम 48मध्ये, एका आठवड्याला फक्त एकच लॉटरी काढता येईल, अशी तरतूद आहे. असे असताना इन्स्टण्ट लॉटरीवाल्यांनी महाराष्ट्र लक्ष्मी, महाराष्ट्र रथ, महाराष्ट्र अमूक, महाराष्ट्र तमूक अशी वेगवेगळी नावे देऊन 15-15 मिनिटांनी इस्टण्ट लॉटरी राज्यामध्ये चालू ठेवलेली आहे. यामध्ये सरकारचा कोणताही संबंध नाही आणि सरकारला हे माहीतही नाही. खरे तर केन्द्र सरकारने लॉटरीच्या संदर्भात केलेला कायदा धाब्यावर बसवून अशा प्रकारे खुले आम लोकांचे संसार, घर-दारे आणि तरुण पिढी उद्ध्वस्त करणारी लॉन लाईन लॉटरी राज्यात चालू आहे. ही महाराष्ट्रातील तरुण पिढी जुगाराकडे खेचली जाऊन ती उद्ध्वस्त होत असताना या तरुण पिढीला कसे वाचवायचे, याची चिंता प्रत्येक कुटुंबातील पालकांना, तुमच्या आमच्या सारख्या लोकप्रतिनिधींना, सामाजिक कार्यकर्त्यांना पडलेली आहे. केन्द्र सरकारच्या कायद्यातील पळवाटा शोधून ही लॉटरी राजरोसपणे चालू आहे. या ऑन लॉईन लॉटरी तिकिटाचा टर्न ओव्हर तीन-साडेतीन हजार कोटीच्या वर आहे. काल दर्यापूरच्या निवडणुकीच्या वेळी एक मशीन असे निघाले की, त्या मशिनवर कोणतेही बटन दाबले की एकच चिन्ह यायचे. निवडणूक आयोगाने मग तेथील निवडणूक रद्द केली. यंत्रामध्ये अशा काही गडबडी करणारी माणसे आहेत. माझ्याकडे अशी माणसे आलेली होती. संगणक युगामध्ये काय काय घडू शकते हे आपण समजून घ्यावे. आज तिजोरीची चावी तुमच्याकडे आहे, पण ती जेव्हा माझ्या हातात येईल त्यावेळी तुम्ही संपून जाल.

**<u>सभापतीस्थानी उपसभापती</u>**

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

बिलावर बोलण्याचा मला पूर्ण अधिकार आहे, जोपर्यंत मी पूर्ण समाधानी होऊन बसत नाही तोपर्यंत. काही वेळेला काही लोकांना या सदनामध्ये माहित नसते ते सांगावे लागते. प्रत्येकाला दुसऱ्याकडून शिक्षण मिळते. परवा खैरलांजीच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जे भाषण केले ते अतिशय मार्मिक होते. आकांडतांडव करणारे नव्हते. हीच गोष्ट कशी मांडता येते हे त्यांनी सभागृहाला दाखवून दिले. प्रत्येकजण प्रत्येकाकडून काहीतरी शिकत असतो. म्हणून या सदनामध्ये बोलत असताना महाराष्ट्राचा हा गंभीर विषय आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. ब्लॅक मॅजिक हा शेकडो वर्षे चाललेला विषय असून तो आपण बंद करु. तो विषय आज महत्वाचा नाही. हजारो घरे उद्ध्वस्त करणारा हा जो विषय आहे तो मोलाचा आणि महत्वाचा आहे. ब्लॅक मॅजिकमध्ये अडकलेली किती घरे असतात? लाखामध्ये एखाद्याला भूतबाधा झाली म्हणून त्या घराला एक मांत्रिक लुटत असतो. या लॉटरीमुळे लाखो घरे लुटली जात आहेत. What is priority? लाखो घरांमधून एक घर लुटले जाते त्याला की लाखो घरे लुटली जात आहेत त्याला? पांचटपणाला मर्यादा असतात. पांचट या शब्दाचा अर्थ पातळ करुन डिक्शनरीमध्ये लिहिला आहे. परंतु आपण ज्या प्रवृत्तीने वागतो त्यावेळी डिक्शनरीला सुध्दा लाज वाटत असेल की कशाला असे लिहिले? धर्मपत्नीला प्रायॉरिटी की रखेलीला? बोलावणार का? सुप्रीम कोर्टाने मान्य केले आहे, entire are equal. सामाजिकदृष्टया बोलाल का? मी कायद्याचे बोलत आहे. सुप्रीम कोर्टाने काय सांगितले ते बोलत आहे. सामाजिकदृष्टया आपण असे बोलत नाही. कायद्याने काही असले तरी सामाजिकदृष्टया आपण असे बोलत नाही हे लक्षात घ्यावे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या नियमामध्ये बसवून प्रत्येक ऑनलाईन लॉटरीवाल्यांनी काय केले? इलेक्ट्रानिक इक्वीपमेंट्स काय करु शकतात? मार्टिन हा सातवी शिकलेला या देशातील सगळयात जास्त टॅक्स भरणारा माणूस आहे. मार्टिन ॲण्ड कंपनी देशात सगळयात जास्त टॅक्स भरणारी कंपनी आहे. तशी देशामध्ये नोंद आहे. हिमाचल प्रदेश आणि मेघालय राज्यामधील कंपनी आहे. लोटो हा आणखी भयानक प्रकार आहे. या ऑनलाईन लॉटरी कंपन्यांनी चीप्स बनविली.

**उपसभापती** : सभागृहाची वेळ सकाळी 11.45 पर्यंत आहे. पाच मिनिटे सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, ऑनलाईन लॉटरी वाल्यानी अशा प्रकारची चीप बनविलेली आहे की, ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य लॉटरीच्या संदर्भात विचार मांडीत असतांना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे खाली बसून त्यांना सांगत आहेत की, "अजून बोला, अजून बोला" त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना आपले विचार मोकळया पणाने मांडू द्यावेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ट्रेझरी बेंचमध्ये काय चालले आहे हे पाहिल्यानंतर आम्ही कसे वागावे हे आम्हाला कळते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार उभे राहिले की, मला रामशास्त्रींची आठवण होते.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, काल जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथेच्या बिलाच्यावेळी सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. हंडोरे हे त्यांच्या सदस्यांना "तुम्ही बोला, तुम्ही बोला" असे सांगत होते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला बोलते करणारा अजून निर्माण झालेला नाही. मला जे पटते, रुचते तेच मी बोलत असतो. मी स्वंभू बोलत असतो. मी स्वत: निर्माण होऊन राजकारणात आलेलो आहे. मी काही कोणाच्या पुण्याईने राजकारणात आलेलो नाही. त्यामुळे या विषयावर आता अधिक न बोलणे चांगले असे मला वाटते.

सभापती महोदय, लॉटरीच्या संदर्भातील इलेक्ट्रॉनिक्स कॅश कलेक्शनमध्ये शासनाची मोठया प्रमाणात फसवणूक होत असते. इलेक्ट्रॉनिक्स कॅश कलेक्शनमध्ये शासनाची फसवणूक होत आहे हे शासनाला माहिती आहे. या पध्दतीमध्ये जेवढे कलेक्शन होते तेवढे रेकॉर्डवर दाखविलेच जात नाही. त्यामुळे यावर निर्बध आणणे आवश्यक आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी या बिलाच्या संदर्भातील सुरुवातीला माहिती सांगितली होती त्यावेळेस आम्हाला वाटले होते की, इलेक्ट्रॉनिक्स कॅश कलेक्शनमध्ये शासनाची जी काही फसवणूक होती ती रोखण्यासाठी काही तरी पाऊल उचलले जाईल असे वाटले होते परंतु तसे त्यांनी काहीही सांगितले नाही. या लॉटरी व्यवसायाला ज्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात तशा सुविधा मात्र जे कारखाने बंद पडत आहेत ते सुरु रहावेत, जे घाम गाळून पोट भरतात त्यांच्यासाठी शासनाकडून मात्र काहीही प्रयत्न केले जात नाहीत.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

हातभट्टया, लॉटरी सेंटर्स, मटक्याचे अड्डे याठिकाणी किती लोक एम्प्लॉय झालेले आहेत त्याचा हिशोब काढला जातो. मी लॉटरीस विरोध केला म्हणून लॉटरी सेंटर्सवाले मला दोष देत होते, माझ्या विरोधात निवेदने दिली होती. अशा गोष्टींना मी बधणारा माणूस नाही.....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ऑन लेग्ज आहेत. त्यांनी आपले अपूर्ण भाषण या विधेयकावर जेव्हा पुन्हा चर्चा सुरु होईल त्यावेळी पुढे सुरु करावे. सभागृहाची बैठक आता तहकूब होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.50 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 20341, तारांकित प्रश्न क्रमांक 22258 व तारांकित प्रश्न क्रमांक 20343 हे तीनही प्रश्न थोडेसे सारखेच असल्यामुळे त्यावर एकत्रित चर्चा करण्याच्या दृष्टीने मी परवानगी देतो. आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रश्न विचारावा.

**मुंबईतील बंद पडलेल्या अनुदानित तुकडया मुंबई उपनगरातील अन्य शाळांना मंजूर करण्याबाबत**

**(१) * २०३४१ श्री.कपिल पाटील , श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. वसंतराव चव्हाण :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील मराठी माध्यमाच्या शाळांच्या बंद पडणाऱ्या तुकड्या मुंबई उपनगरातील अन्य अनुदानित शळांना अनुदान तत्वावर हस्तांतरीत करण्याबाबत शिक्षण संस्था आणि शिक्षक संघटनांनी शासनाकडे दिनांक २३ मार्च, २००६ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) याबाबत अद्याप कार्यवाही केली नसल्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) मुंबई महानगरातील शाळांच्या या प्रश्नाबाबत शासनाचे सर्वसाधारण काय धोरण ठरले आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) अशा आशयाची शिक्षक संघटनेची मागणी आहे.
(२), (३) व (४) संघटनेची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे.

**राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळांमधील तुकड्या/वर्ग बंद पडत असल्याबाबत**

**(४) * २२२५८ श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. जी. एल. अैनापूरे , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १८९१४ ला दिनांक ११ जुलै, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील वर्ग/तुकड्या कमी होत असल्याप्रकरणी माहिती संकलनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(...२...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(२) असल्यास, विभागवार कमी झालेल्या वर्ग तुकड्यांची संख्या किती ? व यावर शासनाने काय उपाययोजना केली वा करावयाचे योजीले आहे,
(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) शैक्षणिक वर्ष २००५-२००६ ची माहिती संकलनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे.
(२) व (३) राज्यात एकूण ५२० तुकड्या कमी झाल्या आहेत.

**शालांत परिक्षा मंडळाच्या १७ नंबरच्या फॉर्मची वयोमर्यादा कमी केल्यामुळे ४ थी आणि ७ वी नंतरचे गळतीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(४३) * २०३४३ श्री.कपिल पाटील , श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे** : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालांत परिक्षा मंडळाच्या १७ नंबरच्या फॉर्मची वयोमर्यादा कमी केल्यामुळे इयत्ता ४ थी आणि ७ वीनंतरचे गळतीचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) ही वयोमर्यादा पूर्ववत करण्याबाबत शिक्षक आणि विद्यार्थी संघटना यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) नाही.
(२) अशी मागणी केली असल्याचे आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दक्षिण मुंबईतील कोणत्या तुकडया कमी झाली ? व त्यापैकी किती तुकडया उप नगरामध्ये अनुदानावर देण्यात आल्या ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2006-2007 मध्ये दक्षिण मुंबईतील 74 तुकडया कमी झाल्या असून नवीन तुकडयांची आकडेवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या शाळांतील विद्यार्थ्यांअभावी तुकडया बंद पडल्या व त्या संस्थेतील शाळांमध्ये जर विद्यार्थी वाढीमुळेशाळा सुरु होणार असतील तर त्या बंद तुकडया तिकडे देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. परंतु त्यासंदर्भातील जी प्रोसिजर आहे, ती लांबची आहे. वर्षानुवर्षे तशा पध्दतीची मान्यता मिळत नाही. त्यामुळे याबाबतीत बंद पडलेल्या तुकडया पुन्हा स्वतंत्र अनुदानावर देण्याचे अधिकार आपण संबंधित शिक्षण उप संचालकांना देणार का ?

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20341, 22258, 20343....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे तुकडया बंद होतात, त्यामुळे याबाबतीतील अधिकार निश्चितपणे उप संचालकांना देण्यात येतील.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 22258 च्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी राज्यात एकूण 520 तुकडया कमी झाल्याचे उत्तर दिले आहे. याचा अर्थ जवळपास 780 शिक्षक सरप्लस झाले असणार. मग, त्यांचे समायोजन आपण त्या त्या संस्थामध्ये केले का ? नसल्यास, समायोजनाच्या बाबतीत आपण आदेश देणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जे अतिरिक्त शिक्षक होतील व त्याठिकाणी शिक्षकांची मंजूर पदे असतील तर त्यांचे त्याठिकाणी समायोजन करण्यासंबंधीचा शासनाचा निर्णयच आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, यावर्षी एकूण 750 शिक्षक सरप्लस झालेले आहेत. दरवर्षी एकटया मुंबईमध्ये 500 हून अधिक शिक्षक सरप्लस होतात. परंतु नैसर्गिक वाढीनुसार ज्या शाळांच्या तुकडया वाढतात, त्या आपण अनुदानावर दिल्या पाहिजेत. कारण, दक्षिण मुंबईतील गिरगांव, गिरणगांव येथील मराठी लोकांचे स्थलांतर होऊन ते उप नगरामध्ये गेलेले आहेत. त्यामुळे या तुकडयांना आपण नैसर्गिक न्यायानुसार त्याठिकाणी परवानगी दिली पाहिजे. कारण आज तेथील गरीब माणसे आर्थिक व राजकीय कारणांमुळे विस्थापित झालेली आहेत. त्यामुळे उप नगरातील शाळा आपण अनुदानावर देणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थी पटसंख्येअभावी बंद पडलेल्या तुकडया अन्य संस्थांकडे समायोजित करण्यासंबंधीचे शासनाचे धोरण नाही. त्याचे कारण असे की, संबंधित शिक्षकांच्या सेवाजेष्ठतेसारखे प्रशासकीय प्रश्न उपस्थित होतात. तसेच, अशाप्रकारच्या तुकडयांच्या बाबतीत अन्य पायाभूत सुविधांमध्ये फरक पडतो.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20341,22258, 20343**.............

श्री.हसन मुश्रीफ.....

त्यामुळे शासनाचे असे धोरण नाही. परंतु, त्याच शाळेमध्ये जर विद्यार्थी संख्या वाढली असेल तर त्या शैक्षणिक वर्षामध्ये तुकडी वाढवून देण्यात येईल. परंतु, एका ठिकाणच्या तुकडया दुसरीकडे देता येणार नाहीत.

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, राज्यात सगळीकडे मराठी माध्यमाच्या शाळेतील तुकडया कमी होत आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा आता खेडयातही सुरु होत आहेत. त्यामुळे शासनाने विद्यार्थी संख्येचे व पटसंख्येचे कधीकाळी केलेले नॉर्म्स शासन बदलणार आहे काय ? कर्नाटक सीमा भागामध्ये कर्नाटक सरकारने सीमेवरील गावातील शाळेत एकही कन्नड मुलगा शिकत नसला तरी शाळा सुरु ठेवल्या आहेत व तेथील शिक्षकांना त्या ठिकाणी कायम ठेवून त्यांना पगार मिळत आहे. तसेच या शिक्षकांना गावात फिरुन कन्नड मुलांना शोधून शाळेत दाखल करुन घेण्याचे प्रयत्न करण्यास सांगितले आहे. आपल्याकडे मिनिमम पटसंख्येची अट आहे आणि आता पटसंख्या पडताळणीचा कार्यक्रम शासनाने सुरु केलेला आहे. परिणामी तुकडया बंद होत आहेत. शासन याबाबत काही नवीन धोरण आखणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शाळेमध्ये तशी परिस्थिती निर्माण झाली असेल आणि त्यासाठी संस्था किंवा शाळा दोषी नसतील तर त्यांना थोडाफार दंड आकारुन तेथील तुकडया आणि शिक्षक सुरक्षित करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दोन गोष्टी आहेत. पहिल्यांदा इंग्रजी माध्यमाच्या शाळा या झपाटयाने वाढत आहेत आणि मराठी माध्यमाच्या तुकडया कमी होत चालल्या आहेत. सगळयांचा, अगदी प्रश्न विचारणारे आणि उत्तर देणारे, यांचा कल इंग्रजी शिकण्याकडे आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येला आळा घालण्याचे धोरण शासनाने अवलंबिले आहे. याचा परिणाम असा होत आहे की, मराठी माध्यमाच्या तुकडया कमी होत आहेत. तरी देखील पटसंख्या आणि विद्यार्थी संख्येबाबत शासनाचे जे सध्याचे नॉर्म्स आहेत त्यामध्ये बदल करण्याचा शासन जरुर विचार करेल. मुलांना चांगले शिक्षण देणे ही आपली जबाबदारी आहे. मुलगा शाळेत गेला पाहिजे, शिकला पाहिजे आणि टिकला पाहिजे यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील.

..2...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 20341,22258, 20343..............**

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी हे मान्य केले आहे की, राज्यभरातील मराठी माध्यमाच्या तुकडया बंद होण्याचे प्रमाण वाढले आहे. जर शासन हे मान्य करीत असेल तर मग निकष का बदलत नाही ? तुकडया बंद होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी, शाळा व शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी शासन निकष शिथिल करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, निकष बदलण्याचा शासनाचा विचार आहे. याशिवायही काही उपाय शासनाकडून केले जात आहेत. आता आपण पहिलीपासून इंग्रजी सक्तीचे केले आहे. परंतु, मुलांना साधे इंग्रजीचे एक वाक्यही बोलता येत नाही किंवा लिहिता येत नाही. आपल्याकडे जे शिक्षक आहेत ते डी.एड.आहेत व त्यांचे इंग्रजी सुमार आहे. इंग्रजी माध्यमातून शिकविणा-या शिक्षकांना पदस्थापना देण्याचा शासनाचा विचार आहे. आता आपण एकविसाव्या शतकाकडे जातो आहोत. त्यामुळे आपल्याला इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे, पालकांचाही तसाच कल आहे. हे सर्व असले तरी मराठी माध्यमाच्या तुकडया सुरक्षित करण्याबाबत शासन योग्य ती उपाययोजना करणार आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या विषयावर गेली 4 वर्षे चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य, श्री.कपिल पाटील यांनी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे दक्षिण मुंबईतील लोक स्थलांतरित होत आहेत. माझ्याकडे शिक्षक संघटनेतील महिला येऊन भेटल्या होत्या. दक्षिण मुंबईतील लोकसंख्या उपनगरामध्ये स्थलांतरित होत आहे त्या ठिकाणी असलेल्या मराठी शाळांनी जर परवानगी मागितली तर त्यांना परवानगी देण्यात येईल काय ? सभापती महोदय, आमची आपल्याला विनंती आहे की, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. शासन जे धोरण बदलणार आहे ते किती कालावधीत बदलणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, बंद पडलेल्या शाळांच्या तुकडया दुसरीकडे देता येणार नाहीत. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे विद्यार्थी पटसंख्येअभावी बंद पडलेल्या तुकडया अन्य संस्थांकडे समायोजित करता येणार नाहीत.

यानंतर श्री.बोरले.............

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.20341, 22258, 20343 .........**

श्री.हसन मुश्रीफ ..........

शिक्षकांच्या सेवा ज्येष्ठतेचे अनेक प्रश्न उपस्थित होणार आहेत. पायाभूत प्रश्नामध्ये फरक पडणार आहे, त्यामुळे ते करता येणार नाही. शासनाचे धोरण असे आहे की, जेथे विद्यार्थी असतील तेथे कायम विनाअनुनानीत तत्वावर शाळा द्यावी. कोर्टाने असे सांगितलेले आहे की, तसे करता येणार नाही. आपण ब्रुहत आराखडा तयार करुन अनुदानीत शाळा देतो. शासनाने ब्रुहत आराखडा तयार करण्यासाठी समिती नेमलेली आहे. दक्षिण मुंबईमध्ये शाळांची गरज असेल तर अनुदानीत शाळा निश्चितपणे देण्यात येतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बृहत आराखडयाचा आणि याचा काही संबंध नाही. माननीय मंत्री महोदय वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. दक्षिण मुंबईतील लोकसंख्या कमी होत चालली आहे. पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील लोकसंख्या वाढत आहे ? तुकडया सुरु करण्यासाठी शिक्षक तयार असतील तर शासनाला काय अडचण आहे. माननीय मंत्री महोदयांनी शिक्षकांच्या सेवा शर्तींचे कारण सांगितले. शिक्षक तयार असतील तर काय अडचण आहे. ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, त्याच संस्थेच्या तुकडया असतील तर देता येतील. नवीन तुकडया देता येणार नाहीत. जेथे विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे तेथे जी तुकडी बंद पडलेली आहे त्याच संस्थेची तुकडी असेल तर देता येईल.

**सभापती** : यामध्ये दोन मार्ग आहेत. कितीही प्रश्न विचारले तरी पूर्णपणे समाधान होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबईमध्ये या प्रश्नासंदर्भात माझ्या दालनात बैठक घेऊन त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, सन्माननीय सदस्य श्री.विनांद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांना बोलावून हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे मला वाटते. अन्यथा मी अजून चार उपप्रश्न विचारण्यास परवानगी देतो त्यामध्ये प्रश्न सुटेल असे मी समजतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांची आपल्या दालनामध्ये बैठक घेऊ.

**सभापती** : मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपण या प्रश्नावर चर्चा केलेली आहे. माझ्या दालनामध्ये या महिन्याच्या अखेरपर्यंत बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलावून आपण सविस्तर चर्चा करु. त्या बैठकीस

..2........

**ता.प्र.क्र.20341, 22258, 20343** .........

**सभापती**...........

संबंधित विभागाचे मंत्री, राज्यमंत्री आणि दोन्ही बाजुचे सन्माननीय सदस्य उपस्थित असतील. आता मी या प्रश्नावरील चर्चा थांबवितो.

---------

..3...........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2005 मध्ये झालेल्या गारपिटीमुळे विदर्भात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत न मिळाल्याबाबत**

**(2) * 23206 श्री. लक्ष्मण जगताप , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. राजेंद्र जैन , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती उषाताई दराडे , श्रीमती मंदा म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक 6136 ला दिनांक 27 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2005 मध्ये झालेल्या गारपिटीमुळे विदर्भात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापही शासनाकडून आर्थिक मदत मिळाली नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई न देण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(3) उक्त जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना किती कालावधीत आर्थिक मदत देण्यात येईल?

**श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) अंशत: खरे आहे.

(2) व (3) एकूण आवश्यक अनुदान रुपये 89.94 कोटी पैकी रुपये 86.73 कोटी उपलब्ध करुन दिले आहे उर्वरित रुपये 3.21 कोटी अनुदानाची आवश्यकता असून ते देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, विदर्भातील शेतक-यांचे सन 2005 मध्ये गारपिटीमुळे नुकसान झाले होते. आज 18 महिने झालेले आहेत. परंतु अद्याप त्या शेतक-यांना पूर्णपणे नुकसान भरपाई मिळालेली नाही. माझ्या समोर असा प्रश्न पडलेला आहे की, परवा नाशिक जिल्हयातील निफाड, सिन्नर, इगतपूरी या ठिकाणी गारपीट झालेली आहे त्यांना नुकसान भरपाई केव्हा मिळणार आहे ? विदर्भातील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी 18 महिने लागतात तर नाशिक जिल्हयातील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी किती महिने लागतील ? मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांनी 89 कोटी 74 लाख रुपयांपैकी 86 कोटी 73 लाख रुपये अनुदान दिलेले आहे आणि अजून 3 कोटी 21 लाख रुपयांची आवश्यकता आहे. ते किती महिन्यांमध्ये देण्यात येतील ? दुसरा प्रश्न असा आहे की, त्या शेतक-यांच्या कर्जाचे पुर्नगठन झालेले आहे काय ? शेतक-यांना कर्जावरील व्याज माफ केले आहे काय ? त्यांना विम्याची रक्कम मिळालेली आहे काय ?

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ D/ श्री. बोरले नंतर --- 12:15

ता.प्र.क्र.23206 ....

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, गारपिटीमुळे झालेले नुकसान हे जानेवारी 2005 मध्ये झालेले होते आणि त्याचा आधी जो अंदाज देण्यात आलेला होता त्यामध्ये साडेचार हेक्टरचे 50 टक्के पेक्षा जास्त नुकसान झालले होते असा अहवाल आलेला होता आणि मार्चमध्ये तो सुधारित करून 21,479 हेक्टरच्या आसपास 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले असल्याचा अहवाल आला. या दोन्ही अहवालामध्ये तफावत होती त्यामुळेच हा विलंब लागला आहे. विलंब झाला आहे याबद्दल दुमत नाही. तेव्हा येत्या एक महिन्यामध्ये हा उर्वरित 3.21 कोटीची रक्कम वितरित करण्याचा शासन पयत्न करील.

डॉ. वसंत पवार : मंत्री महोदयांनी नाशिकमध्ये झालेल्या गारपिटीबाबत देखील सांगितले तर बरे होईल.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, नाशिकमध्ये गारपिटीमुळे जे नुकसान झालेले आहे तो विषय सबकमिटीपुढे ठेवण्यात येईल त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न विदर्भापुरता मर्यादित आहे हे बरोबर आहे. परंतु आता नाशिकमध्येही याची व्याप्ती आपण नेली आहे त्यामुळे या प्रश्नाचा स्कोप वाढलेला आहे आणि तो आता राज्यव्यापी झाला आहे असे मी समजतो आणि त्या दृष्टीने माझा प्रश्न असा आहे की, 2005 मध्ये गारपिटीसंबंधातील हा प्रश्न आणि त्यावेळेस जो महापूर आला तो प्रथमत: कोकणात आला होता आणि त्यासंबंधात कोकणामध्ये एकूण किती हानी झाली आहे त्यामध्ये किती रक्कम आपण तेथे दिली तसेच आंबा पिकाचे जे नुकसान झालेले होते त्यासाठी किती आणि कधी भरपाई दिलेली आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यासाठी वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी अगोदरच सांगितले की, नाशिकबाबत उत्तर दिल्याने प्रश्नाची व्यापी वाढली आहे आणि म्हणूनच त्यांनी कोकणासंबंधात प्रश्न विचारला आहे. माननीय मंत्री महोदयांनी आता या संबंधातील उत्तर नसेल तर ते उपलब्ध करून घेऊन सभागृहाच्या पटलावर नंतर आपण ठेवावे.

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

....... एए 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 23206 .....

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, 2005 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे गोंदिया जिल्हयातील मोरगाव-अर्जुनी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे आणि या शेतकऱ्यांनी त्याची भरपाई मिळावी म्हणून आंदोलन देखील केले होते आणि त्या 250 शेतकऱ्यांचे निवेदन मी राज्य सरकारला, मंत्री महोदयांना दिलेले आहे. तेव्हा त्यांना किती दिवसात आपण हा निधी उपलब्ध करून देणार हे सांगू शकाल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे एक महिन्यात त्यांना अनुदान वितरित करण्यात येईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यात फार मोठी गारपीट झाली आणि सर्व जिल्ह्यातील बाकी तालुक्यांमध्ये याचे वाटप झालेले आहे. मात्र अकोट तालुक्यात 2 कोटीचे नुकसान झालेले असतानाही त्यांना अद्याप भरपाईचे पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे तेथील लोक आता उपोषणाला बसले आहेत. अकोला जिल्ह्यात इतर सर्व तालुक्यांमध्ये भरपाईचे पैसे वाटप झ ाालेले आहे केवळ अकोट तालुक्यातच निधी दिलेला नाही तेव्हा अकोट तालुक्यातील गारपीटग्रस्तांना किती दिवसात हे पैसे आपण देणार आहात ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याबाबत माहिती घेऊन कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : याबाबत आपण माहिती घेऊन त्वरित कारवाई करावी.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, गारपीटग्रस्तांना भरपाई देण्याचा हा प्रश्न आता राज्यव्यापी प्रश्न झाला असल्याने मी आपल्याला विचारू इच्छितो की, मराठवाड्यामध्ये देखील गारपिटीचे पैसे देणे अद्याप बाकी आहे. तेव्हा ते पैसे शासन केव्हा देणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न विदर्भापुरता मर्यादित असल्याने इतर भागातील माहिती आता आमच्याकडे नाही. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, गेल्या दोन वर्षामध्ये 3-4 महिने सतत गारपीट झालेली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे त्यासंबंधात माहिती घेऊन आम्ही कारवाई करू. तसेच या शिवाय अन्य कोणते पैसे देण्याचे राहिले असतील तर त्याबद्दलही कारवाई करण्यात येईल.

...... एए 3 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मागील वर्षी जालना जिल्ह्यातील माझ्या तालुक्यामध्ये देखील लोकांना अजूनही हे पैसे मिळालेले नाहीत. ...

श्री. बाळासाहेब थोरात : ते तपासून त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ऑक्टोबरच्या गारपिटीचा उल्लेख सर्व येथे करीत आहेत. पण गारपीट झाल्यानंतर किती दिवसात त्याचे असेसमेंट पूर्ण होते आणि किती दिवसात पैसे दिले जातात याचे निकष आपण केले असतील तर बरे होईल. अन्यथा कोठलीही गारपीट झ ाल्यानंतर दोन दोन वर्षांनी त्याची नुकसान भरपाई मिळणार असेल तर ते बरोबर नाही. आता या प्रश्नाच्या उत्तरात आपण म्हटले आहे की, 2005 मधील गारपिटीसंबंधातील भरपाई देण्यामध्ये अजून 3.21 कोटीचे अनुदान आवश्यक असून ते देण्याची कारवाई करण्यात येईल. तर ही कारवाई आपण केव्हा पूर्ण करणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, गोंदिया संबंधात मी सांगितलेच आहे की, एक महिन्यात कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, मला येथे सांगितले पाहिजे की, गेल्या दोन वर्षामध्ये 5-6 वेळा गारपीट झालेली आहे आणि त्याचे पंचनामे सुरू असतानाच पुन्हा गारपीट झालेली आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे .... बीबी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 23206...

श्री.बाळासाहेब थोरात...

सभापती महोदय, सहसा गारपीट झाल्यानंतर 15 दिवसात पंचनामे केले जातात. स्थायी आदेशाप्रमाणे मदत देण्यात अडचण नसते. परंतु चौकशी करावी अशी त्यांची अपेक्षा असते. म्हणून सब कमिटीमध्ये याबाबत चर्चा होऊन निर्णय झाल्यानंतर अनुदान देण्यात येते.

श्री. उषाताई दराडे : सभापती महोदय, गारपीटीच्या प्रश्नाला थोडेसे व्यापक स्वरुप प्राप्त झाले आहे. बऱ्याच माननीय सदस्यांनी गारपिटीचे पंचनामे लवकर झाले पाहिजेत आणि त्यांना लवकर मदत दिली गेली पाहिजे असे मुद्दे उपस्थित केले. या संदर्भात मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, पंचनामे करण्याचे काम महसूल विभागाच्या यंत्रणेकडे असते.राज्यामध्ये आलेला महापूर असेल, गारपीट किंवा पिकांवर पडलेला लाल्या रोग असेल यामध्ये ही यंत्रणा वारंवार व्यस्त असते. त्यामुळे वेळेवर सर्व्हे न होणे, सर्व्हे झाल्यानंतर पुढील कारवाई वेळेवर न होणे आणि लोकांना नुकसानीची मदत वेळेवर न मिळणे यामध्ये प्रोसिजरल पार्ट आहे तो सुटसुटीत करुन आपण कामाची फेरआखणी करणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सर्वेक्षणाचे काम महसूल विभागाची यंत्रणा करते, तसा जी.आर. आहे. परंतु त्या यंत्रणेला सर्व विभागांनी सहकार्य करावयाचे असते. म्हणून कृषी विभागाबरोबर ग्रामसेवक आणि तलाठी हे एकत्र येऊन सर्व्हेक्षण करतात. नैसर्गिक आपत्तीची कोणतीही घटना घडली असेल तर त्याचे सर्व्हेक्षण 15 दिवसात केले पाहिजे. ते केल्यानंतर दुसऱ्या 15 दिवसात त्यांना पैसे देणे शक्य आहे. कोणत्याही प्रकारे एक हेक्टरच्या आत असलेल्यांना नुकसानीचे पैसे देण्यासंबंधी स्थायी आदेश आहेत. म्हणून योग्य मदत मिळावी अशी त्यांची अपेक्षा असते. त्याकरिता हा विषय सब कमिटीपुढे नेऊन त्यावर निर्णय घेतला जातो. त्यामध्ये जास्त कालावधी जातो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## असमतोल असलेल्या जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(३) * २०४०४ श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुधवार, दिनांक ८ फेब्रुवारी,२००६ रोजी अमरावती येथे झालेल्या लोकप्रतिनधींच्या बैठकीमध्ये संमत करण्यात आलेला शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात होत असलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी तात्पुरत्या व कायमस्वरुपी उपाययोजना एक तपशीलवार प्रस्ताव एका निवेदनासह हेल्पलाईन या संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक १४ फेब्रुवारी,२००६ रोजी किंवा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी अमरावती यांच्यामार्फत सादर केलेला आहे हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास, जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल दुर होईपर्यंतच्या काळात असमतोलाच्या प्रमाणात असमतोल असलेला जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी या उपाययोजनामध्ये समाविष्ट आहे हे खरे आहे काय,

(३) खरे असल्यास, या मागणीचे तपशिलवार स्वरुप काय आहे व त्याबाबत शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(४) उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरीता :** (१) होय.

(२) होय.

(३) निवेदनातील मागण्या पुढील प्रमाणे आहेत :-

विदर्भ व मराठवाड्याचा जलसिंचनाचा अनुशेष सर्वाधीक आहे व या असमतोलामुळे या विभागांमध्ये आत्महत्या वाढीस लागल्या आहेत.

प्रादेशिक विकासातील असमतोल दूर करण्यासाठी भारतीय संविधानातील कलम ३७१ (२) मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि सततच्या अनुशेषामुळे या तरतूदींचे उल्लंघन होत आहे.

**केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या मागण्या :-**

- राष्ट्रपतींच्या आदेशाची मुदत २० वर्षांनी वाढविण्यात यावी.
- कलम ३७१(२) चा भंग होत असल्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

DGS/ D/ MHM/

ता.प्र.क्र. २०४०४...

- मा. राज्यपालांनी दिलेल्या जलसिंचन अनुशेष विषयक घटना दत्त निदेशांची सन २००६-२००७ पासून काटेकोर अंमलबजावणी व्हावी.
- विकास क्षेत्रातील अनुशेष विशषत: कृषीपंपाच्या अनुशेष दूर करणारे निदेश ताबडतोबीने निर्गमित करण्यासाठी मा. राज्यपालांना सूचना देण्यात याव्यात.

**राज्य शासनाकडील मागण्या :-**

जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्यात यावे. नोकऱ्यांचे समन्याची वाटप करण्यात यावे. तसेच कृषी पंपांच्या विद्युती करणाबाबतचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यात यावे.

**सदर मागण्यांबाबत शासनातर्फे कार्यान्वित करण्यात आलेल्या उपाययोजना खालील प्रमाणे आहेत :-**

मा. पंतप्रधान महोदयांच्या विशेष विदर्भ पॅकेज अंतर्गत आश्वस्त सिंचन सुविधा अंतर्गत पॅकेजमधील ६ जिल्ह्यातील १७ मोठे व मध्यम प्रकल्प आणि ६५ लघुपाटबंधारे प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी रु.२०८५ कोटीचे पॅकेज जाहीर झाले आहे. त्यामधील मोठे व मध्यम प्रकल्पास केंद्र शासनाच्या ए.आय.बी.पी. अंतर्गत निधी प्राप्त होणार आहे. जलसंपदा विभागाकडील निधीतून ऑक्टोबर, २००६ अखेर रु.२०७ कोटी खर्च करण्यात आला असून सर्व प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. यासंदर्भात राज्य शासनाने रु.८८२ कोटी रकमेची तरतूद केली आहे. तसेच पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत पॅकेजमधील प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येकी ५०० चेक डॅम प्रत्येक वर्षी घेण्याचे ठरविले आहे.

राज्य शासनाच्या विशेष पॅकेजअंतर्गत जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विदर्भ पाणलोट मिशनची स्थापना करण्यात आली असून त्यासाठी प्रत्येक वर्षी १०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. २२८ कामे मंजूर करण्यात आली असून त्यावर आजपावेतो ७९ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. ११२ कामे पूर्ण करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, केंद्र सरकारने व राज्य सरकारने विदर्भामधील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या संदर्भात मान्य केले आहे की, या आत्महत्त्या प्रादेशिक असमतोलनामुळे होत आहेत. या आत्महत्त्या विकासाच्या प्रश्नावर होत आहेत. याठिकाणी दिलेले उत्तर अतिशय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गुंतागुंतीचे आहे. हेल्पलाईनने ज्या मागण्या केल्या होत्या, त्यासंबंधी उत्तरामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा या मागण्यांबाबत शासन कोणती पावले उचलणार आहे यासंबंधी शासन खुलासा करील काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, हेल्पलाईन संघटनेच्या माध्यमातून विदर्भातील आमदार व खासदारांना एकत्र आणून विदर्भाच्या सहा जिहयात किंवा बाकीच्या जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या त्यासंबंधी राज्य सरकारने व केंद्र सरकारने कोणती उपाययोजना केली आहे याबाबत चर्चा झाली. ही चर्चा होत असतांना हेल्प लाईनच्या वतीने त्याठिकाणी काही ठराव देखील मंजूर केले होते. त्या ठरावातील महत्वाचा भाग असा की, त्या भागामध्ये पाटबंधारेची व्यवस्था केली पाहिजे, कृषी पंपाचा अनुशेष दूर केला पाहिजे. किंवा इतर बाबीसंबंधी चर्चा होऊन तो ठराव माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात आला. त्यामुळे उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे. त्यांनी निवेदनामध्ये ज्या मागण्या केल्या होत्या त्या संदर्भात राज्य सरकार कोणती कारवाई करीत आहे यासंबंधीचा खुलासा केला आहे. त्या मागण्या केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्या. त्या पाठविल्यानंतर माननीय पंतप्रधानांच्या माध्यमातून इरिगेशनचे पॅकेज जाहीर करण्यात आले. त्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे. आश्वासित सिंचन, सूक्ष्म सिंचन योजना, चेक डॅम करणे या सर्व योजनांच्या माध्यमातून निधी देऊन कामाला सुरुवात झाली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 20404 ...

प्रा.जोगेंद्र कवाडे : विदर्भामध्ये जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल प्रचंड आहे याची सर्वांना कल्पना आहे. यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जातो. माननीय पंतप्रधान महोदयांनी विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी पॅकेज जाहीर केले. 178 मध्यम प्रकल्प आणि 65 लघुपाटबंधारे प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यासाठी पंतप्रधानांनी 2085 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केलेले होते. त्यामधील सन 2006 पर्यन्त 207 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. जलसिचनाचा असमतोल दूर करण्यास विलंब लागतो. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 2085 कोटीचे पॅकेज आले, त्यामधील केवळ 207 कोटी रुपये खर्च करू शकलो. बाकीचे पैसे खर्च करून प्रकल्प केव्हा पूर्ण केले जातील ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : माननीय पंतप्रधानांनी दिलेल्या पॅकेजची येत्या तीन वर्षामध्ये अंमलबजावणी करायची आहे. तीन वर्षामध्ये त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात कार्यक्रम देखील तयार केलेला आहे. अतिरिक्त सिंचनक्षमता निर्मितीसाठी 2177 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. जवळपास 1.60 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल. त्यामध्ये 8 मोठे, 1 मध्यम, 65 लघू आणि 260 स्थानिक प्रकल्प आहेत. शासनाने देखील 882 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. यावर्षी 240.76 कोटी खर्च आपण केलेला आहे. उर्वरित खर्चसुदा पुढच्या तीन वर्षामध्ये करुन सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न रहाणार आहे.

श्री.सुधाकर गणगणे : मंत्री महोदयांचे उत्तर दिशाभूल करणारे आहे. एकूण चार मागण्या केलेल्या आहेत त्या महत्वाच्या आहेत. त्यामध्ये राष्ट्रपतींच्या आदेशाची मुदत 20 वर्षांनी वाढविण्यात यावी,अशी संघटनेची मागणी आहे. त्यानंतर कलम 371 (2) चा भंग होत असल्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी, तिसरी मागणी जलसिंचनाच्या अनुशेषाची माहिती मागितलेली आहे. याबाबत काहीच माहिती दिलेली नाही.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, काही मागण्या या केंद्र सरकारशी संबधित आहेत आणि काही मागण्या या राज्य सरकारच्या अखत्यारितील आहेत. राष्ट्रपतींच्या आदेशाची मुदत 20 वर्षांनी वाढविण्याच्या मागणीबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यानंतर कलम 371 (2) चा भंग होत असल्याची तक्रार केलेली आहे. त्यानंतर सन्माननीय राज्यपालांनी दिलेल्या जनसिंचन अनुशेषाच्याबाबतीत अंमलबजावणीच्या संबंधातील प्रश्न उपस्थित केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MAP/ MHM/

डॉ. राजेंद्र शिंगणे (पुढे सुरु...

तारांकित प्रश्न क्रमांक 20404 ...

माननीय राज्यपालांनी दिनांक 1 एप्रिल 2005 अखेर शिल्लक आर्थिक अनुशेष रु.4329.94 कोटी पुढील 4 वर्षात (वर्ष 2006-07 ते 2009-10) दूर करण्यासाठी दिनांक 6 मार्च,2006 रोजी नवीन निदेश प्रसृत केले. तरतुदीचे विकास मंडळनिहाय वाटप येत्या 4 वर्षासाठी ठरवून देण्यात आले आहे. त्यात 2006-07 साठी अनुशेषाला (1 एप्रिल 2005 अखेरच्या) 25 टक्के, लोकसंख्येला 40 टक्के, निव्वळ पेरणी क्षेत्राला 20 टक्के आणि प्रगती पथावरील प्रकल्पांच्या उर्वरित किंमतीस 15 टक्के असे प्राधान्य गृहित धरण्यात आलेले आहे. नंतरच्या प्रत्येक वर्षासाठी अनुशेषासाठीचे प्राधान्य 10 टक्क्यांनी वाढविले असून त्याचप्रमाणात लोकसंख्येचे प्राधान्य कमी केले आहे. विदर्भ वैधानिक मंडळाच्या सन 2006-07 मध्ये 37.98 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे, सन 2007-2008 या वर्षासाठी 42.98 कोटीची तरतूद आणि सन 2008-2009 मध्ये 47.18 कोटी आणि 2009-10 मध्ये 51.78 कोटी रुपयाची तरतूद करत आहोत. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे तंतोतंत पालन करून कार्यवाही करत आहोत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20404 .....

प्रा. फौजीया खान : माननीय सभापति महोदय, इस प्रश्न के उत्तर तीन में दिया गया है कि विदर्भ और मराठवाडा में जल सिंचन का अनुशेष सबसे ज्यादा है. मैं कहना चाहती हूं कि विदर्भ में किसानों की आत्महत्याओं को देखते हुए स्पेशल पॅकेज दिया गया है. वास्तव में देखा जाए तो मराठवाडा में हयुमॅन डॅवलपमेंट का इंडेक्स यदि हम देखें तो उससे मालूम पड़ता है कि वहां पर प्रति व्यक्ति इंकम, अपने राष्ट्र में सबसे नीचे के क्रम पर है. इसलिए मैं जानना चाहती हूं कि क्या विदर्भ जैसा स्पेशल पॅकेज मराठवाडा को देने के बारे में भी सरकार विचार करेगी ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 22.2.2005 रोजी मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी पॅकेज जाहीर केले होते. त्यामध्ये 1192 कोटी रुपये पाटबंधाऱ्यांसाठी 4 वर्षात देण्याचा प्रस्ताव सुध्दा मंजूर करण्यात आला आहे. वर्षनिहाय किती तरतूद द्यावयाची याचे प्रत्यक्ष वाटप सुध्दा ठरविलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, जसे मी विदर्भाच्या बाबतीत आकडेवारी सांगितली तशा पध्दतीने मराठवाड्यासाठी सुध्दा सन 2004-05 पासून सन 2007-08 पर्यंतचे वाटप ठरविलेले आहे. सन 2004-05 मध्ये 200 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. प्रत्यक्षात 200 कोटी रुपयांचे वाटप सुध्दा झालेले आहे. सन 2005-06 मध्ये 414 कोटी रुपयांची तरतूद केली आणि 225 कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. सन 2006-07 मध्ये 316 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत आणि प्रत्यक्ष वाटप 227 कोटी रुपयांचे होईल असा विश्वास देऊ इच्छितो. सन 2007-08 समध्ये 262 कोटीची तरतूद मराठवाड्यासाठी देणार आहोत

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एस.एस.सी बोर्डाशी असलेली संलग्नता रद्द करुन आयसीएससी किंवा सीबीएससी बोर्डाशी संलग्न होणाऱ्या शाळांच्या संख्येत मुंबईमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याबाबत**

**(5) * 20442 श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत** : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) एस.एस.सी बोर्डाशी असलेली संलग्नता रद्द करुन आयसीएससी किंवा सीबीएससी बोर्डाशी संलग्न होणाऱ्या शाळांच्या संख्येत मुंबईमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याचे नुकतेच शासनाच्या निदर्शनास आले आहे हे खरे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
**श्री. हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (1) मुंबईत अशा फक्त तीन शाळा आहेत.
(2) व (3) चौकशी केलेली नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने अतिशय असत्य उत्तर दिलेले आहे. शासन याबाबतीत अजिबात गंभीर नाही. कारण एस.एस.सी. बोर्डाकडून मान्यता काढून घेण्यासाठी किंवा संलग्नता रद्द करण्यासाठी बोर्डाची एन.ओ.सी. घ्यावी लागते. माझ्या माहिती प्रमाणे मुंबईमध्ये आयसीएससी आणि सीबीएससी या बोर्डाच्या 30 ते 35 शाळा चालू आहेत. या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, मुंबईत अशा फक्त तीन शाळा आहेत. जर अशा तीनच शाळा असतील तर बाकीच्या ज्या शाळा चालू आहेत त्या शाळांची संलग्नता तशीच ठेवून या बोर्डाची मान्यता शासन काढून घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रश्नामध्ये असे विचारलेले आहे की, आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाच्या शाळांच्या संख्येत मुंबईमध्ये झपाट्याने वाढ होत आहे हे खरे आहे काय ? त्याबाबतचे उत्तर असे आहे की, तीनच शाळांना शासनाने एन.ओ.सी. दिलेली आहे. 16 जानेवारी, 2003 ला एक, 27 जून, 2005 ला एक आणि 27 मे, 2005 ला एक अशा तीन शाळांना एन.ओ.सी. दिलेली आहे. त्याच्या पूर्वी मुंबईमध्ये या दोन्ही बोर्डाच्या 44 शाळा चालू आहेत. परंतु या तीन वर्षामध्ये तीनच शाळांना एन.ओ.सी. दिलेले आहे. त्यामुळे शाळांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे असे जे म्हटलेले आहे त्याबाबत "नाही" असे उत्तर आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ MHM/ D/

ता. प्र.क्र. 20442 ....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सांताक्रुझ येथील शेठ आनंदीलाल पोद्दार ही शाळा गेल्या 50 वर्षापासून अस्तित्वात आहे. तेथील शिक्षकांना कमी करुन, पालकांना धाक दाखवून, विद्यार्थ्यांना नापास करुन तुकड्या कमी करण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या शाळेचे रुपांतर सीबीएससी किंवा आयसीएससीमध्ये करण्यासाठी त्यांनी प्रस्ताव मांडलेला आहे. मुंबईमध्ये अशा बऱ्याच शाळा आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी 50 शाळा असल्याचे सांगितले. अशा शाळांची चौकशी केली पाहिजे. मी जे स्पेसिफिक उदाहरण दिले त्या शाळेला न्याय मिळणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : त्याबाबत निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, स्टेटसच्या दृष्टीकोनातून अशी परिस्थिती निर्माण होत आहे. शासन अशा संस्थांवर नियंत्रण ठेवत नाही त्यामुळे त्यांचे प्रमाण वाढत चाललले आहे हे सत्य आहे. एस.एस.सी. बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे असे दाखवण्यासाठी विद्यार्थ्यांना नापास करावयाचे असे प्रकार होतात.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 12:35

(ता.प्र.क्र. 20442... (श्री. अरविंद सावंत....

अशा प्रकारे एसएससी बोर्डाकडून केद्रीय बोर्डाकडे जाण्यासाठी मान्यता घेण्याकरिता किती शाळांचे प्रस्ताव आलेले आहेत ? आपल्या राज्यातील शाळा आयसीएससी किंवा सीबीएससी बोर्डाशी संलग्न झाल्या तरी प्रशासकीय बाबतीत राज्य शासनाला अधिकार असतात. या शाळांमध्ये गरीब वर्गातील मुलांसाठी तसेच अपंगासाठी आरक्षण ठेवण्यासंबंधीचे नियम आहेत. परंतु या शाळा त्या नियमांचे पालन करीत नाहीत. या शाळा प्रवेश देण्यासाठी प्रचंड मोठी फी घेतात. याबाबतीत अशा शाळांवर काही प्रशाकीय निर्बंध घातलेले आहेत काय ? शाळांच्या संलग्नतेबाबत शिक्षण निरीक्षक बसंती रॉय यांनी काही मार्गदर्शक तत्वे तयार केली होती, त्यावर शासनाने काय कारवाई केलेली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : बृहन्मुंबईतून तीन अर्ज आलेले होते आणि त्याबाबतीत त्यांना नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट दिलेले आहे. केन्द्राचे हे दोन्ही अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून आहेत. आपल्याकडेही इंग्रजी माध्यमाच्या चांगल्या शाळा आहेत.त्या शाळातूनही चांगले शिक्षण दिले जाते.

श्री. भास्करराव जाधव : कोकणासाठी रत्नागिरीमध्ये एसएससी बोर्ड स्थापन करण्याची घोषणा मागील अधिवेशनामध्ये मंत्री महोदयांनी केली होती. मंत्री महोदय रत्नागिरी जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. तेव्हा एसएससी बोर्ड रत्नागिरीमध्ये स्थापन करण्याच्या संदर्भात सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे. परंतु मी रत्नागिरी जिल्ह्याचा पालकमंत्री असल्यामुळे हे सांगू इच्छितो की, आपण सर्व कार्यवाही पूर्ण केलेली आहे. लवकरात लवकर बोर्ड स्थापन केले जाईल.

डॉ.वसंत पवार : ज्या पालकांना आणि शिक्षण संस्थांना एसएससी बोर्डाकडून आयसीएससी किंवा सीबीएससी बोर्डाकडे जायचे असेल तर त्याबाबतीत त्यांना मनाई करु नये, असे मला वाटते. कारण त्यामुळे आयसीएससी, सीबीएससी आणि एसएससी बोर्ड यांच्यामध्ये शैक्षणिक गुणवत्तेबाबत चांगली स्पर्धा होईल. म्हणून सरकारने याबाबतीत हरकत घेऊ नये.

श्री. हसन मुश्रीफ : यामध्ये हरकत घेण्याचा प्रश्न येत नाही. केन्द्रीय कायद्याप्रमाणे ज्यांना पसंत पडेल त्याप्रमाणे त्यांना अभ्यासक्रम निवडण्याचा हक्क आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 20442...

श्री. जी.एल.ऐनापुरे : एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम आणि आयसीएससी किंवा सीबीएससी बोर्डाचा अभ्यासक्रम यामध्ये खूप फरक आहे. आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाचा अभ्यासक्रम स्पर्धात्मक परीक्षांना पूरक आहे आणि एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम हा मागासलेला आहे. तेव्हा एसएससी बोर्डाचा अभ्यासक्रम आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाप्रमाणे करण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : एसएससी बोर्डाची देखील शैक्षणिक गुणवत्ता सुधारावी आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाप्रमाणे एसएससी बोर्डाचे स्टॅण्डर्ड रहावे यादृष्टीने निश्चितच प्रयत्न केले जातील.

श्री. संजय केळकर : ठाणे जिल्हयातील किती शाळा आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाशी संलग्न आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : माझ्याकडे बृहन्मुंबई आणि राज्याची आकडेवारी आहे. राज्यामध्ये आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाशी संलग्न असलेल्या 177 शाळा आहेत.

श्री. रामनाथ मोते : एसएससी बोर्डाशी असलेली संलग्नता रद्द करुन आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाग्शी संलग्नता मिळविण्यासाठी अनेक शाळा प्रयत्न करीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये झपाट्याने वाढ होत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20442.................. श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, एसएससी बोर्डाशी संलग्नता रद्द करुन सीबीएससी बोर्डाची संलग्नता मागतात त्या शाळांना शासनाकडून एनओसी प्राप्त करणे आवश्यक आहे आणि ती शासनाकडून दिली जाते. एनओसी देताना त्या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना काढून टाकण्यात येते आणि अन्य शिक्षकांची भरती केली जाते. त्यामुळे एसएससी बोर्डाची संलग्नता रद्द करुन सीबीएससी बोर्डाची संलग्नता मिळण्यासाठी एनओसी देताना सेवेत असलेल्या शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी काटेकोर निर्बंध लादले जातील का?

श्री.हसन मुश्रीफ : त्या शिक्षकांची मान्यता घेऊनच एनओसी देतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा केवळ स्टेटसचा किंवा शिक्षण अभ्यासक्रमातील फरकाचा प्रश्न नाही. जे पेव फुटले आहे ते संस्था चालकांचे त्या जागांवर लक्ष आहे. संस्था विकण्याचा प्रकार सुरु आहे. दुसऱ्या बाजूला एसएससी बोर्डाच्या कचाट्यातून आणि शिक्षकांच्या पगारावरील खर्चातून, आरक्षणातून बाहेर पडून पैसा कमावण्याचे यंत्र म्हणून पाहिले जात आहे. शाळा विकण्यासाठी मुलांना कमी करायचे आणि मग स्वीचओव्हर व्हायचे. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी मागणी केली तर एसएससी बोर्डाची पर्यायी अनुदानित शाळा देणार का?

श्री.हसन मुश्रीफ : ते शासनाचे काम आहे. सन्माननीय सदस्यांनी उदाहरण दिल्यास चौकशी केली जाईल आणि तशी शाळेची मागणी आली तर पर्यायी शाळा देऊ.

डॉ.दीपक सावंत : राज्य शासनाने गंभीरपणे या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. सीबीएससी आणि आयसीएससी संलग्नता मिळण्यासाठी शासनाकडून एनओसी देत असताना जे नियम आहेत ते अधिक मजबूत केले जातील का? पालकांनी किंवा शिक्षकांनी शासनाकडे तक्रार केली तर त्या शाळांची एनओसी रोखणार आहात का?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितले आहे. आपण काटेकोरपणाने अंमलबजावणी करु. एखाद्या पालकाने तक्रार केली तर कारवाई करता येणार नाही. बहुसंख्य पालकांची इच्छा असेल तर निश्चितपणे विचार करु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो मुद्दा मांडला, शाळांना शासनाकडून भूखंड मिळालेले असतात, ज्याठिकाणी त्यांनी एसएससी बोर्डाची शाळा सुरु केलेली असते, त्या भागातील लोकांची ती गरज असते. शाळांची सीबीएससी आणि

..2..

श्री.विनोद तावडे.......

आयसीएससी बोर्डाला पैसे देऊन संलग्नता मिळविण्याची तयारी असते आणि मान्यता मिळाली की शिफ्टींगची स्पर्धा सुरु होते. पोद्दार हायस्कूलमध्ये मागील 4-5 वर्षात 9 वीला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात अनुत्तीर्ण केले गेले. त्याच विद्यार्थ्यांना त्याच शाळेतून दहावीला बाहेरुन बसविले जाते, कारण दहावीचा निकाल सगळयात जास्त लागला हे दाखविण्याचा प्रयत्न असतो. अशा प्रकारांची आपण चौकशी करणार का?

श्री.हसन मुश्रीफ : चौकशी करु.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आयसीएससी आणि सीबीसीएस या बोर्डाची संलग्नता असलेल्या शाळांमध्ये आरक्षण लागू नाही का?

श्री.हसन मुश्रीफ : लागू आहे. आपल्या देशाच्या घटनेमध्ये तशी तरतूद आहे. त्यामुळे सगळया शाळांमध्ये आरक्षण लागू आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : आयसीएससी आणि सीबीएससी बोर्डाची मान्यता मिळविणे ही अपरिहार्य स्पर्धा सुरु झाली आहे. या पध्दतीमुळे मराठी भाषा हद्दपार होत आहे याकडे शासनाने दुर्लक्ष करुन चालणार नाही. या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना दहा वर्षानंतर मराठी भाषा बोलता येणार नाही हे मी माझ्या अनुभवावरुन सांगतो. शासनाकडून याबाबत पावले उचलून मराठी भाषा शिकविणे सक्तीचे केले जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : एसएससी बोर्डाशी संलग्न असलेल्या इंग्रजी शाळा आहेत का? आपली राजभाषा मराठी आहे. सीबीएससी आणि आयसीएससी शाळा या केंद्रीय बोर्डाच्या आहेत. त्याबाबत आपल्याला सक्ती करता येणार नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 20442** .........

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जो उपप्रश्न विचारलेला आहे तो प्रश्न सदनाच्या दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे त्याच्याशी संबंधीत आहे. विद्यार्थी कोठे शिकतात यापेक्षा विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या शिक्षण संस्थेत मराठी ही राजभाषा असल्यामुळे ती शिकवली जाणे अपेक्षित आहे. शाळेत शिकविण्यात येणा-या भाषेचा त्रिसूत्री फॉर्म्यूला सक्तीचा करण्यासाठी शासनाचे काय प्रयत्न राहतील ?

श्री. हसन मुश्रीफ : तसा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, कोणत्याही भाषेची शाळा असली तरी त्या शाळेमध्ये मराठी भाषा शिकविणे हे कंपलसरी करावे असा सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी याप्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोजिसरच्या मुद्यावर उभा आहे. त्रिसूत्री भाषेच्या फॉर्म्यूल्याप्रमाणे शाळेमध्ये तीन भाषा शिकविणे आवश्यक आहे. परंतु या शाळांमध्ये केवळ इंग्रजी आणि हिंदी या दोनच भाषा शिकविल्या जातात. या शाळांना महाराष्ट्र शासन सोयी-सवलती पुरवित असते त्यामुळे या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जाईल काय?

**सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी उपप्रश्न विचारल्यानंतर त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनातील ज्या भावना आहेत त्या भावनांच्या अनुषंगाने मी सांगितले की, राज्यामध्ये कोणत्या पध्दतीच्या शिक्षण देणा-या शाळेमध्ये भाषेच्या संदर्भातील भाषेच्या त्रिसूत्री फॉर्म्युल्याप्रमाणे मराठी विषय सक्तीचा करण्यासाठी शासनाचे काय प्रयत्न राहतील असे मी सदस्यांच्या वतीने विचार मांडलेले आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मराठी भाषेवर आपल्या सर्वांचे प्रेम आहे. आयसीएससी आणि सीबीएससीच्या शाळेत हिंदी आणि इंग्रजी अशा दोन भाषा शिकविल्या जातात. या ठिकाणी जर मराठी भाषा सक्तीची करावयाची असेल तर इंग्रजी भाषेच्या ऐवजी मराठी किंवा हिंदी भाषेच्या ऐवजी मराठी भाषा करावी लागेल. परंतु या शाळेमध्ये मराठी भाषा शिकवण्याचा संदर्भात त्या प्रशासनाला सांगून निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

**ता.प्र.क्र. : 20442** .........

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यासाठी उभा आहे. माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असतांना हा प्रश्न विचारण्यात आलेला होता. कोणत्याही भाषेची शाळा असली तरी त्या शाळेमध्ये मराठी भाषा शिकविणे हे कंपलसरी करावे असा सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे त्यामुळे शासन सुप्रिम कोर्टाचा निर्णय मान्य करेल काय ? असे विचारले होते. त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यासंदर्भात सुप्रिम कोर्टाचा निर्णय मान्य करण्यात येईल. त्यामुळे आता पुन्हा या विषयाच्या संदर्भात प्रयत्न करण्यात येईल असे उत्तर येणे काही बरोबर नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे कम्पलसरी करण्यासंदर्भात शाळेच्या प्रशासनाला निश्चितपणे कळविले जाईल.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी**
**मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करण्याबाबत**

**(६) * २३३६१ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक आधुनिकीकरण करुन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी एसएससी बोर्डाच्या धर्तीवर राज्यात स्वायत्त मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय जानेवारी, २००६ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ,प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता**: (१) होय.

(२) सदर प्रस्तावातील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे -

अ) राज्यामध्ये मध्यप्रदेश व पश्चिम बंगाल या राज्याच्या धर्तीवर मदरसा शिक्षण मंडळ स्थापन करणे.

ब) सध्या मदरशांना पाठशाळेमध्ये देण्यात येत असलेले शिक्षण व मदरसा शिक्षण मंडळ स्थापन केल्यामुळे त्यांना देण्यात यावयाचे विषय व अभ्यासक्रम याबाबत चर्चा.

क) मदरसा शिक्षण मंडळ स्थापन केल्यानंतर त्या मंडळाची आस्थापना, रचना, उद्देश याबाबत निर्णय घेणे.

ड) या मदरसा शिक्षण मंडळामधील मदरसांमध्ये देण्यात यावयाच्या विविध विषयाच्या शिक्षणाकरिता नियुक्त केलेल्या / करावयाच्या शिक्षकांना राज्य शासनाच्या शिक्षण मंडळाच्या अनुरोधाने द्यावयाची वेतनश्रेणी.

इ) मदरसामध्ये सध्या जे शिक्षक आहेत त्या शिक्षकांना राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याने त्याची कार्यपध्दती.

ई) मदरसा शिक्षण मंडळामध्ये राज्याची शिक्षण मंडळाशी समकक्ष अभ्यासक्रम लागू करण्याबाबत.

फ) मदरसा शिक्षण मंडळामध्ये इयत्ता ४ थी, ७ वी, १० वी व १२ वी या स्तरावरील परीक्षा राज्य शिक्षण मंडळामार्फत घेण्याबाबत.

म) मदरसा शिक्षण मंडळामधील मदरसांना देण्यात यावयाचे अनुदानाबाबत चर्चा.

(३) कायदे विषयक बाबी, वित्तीय भार या अनुषंगाने विधी व न्याय विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग यांची मान्यता घेण्याची कार्यवाही चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :23361....**

प्रा. फौजीया खान : माननीय सभापति महोदय, राज्य में स्वायत्त मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करने का निर्णय जनवरी 2006 में लिया गया है और यहां पर उत्तर क्रमांक तीन में बताया गया है कि इस बारे में कुछ बातो पर निर्णय लेने की प्रक्रिया अभी शुरु है. मुझे कहना है कि अभी इस बारे में बहुत सी बातों के बारे में कंफ्युजन है. क्योंकि जब मदरसा बोर्ड स्थापित होता है तो वहां पर दो तरह की शिक्षा दी जाती है एक तो रिलीजियस एजुकेशन और दूसरी स्टेट बोर्ड एजुकेशन. मुझे पूछना है कि इनका ऑटोनमी स्टेटस क्या रहेगा. इसके अलावा मुझे पूछना है कि इस राज्य में इस तरह के कितने मदरसे है और क्या उनसे इस बारे में कुछ विचार विमर्श किया गया है ? इन सब बातों की जानकारी सदन को देना जरुरी है. लेकिन माननीय मंत्री महोदय द्वारा दिए गए छपे उत्तर से उन बातों का खुलासा नहीं होता है. इसलिए क्या मंत्री महोदय इन बातों का उत्तर सदन में देंगे ?

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23361........

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या राज्यात जे मदरसे आहेत विशेषत: मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिनांक 4.1.2006 रोजी शासनाने मदरसा बोर्ड स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या बोर्डावर तीन अधिकाऱ्यांनी नियुक्ती करण्यात आलेली आहे. पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अशाप्रकारचे मदरसे सुरु आहेत. या तीन अधिकाऱ्यांनी या राज्यात जाऊन तेथील अभ्यासक्रमाबाबत चर्चा करावी. त्याठिकाणी शिक्षकांना कोणती वेतनश्रेणी देण्यात येते, कोणकोणत्या भाषेचा अभ्याक्रमांमध्ये समावेष आहे याची त्यांनी माहिती घ्यावयाची आहे. मदरसांमध्ये रिलिजिअस शिकवितात असा गैरसमज आहे त्यामुळे मदर्शांची नोंदणी करावी. त्यांना चांगल्या तऱ्हेचे शिक्षण द्यावे. रिलिजिअस शिक्षणाबरोबर इतरही चांगले शिक्षण द्यावे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी चांगल्याप्रकारचे शिक्षण द्यावे असा शासनाचा उद्देश आहे. त्यासाठी एक समिती घटित करावयाची असून त्या समितीवर दोन्ही बाजुच्या मुस्लिम सदस्यांची नियुक्ती केली जाईल.........

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, समितीवर दोन्ही बाजुकडील मुस्लिम सदस्यांची नियुक्ती केली जाईल. मला मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे की, आपण समिती गठीत करीत असाल तर त्या समितीवर मुस्लिम सदस्यांबरोबर इतरही सदस्यांची नियुक्ती करावी.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे मदरसा बोर्डाला विरोध करण्याचे काही कारण नाही. हा विषय नीटपणे समजून घेतला पाहिजे. या संदर्भात अभ्यासक्रम निश्चित करण्याचा अधिकार कोणाला आहे ? पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष श्री.परवेज मुशर्रफ यांनी पाकिस्तानातील सर्व मदरसे रद्द केलेल आहेत. आज मुस्लिम समाजाला संगणक, विज्ञान- तंत्रज्ञान शिकविण्याची आवश्यकता आहे. डॉ.अब्दुल कलाम यांच्यासारखा भविष्याचा वेध घेऊन विकास योजना शिकविण्याची आवश्यकता आहे. प्रश्न असा आहे की, मदरसे सरकारच्या कोणत्याही अभ्यासक्रमांचे

ता.प्र.क्र.23361........

श्री.नितीन गडकरी........

बंधन मानायला तयार नाही. त्यांना रिलिजिअस मायनॉरिटी अधिकाराखाली अभ्यासक्रम ठरविण्याचा अधिकार आहे. त्यावर शासन कोणत्याही प्रकारचे बंधन आणू शकत नाही. आपण मदरशांना जरुर मदत करावी. परंतु त्याठिकाणी जर "लादेन झिंदाबाद" च्या घोषणा होत असतील तर त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतील. मदरशांमध्ये डॉ.अब्दुल कलाम सारख्या व्यक्ती तयार झाल्या पाहिजेत. तेव्हा मदरशामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, भविष्यात रोजगाराची सोय होईल अशाप्रकारचे शिक्षण मिळेल अशाप्रकारचे बंधन शासन आणणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23361....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी तेच सांगितले की, रिलिजिअस शिक्षणाबरोबरच आपल्याला.....(अडथळा) तंत्रज्ञान....

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन एवढयापुरताच मर्यादित आहे की, जे मदरसे आहेत, त्यात विज्ञान किंवा अन्य क्षेत्रामध्येसुध्दा शिक्षणाची तरतूद व्हावी, अशा पध्दतीची व्यवस्था आहे का ? एवढयापुरताच त्यांचा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन मर्यादित आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ते आहेच. त्यांना मुख्यप्रवाहात आणण्याचा शासनाचा उद्देशच आहे. त्यांचे शिक्षणामध्ये मागासलेपण असल्यामुळे त्यांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी संघटीत.....(गोंधळ) लादेन कधी तयार झाले ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे....(गोंधळ) ...बाबरी मशीद पाडून.....

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझे ऐकून घेतले पाहिजे. आम्ही पाडव्याला पोळया खाल्याशिवाय....(गोंधळ) मी सत्यच सांगत आहे.

**सभापती** : कृपया माननीय मंत्रिमहोदयांनी प्रश्नाच्या मर्यादेत बोलावे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी प्रश्न विचारावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय आक्षेपार्ह विधान केलेले आहे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकत्र घोषणा देतात. )

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23361....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय आक्षेपार्ह असे उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुस्लीम समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी बोर्ड स्थापन केले. मुस्लीम समाज राष्ट्रीय प्रवाहातच आहे. तो "नाही" असे म्हणणे आक्षेपार्ह आहे. सभापती महोदय, मदरसा हे धार्मिक शिक्षणासाठी असते. मदरसा बोर्ड स्थापन करुन धर्मामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार हे शासन स्वत:कडे घेत आहे, याला आमचा आक्षेप आहे. ऊर्दू शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असून मदरसा बोर्डऐवजी गरीब मुस्लीम मागासवर्गीयांसाठी आश्रमशाळा काढाव्यात, परंतु बोर्ड कृपया करु नये. याठिकाणचे सन्माननीय सदस्य आपली मुले मदरसा बोर्डामध्ये घालणार नाहीत. आपण मुस्लीम समाजावर अन्याय करु नये, ती महाराष्ट्राची परंपरा नाही. त्यामुळे आपण मदरसा बोर्ड वेगळे करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो आपण रद्द करणार का ? व मुस्लीम समाजाला त्यांच्या हक्कानुसार आपण मुलभूत शिक्षण देण्याच्या दृष्टीने निर्णय घेणार का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महादेय, मी मघाशीच सांगितले की, मदरसा बोर्ड जे होत आहे, ते करण्यासंबंधीचा निर्णय यापूर्वीच शासनाने घेतलेला आहे व त्यामध्ये एक समिती होती. त्यामध्ये दोन्ही सभागृहाच्या सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांना आपण घेऊ. मी याबाबतीत मघाशी जे बोललो त्यामध्ये बदल करुन आपण सर्वपक्षीय सदस्यांना त्या कमिटीमध्ये घेऊ. त्याप्रमाणे समितीच्या बैठकीमध्ये मदरसा बोर्ड बंद करुन आश्रमशाळा काढाव्यात की नाही याबाबतीत ती समिती निर्णय घेईल. तेथील मुले शिक्षणापासून वंचित न राहता त्यांना शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणण्याच्या दृष्टीने आपल्याला प्रयत्न करावे लागतील.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.23361**.............

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. मी असा प्रश्न विचारला होता की, विधिमंडळाची समिती नेमणे हे अनकॉन्स्टीटयूशनल आहे. हा विषय रिलिजिअस मायनॉरिटी ॲक्टअंतर्गत येतो. रिलिजिअस अभ्यासक्रम ठरविणे आणि प्रवेश देण्याचे अधिकार या ॲक्टअंतर्गत मायनॉरिटी संस्थांकडे अबाधित आहेत. त्यामुळे समिती नेमून यामध्ये बदल करणे शक्य नाही. मुस्लिम समाजामध्ये धार्मिक शिक्षणाच्या माध्यमातून आतंकवाद्यांना प्रोत्साहन देणारे शिक्षण दिले जाते. विज्ञान, तंत्रज्ञान, इंग्रजी अशा प्रकारचे शिक्षण देऊन मुस्लिमांना आपल्या पायावर उभे करण्याची आवश्यकता आहे. मागील काळात मुस्लिम समाजाला केवळ चहाची गाडी, कबाडी, ट्रक ड्रायव्हर, मेकॅनिक, क्लिनर हेच व्यवसाय या सरकारने दिले आहेत आणि त्यांना वापरुन घेण्यात येत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, धार्मिक शिक्षणासंबंधीचे जे अधिकार या संस्थांना आहेत ते जर बदलावयाचे असतील तर कायद्यात दुरुस्ती करावी लागेल. मुस्लिमांना एकविसाव्या शतकाकडे घेऊन जाण्याच्या दृष्टीने संगणक, तंत्रज्ञान, विज्ञान अशा पध्दतीचा शिक्षण अभ्यासक्रम मदरसा तयार करणार काय ? मी आपल्याला या ठिकाणी माहिती देऊ इच्छितो की, जनरल मुशर्रफ यांनी पाकिस्तानमधील सर्व मदरसे बंद केले आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, कायद्यात सुधारणा करण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी आणि माझे विचार एकच आहेत. ती जी मुले ज्यांचा त्यांनी उल्लेख केला ती मुख्य प्रवाहापासून वंचित आहेत. त्यामुळे कायद्यात दुरुस्ती करणार काय ? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. आपण आता जी समिती नेमणार आहोत ती समिती या सर्व बाबींचा अभ्यास करणार आहे. समितीने आपल्या शिफारशी शासनाला सादर केल्यानंतर त्याप्रमाणे शासन योग्य ती कार्यवाही करेल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

--------------

..2...........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ.सुनील देशमुख (अर्थ राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सन 2005-2006 चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----------------

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितचा सन 2004-2005 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------------

श्री.रविशेठ पाटील (पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचा सन 2001-2002 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------------

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाचा सन 2004-2005 चा तेहतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.अरविंद सावंत (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करीत असतांना या अहवालातील काही प्रमुख प्रकरणे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. हा अहवाल महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कामकाजासंबंधातील आहे.

पहिल्या प्रकरणात मंडळाने सुरुवातीपासूनच अनेक चुका केल्या. दोन मीटरचा बंधारा बांधायचा की 4 मीटरचा बंधारा बांधायचा हे अगोदर ठरविले नाही. केंद्रीय आरेखन संस्था नाशिक यांचेकडून बंधा-याच्या आरेखनाची अंतिम मंजूरी मिळविण्यापूर्वीच कंत्राटदाराला काम देण्यात आले. समितीच्या मते मंडळाच्या अधिका-यांना सदरहू कंत्राटदाराला कम देण्याची घाई झाली होती. दुसरे म्हणजे ज्यावेळी एखाद्या कामात 25 टक्क्यापेक्षा जास्त वाढ होते त्यावेळी पुन्हा निविदा मागवावयाच्या असतात. परंतु मंडळाने तसे न करता वाढीव कामदेखील त्याच कंत्राटदाराला दिले. मंडळाचे अधिकारी व कंत्राटदार यांचे यात संगनमत असावे असा संशय समितीस येत आहे. सुरुवातीच्या टेंडरमध्ये स्वामित्व धनाची बाब नव्हती. नंतर जे काम वाढवले गेले त्यात स्वामित्व धनाची बाब कंत्राटदाराने मंडळाच्या अधिका-यांशी संगनमत करुन उपस्थित केली व मंडळाने देखील कंत्राटदाराची मागणी मान्य केली. मंडळाच्या कारभारातील गलथानपणाच यास कारणीभूत आहे. म्हणून समितीने शिफारस केली आहे की, या सर्व प्रकरणाची खास अधिका-यांमार्फत चौकशी करावी व दोषींविरुद्ध कठोर कारवाई करावी.

सभापती महोदय, दुस-या प्रकरणात देखील अशाच प्रकारची अनियमितता झालेली असून कंत्राटदाराला रुपये 1.62 कोटींचे अतिरिक्त प्रदान करण्यात आले आहे. समितीच्या मते मंडळाच्या अधिका-यांनी कंत्राटदाराशी संगनमत करुन महामंडळाला आर्थिक नुकसानीच्या खाईत लोटले आहे. समितीने शिफारस केली आहे की, केवळ कमी किंमतीची निविदा प्राप्त झाली आहे म्हणून त्या कंत्राटदारास काम द्यावयाचे ही पद्धत योग्य नाही. त्या कंत्राटदाराचा अन्य कामाचा अनुभव, त्याची काम पूर्ण करण्याची कुवत इत्यादी बाबी लक्षात घेऊनच काम दिले गेले पाहिजे. समितीने शिफारस केली आहे की, यासंबंधात मंडळाने सुस्पष्ट तसेच मार्गदर्शक सूचना आखून द्याव्यात व

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .......

शासनाने देखील या बाबीकडे सतर्कतेने लक्ष देऊन योग्य ती उपाययोजना करावी.

औष्णिक विद्युत केंद्रातून मिळणा-या राखेचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या राखेकरिता फार मोठे क्षेत्र निरुपयोगी होते. त्यामुळे समितीने या संबंधात अशी शिफारस केली आहे की, देशातील अन्य भागात तसेच परदेशात अशा राखेचा विनियोग कोणकोणत्या कामांसाठी व कशा प्रकारे केला जातो व तसे करणे महामंडळास शक्य आहे काय याचा अभ्यास करावा व योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, तिस-या प्रकरणात महामंडळाने आपल्या 5 औष्णिक विद्युत केंद्रात क्लोरिनीकरण संयंत्र बसवावयाचे ठरविले. 10 वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही हे संयंत्र बसवावयाचे काम पूर्ण झाले नाही. काम पूर्ण करण्यास विलंब लागला तर नुकसान भरपाई कंत्राटदारांकडून वसूल करावयाची होती. परंतु मंडळाने कंत्राटदाराकडून कोणतीही नुकसान भरपाई वसूल केली नाही. महामंडळाचा गलथानपणाच यास जबाबदार आहे. हे काम जवळ जवळ 13 वर्षे रेंगाळले. मंडळाचा फार मोठा निधी त्यात अडकून पडला. व्याजाचे नुकसान झाले. तरीही मंडळाने त्या कंत्राटदाराविरुध्द कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही. समितीच्या मते या प्रकरणात सदरहू कंत्राटदार व मंडळाचे अधिकारी यांचे संगनमत असावे अन्यथा कायदेशीर कारवाईस एवढा विलंब मंडळाने लावला नसता. विलंबाबाबत दंड आकारण्याची तरतूद आसतांनाही दंड वसूल केलेला नाही, हे देखील समितीस संशयास्पद वाटते. एकंदरीतच या कामावर केलेला खर्च बहुतांश प्रमाणात वाया गेल्यासारखा आहे. अत्यंत चीड येण्यासारखे हे प्रकरण आहे. समितीने शिफारस केली आहे की, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन मंडळाचे जे अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कडक कारवाई करावी.

सभापती महोदय, अन्य एका प्रकरणात मंडळाने जिल्हाधिका-यांच्या विनंतीवरुन 33 लाख रुपये खर्चुन कोराडी येथील महालक्ष्मी देवळाजवळ एक संग्रहालयाची इमारत बांधली. या तांत्रिक संग्रहालयाचा मुख्य उद्देश औष्णिक विद्युत संयंत्राच्या सर्वसाधारण प्रणालीविषयी लोकांना व पर्यटकांना माहिती देणे आणि कोराडीतील महालक्ष्मी मंदिराच्या असपासच्या क्षेत्रातील पर्यटन विकासास हातभार लावून पर्यटकांना आकर्षित करणे हा होता. हे तांत्रिक संग्रहालय बांधण्यापूर्वी

..3.......



GRB/ KGS/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 13:05

श्री.अरविंद सावंत ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संग्रहालय इमारतीत बसवावी लागणारी सामुग्री, संग्रहालयाच्या परीरक्षा, त्यासाठी आवश्यक असलेले तज्ञ मनुष्यबळ यांच्या वित्तीय परिणामाबाबत कोणतेही विश्लेषण करण्यात आलेले नाही. परिणामी ही इमारत 1987-1988 पासून 2002 पर्यंत म्हणजेच जवळ जवळ 14 वर्षे पडून राहिली व या बांधकामावर केलेला रुपये 33 लाखाचा खर्च व त्यावरील रुपये 55 लाख व्याजाचे नुकसान झाले. तांत्रिक संग्रहालय बांधणे ही बाब विद्युत मंडळाच्या कामाशी निगडीत नसतांनाही मंडळाच्या संचालक मंडळाने या बांधकामाच्या प्रस्तावाला कशाच्या आधारे मान्यता दिली हे समितीस कळू शकले नाही. आता ही इमारत नागपूर तिर्थक्षेत्र परिसर विकास या संस्थेस, ज्यांचे अध्यक्ष जिल्हाधिकारी नागपूर आहेत त्यांना यात्री निवास म्हणून वापरण्यासाठी वार्षिक रुपये 50,000 भाडेपट्टीने 30 वर्षासाठी देण्यात आली आहे. या समितीने देखील एक वर्षाचे भाडे भरले व त्या नंतर भाडे थकविले आहे. समितीने या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन योग्य ती कारवाई करण्याची शिफारस केली आहे. समितीने अशीही शिफारस केली आहे की, मंडळाने या प्रकरणातून बोध घेऊन अशा प्रकारची आगंतुक जबाबदारी यापुढे घेऊ नये.

अध्यक्ष महोदय, समितीस आशा आहे की, शासनामार्फत समितीच्या शिफारसींची योग्य ती दखल घेतली जाईल व परिणामकारक कारवाई केली जाईल.

या दरम्याने मंडळावर श्री.अरुण मागे, श्री.रवी बुद्धीराजा आणि श्री.बागडे हे अधिकारी होते. हे अधिकारी तोटयाला कारणीभूत आहेत. मंडळाने त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मी अहवालाच्या निमित्ताने मागणी करतो.

**सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

...4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

प्रा.जोगेंद्र कवाडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) नवी मुंबई या कार्यालयातील अनुसूचित जातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच महामंडळातर्फे मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना या विषयावरील समितीचा तिसरा अहवाल (1995-1996) व अकरावा अहवाल (2002-2003) यामध्ये ज्या शिफारशी करण्यात आल्या त्याकडे सभागृहाचे लक्ष वेधतो.

सदर अहवालामध्ये मागासवर्गीयांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष या संदर्भात अनेक शिफारशी करण्यात आल्या आहेत त्या शासनाने मंजूर कराव्यात अशी समितीने शिफारस केली आहे. तील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील अनुपालनासंदर्भात तिसरा अहवाल सभागृहास सादर करतो.

अनुसूचित जातींसाठी 11 टक्के सदनिका व गाळे राखीव ठेवण्याबाबत समितीने शिफारस केली होती ती शासनाने मंजूर केल्यामुळे समिती समाधान व्यक्त करते.

तसेच, मागासवर्गीय उमेदवारांच्या मुलाखतीच्या वेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी उपस्थित राहत नाहीत असे समितीच्या निदर्शनास आले आहे याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

सभापती महोदय, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) नवीमुंबई या कार्यालयातील अनुसूचित जातीच्या अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच महामंडळातर्फे मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजना या विषयावरील समितीचा तिसरा अहवाल (1995-1996) व अकरावा अहवाल (2002-2003) यातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील अनुपालनासंदर्भातील तिसरा अहवाल सभागृहात सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कयाण समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

-------

...5.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

डॉ.नीलम गो-हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करते.

सभापती महोदय, शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता मंगळवार, दिनांक 14 डिसेंबर, 2006 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. बॅलटमध्ये दाखविण्यात आल्यानुसार खालील 4 विधेयके कामाज पत्रिकेवर दर्शविण्यात आले असून सदर विधेयकांना 150 मिनिटांचा वेळ खालील प्रमाणे देण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 17- महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध विधेयक, 2006 डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांचे | 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 02 | सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 6- महाराष्ट्र घरेलू कामगार (कल्याण व सेवाशर्ती) विधेयक, 2006 श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे | 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 03 | सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 12- मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2006, श्री.दिवाकर रावते, वि.प.स. | 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही |
| 04 | सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 2- मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006 श्री.संजय दत्त, वि.प.स. | 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही |

यापैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

--------

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यांबाबत ....**

डॉ. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, मी येथे एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करू इच्छितो. चिकन गुन्या संबंधातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये सांगण्यात आल्यापमाणे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल अजूनही या सभागृहाला सादर करण्यात आलेला नाही तसेच त्या लक्षवेधी सुचनेवरील चर्चा देखील अजून अपूर्ण आहे. हे मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देतो.

**सभापती** : माननीय आरोग्य राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आता येथे सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे चिकनगुन्या संबंधात लक्षवेधी सुचनेवरील चर्चा येथे सुरू असताना पीठासीन अधिकाऱ्यांनी सूचना दिली होती आणि या बाबतीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील जी समितीने आहे तिने जी काही कार्यवाही केली आहे त्यासह अहवाल सादर करावा आणि त्याबाबत काही प्रश्न विचारण्यास देखील सन्माननीय सदस्यांना परवानगी द्यावी. मला वाटते परवाच याबाबत विधीमंडळाने आपल्याला कळविले आहे. तेव्हा आजच तो अहवाल सादर करण्यासाठी प्रयत्न व्हावेत अन्यथा उद्या निश्चितपणे तो अहवाल सभागृहाला सादर करण्यात यावा.

श्री. रणजित कांबळे : होय साहेब.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान झाल्या प्रकरणी आपण शासनास निवेदन करण्याचे निदेश दिले होते. पण त्याबाबत कालही निवेदन करण्यात आलेले नाही आणि काल मी हा मुद्दा उपस्थित केला असता माननीय उपसभापतींनी त्याची दखल घेऊन आज प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर त्वरित निवेदन करण्यात यावे असे निदेश शासनाला दिले होते पण अजूनही ते निवेदन सरकारकडून करण्यात आलेले नाही ही बाब मी आपल्या निदर्शनास या औचित्याच्या मुद्याद्वारा आणून देतो.

**सभापती** : संसदीय कार्य राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख येथे उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, गुजरातच्या विरोधी पक्षनेत्यांनी महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी

...... एलएल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

महाराजांसंबंधात काही अपमानजनक आणि बदनामी करणारे वक्तव्य केलेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करून निदर्शनास आणून दिले होते. त्या संबंधात शासनाने तातडीने निवेदन करावे अशा सूचनाही मी दिल्या होत्या. तेव्हा आज दिवसभरामध्ये ते निवेदन होईल या दृष्टीने आपण कार्यवाही करावी.

डॉ. सुनील देशमुख : ठीक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, परवा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होत असल्याचे आपल्या निदर्शनास आणून दिले होते आणि त्याबद्दल आपण शासनाला निदेशही दिलेले आहेत. आताही मी औचित्याच्या मुद्याद्वारे अशाच एका विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो.

अलिकडे इंटरनेटचा वापर मनोरंजनासाठी करता करता काही लोकांकडून राष्ट्रपुरूषांचा अवमान करण्यासाठीही केला जात आहे त्याचे एक उदाहरण म्हणजे गुगल चे ऑरकूट हे संकेतस्थळ. छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गुगल च्या ऑर्कुट या संकेतस्थळावर 29 ऑक्टोबर 2006 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करणारा मजकूर प्रसृत केला गेला आहे. 'इंपोटंट शिवाजी' असा फोरम तयार करून त्यात सहभागी होण्याचे आवाहन त्यातून करण्यात आलेले आहे. हा मजकूर इतका अश्लील आहे की तो मी येथे वाचून देखील दाखवू शकत नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... एमएम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

दिनांक 10 ऑक्टोबर, 2006 रोजी वुई हेट इंडिया नावाचा फोरम सुरु केल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गुगलला नोटीस बजावली होती व नोटीशीचे उत्तर देण्यासाठी 6 आठवडयांचा कालावधी देण्यात आला होता. तथापि, खंडपिठाचे आदेश, पोलिसांची कारवाई इत्यादी कशालाच न भिता महाराष्ट्राच्या राजधानीतून (मुंबईतून) संगणकाव्दारे अशा प्रकारचा मजकूर गुगलव्दारा प्रसिध्दीस दिला जातो आणि राज्य शासन याबाबत कोणतीही दखल घेत नाही, ही अत्यंत खेदजनक घटना सभागृहाच्या निदर्शनास यावी म्हणून ही बाब मी औचित्याच्या मुद्दयाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणीत आहे.

सभापती महोदय, संगणकाव्दारे गुगल या वेबसाईटवरील ऑरकुट या संकेतस्थळाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अत्यंत अश्लिल भाषेमध्ये मजकूर छापण्यात आला आहे. त्याची प्रत माझ्याजवळ आहे. खरे म्हणजे कोणत्याही माणसाला संताप येईल अशाप्रकारचे हे वक्तव्य असून ते मी याठिकाणी वाचून दाखवू शकत नाही. यासंबंधी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी निवेदन केले पाहिजे. राजा शिवछत्रपतींचा अपमान त्यांच्या राजवटीमध्ये केला जात असेल तर ते पाप आहे. काल गुजरात राज्यामध्ये अशापध्दतीने छत्रपतींविषयी अपमानास्पद बोलले गेले. आज महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये, मुंबईमध्ये इंटरनेटवरुन छत्रपती शिवजी महाराजांचा अपमान करणारी प्रवृत्ती महाराष्ट्रात वाढणार असेल तर ती प्रवृत्ती हे महाराष्ट्र शासन ठेचून काढणार आहे काय?

**सभापती** : अत्यंत अक्षम्य घटना घडली आहे. अशाप्रकारची प्रवृत्ती महाराष्ट्रामध्ये वाढण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन शासनाने याची वेळीच दखल घ्यावी. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी गुजरात राज्यामध्ये विरोधी पक्षनेत्यांनी जे वक्तव्य केले त्याबाबत माननीय गृह राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, शिव छत्रपती हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे, व त्या अनुषंगाने आपण त्याकडे पहातो.त्यासंबंधी शासनाच्या वतीने निवेदन करण्यात यावे अशा सूचना 11 तारखेला देण्यात आल्या होत्या. शासनाकडून ते निवेदन अद्यापि करण्यात आले नाही. तेव्हा आज दिवसभरामध्ये यासंबंधी निवेदन व्हावे अशी माझी इच्छा आहे. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आताच उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयामधील बाब देखील अक्षम्य असून त्यासंबंधी अत्यंत कठोर कारवाई होईल याची गृह विभागाने नोंद घ्यावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदरहू वेबसाईट बंद करण्यात आली आहे. ही वेबसाईट ज्यांनी सुरु केली त्या व्यक्तीचा शोध घेण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही वेबसाईट कुणी सुरु केली त्या व्यक्तीचा शासनाने शोध घ्यावा. आणि संबंधित आरोपींना पकडून त्यांना ताबडतोब शिक्षा झाली पाहिजे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : आरोपींना ताबडतोब पकडण्याच्या दृष्टीने कारवाई चालू आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो.

दिनांक 11 डिसेंबर 2006 रोजी नागपूर जवळ वाडी पोलिसांनी 1 ट्रक अडविला होता. परंतु एका मंत्रिमहोदयांच्या दबावाखाली तो ट्रक सोडण्यात आला. एका वर्तमानपत्रामध्ये ही बातमी छापून आली की, त्या ट्रकमध्ये 3 लाखाच्या जवळपास साडया होत्या. माननीय पंतप्रधानांनी दिलेल्या पॅकेजच्या पैशामधून अधिकाऱ्यांवर दबाव आणून त्या साडया खरेदी केल्या आहेत. तो ट्रक नागपूरकडे निघाला असतांना पोलिसांनी जेव्हा अडविला त्यावेळी मंत्रिमहोदयांनी दबाव आणून तो ट्रक सोडविला. सभापती महोदय, महानगरपालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असतांना अशाप्रकारचे जे काही वृत्त वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे त्याची सखोल नि:पक्षपाती चौकशी होणे आवश्यक आहे . महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडली असल्यामुळे शासनाकडून यासंबंधी खुलासा होणे गरजेचे आहे. तेव्हा शासनाने खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विषयासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या प्रश्नावर या सदनामध्ये भरपूर चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या उत्तरामधून आमचे समाधान झाले नाही. या आत्महत्त्येच्या प्रश्नावर शासन किती गंभीर आहे हे मी या सूचनेच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणीत आहे. कृपया माननीय गृह राज्यमंत्र्यांनी त्याची तातडीने नोंद घेणे आवश्यक आहे. कारण आपण पालक मंत्री सुध्दा असल्यामुळे त्या संदर्भात मी हा औचित्याचा मुद्दा मांडीत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

श्री.प्रल्हाद हरकळ, मु.पो.आर्वी, ता.जि.परभणी या शेतकऱ्याने काल दिनांक 13 डिसेंबर 2006 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे तो सध्या नांदेड येथील रुग्णालयामध्ये आहे. खाजगी सावकाराकडून घेतलेले कर्ज फेडले असतानाही त्याला त्रास देणे सुरू आहे. या प्रकरणी पी.आय. श्री.साळुंखे (ग्रामीण) यांच्याकडे तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर पी.आय. यांनी तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिला. उलट उपोषण कर्त्याला दमबाजी, शिविगाळ करून हाकलून दिले. त्याची तक्रार नोंदवून घेतली नाही तर तो शेतकरी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणार नाही तर काय करणार ? त्या शेतकऱ्याला संरक्षण देण्याचे सोडून त्यालाच दमबाजी केली आणि त्याला घालवून दिले, या नैराश्येपोटी त्या शेतकऱ्याला हात्महत्या करण्यास प्रवृत्त केले म्हणून पोलीस अधिकारी श्री.साळुंखे याच्यावरच गुन्हा दाखल केला पाहिजे, त्याला सेवेतून निलंबित केले पाहिजे. तशी कृती माननीय गृहमंत्री महोदयांनी केली तर तो संदेश सगळया महाराष्ट्रातील पोलिसांपर्यन्त पोहोचेल. शेतकऱ्यांची अवहेलना आता करता येणार नाही,हे कळेल. म्हणून ही बाब मुद्दाम उपस्थित करून निदर्शनास आणलेली आहे. त्याबाबत कारवाई करावी.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, देवरी तालुक्यामध्ये 9 डिसेंबर रोजी घटना घडलेली आहे. श्री.महेंद्र रामकुमार मेश्राम वय वर्षे 19 यानी 9 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. या प्रकरणी काल देवरी येथे बंद पाळण्यात आलेला होता. या मुलीला मेडिकल कॉलेज अमरावती येथील रुग्णालयामध्ये दाखल केलेले आहे. ही गरीब मुलगी आहे. त्या मुलीला आर्थिक मदत करावी म्हणून आंदोलनकर्त्यांची मागणी आहे. त्याचबरोबर श्री.मेश्राम या आरोपीवर कठोर करावाई करण्याची मागणी केलेली आहे. या मागण्यांचा शासनाने विचार करावा अशी विनंती आहे.

दुसरा मुद्दा मी उपस्थित केला होता. माजी आमदार श्रीमती इंदुताई नाकाडे यांनी उपोषण सुरू केलेले आहे. त्यांचा तिसरा दिवस चालू आहे. अर्थमंत्री महोदय जोपर्यन्त निधी मंजूर करून देणार नाहीत तोपर्यन्त त्यांचे उपोषण सुटणार नाही. मी कालही मुद्दा उपस्थित केलेला होता. आजही मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो की, माननीय अर्थमंत्री महोदयांनी याबाबतचे निवेदन करावे आणि माजी आमदार श्रीमती इंदुमती नाकाडे यांना न्याय द्यावा.

---

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सन्माननीय अर्थमंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत म्हणून मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करतो. माननीय सभापती महोदय आपल्याला विनंती करावयाची आहे की, मागच्या अधिवेशनाच्या वेळी मी विदर्भ विणकर सोसायटीच्या आणि महामंडळाच्या विणकरांच्या संबंधात प्रश्न उपस्थित केलेला होता. त्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या चेंबरमध्ये बैठक बोलाविलेली होती. त्यावेळेस माननीय वित्तमंत्री, वस्त्रोद्योग मंत्री आणि मी उपस्थित होतो. त्या ठिकाणच्या कामगारांना आत्महत्या करण्याची त्यांच्यावर वेळ आलेली आहे. त्यावेळेस माननीय वित्त मंत्र्यांनी मान्य केलेले होते त्याप्रमाणे हा विषय त्या ठिकाणी संपला. परवा जेव्हा या संबंधाने प्रश्न उपस्थित झाला तेव्हा अशी माहिती समोर आली की, नियोजन मंत्री समितीकडे हा विषय पाठविलेला आहे. मंत्री मंडळातील सहकारी मंत्री, श्री.सतिश चतुर्वेदी हेही माननीय सभापती महोदयांनी घेतलेल्या बैठकीच्यावेळी उपस्थित होते. अर्थमंत्री महोदयांनी त्यावेळी कबूल केले होते, परंतु काही केले नाही. सभापती महोदयांनी निर्देश दिले की,अधिवेशन स्थगित होण्याच्या आत बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे या सर्व विणकरांना पैसे मिळावेत. ते माननीय मंत्री महोदयांन कळले असेल असे वाटते. या अधिवेशनाचे आजचा आणि उद्याचा असे दोन दिवस शिल्लक आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

अजूनपर्यंत माननीय वित्त मंत्र्यांनी याबाबतीत कोणत्याही प्रकारचे आदेश काढलेले नाहीत. हा सभागृहाचा आणि माननीय सभापतींचा अवमान आहे. याबाबतीत त्यांनी खुलासा करावा. जर माननीय वित्तमंत्री माननीय सभापतींच्या आदेशाचे पालन करीत नसतील आणि विणकरांना न्याय मिळत नसेल तर मी जास्तीत जास्त त्यांचा निषेध करुन कामकाजात भाग घेणार नाही. याचे कारण असे की, हे असे वारंवार झालेले आहे. या सभागृहाचे पावित्र्य, या सभागृहाचा सन्मान तसेच माननीय सभापतींचे निर्देश हे सर्व असताना देखील ते करीत नाहीत. याबाबतीत माननीय वित्त मंत्र्यांना खुलासा करण्यास सांगावे. अन्यथा ते विणकर आत्महत्या करुन मोकळे होतील. या सरकारकडे हत्त्या आणि आत्महत्त्या हे दोन आनंदाचे विषय आहेत. लोकांचे रक्त सांडावे, लोकांनी आत्महत्या कराव्या असे जर त्यांना वाटत असेल तर त्याला माझा नाईलाज आहे. सभापती महोदय, आपण या ठिकाणी आसनस्थ असताना माननीय मंत्रिमहोदयांना खुलासा करण्यास सांगावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, माननीय सभापती महोदयांच्या दालनात मुंबईमध्ये अशी बैठक झाली होती. त्याविषयी सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी जाऊन किती परतावा द्यावा लागेल, किती रक्कम मिळावी याची तपासणी करावी आणि परत आमच्याकडे प्रस्ताव पाठवावा व त्यावर निर्णय करावा असे ठरले होते. याला मीही संमती दर्शविली होती. बैठक झाल्यानंतर अशा स्वरुपाचा प्रस्ताव त्यांनी प्रोसेस करुन वित्त विभागाकडे पाठविला. आता सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी असे सांगितले की, वित्त विभागाने नामंजूर केलेले आहे किंवा मंजुरी दिलेली नाही...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या अर्थ व नियोजन समितीकडे मंजुरीकरिता पाठवावे असे म्हणून त्यांना बाजूला काढलेले आहे. ही दु:खाची बाब आहे की, माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी या ठिकाणी जे कॉमेन्टस् केले ते माननीय मंत्रिमहोदयांना माहीतच नाहीत. माननीय सभापतींनी या ठिकाणी जी नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमहोदयांना जे निदेश दिले ते माननीय मंत्रिमहोदयांपर्यंत पोहोचलेच नाहीत. या गोष्टीचे मला दु:ख होते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : असा विषय झाला आणि त्याबाबत माननीय सभापतींनी निदेश दिले हे माझ्यापर्यंत पोहोचलेले नाही. पण मी मान्य केलेले आहे. कबूल केलेली गोष्ट आहे त्याबाबत उद्या संध्याकाळपर्यंत त्याची व्यवस्था करणे हे माझे कर्तव्य आहे. When I say yes, it is yes. By tomorrow evening I will do it.

श्री. नितीन गडकरी : उद्या संध्याकाळपर्यंत याबाबतचे आदेश निघतील असे आपण सांगितले. हे आदेश आपण काढावेत. मी आपले अभिनंदन करतो. माझे अभिनंदन फुकट जाऊ देऊ नका.

श्री. जयंत पाटील : काम झाल्यावर अभिनंदन करा. ॲडव्हान्समध्ये अभिनंदन घेण्याची मला सवय नाही.

**उपसभापती** : या सभागृहाच्या माजी सदस्या श्रीमती इंदुमती नाकाडे यांच्या उपोषणाबाबतचा प्रश्न दोन दिवस या ठिकाणी औचित्याच्या मुद्याव्दारे उपस्थित होत आहे. दोनही दिवशी त्यावर ताबडतोब कारवाई करावी असे निदेश दिले. आजचा तिसरा दिवस आहे. या सभागृहाच्या त्या माजी सदस्या आहेत. त्या अत्यंत सिन्सिअर कार्यकर्त्या आहेत. त्या वयोवृध्द आहेत. त्यांच्या साध्या मागण्यांच्या संदर्भात शासन निवेदन करु शकत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आणि सन्माननीय सभापतींनी तीव्र दखल घेण्यासारखा विषय आहे. परवा माननीय सभापतींनी एवढी नाराजी व्यक्त केली. त्यासंदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी नम्रपणे मान्य केले की, त्याबाबत मला काहीच कळले नाही, मला माहीत नाही. आपण या आसनावरुन वेळोवेळी जे निदेश देता ते सरकारपर्यंत पोहोचत नाहीत. मंत्रिमंडळातील मंत्री ही बाब गंभीरपणे घेत नाहीत. मला आपल्याला प्रश्न विचारावयाचा आहे. आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे दखल घेतली की, नाही याला सरकार जबाबदार आहे. त्यांनी तुम्हाला रिपोर्ट करावा. अशी व्यवस्था आपण करणार की नाही ? हे प्रशासन निर्ढावलेले आहे. आम्ही या ठिकाणी मनोरंजनाच्या कार्यक्रमासाठी येतो काय ? आम्हाला खायला मिळत नाही आणि 500 रुपये भत्ता मिळतो म्हणून चर्चा करण्यासाठी आम्ही येतो काय ? आपण जे निदेश देता त्याची कोणी दखल घेत नाही. शासन असे नॉनसिरियस असेल तर ते बरोबर नाही. त्यांनी विदर्भाची वाट

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

लावली. माननीय राज्यपालांच्या निर्देशांना केराची टोपली दाखवली. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी परवा भाषण केल्यानंतर त्यांना दवाखान्यात न्यावे लागले. त्यांच्यावर अँजिओप्लॅस्टी करण्याची वेळ आलेली आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचे हार्ट दुखावण्याचे कारण काय होते हे या सभागृहात सगळ्यांनी पाहिलेले आहे. आम्ही आत्महत्या करावी असे वाटते काय ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 13:30

(श्री. नितीन गडकरी...)

आम्ही काय केले पाहिजे ? सभापती महोदय, आपण या सदनामध्ये जेवढे निर्देश दिलेले आहेत त्याचे पालन झालेले नाही, हे आपणाला रेकॉर्डवरुन दिसून येईल. अशा प्रकारे शासनाला सिरिअसनेस नसेल तर तुमच्या खुर्चीला, या सभागृहाला आणि या सभागृहातील सन्माननीय सदस्यांना काय प्रतिष्ठा आहे ? आता आम्ही आत्महत्या करायच्या काय ? हे तरी आपण आम्हाला सांगा. माजी सन्माननीय सदस्या श्रीमती इंदुमती नाकाडे यांच्या बाबतीत कोणतीही दखल घेतलेली नाही हे मी खात्रीने सांगतो. या सभागृहाच्या लॉबीमध्ये भाराभर अधिकारी कशाला बसलेले आहेत ? या सभागृहामध्ये उपस्थित झालेल्या मुद्यांची नोंद ते घेत नाहीत, मंत्र्यांना काही सांगत नाहीत. या अधिका-यांची तोंडे आम्ही कशासाठी पहायची ?

श्री. जयंत पाटील : त्यासंदर्भात आदेश देण्यात आलेले आहेत. कम्युनिकेशन गॅपमुळे इन्स्टण्ट माहिती मिळू शकली नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शिवाजी महाराजांच्या संदर्भात या सदनामध्ये तीन वेळा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर तिन्ही वेळा माननीय पीठासीन अधिका-यांनी निवेदन करण्यासंबंधी आदेश दिले होते. भुसावळ येथील घटनेच्या संदर्भात मी 93ची सूचना दिलेली होती. त्याचे निवेदन अजून आलेले नाही. सर्वच कामकाज आपण पटलावर ठेवणार आहात काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या खुर्चीचा सन्मान ठेवला जात नसेल, आपल्याला अशा प्रकारे वागवीत असतील तर आपण काही बोलणार आहात की नाही ? या अधिका-यांना खुर्चीवर उभे केले पाहिजे. सभागृहाच्या लॉबीमध्ये गर्दी कशाला करतात ? यांना येथे येण्याचे बंद केले पाहिजे. हे सरकार संवेदनशील नाही. कुणाचा पायपोस कुणात नाही. सभापती महोदयांनी वित्त विभागाच्या संदर्भात मंत्री महोदयांचे नाव घेऊन स्पष्टपणे निदेश दिलेले आहेत. असे असताना त्या विभागाच्या अधिका-यांचे त्यांना सांगण्याचे काम नाही काय ? माझी आपणास नम्र विनंती आहे की, सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशांचे तातडीने पालन व्हावे यासाठी आपल्या विभागाचा एक अंडर सेक्रेटरी डेप्यूट करा. आपण दिलेले प्रत्येक आदेश संबंधितांना त्यांनी सांगायचे आणि त्यांच्याकडून त्याचे पालन होते की नाही याची माहिती घ्यायची. सभापती महोदय, आपणास माझी विनंती आहे की, आपण आता निदेश देऊ नका. आमचा अपमान झाला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....)

तरी चालेल परंतु आपला अवमान झालेला आम्हाला चालणार नाही. आम्ही तुमच्याकडे न्याय मागण्याचे सोडून देऊ. तुम्ही दिलेल्या आदेशांची अवहेलना होऊ नये एवढीच आमची इच्छा आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नियम 93 ची निवेदन तीन दिवसामध्ये झाली पाहिजेत असे आपण निदेश दिलेले आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ज्या 93च्या सूचनांवर निवेदने करण्यास सांगितले ती निवेदने अजून आलेली नाहीत. वित्त विभागाच्या संदर्भातील सूचना असेल तर ती गृहनिर्माण विभागाकडे पाठविली जाते, गृहनिर्माणाच्या संदर्भातील सूचना गृह विभागाकडे पाठविली जाते आणि मग निवेदने येण्यास उशीर होतो. तसेच मंत्र्यांकडून, अधिका-यांकडून आम्हाला माहिती दिली जात नाही असेही सांगितले जाते. 30 पैकी 9, 93च्या सूचना आता आलेल्या आहेत.

**उपसभापती** : माजी सन्माननीय सदस्या श्रीमती इंदुमती नाकाडे यांनी उपोषण सुरु केलेले आहे. त्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत लक्ष घालावे.

श्री. जयंत पाटील : आता जे काही भाष्य केले ते तपासून घेतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, जॅम मासिकामध्ये जागतिक एडस दिनानिमित्त जाहिरात प्रसिध्द झाली आहे. त्या जाहिरातीमध्ये कण्डोम वापरासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. त्याखाली स्लोगन दिले आहे आणि वर शिवलिंगाचे चित्र आहे. त्यामधील वाक्य या सभागृहामध्ये सांगता येणार नाही इतके भयानक आहे. दुसऱ्या पृष्ठावर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र असून त्याखाली मजकूर छापला आहे. त्या पुढील पृष्ठावर कुतूबमिनारचे चित्र आणि त्याखाली कण्डोम वापरासंबंधी वाक्य नमूद केले आहे ते याठिकाणी वाचून दाखविता येण्यासारखे नाही. या मासिकाची होळी एका हिंदू संघटनेने केली. आजपर्यंत त्या मासिकाच्या संपादिका श्रीमती रश्मी बन्सल यांच्यावर कारवाई झालेली नाही. हे मासिक बोरीवली येथून प्रसिध्द केले जाते.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, आज सभागृहामध्ये गृहराज्यमंत्री उपस्थित आहेत. बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल येण्यास सुरुवात झालेली आहे. सरकारी वकील ॲड.उज्ज्वल निकम अतिशय चांगल्या पध्दतीने सरकारी बाजू कोर्टापुढे मांडण्याचे काम करीत आहेत. ज्यावेळी निकालाचे वाचन होते, त्यावेळी आरोपींना दोषी ठरविल्यानंतर ते आरोपी तेरे को बाहर आकर देख लूंगा अशा पध्दतीच्या धमक्या देतात. ॲड.उज्ज्वल निकम यांना सध्या जी सुरक्षा व्यवस्था देण्यात आली आहे ती वाढविण्याची गरज आहे. निर्भयपणे कायद्यासाठी लढणाऱ्या माणसाला पुरेशी सुरक्षा व्यवस्था दिली नाही असे होता कामा नये. म्हणून मी औचित्याच्या माध्यमातून विनंती करतो की, ॲड.उज्ज्वल निकम यांची सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात यावी.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, सागर मेघे यांनी "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या मालकीची मौजे पांढराबोडी येथील एकूण 70.09 एकर जमीन शासनाने क्रीडा संकुल बांधण्याकरीता मिळावी या विनंतीवरुन या जमिनीवर क्रीडा संकुल न बांधता कोराडी रोडवरील जमिनीवर क्रीडा संकुल बांधल्याने विद्यापीठाच्या सदस्यांनी शासनाकडून जमीन परत मिळणेबाबत विद्यापीठासमोर सुरु केलेले उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी मला बोलण्याची संधी द्यावी. 70 एकर पैकी 35 एकर जमीन हडपण्यात आली. प्राईम लँड आहे. मी नागपूर विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदा आमच्या वेळचे रजिस्ट्रार श्री.आहेर, ॲकॅडमिक कौन्सिल, एक्झीक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य उपोषणाला बसले आहेत. नागपूरच्या अस्मितेचा प्रश्न आहे. अधिवेशन सुरु असल्यामुळे सरकारला उद्याच्या उद्या निवेदन करण्यास सांगावे. 70 एकर जमीन परत करण्यास सांगावे.

**उपसभापती** : तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने उद्या निवेदन करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : 72 एकर जमीन आहे, महसूल मंत्रीमहोदयांना मी देखील या संदर्भात पत्र दिले आहे.

**उपसभापती** : शासनास निवेदन करण्यास सांगितले आहे.

यानंतर सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "गेल्या 50 वर्षापासून केंद्र व राज्य शासनाकडे क्रिमीलेयरमधून भटक्या विमुक्तांना वगळावे, लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करणे व इतर सोयी सुविधा मिळणेबाबत दि.27.11.2006 रोजी आंदोलन करुनही याबाबत शासनाने कोणतीही दखल न घेणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी सिध्दांत इंस्टीटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस ॲण्ड रिसर्च, पुणे या संस्थेच्या वतीने चालविण्यात येणा-या एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी इंडीयन मेडीकल कौन्सिल ॲक्ट 1956 नुसार केंद्र शासनाची मान्यता नसतानाही अभ्यासक्रम सुरु ठेवल्यामुळे वद्यकीय शिक्षण विभागाकडे तक्रार करुनही शासनाने या वैद्यकीय महाविद्यालयावर कोणतीही कारवाई न करणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "बोरियडगाव ( ता. खामगाव. जि. बुलढाणा) येथे असलेला जुना गावतलाव हा नवीन गावतलाव बांधला असे दाखवून कृषी विभागाने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "गुंदवली माणकोली गट सामुदायीक शेती सहकारी संस्था ता. भिवंडी या सहकारी संस्थेच्या पदाधिका-यांनी कार्यालयाच्या पत्राचा गैरवापर करुन संस्था सभासद व सहकारी निबंधक कार्यालयाची फसवणूक केल्याच्या निष्कर्षाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "पुणे जिल्हयातील वालचंद नगर (ता. इंदापूर) येथील अशोक अल्को केमिकल कंपनी स्पिरीट तयार करतांना लाखो लिटर स्पेट वॉश हे अपायकारक रसायन बाहेर पडून नदीच्या पाण्यात मिसळत असल्याने सदरहू प्रदूषित पाणी शेजारील विहीरीत मुरुन तेथील जनतेच्या आरोग्याला निर्माण झालेला घोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

यानंतर सवश्री. विनोद तावडे, नतीन गडकरी, मधु चव्हाण, प्रतापराव सोनावणे, वि.प.स. यांनी मुंबईमधील वीरमाता जिजाबाई टेक्नीकल इन्स्टिटयट या क्ष्यातनाम संस्थेला सन 2004 मध्ये प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तर पत्रिका तपासणी, निकाल तयार करणे याबाबत अधिकार बहाल करण्यात आले असून सदर संस्थेतील विद्यार्थ्यांना कमी मार्कग मिळून त्यांना जास्त ग्रेस मार्क दिल्यामुळे संस्थेचा शैक्षणिक दर्जा खालावल्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र यया विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयात 28 एप्रिल ते 1 मे, 2006 च्या दरम्यान झालेल्या कृषि प्रदर्शन 2006 या संस्थेला तीन वर्षाचे ऑडीट नसतानाही शासनाच्या नियमांची पायमल्ली करुन पाच लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणे याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्राथमिक शाळांना कायम विना अनुदानीत तत्वावर अतिरिक्त तुकडयांना मान्यता देणे.

**मु. शी.** : प्राथमिक शाळांना कायम विना अनुदानीत तत्वावर अतिरिक्त तुकडयांना मान्यता देणे याबाबत सर्वश्री दिलीपराव सोनवणे, वसंतराव खोटरे, व्ही.यू.डायगव्हाणे, कपील पाटील, जी.एल. अैनापूरे , वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय सन्माननीय सदस्य सर्वश्री दिलीपराव सोनावणे, वसंतराव खोटरे, व्ही.यू.डायगव्हाणे, कपील पाटील, जी.एल.अैनापुरे, वि.प.स. यांनी "प्राथमिक शाळांना कायम विना अनुदानित तत्वावर अतिरिक्त तुकडयांना मान्यता देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती , तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( मा.सदस्य अनुपस्थित )

-----------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली या सर्व जिल्हयात हजारो प्रशिक्षित शारीरिक शिक्षक व पदवीधारक उमेदवार (बी.पी.एड.व बी.पी.ई ) बेरोजगार असणे.

**मु. शी.** : भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली या सर्व जिल्हयात हजारो प्रशिक्षित शारीरिक शिक्षक व पदवीधारक उमेदवार (बी.पी.एड.व बी.पी.ई ) बेरोजगार असणे, याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता यांनी "भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली या सर्व जिल्हयात हजारो प्रशिक्षित शारिरीक शिक्षक व पदवीधारक उमेदवार (बी.पी.एड.व बी.पी.ई ) बेरोजगार असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी शाळांचा दर्जा उंचावण्याकरिता 4860 केंद्रीय प्राथमिक शाळामध्ये शिक्षकांची पदे भरावयाची आहेत. परंतु ही पदे भरली जात आहे अशी माहिती उत्तरात दिलेली आहे. आपले सर्व उत्तर मी वाचलेले आहे परंतु त्या उत्तरातून काहीही स्पष्ट होत नाही. त्यामुळे या जागा कधी भरणार आहात? जागा भरण्याच्या संदर्भात आदेश केव्हा काढले जाणार आहेत?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये इयत्ता 5 वी ते 7 वी च्या वर्गाकरिता समान अभ्यासक्रम असला तरी माध्यमिक शाळांना जोडलेल्या इयत्ता 5 वी ते 7 वीच्या वर्गांना अनुज्ञेय असलेल्या 4 पदापैकी 1 पद प्रशिक्षित पदवीधर शिक्षकाकरिता अनुज्ञ ेय आहे. परंतु प्राथमिक शाळेस जोडलेल्या इयत्ता 5 वी ते 7 वी वर्गाकरिता अनुज्ञेय 4 पदाकरिता एस.एस.सी.डी.एड अशी शैक्षणिक अर्हता पूर्वी होती. ही विसंगती दूर करण्याकरिता या 4 पदापैकी 1 पद पदवीधर वेतनश्रेणीत परावर्तीत करण्याचे आदेश शासन निर्णय दिनांक 14 नोव्हेंबर, 1979 अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. माध्यमिक शाळेत शारीरिक शिक्षक घेतले जात आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची मागणी पूर्ण करता येणार नाही.

---------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिंवंडी निजामपूर महानगरपालिका शिक्षण मंडळात शिक्षकांची रिक्त पदे न भरणे.

**मु. शी.** : भिंवंडी निजामपूर महानगरपालिका शिक्षण मंडळात शिक्षकांची रिक्त पदे न भरणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे वि. प. स यांनी "भिंवंडी निजामपूर महानगरपालिका शिक्षण मंडळात शिक्षकांची रिक्त पदे न भरणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या विविध माध्यंमाच्या शाळांमध्ये शिक्षकांची 105 पदे भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे धरणे धरण्यात आले, मोर्चे काढण्यात आले. या पदांसाठी महानगरपालिकेने 40 ला रुपयांची तरतूद देखील केलेली आहे, तरी देखील ही पदे अजूनपर्यंत रिक्त आहेत. गेल्या तीन वर्षापासून वेगवेगळ्या संवर्गातील अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत शासन महानगरपालिकेला सूचना देईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, भिवंडी निजामपूर महानगरपालिका शिक्षण मंडळास एकूण 665 पदे मंजूर आहेत. त्यातील 95 पदे रिक्त आहेत. रिक्त असलेली पदे विहित पध्दतीने भरावीत अशाप्रकारच्या सूचना शासनामार्फत भिवंडी निजामपूर महानगरपालिकेला दिलेल्या आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी 40 लाख रुपंयाची तरतूद करण्यात आलेली आहे. जानेवारी महिन्यात महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर रिक्त पदे करण्याबाबत शासनाकडून निश्तितपणे कळविण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शिक्षण मंडळात एकूण 700 पदांपैकी 100 पदे रिक्त आहेत. तेव्हा ही रिक्त पदे भरण्याबाबत शासन टाईम बाऊंड प्रोग्राम देईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे एकूण 665 पदांपैकी 95 पदे रिक्त आहेत. ही पदे जानेवारी पूर्वी भरावीत असा टाईम बाऊंड देण्यात येईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : गोंदिया पाटबंधारे विभागाच्या उपविभागीय कार्यालयामसेर श्री.पुरुषोत्तम कापसे या रोजंदारी मजुराने केलेली आत्महत्या

**मु.शी.** : गोंदिया पाटबंधारे विभागाच्या उपविभागीय कार्यालयामसेर श्री.पुरुषोत्तम कापसे या रोजंदारी मजुराने केलेली आत्महत्या . याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.सुनील देशमुख ( पाटबंधारे राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील यांनी "गोंदिया पाटबंधारे विभागाच्या उपविभागीय कार्यालयामसेर श्री.पुरुषोत्तम कापसे या रोजंदारी मजुराने केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमरावती जिल्ह्यातील मूर्तिजापूर सबट्रेझरीमध्ये झालेला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा

**मु.शी.** : अमरावती जिल्ह्यातील मूर्तिजापूर सबट्रेझरीमध्ये झालेला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी व विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.सुनील देशमुख ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी व विनोद तावडे वि. प. स.यांनी "अमरावती जिल्ह्यातील मूर्तिजापूर सबट्रेझरीमध्ये झालेला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे एक मोठे रॅकेट आहे. ट्रेझरी आणि आरोग्य विभागाने शासनाची लूट चालविली आहे. याप्रकरणी फक्त शिस्तभंगाची कारवाई करुन चालणार नाही. या संदर्भात ट्रेझरी आणि आरोग्य विभागाची चौकशी होण्याची गरज आहे. या प्रकरणात वरपर्यंत हात गुंतलेले आहेत. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर केला पाहिजे. या संपूर्ण प्रकरणाची शासन सी.आय.डी.चौकशी करणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : या प्रकरणाची चौकशी झालेली आहे. या प्रकरणात डॉ.धोत्रे यांना निलंबित केलेले आहे. आम्ही सी.आय.डी इन्क्वायरी केलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणात जे अधिकारी दोषी होते त्यांचे निलंबन झ ाालेले नाही. तेव्हा या प्रकरणात जे दोषी आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई होणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकरणात आरोग्य विभागाने दाखल केलेल्या फिर्यादीनुसार डॉ.झांबरे यांना अटक करण्यात आलेली आहे. सी.एस.,डेप्युटी डायरेक्टर यांनी खरेदीची स्टेटमेंट व्हेरिफाय करणे आवश्यक आहे.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या तीन प्रकरणांतून 35 कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला. तेव्हा हे प्रकरण क्राईम ब्रांचकडे चौकशीसाठी देण्यात येईल काय ?

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या माध्यमातून प्रत्येक विभागाचे ऑडीट चालू आहे. ही केस आपण सीआडीकडे दिलेली आहे. या केसमध्ये स्वत: माननीय मुख्यमंत्री साहेब लक्ष घालत असून ते याबाबत काळजी घेत आहे. यापुढे अशी प्रकरणे घडू नयेत याबाबत शासन काळजी घेत आहे.

-----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : पात्र पोलीस उपनिरीक्षक उमेदवारांना सामावून न घेणे

**मु. शी**. : पात्र पोलीस उपनिरीक्षक उमेदवारांना सामावून न घेणे याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी "पात्र पोलीस उपनिरीक्षक उमेदवारांना सामावून न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील पोलीस उपनिरीक्षक पदासाठी खातेनिहाय तसेच महाराष्ट्र लोकसेवा बोर्डाच्या माध्यमातून सन 2002 मध्ये उत्तीर्ण असलेल्या 517 उमेदवारांना पोलीस उप निरीक्षक पदावर सामावून घेण्यात आलेले नाही. आपल्याकडे उमेदवारांची 555 पदे रिक्त असून या पोलीस सेवेमध्ये 517 पात्र उमेदवार असूनही अद्यापपर्यंत शासनाने त्यांना उप निरीक्षक पदावर घेतलेले नाही. याबाबतीत माझा प्रश्न असा आहे की, Qualified but not recommended. याबाबतीत कोणता निकष लावला जातो याचा अर्थ मला समजत नाही. ते पात्र झ ालेले आहेत, परंतु त्यांची शिफारस केलेली नाही. शिफारस करण्यासंबंधी कोणते निकष आहेत ? यामध्ये काही टेबल डिलींग होते का ? याबाबतचही चौकशी करण्याची आवश्यकता आहे. प्रामुख्याने याठिकाणी माझा एवढाच प्रश्न आहे की, सदर पदासाठी सन 2002 मध्ये जी परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये पात्र झालेल्या उमेदवारांना आपण का घेतले नाही ? आपण निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "माननीय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक 5 मे, 2006 रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अपात्र उमेदवारांनी माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केलेल्या असून प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे." माझा प्रश्न असा आहे की, शासन रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत फेरविचार करणार का ? व न्यायालयात सकारात्मक प्रतिज्ञापत्र सादर करुन या उमेदवारांना न्याय देईल का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन 1998 साली पोलीस महासंचालकांनी मागणी केल्यानुसार विभागीय पोलीस शिपाई संवर्गातून 25 टक्के आरक्षित जागेवर 179 उमेदवार निवडण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने या प्रकरणी माननीय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे केलेल्या अर्जात माननीय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने असे नमूद केले आहे की, पोलीस महासंचालकांनी पोलीस शिपाई याकरिता असलेल्या 25 टक्के कोटयाप्रमाणे कमी जागा दर्शविल्या आहेत. माननीय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने फक्त 150 जागा भराव्यात असा निर्णय यावर दिल्यामुळे सदर उमेदवार माननीय उच्च न्यायालयात गेले व याप्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सुध्दा प्रतिवादी केले. माननीय उच्च न्यायालयाने सन 2000 पर्यंतच्या रिक्त जागांचा शोध घेण्याचे शासनास कळविले. यावर शासनाने 463 एवढी रिक्त पदे असल्याचे नमूद केले. तथापि यापैकी 48 पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रतिक्षा यादीवरुन

..4...

श्री.सिध्दाराम म्हेत्रे....

नेमली गेली होती. 358 एवढी पदे माननीय उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासनाने शिफारस केली. यामुळे माननीय उच्च न्यायालयाने 406 अतिरिक्त जागा भरण्याबाबत आदेश दिले. म्हणजेच सन 1998 मध्ये 179 अधिक माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 685 पदांसाठी सन 2002 मध्ये पुन्हा परीक्षा झाली. त्यामध्ये 752 पदे रिक्त दाखविण्यात आली. त्यापैकी 300 उमेदवारांची निवड झाली. सन 1998 मध्ये शासनाने 347 पदे रिक्त असल्याचा निर्णय दिला होता. सदर 347 पदे वरील 452 पदांमधून वजा केल्यास 105 पदे रिक्त म्हणून शिल्लक राहतात. म्हणजेच, सन 2002 या वर्षी 105 पदे रिक्त होती असे म्हणणे वावगे होणार नाही. तथापि सदर बाब अद्याप न्यायप्रविष्ठ असल्याने यावर अधिक विचार करणे योग्य होणार नाही. जरी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेता, कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये याकरिता सन 2002 ते 2006 पर्यंतच्या रिक्त पदांचा आढावा घेण्यासंबंधी बैठक घेण्यात येईल व रिक्त पदे भरण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेईल. तसेच, आवश्यकता भासल्यास शासन न्यायालयात प्रतिज्ञापत्रही सादर करेल.

--------

..5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गावेच्या गावे विस्थापित होणार असल्याने खारेपाट विभागातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे.

**मु. शी.** : गावेच्या गावे विस्थापित होणार असल्याने खारेपाट विभागातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, कपिल पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यांनी गावेच्या गावे विस्थापित होणार असल्याने खारेपाट विभागातील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

( निवेदनानंतर )

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या लेखी निवेदनाने माझे समाधान झाले आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : किंजळघर (जि.रायगड) येथे एका चाळवजा घरात झालेल्या स्फोटात माजी सैनिक श्री.मदन शिंदे व त्यांचे भाऊ श्री.जगन शिंदे हे दोघेही मयत होणे.

**मु. शी**. : किंजळघर (जि.रायगड) येथे एका चाळवजा घरात झालेल्या स्फोटात माजी सैनिक श्री.मदन शिंदे व त्यांचे भाऊ श्री.जगन शिंदे हे दोघेही मयत होणे.याबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी किंजळघर (जि.रायगड) येथे एका चाळवजा घरात झालेल्या स्फोटात माजी सैनिक श्री.मदन शिंदे व त्यांचे भाऊ श्री.जगन शिंदे हे दोघेही मयत होणे. या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीपदी - उपसभापती)**

माननीय मंत्री महोदयांची सभागृहातील अनुपस्थिती

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण जर सभागृहाचे निरीक्षण केले तर आपल्या असे लक्षात येईल की, एकही मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. यावरुन असे दिसते की, सभागृहाचे कामकाज करण्यासाठी हे सरकार गंभीर नाही. अशा पध्दतीने जर सरकारला कामकाजात रसच नसेल तर सभागृह विसर्जित करुन टाकावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सभागृह विसर्जित करण्याची मागणी या ठिकाणी केली आहे. मी त्यांच्या हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, इंडियन ॲक्ट 1935 नुसार सभागृहाची स्थापना झालेली आहे. त्यावेळी केवळ विधान परिषद आस्तित्वात होती, विधानसभा सभागृह नव्हते. त्यामुळे हे सभागृह बरखास्त करणे ही एवढी सोपी बाब नाही.

**उपसभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्यामुळे मी सभागृहाची बैठक 3.00 वाजेपर्यन्त स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 33 मिनिटांनी, 3.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----------------------

यानंतर श्री.रोझेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी**.: कल्याण पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयाची झालेली दुरावस्था.

**मु.शी**.: कल्याण पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयाची झालेली दुरावस्था यासंबंधी सर्वश्री. संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण (जि.ठाणे) येथे पालिकेने सन 1997 मध्ये बांधण्यात आलेल्या रुक्मीणीबाई रुग्णालयाची अवस्था एखाद्या गंभीर रुग्णासारखी झाली असल्याचे अलिकडेच आढळून येणे, या रुग्णालयाची दोन मजली भव्य इमारत असणे,रुग्णालयात बाहय रुग्ण विभागाबरोबरच प्रसूती विभाग, बालरुग्ण विभाग, महिला व पुरुष रुग्ण विभाग असल्याचे आढळून येणे, अशा एवढया मोठया रुग्णालयात केवळ फिजिशियन्स डॉक्टर असणे, तज्ञ डॉक्टरांची कमतरता असणे, रुग्णालयात प्रयोगशाळा, सोनोग्राफी व ईसीजीची व्यवस्था असूनही बऱ्याचवेळा रुग्णांना बाहेरील खाजगी रुग्णालयात तपासणीसाठी पाठविण्यात येत असलेले प्रकार घडत असल्याचे आढळून येणे, अपुऱ्या दिवसाच्या व कमी वजनाच्या नवजात शिशूंसाठी एमआयसीयू विभाग भाजलेल्या रुग्णांसाठी बर्न वॉर्ड, ब्लड बँक या सर्व सुविधांची आवश्यकता असतानाही या सुविधा उपलब्ध नसणे, प्रशस्त ऑपरेशन थिएटर असूनही सिझेरियनसारख्या शस्त्रक्रिया वगळता इतर कोणत्याही शस्त्रक्रिया होत नसल्याचे आढळून येणे, गेल्या 9 वर्षात या रुग्णालयाची दुरुस्ती व साधी रंगरंगोटीही करण्यात न येणे, ठिकठिकाणी छपराचे प्लास्टर पडलेले आढळून येणे, नर्स सह सफाई कामगारांची व आयांची अनेक पदे रिक्त असल्याचे आढळून येणे, त्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, परिणामी रुग्णामध्ये व नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला असंतोष, सबब रुक्मिणीबाई रुग्णालयातील अपुऱ्या असलेल्या सुविधा पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3.....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, लक्षवेघी सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये दुरुस्ती आहे. निवेदनाच्या शेवटून तिस-या ओळीमध्ये "2005-06" असे नमूद केलेले आहे. त्या ऐवजी "2006-07" असे वाचावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जी माहिती दिलेली आहे ती वस्तुस्थितीला धरुन नाही. मी स्वत: वेळोवेळी या हॉस्पिटलमध्ये गेलो आहे. तेथील रुग्णांच्या आणि नागरिकांच्या तक्रारी लेखी स्वरुपात मला मिळालेल्या आहेत. सभापती महोदय, या खात्याला कार्यक्षम मंत्री लाभलेले आहेत. मात्र अधिका-यांनी दिलेल्या दिशाभूल करणा-या माहितीवर माननीय मंत्री महोदय अवलंबून असल्यामुळे ते स्वत: अडचणीत येण्याची शक्यता आहे. या रुग्णालयाच्या खाटांची क्षमता 120 बेडची आहे. या रुग्णालयामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. हॉस्पिटलमध्ये जे पेशंट येतात त्यांना तेथे उभे राहता येत नाही. तज्ज्ञ डॉक्टर फक्त रेकॉर्डवर आहेत. हॉस्पिटलमध्ये डॉक्टर अपुरे आहेत. एक्स-रे काढण्यासाठी व ई.सी.जी. काढण्यासाठी रुग्णांना बाहेर पाठविले जाते. वेळोवेळी ही बाब अधिका-यांच्या निदर्शनास आणून देखील कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना एक-दोन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, या रुग्णालयामध्ये वर्गनिहाय वैद्यकिय अधिका-यांची किती पदे मंजूर आहेत ? या रुग्णालयामध्ये वेगवेगळे कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचा-यांची संख्या मंजूर पदांच्या बरोबर आहे की काही पदे रिक्त आहेत ? पदे रिक्त असल्यास किती पदे रिक्त आहेत ? याची माननीय मंत्री महोदय माहिती देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण पश्चिम येथील रुक्मिणीबाई रुग्णालयासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे हॉस्पिटल 120 बेडचे आहे आणि हॉस्पिटलमध्ये 120 बेड सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी त्या रुग्णालयामध्ये डॉक्टरांची संख्या अपुरी आहे, एक्स-रे, ई.सी.जी. काढण्यासाठी रुग्णांना बाहेर जावे लागते असे सांगितले. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्या त्यावरुन मी माहिती देत आहे. या रुग्णालयामध्ये शंभर टक्के बेड उपलब्ध असतात अशी माझ्याकडे माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी मंजूर पदांच्या संदर्भात माहिती विचारली. मी सांगू इच्छितो की, शासनाने मंजूर केलेली वैद्यकीय अधिका-यांची पदे 30 आहेत

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

आणि भरलेली पदे 30 आहेत. ही पद संख्या कमी असल्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने शासनाकडे पदे वाढवून मिळण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविलेला आहे. शासनाने जास्त पदे मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव करुन डॉक्टरांची पदे भरलेली आहेत. ते डॉक्टर सुध्दा तेथे काम करीत आहेत. शासनाने 82 नर्सची पदे मंजूर केलेली आहेत. त्यापैकी 73 नर्सची पदे भरलेली आहेत. उर्वरित 9 पदांसाठी मुलाखती झालेल्या आहेत आणि काल परवाच आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ D/ KTG/ श्री. बोरले नंतर --- 15.05

श्री. टोपे ....

सभापती महोदय, आयांची पदे 25 शासनाने मंजूर केलेली आहेत आणि भरलेली पदे 25 आहेत. सफाई कर्मचाऱ्यांची 81 पदे भरलेली आहेत. सभापती महोदय, या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये देखील 9.9 कोटी रूपयांची तरतूद त्यांनी केलेली आहे जेणे करून ज्या ज्या उणीवा तेथे असतील मग ती मशिनरीबाबतची असो, बांधकामाबाबतची असो, मेंटेनन्सच्या बाबतीतील असा आणि आस्थापनांच्या बाबतीत असो त्यासाठी ही तरतूद केलेली आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कल्याणमधील रूक्मिणी हॉस्पिटलच्या बाबतीत जी माहिती शासनाकडून मंत्री महोदयांना दिलेली आहे ती अत्यंत चुकीची आहे. आजच्या दिवसाला त्या ठिकाणी आपले कोणी अधिकारी पाहणी करून आले तरी त्यांना समजून येईल की, तेथे पॅथॉलॉजीचे डॉक्टर स्किन स्पेशालिस्टचे काम करीत आहेत. तेथे ज्या नर्सेस आहेत त्या नर्सेसचे रूटीन काम करण्याऐवजी स्टाफचे काम म्हणजे केसपेपर्स तयार करणे वगैरे काम करीत असतात. त्यामुळे माझा नेमका प्रश्न असा आहे की, या हॉस्पिटलमध्ये ज्या स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या जागा आहेत त्या आपण केव्हा भरणार आहात ? तसेच हे हॉस्पिटल सुरू होऊन 9 वर्षे झाली आहेत आणि आताच तेथील प्लास्टर कोसळण्याची पाळी आलेली आहे, तेव्हा त्याची दुरूस्ती आपण केव्हा सुरू करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जागा भरणे आणि प्लास्टर दुरूस्त करणे असे दोन प्रश्न सन्माननीय सदस्यांचे आहेत. सन्माननीय सदस्य असेही सांगत आहेत की, तेथे स्पेशालिस्ट डॉक्टर्स नाहीत. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी स्वत: या बाबतीत वेगळी बैठक घेऊन सारी माहिती घेतो आणि या दृष्टीकोनातून ज्या ज्या उणीवा तेथे असतील त्या दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला जाईल. ...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्वत: येथे भेट देणे आवश्यक आहे. आणि तेही सरप्राईस भेट देण्याची आवश्यकता आहे तरच मंत्री महोदयांना वस्तुस्थिती काय आहे हे समजून येईल.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या सगळ्या प्रश्नाची माहिती दिलेली आहे. त्या निमित्ताने मी आपल्याला सांगू इच्छितो की, या विषयाशी संबंधित जे जे कोणी सदस्य असतील त्यांनी मला सांगावे त्या दिवशी मी त्यांच्यासह येथे सरप्राईस व्हिजिट देऊन तपासणी करण्यास तयार आहे. ..... XX 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कल्याण शहरामध्ये राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याचा हा प्रश्न आहे. येथे उत्तर देताना पृष्ठ 2 वर मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, खालील प्रमाणे तज्ज्ञ कर्मचारी उपलब्ध आहेत. कोण कोठले खालील कर्मचारी आहेत त्याचा उल्लेखच यात नाही. तो उल्लेख या निवेदनात व्हावा. दुसरे म्हणजे या निवेदनात आपण असेही म्हटले आहे की, सर्व विभागांसाठी आमच्याकडे तज्ज्ञ डॉक्टर्स आहेत. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, तेथे नेत्ररोगाचे स्पेशालिस्ट कोणीही नाही, तीच गोष्ट चर्मरोगाच्या बाबतीत आहे, इएनटी च्या बाबतीत आहे इतकेच काय पण तेथे दंतचिकित्सा केली जाते म्हणून म्हटले आहे पण त्या विषयातील स्पेशालिस्ट देखील तेथे नाही. याचा अर्थ असा होतो की, तेथे कोणीही तज्ज्ञ डॉक्टर मंडळी नाहीत तेव्हा अन्य डॉक्टरांकडूनच ते काम तेथे केले जाते आहे काय ? याबाबत कृपया खुलासा व्हावा. सभापती महोदय, एकूणच या निवेदनामध्ये देण्यात आलेली माहिती ही वस्तुस्थितीला धरून नाही हे निश्चित आहे. तेव्हा तातडीने दोन दिवसांनी स्वत: माननीय राज्यमंत्री महोदय, कल्याणच्या या हॉस्पिटलला भेट देतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या निवेदनात देण्यात आलेली माहिती असत्य असेल तर मी जबाबदारीने सांगतो की, मंत्र्यांना अशा प्रकारे असत्य माहिती पुरविली गेली असेल तर ती माहिती देणाऱ्याविरूद्ध कारवाई आम्ही निश्चितपणे करू आणि सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता मी माझ्या दालनामध्ये खात्याचे प्रमुख, मेडिकल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी, सुपरिंटेंडेंट, कल्याण महापालिका आयुक्त यांची एक बैठक घेतो आणि या रूक्मिणी हॉस्पिटलमध्ये जे जे काही प्रश्न असतील मग ते डॉक्टर्स-कर्मचारी यांच्या जागा भरण्याबाबतीत असतील वा बांधकामाबाबत असेल ते सारे प्रश्न निश्चितपणे सोडविले जातील.

( यानंतर श्री. सरफरे .....वायवाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 70 ते 80 लाखावर गेली आहे. ठाणे जिल्हयात एकही कॅथलॅब नाही. तेथील एखाद्या गरीब रुग्णास हार्ट अटॅक आला तर त्याला मुंबईच्या के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये न्यावे लागते. त्याकरिता दीड तास लागतो. मधल्या काळात त्या रुग्णाचे बरेवाईट होऊ शकते. तेव्हा ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण भागामध्ये कॅथलॅब निर्माण करण्यासाठी आपण काही तरतूद करणार आहात काय? त्यासाठी उपाययोजना करणार आहात काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय,माननीय सदस्यांची सूचना निश्चितपणे चांगली असून त्याबाबत ठाणे महानगरपालिकेला कळविण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला निवेदनामध्ये दुरुस्ती केली. शासनाचे अधिकारी कशी धूळफेक करतात ते या निवेदनावरुन दिसते. एप्रिल 2005 ते मार्च 2006 या काळात मेजर शस्त्रक्रिया 132 आणि मायनर शस्त्रक्रिया 819 करण्यात आल्या.आणि पुन्हा एप्रिल 2006 ते नोव्हेंबर 2006 या कालावधीत मेजर शस्त्रक्रिया 136 व मायनर शस्त्रक्रिया 630 करण्यात आल्या. ज्यावेळी एखादा रुग्ण अतिशय आजारी असतो व तो हॉस्पिटलमध्ये येतो त्यावेळी त्याला शस्त्रक्रिया करुन घ्यावयाची असते, उपचार करुन घ्यावयाचे असतात. याठिक्णी आकडेवारी बघितली तर आय.पी.डी. चे पेशंट वाढले आहेत व शस्त्रक्रिया झालेले पेशंटचे प्रमाण व्यस्त आहे. यावरुन आपले अधिकारी किती खोटी माहिती देऊ शकतात. याठिक्णी डोळयाच्या शत्रक्रिया शून्य दाखविल्या आहेत. याठिकाणी 2005-06 मधील तक्ता दिलेला आहे तो चुकीचा आहे असे मला वाटते. तेव्हा अशाप्रकारे चुकीचा तक्ता देणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री.राजेश टोपे : होय.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे या रुग्णालयाच्या शवागारामध्ये महिन्यातून किमान 27 ते 30 बेवारस प्रेते येतात. तेथील कुलिंग सिस्टीम अतिशय सदोष आहे. त्यामुळे प्रेताची अतिशय दुर्गंधी पसरलेली असते. रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक आणि डॉक्टर्स यांच्या स्वास्थ्यावर त्याचा वाईट परिणाम होतो,त्यांचे आरोग्य बिघडते. त्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे. त्याचप्रमाणे त्याठिकाणी रुग्णालयाची एकच शववाहिनी आहे. त्यामुळे कर्जत आणि अंबरनाथ येथून शव त्याठिकाणी येतात. त्याकरीता ही शववाहिनी कमी पडते. तसेच, शव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती जोशी..

ठेवण्यासाठी शवागाराची जागा कमी पडते. त्यादृष्टीने आपण उपाययोजना करणार काय? त्याठिकाणी व्हेंटीलेटर दिले आहेत परंतु त्याला जोडून जी मशिनरी लागते ती दिलेली नसल्यामुळे व्हेंटीलेटर वापरता येत नाहीत. अशाप्रकारची जोड मशिनरी देऊन दोन व्हेंटीलेटर रुग्णालयास दिले तर चांगले होईल. त्यादृष्टीने उपाययोजना करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या रुग्णालयाकरीता व्हेंटीलेटर, शववाहिनी, पोस्ट मार्टेम रुम, कुलिंग सिस्टीम इत्यादी गोष्टी पुरविण्यासंबंधी निश्चितपणे गांभीर्याने नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी नोंद घेण्याचा प्रश्न नाहीतर पैसे देण्याचा प्रश्न आहे. या रुग्णालयाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी 5 ते 10 कोटींची आपण मदत करणार काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या रुग्णालयासंबंधी बैठक घेण्यात येणार आहे त्यावेळी जे मिनिट्स तयार होतील मी आपणास जबाबदारीने सांगतो की, त्या रुग्णालयाकरीता जर आर्थिक गरज असेल तर ती पूर्ण केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिजामातानगर, (जिल्हा हिंगोली) येथील शासकीय वसतिगृहातील मुलींवर होत असलेले अत्याचार.

**मु.शी.**: जिजामातानगर, (जिल्हा हिंगोली) येथील शासकीय वसतिगृहातील मुलींवर होत असलेले अत्याचार यासंबंधी सर्वश्री. सुरेश जेथलिया, अरविंद सावंत, दीपक सावंत,गोपीकिसन बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश जेथलिया ( विधानसभेने निवडलेले ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"हिंगोली जिल्हयातील जिजामातानगर येथे असलेल्या मुलींच्या शासकीय वसतिगृहात गेल्या अनेक दिवसांपासून गैरसोयी असून याबाबतचे सविस्तर निवेदन जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे ऑगस्ट, 2006 च्या सुमारास देण्यात येणे, सदरहू वसतीगृहातील दुरावस्थेबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यामुळे तेथील अधीक्षीकेच्या पतीने दारु पिऊन या वसतीगृहातील मुलींना दिनांक 18 ऑगस्ट, 2006 च्या सुमारास केलेली अमानुष मारहाण, यातील एक विद्यार्थीनी गंभीर जखमी असणे, या घटनेमुळे या वसतिगृहातील मुलींमध्ये निर्माण झालेले भितीचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. रविशेठ पाटील ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

.... ....

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, निवेदनामध्ये चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. मी प्रत्यक्षात त्या ठिकाणच्या वसतिगृहाला भेट दिलेली आहे. त्या ठिकाणच्या मुलींनी, वसतिगृहामध्ये सोयीसुविधा नाहीत, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडे आणि प्रकल्प अधिकाऱ्यांकडे तक्रार केली म्हणून त्या ठिकाणच्या अधिक्षिकेच्या पतीने वसतिगृहामध्ये जाऊन मुलींना जबर मारहाण केली आणि त्यांच्यावर दबाव आणून ती तक्रार परत घ्या, असे त्यांना सांगितले. यामुळे मुलींमध्ये घबराट पसरलेली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा यांच्याच जिल्ह्यात मुलींची छेडछाड आणि अत्याचार करणारी घटना घडलेली आहे. त्या मुलींनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्यानंतर साधा गुन्हा दाखल केलेला नाही. त्याच दिवशी जामिनावर अधिक्षिकेला सोडण्यात आले. पुन्हा मुलींनी तक्रार दिल्यानंतर त्या ठिकाणच्या अधिक्षिकेची नंतर बदली करण्यात आली.

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी**)

त्या मुलीवर अन्याय झालेला आहे, त्यांना मारहाण झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. 46 मुलींनी निवेदन दिलेले आहे की, त्या वसतिगृहामध्ये कोणतीही सुविधा नाही. मुलींच्या वसतिगृहामध्ये पुरुषांना जाता येत नाही, तरी देखील अधिक्षिकेच्या पतीने त्या ठिकाणी जाऊन मुलींना मारहाण केलेली आहे. या मुलींवर जो अन्याय झालेला आहे त्याबाबत शासन अजूनही त्या संबंधाने कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.रविशेठ पाटील : गृहपाल श्रीमती पोले यांच्या विरूध्द गुन्हा नोंदविला गेला व कोर्टाने त्यांना एक दिवसाची सजा दिलेली आहे त्यानंतर श्रीमती पोले या दोषी आढळल्यानंतर 20-8-2006 पासून त्यांना खात्यातून निलंबित करण्यात आलेले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : अधिक्षिकेच्या पतीने मुलींना मारहाण केलेली आहे. त्याबाबत त्यांच्यावर ॲक्शन झाली पाहिजे, त्या संदर्भात कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री.रविशेठ पाटील : कोर्टाने अधिक्षिकेला एक दिवसाची शिक्षा केलेली आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लड़कियों के वसतिगृह के बारे में यहां पर जो तक्रार की गई है, ऐसी तक्रार पूरे राज्य के वसतिगृहों के के बारे में है कि वहां पर लड़कियों के लिए सुविधाएं नहीं है और उनको शोषण होता है. मैं माननीय मंत्री महोदय को बताना चाहती हूँ कि इसके बारे में शासन की तरफ से महिला आमदारों की एक तदर्थ समिति बनाई गई थी और

. . .2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

उस समिति ने बहुत अच्छी सिफारिशें की थीं. लेकिन उस समिति का कार्यकाल समाप्त हो गया है, इसलिए मैं यह विनंती करती हूँ कि उस समिति को फिर से जीवित किया जाए, ताकि वसतिगृहों की अच्छी तरह से मॉनीटरिंग हो सके.

श्री.रविशेठ पाटील : सन्माननीय सदस्या श्रीमती फोजिया खान यांची सूचना मान्य करण्यासारखी आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया,या लक्षवेधीमध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग असा की, वसतिगृहातील मुलींना निकृष्ट दर्जाचे जेवण मिळते, त्यांना पुस्तके, वह्या मिळालेल्या नाहीत. दुसरा भाग असा की, मुलींना वसतिगृहाच्या अधिक्षिकेच्या पतीने मारहाण केलेली आहे, त्याबाबत काय ॲशन घेतलेली आहे? दुसरा प्रश्न असा की, ही घटना घडून तीन महिन्याचा कालवधी झालेला आहे. या संदर्भात पोलिसांनी कोर्टामध्ये चार्जसीट दाखल केले की नाही ? आदिवासी विकास विभागाने मुलींना संरक्षण दिले नाही. त्यामुळे त्या मुलींच्या शिक्षणावर विपरित परिणाम होणार आहे. त्यांना संरक्षण देण्याची वेळ आलेली आहे. सभापती महोदया, खालच्या सभागृहातील आणि या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी अशाप्रकारचे प्रश्न जवळजवळ 50 वेळा उपस्थित केलेले असतील. मुलींच्या वसतिगृहामध्ये मुलींची होत असलेले शोषण, निकृष्ट दर्जाच्या सुविधा या संबंधात प्रश्न उपस्थित झालेले आहेत. महिला समितीचा प्रश्न नाही. पोलिसांच्या महिला दक्षता समित्या आहेत, त्यांना वसतिगृहाची तपासणी करण्याचा अधिकार दिला पाहिजे. गृह विभाग आणि आदिवासी विभाग यांचा एकमेकांशी समन्वय नसल्यामुळे ते टोलवाटोलवीची उत्तरे देत असतात.

. . . 3A 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

एखादी घटना घडल्यानंतर तात्पुरते उत्तर दिले जाते पण पुढे काही होत नाही. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी समिती परत स्थापित करण्यासंबंधीचा जो मुद्दा मांडलेला आहे त्याबाबतचा निर्णय झाला पाहिजे. उद्या हे अधिवेशन संपणार आहे. परत मार्चपासून अशा तक्रारी येतील. आदिवासी विकास विभागाला अशा प्रकारे संनियंत्रण करणारी, मदत करणारी समिती करण्यामध्ये काय अडचण आहे ? जे चालले आहे ते चांगले आहे, आमचा हस्तक्षेप नको असे शासनाला वाटते काय ? सभापती महोदया, आपण या विषयात आम्हाला संरक्षण द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, तेथील ज्या स्वयंपाकींबद्दल किंवा कामाठींबद्दल तक्रारी आल्या होत्या त्यांची त्या ठिकाणाहून बदली केली. त्यांच्या बाबतीत ज्या तक्रार होत्या त्याबाबतीत तपास चालू आहे. आणखी काही तक्रार असेल तर त्याबाबत कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी समिती तयार करण्याच्या बाबतीत सांगितले. त्या समितीबद्दल सुध्दा विचार केला जाईल.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : ही समिती तातडीने नियुक्त करण्याची गरज आहे. नुसत्या बदल्या करुन काही उपयोग होणार नाही.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदया, या ठिकाणी अतिशय गंभीर प्रश्न चर्चेला आला आहे आहे. अधिक्षिकेच्या नवऱ्याने दारु पिऊन मुलींना त्रास द्यावयाचा ही गंभीर बाब आहे. यामध्ये दोन गोष्टी घडलेल्या आहेत. एक तर बायको जी नोकरी करते ती माझ्या घरची नाही, तिला वेगळे अस्तित्व आहे, तिनेच त्याबाबत मॉनिटरींग करावयाचे आहे, माझा त्यामध्ये काही संबंध नाही, ही भावना तो विसरलेला आहे. त्या रेक्टरची आपण त्या ठिकाणाहून बदली केली परंतु जाताना ती नवऱ्याला बरोबर घेऊन गेली असेल. तेव्हा त्या ठिकाणी परत तो हेच उद्योग करील. नवऱ्याने या गोष्टीचा फायदा घ्यावयाचा याला समाज कधीही परवानगी देणार नाही. आरोपीला शिक्षा देऊन प्रश्न सुटत नाही. जालना येथील रिमांड होमचा जो रेक्टर मुलींशी छेडछाड करतो, बलात्कार करतो त्याला निलंबित केले. परंतु त्या मुलींच्या पुनर्वसनाबाबत काय केले ? सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे त्याना दक्षता कमिट्यांचा आधार देणे हा फार उपयोगी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे

मार्ग आहे. सामाजिक मानसिकता मनूच्या बाहेर गेलेली आहे. दक्षता समितीच्या बाबतीत जी सूचना आलेली आहे त्या सूचनेचा गांभीयाने विचार करणे गरजेचे आहे. शासन त्याबाबत विचार करील काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितले की, त्यांची बदली केली. त्यांची बदली केलेली नाही तर त्यांना निलंबित केले आहे. आपल्या ज्या सूचना आलेल्या आहेत त्याबाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करु. जी कमिटी आपल्याला तयार करावयाची आहे ती केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : जी शासकीय वसतिगृहे आहेत त्या ठिकाणी मुली असोत किंवा लहान मुले असोत त्यांच्या जेवणाच्या बाबतीत, राहण्याच्या बाबतीत तक्रारी असतात. लैंगिक शोषणाचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये येतो. कोणत्या तरी जिल्ह्यामध्ये हा प्रकार घडत असतो. त्यासंदर्भात दरवर्षी गांभीर्याने चर्चा होते. माननीय मंत्रिमहोदय आश्वासन देतात. एखादा अधिकारी किंवा कर्मचारी निलंबित होतो. त्यांची बदली करतो. परत त्या ठिकाणी एखादी स्त्री येते. परत त्या ठिकाणी लैंगिक शोषण, परत उपासमार, परत तीच कॅन्टीन अशी परिस्थिती असते. ज्याप्रमाणे एम.एस.ई.बी.मध्ये मुख्य व्हिजिलंस ऑफीसर असतो किंवा एमएसएसआरडीसीमध्ये मुख्य व्हिजिलंस ऑफीसर असतो त्या पध्दतीने महिला आय.पी.एस. अधिकारी नेमून व्हिजिलंसच्या माध्यमातून या सगळ्यांवर नियंत्रण करता आले तर तशी प्रशासकीय सिस्टिम तयार करणार काय ? त्यामुळे त्यांना धाक बसून या गोष्टीला आळा बसेल. नाही तर शाहू, फुले, आंबेडकर यांचा महाराष्ट्र असे म्हणावयाचे आणि असे प्रकार सगळीकडे चालू ठेवावयाचे हे बरोबर होणार नाही. हे कोठे तरी थांबविणे गरजेचे आहे. पाच वर्षात 40 वेळा हा प्रश्न आलेला आहे. त्याचा गांभीर्याने विचार करण्यात येईल का ?

श्री. रवीशेठ पाटील : याबाबतीत विचार केला जाईल.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15.25वा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : तालिका सभापती महोदया, सर्वात गंभीर बाब अशी आहे की, खाजगी वसतिगृहामध्ये कोणते प्रकार घडतात याची सर्वांना कल्पना आहे. हे मुलींचे शासकीय वसतिगृह आहे. शासन चालवित असलेल्या वसतिगृहामध्ये अशा घटना घडाव्यात ही बाब खरोखरच शासनकर्त्यांना अशोभनीय अशी आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आणि सन्मानीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी सूचना केल्याप्रमाणे महिला आमदारांची एक समिती तयार करावी. केवळ पाहणी करण्यासाठीच नव्हेतर मॉनिटरिंग करण्याचे अधिकारही त्या समितीला द्यावेत. तेव्हा यासंदर्भात शासन विचार करील काय ?

श्री. रविशेठ पाटील : शासन निश्चितच विचार करील आणि लवकरात लवकर समिती निर्माण करील.

श्री. जी.एल.अैनापुरे : महाराष्ट्रातील अनेक वसतिगृहांची अवस्था अशीच आहे. असे प्रकार घडू नयेत म्हणून कायमस्वरुपी तज्ज्ञ असे वसतिगृह अधिक्षक नेमण्यात येतील काय ? आता ज्यांना अधिक्षक म्हणून नेमले जाते त्यांना कोणतेही प्रशिक्षण नसते. तेव्हा एमएसडब्ल्यू डिग्री घेतलेल्या लोकांनाच वसतिगृह अधिक्षक म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : याबाबतीत विचार केला जाईल.

श्री. सुरेश जेथलिया :एवढी मोठी गंभीर घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला त्या इसमाला 5.30 वाजता अटक झाली आणि लगेच 5.35 वाजता म्हणजे 5 मिनिटांनी त्याला जामीन मिळाला. तेव्हा या अधिक्षिकेच्या पतीबद्दल शासन कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री. रविशेठ पाटील : ते आपल्या खात्यात नसल्यामुळे त्यांच्यावर ॲक्शन घेतलेली नाही. कोर्टाने त्यांना सोडलेले आहे.

श्री. सुरेश जेथलिया : पोलीस स्टेशनमधून त्याला जामीन मिळाला.

श्री. रविशेठ पाटील : पोलीस स्टेशनला चापटी मारल्याची तक्रार होती. तो सिरिअस, नॉन बेलेबल गुन्हा होऊ शकत नाही.

श्री. नितीन गडकरी : सात, आठ, नऊ वर्षाच्या मुलींवर बलात्काराची प्रकरणे होत आहेत. मंत्री महोदय म्हणतात की, चापटी मारली हा गंभीर गुन्हा नाही. खरे म्हणजे मंत्री महोदयांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

यामधील गंभीरता लक्षात यावयास पाहिजे. एका महिले बरोबर अशा प्रकारे वर्तन करणा-या व्यक्तीस पोलिसांनी कठोर शिक्षा करायला पाहिजे. अशा व्यक्तीला पोलीस स्टेशनमध्ये 5 मिनिटात जामीन मिळतो हे दुर्दैव आहे. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा. महिले बरोबर अशा प्रकारचे वर्तन करणा-या माणसाला नॉन बेलेबल गुन्ह्याखाली अटक करायला पाहिजे जेणे करुन पुन्हा असे प्रकार कोणाकडून होणार नाहीत. तेव्हा या घटनेची उच्चस्तरीय चौकशी मंत्री महोदय करतील काय ?

**तालिका सभापती** : ही अतिशय गंभीर बाब असून ती तितक्याच गंभीरतेने घेतली पाहिजे. या व्यक्तीस 5 मिनिटामध्ये जामीन कसा मिळाला ? त्याच्यावर कोणती कलमे लावलेली आहेत ? याची चौकशी करुन त्याबाबतची माहिती पटलावर ठेवावी.

श्री. रविशेठ पाटील : होय.

श्री. नितीन गडकरी : आपण निदेश दिल्यामुळे यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला. आपण दिलेल्या निदेशासंदर्भात आज सकाळी सदनामध्ये चर्चा झाली. पीठासीन अधिका-यांनी दिलेले निदेश तीन तीन दिवस मंत्र्यांच्या कानवर जात नाहीत. आपल्या राज्याचे मंत्रिमंडळ हे ऐतिहासिक मंत्रिमंडळ आहे. या मंत्रिमंडळाला कोणतीही संवेदनशीलता नाही. तालिका सभापती महोदया, आपण एक महिला आहात, आपली भाषणे आम्ही वेळोवेळी ऐकलेली आहेत. आपल्या बद्दल आम्हाला नितांत आदर आहे. तेव्हा ज्या महिलेला अधिक्षिकेच्या पतीने चापटी मारली त्याच्यावर नॉन बेलेबल गुन्हा रजिस्टर करुन कठोर कारवाई करण्याचे आदेश शासनाला द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : या प्रकरणी चौकशी करुन कठोर कारवाई करावी.

श्री. रविशेठ पाटील : होय.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : त्यांनी शब्द वापरला तो बरोबर नाही. चापट्या मारल्या म्हणून पाच मिनिटात सोडून दिले असे रेकॉर्डवर येणे बरोबर नाही.

श्री.रविशेठ पाटील : अशी तक्रार आहे, मी बोललेलो नाही.

**तालिका सभापती** : हा मामुली गुन्हा नाही. हा अभद्र व्यवहार आहे, याची मंत्रीमहोदयांनी जाणीव ठेवावी.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विकास प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या शाळांचे पुनर्वसन करणे.

**मु. शी.** : विकास प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या शाळांचे पुनर्वसन करणे यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील,जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एमएमआरडीए आणि एमयुआयपी यांच्या प्रकल्पामुळे तसेच मिठी नदीच्या प्रकल्पामुळे मुंबईतील गणेश विद्या मंदिर (चेंबूर), डॉ. आंबेडकर विद्यालय (चेंबूर), शिवम् विद्यामंदिर (कुर्ला) यासारख्या शाळा विस्थापित होत असूनही त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही उपाययोजना शासनाने न केल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागणे, त्यामुळे पालकवर्गात निर्माण झालेला असंतोष याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.राजेश टोपे( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जे धोरण सांगितले आहे त्यामध्ये कुठेही शाळेच्या पुनर्वसनाबद्दल उल्लेख नाही. मंत्रीमहोदयांनी याठिकाणी तीन गोष्टींचा खुलासा केला तर मुंबईमध्ये विस्थापित होणाऱ्या शाळांचा प्रश्न सुटू शकेल. चार शाळांचा प्रश्न शासनाने मान्य केला आहे. या शाळांचे पुनर्वसन करताना समाज मंदिराला तात्पुरती जागा द्यावयाची एवढेच अंशत: पुनर्वसन होणार आहे. शाळेचे पुनर्वसन करताना अर्धी शाळा या ठिकाणी आणि अर्धी शाळा दुसऱ्या ठिकाणी असे करता येत नाही. ज्या शाळा बाधित झाल्या आणि होणार आहेत त्यांचा पूर्ण आराखडा तयार करावा आणि त्यांचे अंशत: नव्हे तर पूर्ण पुनर्वसन करावे. पुनर्वसन करताना ब-याचदा शेड बांधून दिली जाते. मधल्या भागात कम्पार्टमेंट घालून दिले जाते. शाळा बांधावयाची झाल्यास शेड तोडावी लागते. म्हणजे पुन्हा भूर्दंड सहन करावा लागतो. पूर्ण पुनर्वसन करताना एस.एस.कोडनुसार आवश्यक आहे तितके पक्के बांधकाम करुन दिले पाहिजे. हा आराखडा मंजूर केला जाईल का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, एमयुटीपी किंवा मिठी नदी विकास, एमआयुआयपीची कामे एमएमआरडीएच्या माध्यमातून केली जातात. त्या विकास कामांमध्ये जे बाधित होतात त्यांचे पुनर्वसन करण्याचे एमएमआरडीएचे धोरण आहे. शाळांची खूप तुरळक प्रकरणे आहेत. शाळा बाधित होते त्याकरीता एमएमआरडीएच्या धोरणामध्ये शाळांच्या पुनर्वसनाची स्पष्टता निश्चितपणे नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा अत्यंत योग्य आहे. अंशत: पुनर्वसन करणे, अर्धी शाळा इकडे आणि अर्धी शाळा तिकडे असे शाळेचे पुनर्वसन केले तर ते संस्था चालकांना, विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना चुकीचे होऊ शकेल. पूर्णत: पुनर्वसन होणे ही आवश्यक बाब आहे. त्यादृष्टीने शासन निश्चितपणे विचार करील.

डॉ.दीपक सावंत : शाळांबाबत कोणत्याही प्रकारचे स्पष्ट धोरण नाही. प्रकल्पग्रस्त आणि रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या लोकांसाठी राज्य शासनाने कोणतेही स्पष्ट धोरण नाही. एमयुआयपी, एमयुटीपी, महापालिका यांच्या विकास कामात बाधित होणाऱ्यांसाठी कोणते धोरण आहे? एखाद्याची जागा जात असेल, शाळा जात असेल, शासकीय इमारत किंवा दवाखाना, महापालिकेचा दवाखाना जात असेल तर त्यासाठी कोणते धोरण आहे? एखादी शाळा विस्थापित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

करणार असाल तर तेथे शिकणाऱ्या मुलांचे काय करायचे? त्या भागातच शाळा बांधून देणार का? रस्त्यांचे रुंदीकरण व प्रकल्पग्रस्त बाधितांचे पुनर्वसन करण्यासाठी ठोस व स्वयंस्पष्ट धोरण जाहीर करणार का?

श्री.राजेश टोपे : एमयुटीपीच्या माध्यमातून ज्या दिवशी सर्वेक्षण करायचे ती नियत तारीख धरुन बाधित होणाऱ्या गोष्टींची यादी तयार करुन विकास कामात बाधित होणाऱ्यांचे पुनर्वसन करण्याचे एमएमआरडीएचे धोरण आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, वेगवेगळ्या संस्था असतील, दवाखाना, शाळा यांचे पुनर्वसन करण्याबाबत धोरण नाही असे नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

धोरण आहे परंतु त्यामध्ये काही त्रुटी आहेत. ज्या ठिकाणी खोल्या बाधीत होतात त्यांचे पुनर्वसन करण्याचे धोरण आहे. जो भाग बाधीत झालेला आहे, बाधीत झालेल्या भागातील खोल्यांचे पुनर्वसन करण्याचे एमएमआरडीए चे धोरण आहे. तसेच या शाळा खोल्यांचे पुनर्वसन जवळच्या जवळ होणे आवश्यक आहे. पुनर्वसनाची जी काही वस्ती असेल त्या ठिकाणी या शाळा खोल्यांचे पुनर्वसन होणे आवश्यक आहे. या लक्षवेधीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. पुनर्वसनाच्या धोरणात काही त्रुटी असतील तर त्या त्रुटी दूर करण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, माननीय मंत्रीमहोदयांनी सकारात्मक उत्तर दिल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. एमएमआरडीए, एमयुआयपी तसेच मिठी नदीच्या प्रकल्पामुळे ब-याच मोठया प्रमाणात लोकांना मानखुर्द गोवंडी तसेच जोगेश्वरी येथे स्थलांतर करावे लागणार आहे. या लोकांसाठी जवळ 50 ते 70 हजार घरे बांधून दिलेली आहेत. या ठिकाणी ज्या लोकांचे पुनर्वसन होणार आहे त्या ठिकाणी शाळा काढण्यासाठी जे लोक पुढे येतील, शाळा काढण्यासंदर्भात अर्ज येतील अशांना त्या ठिकाणी शाळा खोल्यांसाठी जागा उपलब्ध करुन दिली जाणार आहे काय? या ठिकाणी गरीब लोकांचे स्थलांतर होणार आहे त्यामुळे हे गरीब लोक आपल्या मुलांना खाजगी शाळेत ॲडमिशन घेऊ शकणार नाही त्यामुळे पुनर्वसित भागात अनुदानित शाळांना खोल्या बांधून दिल्या जातील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, ज्या ठिकाणी अशा पध्दतीचे पुनर्वसन होऊन वसाहती निर्माण होतील त्या ठिकाणच्या लोकांना सोयी-सुविधा पुरविण्याचे काम आपल्याला करावे लागते. अशा ठिकाणी गार्डन, शाळा, दवाखाने उभे करावे लागतात. जर अशा रितीने शाळा विस्थापित होत असतील किंवा शाळेच्या खोल्या बांधण्यासाठी तयार आहेत त्यांना जागा दिली जाईल. अशा ठिकाणी जर शाळा त्वरीत सुरु करावी लागत असेल, विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असेल तर त्या ठिकाणी शाळा त्वरीत सुरु करण्यासाठी सुविधा आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदया, या ठिकाणी शाळा सुरु करण्याच्या संदर्भात किती अर्ज आलेले आहेत?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : अर्ज किती आले याची माहिती नाही परंतु शाळेचे काम निश्चित होईल.

श्री. जी.एल.अैनापूरे : मुंबईच्या शाळेच्या पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. कृष्णा नदीला दर वर्षी मोठया प्रमाणात पूर येत असतो व या पुरामुळे शिरोळा, वाळवा या ठिकाणच्या शाळेत कृष्णानदीचे पाणी शिरते. त्यामुळे मुंबईच्या शाळेच्या संदर्भात आपण जो निर्णय घेतलेला आहे तसा निर्णय आपण शिरोळा,वाळवा मधील शाळेच्या संदर्भात घेणार आहात काय?

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 संबंधी**</u>

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजात दाखविण्यात आलेल्या चौथ्या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती केलेली आहे की, सदर लक्षवेधी सूचना न घेता ती उद्याच्या कामकाजात घेण्यात यावी. त्यामुळे आजच्या कामकाजात दाखविलेली चौथ्या नंबरची लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील भ्रष्टाचाराच्या संदर्भात चौकशी होऊनही गैरव्यवहारातील दोषीवर कोणत्याही प्रकारची कारवाई न होणे.

**मु. शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील भ्रष्टाचाराच्या संदर्भात चौकशी होऊनही गैरव्यवहाराताल दोषींवर कोणत्याही प्रकारची कारवाई न होणे यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मणराव जगताप, जोगेंद्र कवाडे, जगन्नाथ शेवाळे, सदाशिवराव पोळ, श्रीमती फौजिया खान, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील भ्रष्टाचाराच्या गंभीर प्रकरणावर मार्च, 2006 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी, विशेष उल्लेख अशी विधानमंडळातील विविध आयुधे वापरल्या नंतर शासनाच्या संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडून, गुन्हा अन्वेषण विभागाकडून चौकशी करुन 1 महिन्यांच्या आत दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात मिळणे, या आश्वासनावर कारवाई होण्याकरिता दिनांक 13 एप्रिल, 6 मे, 1 जुलै, 2006 अशा विविध तारखांना संबंधित विभागांच्या मंत्र्यांबरोबर पत्रव्यवहार करुनही आजपर्यन्त वरील गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई न होणे, यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, लोक किती लबाड असतात, बदमाश असतात फसवणूक करणारे असतात याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर आपल्याला "जूहू" येथील एसआरए च्या योजनेअंतर्गत सिनेमा कलावंतांनी खोटी नावे दिल्याचे सांगता येईल "जुहू" येथील एसआरए च्या सोसायटयांमध्ये सिनेमा क्षेत्रातील नावाजलेल्या लोकांनी आपली नावे घातलेली आहेत. यामध्ये संजय खान, फराह खान, झरीना अशा लोकांनी आपली नावे घुसवलेली आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात चर्चाही झालेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ MAP/ KGS/ 15:40

श्री.मधुकर चव्हाण.........

ही चर्चा झाल्यानंतर तत्कालीन राज्यमंत्री श्री.मस्के यांनी मान्य केले होते की, या प्रकरणात फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. एस.आर.ए. योजनेचा गैरफायदा घेतला असे गृहीत धरुन त्यांची घरे ताब्यात घेण्यात येतील. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. त्यावर सभागृहात पुन: गदारोळ झाला. त्यानंतर माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, "सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणाची सी.आय.डी.चौकशी करण्यात येईल आणि एक महिन्यात आत गुन्हा नोंदविण्यात येईल." सभापती महोदया, आजच्या निवेदनात जे उत्तर दिलेले आहे ते फसवे आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हे उत्तर दिलेले आहे त्यास प्रथम गजाआड केले पाहिजे. सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना लागण्यासाठी मला हाजीहाजी करावी लागली. भ्रष्टाचाराविरुध्द, गुन्ह्यांच्या विरुध्द किंवा गंभीर विषयाबाबत शासनास प्रश्न विचारावयाचे असतात पण अशा विषयावरील प्रश्न, लक्षवेधी, अर्धातास चर्चा का लागत नाही हे मला माहीत नाही. कदाचित सोडतीमध्ये आमचा नंबर लागत नसावा. सभापती महोदया, निवेदनाच्या पृष्ठ दोन वर असे म्हटलेले आहे की, "सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संबंधांने सन 2006 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवरील चर्चेस उत्तर देताना "या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल" असे शासनातर्फे सभागृहात आश्वासन देण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत पोलीस खात्याला कळविण्यात आले आहे. आर्थिक गुन्हे विभागामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास सुरु आहे." हा भयंकर प्रकार आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात आश्वासन दिले की, एक महिन्यात गुन्हा नोंदविण्यात येईल, परंतु त्याबाबत कार्यवाही झालेली दिसत नाही. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना आणि संबंधित विभागाच्या मंत्र्यांना पत्र लिहिली आहेत. त्या पत्रांवर त्यांनी माझ्यासमोर "सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात यावी" अशाप्रकारचे नोटींग देखील केलेले आहे. आता निवेदनात म्हटले आहे की, " आर्थिक गुन्हे विभागामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून संबंधिताविरुध्द गुन्हा दाखल झालेला आहे." सभापती महोदया, खोटी कागदपत्रे सादर करुन झोपडपट्टीत राहतो असे दाखवून धनदांडग्यांनी गरिबांची पिळवणूक चालविली आहे. तेव्हा माझ्‍या मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ज्यांनी अशाप्रकारे खोटी कागदपत्रे

श्री.मधुकर चव्हाण.........

दाखवून घरे बळकावली आहेत त्यांच्याकडून घरे परत घेण्यात येतील काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदया, या प्रकरणाची क्राईमब्रांचने चौकशी केलेली आहे. दिनांक 31.10.2006 रोजी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विषयावर दिनांक 12 जुलै रोजी येथे चर्चा झाली. त्यावेळी उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की, एक महिन्यात गुन्हा नोंदविण्यात येईल. असे असताना ऑक्टोबर महिन्यात गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या प्रकरणात किती जणावंर गुन्हा दाखल झाला आहे ? किती जणांना अटक झाली आहे ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदया, याप्रकरणात पोलीस उपनिरीक्षक चौकशी अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. ते चौकशी पूर्ण झाल्यनंतर गुन्हेगारांना अटक करतील. त्याच्यांवर चार्जशीट दाखल होईल,त्याप्रमाणे कोर्टात ही केस जाईल.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होता की, गुन्हा नोंदविण्यास उशीर का झाला ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी जुलै महिन्यात आश्वासन दिले होते की, एक महिन्यात गुन्हा नोंदविण्यात येईल.

ॲड.प्रीतमकुमार शेगावंकर : सभापती महोदया, या प्रकरणी दिनांक 31.10.2006 रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मुंबई महानगरीमध्ये जो काही प्रकार सुरु आहे तो पूर्णत:संशयास्पद आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली बिल्डर्स गरीब लोकांचे शोषण करीत आहेत. यामध्ये काही जबाबदार नेते मंडळी देखील गुंतलेली आहेत. निवेदनात असे म्हटले आहे की, आर्थिक गुन्हे विभागामार्फत चौकशी करण्यात आली असून संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे ? माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या प्रकरणी किती लोकांची चौकशी करण्यात आली ? त्यांची नावे काय आहेत ?

यानंतर श्री.पुरी......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये खालीलप्रमाणे नांवे आहेत. कॅप्टन सलारिया, हनिफ मोहम्मद, सोसायटीचे मुख्य प्रवर्तक, सिद्दिक अब्दुल कादर, म्हाडा व एसआरएचे संबंधित अधिकारी/कर्मचारी, बनावट कागदपत्रे सादर करणारे झोपडीधारक व बिल्डर यांचेविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. यातील चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल त्याप्रमाणे त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्यांचे निश्चितपणे समाधान होईल. यामध्ये आपण कोणालाही पाठीशी घालण्याचे काहीच कारण नाही. यामध्ये चौकशी होऊन योग्य ती कारवाई होईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्रीहोदय, या प्रश्नी अतिशय गंभीर आहेत, याची मला कल्पना असून ते चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत. माझा याठिकाणी स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, यातील संबंधित बिल्डरचे नांव काय ?

**( सभापतीस्थानी माननीय उपसभाती )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे. ज्याअर्थी गुन्हा दाखल झाला आहे त्याअर्थी यामध्ये काहीतरी चुकीचे झालेलेच आहे. याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, ज्यांना आपण जागा दिल्या, त्या आपण परत ताब्यात घेतल्या का ? व ज्यांच्यावर आपण गुन्हा दाखल केला त्यांस अटक झाली का की तो जामिनावर सुटले आहेत ? याबाबतची वस्तुस्थिती काय ? तसेच, यामध्ये जे बिल्डर सहभागी आहेत, त्यांचे नांव काय ? तसेच, यामध्ये जे कोणी अधिकारी आहेत, त्यांच्यावर आपण गुन्हा दाखल केला आहे का ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, बिल्डरांच्या विरोधात गुन्हा दाखल केलेला असून त्यांची नांवे श्री.अलोक अग्रवाल व श्री.शैलेश सावला अशी आहेत. यामध्ये जे लोक दोषी असल्याचे पोलीस कळवतील, त्याप्रमाणे त्यांच्यावर निश्चितपणे निलंबनाची कारवाई करण्यात येईल व त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई होईल. ज्या उद्देशाने ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे, तो



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर....

उद्देश यातून पूर्ण होईल. याबाबतीत सर्व कारवाई पूर्ण केलेली आहे. यामध्ये 90 दिवसांच्या आत चार्जशिट दाखल करावी लागणार आहे. त्यामुळे याठिकाणी आपल्याला 90 दिवसांची वाट पहावी लागेल. याबाबतीत पोलीस ज्या शिफारशी करतील त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे त्यांना आपल्याला अटक करावी लागेल, ती आपण केली का ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, पोलिसांकडून ज्या सूचना होतील, त्याप्रमाणे कारवाई होईल. यामध्ये आपल्या इच्छेप्रमाणे काही करता येणार नाही. पोलिसांनी सांगितले की, या चार लोकांना सस्पेंड करा, तर त्या चार लोकांना आम्ही सस्पेंड करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी दि.12 एप्रिल,2006 रोजी सभागृहात आश्वासन दिले आहे की, याबाबतीत एक महिन्याच्या आत सीआयडी चौकशी करण्यात येईल व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल. याठिकाणी माझा प्रश्न असा आहे की, आपण ऑक्टोबरच्या अगोदर गुन्हा का दाखल केला नाही ? याबाबतीत ज्यांनी टाळाटाळ केली, त्यांना आपण त्वरित आजच्या आज निलंबित करणार का ?

नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....(पुढे सुरु)

मे महिन्यापासून आतापर्यंत याकरीता सहा महिने का लागले ? मी जवळजवळ 10-15 पत्रे लिहिली. त्या सहा महिन्यात कारवाई करण्याची टाळाटाळ केली. सर्वोच्च सभागृहात याबाबत कारवाई करण्याचे आश्वासन देऊनसुध्दा कारवाई करण्याचे टाळले जात आहे.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : संबंधितांवर गुन्हे दाखल करुन याबाबत तपास करण्याचे काम पोलिसांचे आहे. याबाबत का उशिर होत आहे याची चौकशी करण्यात येईल व त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : मी उपस्थित केलेल्या प्रश्नावर सभागृहात आश्वासन दिलेले आहे. एक महिन्यात कारवाई केली जाईल असे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन दिलेले आहे. सभागृहात दिलेल्या आश्वासनावर कार्यवाही होणे आवश्यक आहे 12 एप्रिल 2006 रोजी हे आश्वासन दिलेले आहे. ज्यांनी या प्रकरणी कारवाई करण्यासाठी सहा महिने उशीर केला आहे, त्यांना तुम्ही निलंबित करणार आहात काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : या प्रकरणी चौकशी करुन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

.....3G2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे शहरातील पोखरण रोड नं.2 येथील गांधीनगर झोपडपट्टीमध्ये या परीसरात राहणारे गोरगरिब, आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या झ ाोपडपट्टीवासियांचे वास्तव्य असून या परिसराचा विकास व्हावा यासाठी त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले को-ऑपरेटीव्ह गृहनिर्माण हौसींग सोसायटीची स्थापना केलेली आहे. परंतु तेथील काही समाजद्रोही व्यक्ती झोपडपट्टीवासियांच्या गरीबी तसेच अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या खोटया सहया मारुन, त्यांना दमबाजी करुन जबरदस्तीने सहया घेऊन त्यांनी वेगळीच गृहनिर्माण सोसायटी स्थापन केलेली आहे व सदर झोपडपट्टीच्या विकासासाठी या सोसायटीच्या नावावर मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचेकडे विकास प्रस्ताव सादर केला असून सकृतदर्शनी तो बेकायदेशीर असल्याचे दिसून येते. या लोकांवर अन्याय होऊ नये यासाठी या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता आहे असे निवेदन मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे दाखल केलेले आहे, आपण या प्रकरणात दोषी असलेल्या व्यक्तिंवर कोणती कारवाई करणार आहात ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**पृ.शी.**: वैनगंगा नदीवर बांधलेला पूल पहिल्याच पावसात वाहून गेल्याबाबत.

**मु.शी.**: वैनगंगा नदीवर बांधलेला पूल पहिल्याच पावसात वाहून गेल्याबाबत

श्री. जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती सुधा जोशी, संजय दत्त, वि.प.स.

यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मौजे वनोजा (तालुका-कोरपना, जिल्हा चंद्रपूर) येथे वैनगंगा नदीवर बांधण्यात आलेला पूल संबंधित ठेकेदार, कार्यकारी अभियंता, शासकीय अधिकारी यांच्या हलगर्जीपणा व मनमानी कारभारामुळे पहिल्याच पावसाळयात जुलै, 2006 मध्ये झालेल्या पूल पिलरसह वाहून गेल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान होणे, पुलाचे काम प्रत्यक्षपणे करतांना शासनाने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे न करता, संबंधित कंत्राटदाराने तत्कालीन अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांच्याशी संगनमत करुन पुलाची उंची कमी करणे, उंची कमी केल्यामुळे या वर्षी झालेल्या जोरदार अतिवृष्टीने नदीचे पाणी पुलावरुन गेल्याने स्प्रींग तुटून पुल वाहून जाणे, या पुलावर आतापर्यन्त झालेला कोटयावधीचा खर्च पाण्यात जाणे, यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... यानंतर श्री.रोझेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, सब से पहले तो मैं यह कहूंगा कि यह प्रश्न चंद्रपुर जिले से संबंधित है, जो कि पिछड़ा हुआ क्षेत्र है, इसलिए इस प्रश्न को अधिक समय दिया जाए. वैनगंगा नदी पर बना हुआ यह पुल जुलाई, 2006 में गिर गया. यह अपघात होने के बाद मैंने अगस्त के महीने में एक पत्र माननीय मंत्री श्री. छगन भुजबल को लिखा. जब इस पत्र को मुझे कोई जबाब नहीं मिला तो मैंने दूसरा पत्र नवम्बर के महीने में लिखा. इस पत्र का भी मुझे कोई जबाब नहीं मिला. इन पत्रों में मैंने वैनगंगा नदी पर बने हुए पुल के बारे में सारे डिटेल्स लिखकर भेजे थे. 4-5 करोड़ रुपए का पुल गिर जाता है, उसके बारे में जब कोई आमदार माननीय मंत्री महोदय को पत्र लिखते हैं और उसका कोई जबाब नहीं आता है, तो यह कोई अच्छी बात नहीं है. इस पुल का टेन्डर वर्ष 2000 में दिया गया था. जब किसी नदी पर पुल बनता है तो उसकी ऊंचाई तय करते समय इस बात का विचार किया जाता है कि पिछले 50 साल में कितने महापूर आए हैं. उसके हिसाब से उसका स्तर तय किया जाता है. शुरु में इस काम के लिए 5 करोड़ रुपए निश्चित किए गए थे और ठेकेदार ने 4.5 करोड़ रुपए में यह काम किया है. 50 लाख रुपए के चक्कर में आपके 5 करोड़ रुपए डूब गए. मेरा आरोप है कि पहले जो डिजायन मंजूर की गई थी, उसके हिसाब से काम करने पर ठेकेदार के लिए 50 लाख रुपए कम पड़ते थे, इसलिए डिजाइन चेंज की गई. इसमें इंजीनियर और ठेकेदार की मिलीभगत है. डिजाइन चेंज करने की वजह से यह पुल गिर गया, ऐसा मेरा आरोप है. क्या माननीय मंत्री महोदय मेरे आरोप के बारे में इन्क्वायरी करेंगे ? मेरे पास इस बारे में सारे डिटेल्स मौजूद हैं.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पाठविलेल्या पत्रांना उत्तर देण्यात आले नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात मी स्वत: चौकशी करतो. सर्वसाधारणपणे पुलांचे डिझाईन तयार करतांना गेल्या 30 वर्षामध्ये पुराची पातळी किती होती याचा अभ्यास केला जातो. त्या परिसरातील 11 धरणांची पाण्याची पातळी वाढल्यामुळे या सर्व धरणांचे पाणी सोडण्यात आले व त्यामुळे अतिरिक्त पाण्याचा विसर्ग वाढला आणि पुलाच्या वरती पाणी गेले. जे डिझाईन तयार करण्यात आले होते त्यापेक्षा पाण्याची पातळी वाढल्यामुळे पुल वाहून गेला. या घटनेची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली असून या समितीमध्ये तीन मुख्य अभियंतांचा समावेश आहे. आता या ठिकाणी मी जर पुल वाहून गेल्याबाबतच्या

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ पुढे सुरु.............

कारणमिमांसेची चर्चा केली तर चौकशी समितीला काही अर्थ उरणार नाही. प्रथमदर्शनी विभागाचे जे मत तयार झाले आहे ते मी या ठिकाणी सांगितले आहे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या पुलाच्या 9 गाळयांपैकी 7 गाळे वाहून गेले याचा अर्थ संपूर्ण पुल वाहून गेला आहे. पुराची पातळी वाढल्यामुळे व पुलाची उंची कमी असल्यामुळे पुलामधील स्प्रिंग तुटले व पूल वाहून गेला, हे खरे आहे काय ? या प्रकरणी सर्वसंबंधितांनी मिलिभगत करुन भ्रष्टाचार केला, असे सकृतदर्शनी वाटते. याबाबत मंत्रीमहोदय खुलासा करतील काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याबाबत जी वरिष्ठ अधिका-यांची समिती नेमलेली आहे त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शिफारशीप्रमाणे संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मेरे सवाल का जबाब माननीय मंत्री महोदय ने नहीं दिया है. मेरा प्रश्न यह है कि पहले जो टेन्डर दिया गया था वह अलग था, उसमें बदल किया गया है और इसमें भ्रष्टाचार हुआ है. सब डॉक्यूमेंट मेरे पास मौजूद हैं. मैं ये डॉक्यूमेंट माननीय मंत्री महोदय के पास देने के लिए तैयार हूँ. इस ठेकेदार को बचाने में इंजीनियर का हाथ है. एक इंजीनियर दूसरे इंजीनियर की क्या जांच करेगा, एक भाई दूसरे भाई की जांच कैसे करेगा ? यह क्रिमिनल गुन्हा है. शाम को 6 बजे उस पुल के ऊपर लगभग 1 हजार लोग थे. वह पुलिस उस समय हिल रहा था. पुलिस को इस बात की सूचना दी गई. सुबह 4 बजे वह पुल गिर गया. इसमें अगर सावधानी नहीं बरती जाती तो 1 हजार लोग मर जाते. यह क्रिमिनल गुन्हा है, इसलिए मेरी मांग है कि इसकी जांच सी.आई.डी. या सी.बी.आई. से करानी चाहिए.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ही चौकशी थांबवावी असे सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांचे म्हणणे असेल तर चौकशी थांबविली जाईल आणि सी.बी.आय. चौकशी करावयाची असेल तर त्यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्याशी बोलतो. सी.बी.आय. चौकशी करने के लिए माननीय मुख्य मंत्री से पूछना पड़ेगा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, इसमें ठेकेदार और इंजीनियर की मिलीभगत है, उन्होंने पैसा खाया है. यह बहुत गंभीर बात है, इसलिए इस पूरे मामले की चौकशी सी.बी.आय. से करानी चाहिए.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी सी.बी.आय. चौकशीची मागणी केलेली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन सी.बी.आय. चौकशी करता येईल काय ? हे मी बघतो. तीन चिफ इंजिनियर्स व इतर लोकांची समिती नेमण्यात आलेली आहे ती समिती याबाबतची चौकशी करीत आहे. या चौकशी समितीवर विश्वास न ठेवता सी.बी.आय. चौकशी .....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी सी.आय.डी. चौकशीची मागणी करीत आहेत.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सी.बी.आय. किंवा सी.आय.डी. चौकशी करावयाची असेल तर त्यासंदर्भात मला माननीय मुख्यमंत्री महोदयांशी बोलावे लागेल. या समितीचा अहवाल आल्यानंतर पोलीस कारवाई करावी असे जर आपल्याला वाटते तर आपण पोलीस कारवाई करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकावे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, मागील 30 वर्षातील पावसाच्या पुराची पातळी बघून पुलाचे डिझाईन तयार केले जाते. हा पूल उंच बांधलेला होता. हा सबमर्सिबल पूल नव्हता. सबमर्सिबल पुलावरुन पाणी गेले तरी तो पूल हलत नाही. पाणी पुलाच्या खालून वाहून जावे म्हणून क्लँपवर स्लॅब टाकलेला असतो. 11 धरणातून एकदम पाणी सोडल्यामुळे पाण्याची पातळी प्रमाणापेक्षा जास्त वाढली व त्यामुळे तो पूल वाहून गेला. पुलाची उंची कमी करण्याचा कोणी प्रयत्न केला काय ? काम निकृष्ट दर्जाचे झाले काय ? यासंदर्भात तीन चिफ इंजिनियरर्सची समिती नेमलेली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर आपण पोलीस कारवाई करु.

----------

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दीर्घकाळापासून प्रलंबित असणारी धनगरांची चराई करणांची समस्या.

**मु. शी.** : दीर्घकाळापासून प्रलंबित असणारी धनगरांची चराई करणांची समस्या यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, संजय केळकर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वनमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने राज्यात चराई जमाबंदी करण्यासाठी दिनांक 21 डिसेंबर, 2003 व दिनांक 21 नोव्हेंबर, 2005 रोजीच्या शासन निर्णयाअन्वये चराई जमाबंदी अधिकारी नियुक्त केला असणे, सदर अधिकारी स्वत:चे काम सांभाळून जमाबंदीचे काम वेळ मिळेल तेव्हा करीत असणे, शासन निर्णय निघून 3 वर्षे होऊन देखिल अद्यापपर्यन्त फक्त वन विभागाचे दोनच अहवाल सादर होणे, अशाच गतीचे काम होत राहिल्यास संपूर्ण राज्याचा जमाबंदी अहवाल तयार होण्यास आणखी 15 वर्षे लागण्याची शक्यता असणे, दिर्घकाळापासून शासनाकडे प्रलंबित असणाऱ्या धनगरांच्या चराई कुरणांच्या समस्येकडे शासनाने केलेल अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे धनगर समाजात पसरत असलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

यानंतर श्री.सुंबरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा. वन मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदय, हा शेळ्या-मेंढ्यांच्या चराईचा प्रश्न आहे. शासनातील सगळे चरून राहिले आहेत आणि या शेळ्या-मेंढ्यांना मात्र आपण चराईसाठी जागा देत नाही. सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये याच आशयाची लक्षवेधी सूचना आम्ही दिली होती आणि त्यावर दिलेले जे निवेदन आहे, जे उत्तर आहे तेच उत्तर, तेच निवेदन, अगदी सेम टू सेम, काना-मात्रेचाही फरक नाही अशा स्वरूपात या लक्षवेधी सुचनेवर आम्हाला देण्यात आलेले आहे. हे काय सरकार आहे काय ? सभापती महोदय, वाटल्यास मी मागील अधिवेशनातील निवेदन आणि आताचे निवेदन ही दोन्ही मी आपल्या अवलोकनार्थ आपल्याकडे देतो. आपणच ते पाहून घ्यावे. ( माननीय उपसभापतींकडे दोन्ही निवेदनाच्या प्रती दिल्या जातात. ) येथे बाकी सगळे चरून राहिले आहेत. मात्र या लक्षवेधी सूचनेकडे मात्र सरकारने लक्षच दिलेले नाही. सरकारपक्षाचे मंत्री आम्हाला शेळ्या-मेंढ्या समजतात का ? दोन अधिवेशनातील दोन लक्षवेधी सूचना असताना त्यावर एकच उत्तर देत आहेत, हे कसे काय ?

**उपसभापती** : ही बाब गंभीर आहे. लक्षवेधी सूचना तीच आहे आणि उत्तरदेखील तेच ते आहे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवतो आणि या लक्षवेधी सूचनेवर सुधारित उत्तर सरकारकडून उद्या देण्यात यावे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधात मागील वेळेस जी लक्षवेधी सूचना विचारली होती, तेव्हा चराई कुरणांचे हे काम महसूल विभागाकडे होते. त्यानंतर ते आता आमच्या वन विभागाकडे आलेले आहे. त्यानंतर ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा कोणता न्याय आहे ? मागील अधिवेशनामध्ये दिलेले छापील उत्तर याही अधिवेशनामध्ये जसेच्या तसे सरकार देत आहेत, हे कसे काय आम्ही स्वीकारायचे ? हे सरकार कॉपी मास्टर झालेले आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे खरे आहे की, हे काम यापूर्वी आमच्या वन खात्याकडे नव्हते. यामध्ये आपण 3 विभाग नेमलेले आहेत. त्यांच्याकडे हे काम दिलेले आहे. या संदर्भात काल जेव्हा ही लक्षवेधी सूचना लागली तेव्हापासून मी स्वत: संबंधित अधिकाऱ्यांच्या तीन बैठका घेतलेल्या आहेत आणि या विषयावर उत्तर जसेच्या तसे दिलेले असले तरी शेवटी प्रश्नाला

...... 3जे 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न्याय मिळाला पाहिजे याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. धनगर समाजाचे लोक कमी शिकलेले आहेत ...

श्री. नितीन गडकरी : पण मागील अधिवेशनामध्ये दिलेले उत्तर जसेच्या तसे आपण येथे कसे काय दिले ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना जशी असेल तसेच उत्तर येणार, त्यामध्ये वेगळेपणा तो काय येणार ? या ठिकाणी आपण लक्षवेधी सूचनेमध्ये आपण म्हटलेले आहे की, शासनाने राज्यात चराई जमाबंदी करण्यासाठी दिनांक 21 डिसेंबर 2003 व दिनांक 21 नोव्हेंबर 2005 रोजीच्या शासन निर्णयान्वये चराई जमाबंदी अधिकारी नियुक्त केला असणे, सदर अधिकारी स्वत:चे काम सांभाळून जमाबंदीचे काम वेळ मिळेल तेव्हा करीत असणे, शासन निर्णय निघून 3 वर्षे होऊनदेखील अद्यापपर्यंत फक्त वन विभागाचे दोनच अहवाल सादर होणे. अशाच गतीने काम होत राहिल्यास संपूर्ण राज्याचा जमाबंदी अहवाल तयार होण्यास आणखी 15 वर्षे लागण्याची शक्यता असणे, ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी आपण लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर सन्माननीय सदय श्री.नितीन गडकरी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मागील अधिवेशनामध्ये पुकारलेल्या लक्षवेधी सूचनेवर दिलेले निवेदन आणि आता सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन एकच आहे, त्यामध्ये काडीमात्र फरक नाही, कोणताही बदल झालेला नाही. हे त्यांनी हरकतीच्या मुद्यातून दाखवून दिले आहे. त्यावर आपण निदेश दिला की, ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवतो आणि उद्या सुधारित उत्तरासह ही लक्षवेधी सूचना घेतली जाईल. सभापती महोदय, एक तर आपण सन्माननीय सदयांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर निर्णय दिल्यानंतर मंत्री महोदय कसे काय बोलतात ? सभागृहाचे कामकाज हे नियमानुसार चालले पाहिजे. आपण निर्णय दिलेला आहे, त्यावर कोणालाही बोलता येणार नाही.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेता यांनी जो मुद्दा येथे मांडला आहे तो बरोबर आहे. पण मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारली होती. संबंधित सदस्य उभे देखील राहिले होते.

........ 3जे 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण तरीही पुन्हा सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांनी आग्रहाने प्रश्न विचारून त्यावर मंत्र्यांचे उत्तर झालेले आहेच ना ? तेव्हा सभागृहामध्ये अशा गोष्टी होतच असतात. हे आपण समजून घ्यावे. दुसरे असे की, मंत्री महोदयांना बोलण्याची परवानगी मी दिली होती.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना जी मांडली जाते, त्यामध्ये ज्या प्रकारचा विषय वा प्रश्न असेल त्याचप्रकारचे उत्तर येणार. त्यापेक्षा वेगळे उत्तर येऊ शकत नाही. लक्षवेधी सुचनेमध्ये बदल असेल तर उत्तरातदेखील बदल येईल. तेव्हा सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपल्याला अपेक्षित असे जे उत्तर पाहिजे ते देण्यास मी तयार आहे, आपण त्यासाठी उपप्रश्न तर विचारले पाहिजेत.

( यानंतर श्री. सरफरे .....3के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे अधिवेशन तीन महिन्यानंतर येते. पहिल्या अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन दिले जाते तेच निवेदन पुढील अधिवेशनामध्ये देखील दिले जाते. त्या निवेदनाच्या वाक्य रचनेमध्ये काना-मात्रा-वेलांटीचा सुध्दा फरक केला जात नाही ही प्रथा बरोबर आहे काय? मंत्रिमहोदयांनी मागील अधिवेशनामध्ये जे उत्तर दिले होते तेच या अधिवेशनामध्ये छापून दिले आहे. म्हणजे सहा महिन्याच्या काळात यामध्ये काहीच बदल झालेला नाही काय? असे जर असेल तर मंत्रिमहोदयांचे वागणे बरोबर आहे काय? हे सरकार गंभीर आहे काय?

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एखाद्या माननीय सदस्यांनी मागील अधिवेशनामध्ये विचारलेल्या लक्षवेधी सूचनेचा मसूदा जर सारखाच असेल तर त्या लक्षवेधीसूचनेवरील निवेदनही तसेच येणार. त्या निवेदनामध्ये फरक कसा काय होईल?

श्री.नितीन गडकरी : मागील अधिवेशनामध्ये विचारलेल्या आणि या अधिवेशनामध्ये विचारलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये फरक आहे....

श्री. विनोद तावडे : मागील अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेली लक्षवेधी जर आपणाकडे असेल तर ती आपण सादर करा...

श्री. भास्कर जाधव : मागील सहा महिन्यामध्ये एकाच विषयावर दुसऱ्यांदा लक्षवेधी सूचना विचारली असेल तर नियमाप्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीमध्ये त्याच विषयावरील दुसरी लक्षवेधी सूचना कशी विचारता येईल?

**उपसभापती** : कोणती लक्षवेधी सूचना स्वीकारावी आणि कोणती लक्षवेधी सूचना स्वीकारु नये याबाबतचा अधिकार पूर्णपणे पिठासीन अधिकाऱ्यांचा आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य असे म्हणाले की, मला अधिकाऱ्यांपेक्षा जास्त चांगले समजते...

श्री भास्कर जाधव : तुम्ही असे काही करु नका, मी असे काहीही बोललो नाही...

**उपसभापती** : मंत्रिमहोदय, माननीय सदस्यांकडून देण्यात आलेल्या दोन्ही लक्षवेधी सूचनांमधील मसूदा निश्चितपणे वेगळा आहे. कदाचित त्यामधील प्रश्न तोच असेल. मागील वेळी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये त्यांना न्याय मिळाला नसेल. परंतु एक गोष्ट निश्चित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

आहे की, सहा महिन्यापूर्वी जे उत्तर देण्यात आले होते तेच उत्तर आज देण्यात आले आहे. आपण एक बाब लक्षात घ्यावी की, सहा महिन्याच्या कालावधीत यामध्ये काही बदल झाला नसेल तर हे सरकार निष्क्रिय समजावयाचे काय? माननीय सदस्यांकडून लक्षवेधी सूचना देण्यात आल्यानंतर त्याच आशयाचे उत्तर दिले जात असेल तर यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा घडला असेल, या कामामध्ये ते कुठेतरी कमी पडत असतील. त्यामुळे या अधिकाऱ्यांनी मागील निवेदनाच्या परिच्छेदामध्ये आणि वाक्यरचनेमध्ये काहीही बदल न करता जसेच्या तसे निवेदन पाठवून दिले आहे. याबाबतीत माननीय सदस्यांचा राग आपणावर नाही. आपल्या हाताखाली जे अधिकारी काम करतात त्यांनी या गोष्टी तपासून पाहिल्या पाहिजेत. सहा महिन्यापूर्वी अशाप्रकारची लक्षवेधी सूचना देण्यात आली असेल तर त्यावर निवेदन करतांना आपल्याला वाक्यरचनेमध्ये काहीतरी बदल करता आला असता. त्यामुळे मला स्वत:ला याबाबतीत जाणवले आहे की, हे निवेदन अत्यंत अयोग्य आहे. फार तर ज्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारचे निवेदन तयार करुन दिले आहे त्यांना आपण जाब विचारु असे म्हणू शकता.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय मला मान्य आहे. या संदर्भात अधिक बोलणे बरोबर नाही. ज्या माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना विचारली आहे त्यांना मी बोलावून घेऊन या संदर्भातील त्यांच्या अपेक्षा आपण पूर्ण करु शकतो. याचे कारण यामध्ये अत्यंत छोटया घटकाला न्याय मिळाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. आणि जो न्याय मिळत नसेल तर त्या संबंधी संबंधितांवर कारवाई करणार काय? असा जर माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यास कारवाई करण्यात येईल. याबाबतीत कुणालाही पाठीशी घालावयाचे नाही.माननीय सदस्यांच्या अडचणी सोडविण्यास मी तयार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये या लक्षवेधी सूचनेच्या वेळी झालेल्या चर्चेचे प्रोसेडींग माझ्याकडे आहे. त्यावेळी आपण "विचार करु" असे सांगितले होते. तुम्ही या सभागृहामध्ये मागील वेळी दिलेल्या उत्तरावर तुमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी पूर्णपणे बोळा फिरविला आहे. त्यानंतर त्यांनी काहीही कारवाई केली नाही. त्यांनी तुमची दिशाभूल केली आहे. म्हणून त्याकरीता हे निवेदन दुरुस्त केले पाहिजे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : मागील वेळी जे उत्तर दिले ते रेकॉर्डवर आहे...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारले तर त्यावर मी उत्तर देण्यास तयार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यावेळच्या लक्षवेधीवर चर्चा झाली, आश्वासन दिले त्या संबंधातील सगळा रेफरन्स बाजूला ठेवला आणि त्यावेळचे जे निवेदन होते ते तसेच निवेदन येथे दिलेले आहे. या विषावर सभागृह गंभीर आहे. हे सगळे खपून जाईल असे अधिकाऱ्यांना वाटते काय ?

श्री.बबनराव पाचपुते : या लक्षवेधीच्या संबंधात सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारला आणि त्याला उत्तर दिले नाही तर मग बोलता येईल. सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय आपण याबाबत निर्णय दिलेला आहे.

**उपसभापती** : एक गोष्ट खरी आहे की, अधिकाऱ्यांनी त्यावेळेस निवेदनामध्ये जे उत्तर दिलेले होते, तेच उत्तर दिलेले आहे. ही त्या अधिकाऱ्यांची चूक आहे.

श्री.बबनराव पाचपुते : त्या अधिकाऱ्यांच्याबाबतीत काय करायचे हे मी पहातो. सभापती महोदय सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारावेत.

श्री.नितीन गडकरी : तेच उत्तर अधिकाऱ्यांनी छापून दिले. त्यावेळेस जे आश्वासन दिलेले होते ते रेकॉर्डवर आहे. त्याचा संदर्भ या निवेदनामध्ये नाही. ही गंभीर बाब आहे. त्यावेळेस या लक्षवेधीच्या संबंधात काय चर्चा झालेली होती, त्याच्या आधारे निवेदन केलेले नाही ही गंभीर बाब आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांना बोलावून सांगितले की, अशाप्रकारचे निवेदन आहे त्यावर आपण उपप्रश्न विचारा. ज्यांनी या सबंधाने काम केलेले नाही, त्यांच्यावर ॲक्शन घेतली पाहिजे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारावेत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, घोड्याच्या पाठीवर उघडा संसार लादून डोंगरकपाऱ्यातून आपली कच्चीबच्ची बरोबर घेऊन, मेंढरांचे कळप घेऊन रानोमाळ भटकणाऱ्या मेंढपाळांच्या आयुष्यातील ही महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. त्यांना लक्षवेधीच्या माध्यमातून काहीतरी संरक्षण मिळावे, असा उद्देश आहे. 1968 साली केंद्र शासनाने राज्य सरकारांना आदेश काढला की, मेंढरांना चरण्यासाठी नियमित असे क्षेत्र राखून ठेवावे. त्यानंतर 1971 साली महाराष्ट्र शासनाने जी.आर.काढला की, प्रत्येक वेळेला मेंढपाळांकडून मेंढरांना चरण्यासाठी 1 रुपया आकारून त्यांना पास द्यावा. हे आदेश अधिकाऱ्यांनी पायदळी तुडविले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरू.......

त्यानंतर महाराष्ट्र सरकारने दुसरा 1995 मध्ये जी.आर. काढला की, एक रूपया घेऊ नये. त्या अधिकाऱ्यांनी असा अर्थ काढला की, एक रुपया त्यांच्याकडून घ्यायचा नाही, याचा अर्थ मेंढरांना चरू द्यायचे नाही. खरे तर 1995 च्या आदेशाप्रमाणे एक रुपया घ्यायचा नाही पण मेंढरांना तसेच चरायला द्यायचे. तो निर्णयही अधिकाऱ्यांनी पायदळी तुडविला. त्यानंतर 2003 साली शासनाने जी.आर.काढून मेंढरांना चरण्यासाठी क्षेत्र निश्चित करून सहा महिन्याच्या आत मेंढपाळांना तशी परवानगी द्यावी. तोही आदेश पायदळी तुडविला. त्यानंतर 2005 मध्ये सबंध वन क्षेत्राच्या संबंधात आदेश दिला की, सहा महिन्याच्या आत चराईबंदीच्या आदेशामध्ये सुधारणा करा. पण त्या आदेशाचे पालन केले नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

40 वर्षे या गरीब समाजाची अवहेलना झालेली आहे. त्यांच्या तीन पिढ्या उद्ध्वस्त झालेल्या आहेत. मेंढपाळ समाज उद्ध्वस्त झालेला आहे. असे असताना हे मुजोर अधिकारी त्या समाजाला न्याय देण्यास तयार नाही. शासनाने 1971 साली, 1995 साली, 2003 साली तसेच 2005 साली जे आदेश काढले त्या आदेशांची अंमलबजावणी येत्या एक महिन्याच्या आत करण्यास अधिकाऱ्यांना भाग पाडणार काय ? ज्या अधिकाऱ्यांनी ही दिरंगाई केलेली आहे त्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी त्यांचे स्वागत करतो. मागच्या अधिवेशनात माननीय मंत्रिमहोदयांनी आदेश काढले. यासंदर्भात दोन आदेश निघाले. माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले. मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो. या फॉरेस्ट खात्याचे जे अधिकारी आहेत ते ज्याप्रकारे तुम्ही भजन कीर्तन करता त्या पध्दतीने ऐकणाऱ्यांपैकी नाहीत. तुम्ही पैलवान आहात. सध्या भजन कीर्तन करणारे असा तुमचा परिचय जास्त आहे. तुमचा पैलवान म्हणून परिचय होऊ द्या. तुमच्या मनगटाची ताकद दिसू द्या. तुम्ही सांगितल्यानंतरही त्या गरिबांच्या मेंढ्यांना चरावयास कुरणे उपलब्ध करुन दिली नाहीत. आपण दोन वेळा आदेश दिले त्याचे पालन केले नाही. आपण जो अहवाल मागितला तो दिला नाही. या अधिकाऱ्यांनी मागच्या वेळचे उत्तर केराच्या टोपलीत फेकले आणि जुने उत्तर छापून दिले. त्यांना असे वाटले की, विधान परिषदेमध्ये एवढे कोण पाहणार आहे ? आम्ही या ठिकाणी जुने रेकॉर्ड आणून चेक करु असे त्यांना वाटले नाही. ते आमच्या लक्षात आले. हे फॉरेस्टचे अधिकारी केवळ आमचीच फसवणूक करीत नाहीत तर ते माननीय मंत्रिमहोदयांचीही फसवणूक करीत आहेत. या प्रकरणामध्ये त्यांनी फसवणूक केलेली आहे. आपण आदेश दिल्यानंतर ज्यांनी ते आदेश पाळले नाहीत त्या अधिकाऱ्यांवर आपण शिस्तभंगाची कठोर कारवाई करुन त्याचा अहवाल सभागृहासमोर केव्हा ठेवणार ? मेंढरांना फॉरेस्टमध्ये चरण्याकरिता किती दिवसात 1 रुपयाचे पासेस किंवा जे काही असेल त्याप्रमाणे पासेस देणार ? ही परवानगी अमूक तारखेपासून लागू होईल अशी स्पष्ट घोषणा करणार काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यातील बऱ्याच गोष्टी खऱ्या आहेत. मी जरी या खात्याचा मंत्री असलो तरी ही बाब सकाळी माझ्या लक्षात आली आणि तोपर्यंत सर्क्युलेशन झालेले होते. त्यानंतर पुन्हा बैठक झाली. 1971 चा कायदा आहे. त्यामध्ये 23 डिसेंबर, 2003 मध्ये बदल झाला आणि ही बाब महसूल विभागाकडून काढून वन अधिकाऱ्यांकडे द्यावयाची असे ठरले. पूर्व मेळघाट, पश्चिम मेळघाट, परतवाडा येथील सहाय्य वनरक्षक यांच्याकडे काम दिले. त्यांना काम देत असताना त्यांचे नियमित काम त्यांच्याकडे ठेवून हे जादाचे काम त्यांना दिले होते. हे काम आमच्याकडे नाही असा त्यांचा समज झाला. त्यासंदर्भात मी सूचना दिलेल्या आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे एकूण चराईचे वन विभाग 45 आहेत. यामध्ये सगळ्या राज्याच्या बाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट खरी आहे की, वनाचे क्षेत्र आणि प्रत्यक्ष जनावरांची संख्या यामधील संतुलन बरेच बिघडलेले आहे. जनावरांच्या चरण्यासाठी जी जागा पाहिजे ती एक जनावर एक युनिट किंवा एक नांगर एक युनिट असे धरले तरी जे क्षेत्र उपलब्ध आहे त्यामध्ये आपल्याकडे या घटकांसाठी 2 लाख 23 हजार 570 हेक्टर क्षेत्र चराईसाठी लागेल आणि आपल्याकडे फक्त 51,897 हेक्टर जमीन आहे. त्यामध्ये आपण सर्वांना पासेस देऊ शकत नाही. हा विषय घेण्याच्या आधी ही बाब माझ्याही लक्षात आली. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत म्हणजे 30 जानेवारीपर्यंत हे पासेस देण्याची व्यवस्था करु. ज्या अधिकाऱ्यांनी कुचराई केलेली आहे, ज्यांनी काम केलेले नाही त्यांची उच्च अधिकाऱ्यांकडून, ॲडिशन पी.सी.एफ. कडून चौकशी करु. ज्यांनी हलगर्जीपणा दाखविला असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करु. यामध्ये कोणालाही माफ केले जाणार नाही. जे क्षेत्र राखून ठेवावयाचे आहे ते सुध्दा डिक्लेअर करण्यात येईल.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 1995 सालापासून या संदर्भात शासनाने दोन-तीन वेळा जी.आर. काढेलेले असून देखील मेंढपाळांना पासेस मिळालेले नाहीत. "अ" वर्ग, "ब" वर्ग आणि "क" वर्ग असे वनक्षेत्राचे भाग करण्यात आलेले आहेत. मेंढपाळांनी "क" वर्ग क्षेत्रामध्ये मेंढया चरण्यासंबंधी पासेस मागितले होते. "क" वर्गाचे पासेस न मिळाल्यामुळे काही मेंढपाळांनी जबरदस्तीने तेथे मेंढया चरण्यासाठी नेल्या. त्याचा परिणाम असा झाला की. त्या मेंढपाळांच्या मेंढया हरास करुन मेंढपाळांवर केसेस दाखल करण्यात आल्या. वन विभागाच्या अधिका-यांनी आमच्या बुलढाणा जिल्हातील खामगाव तालुक्यातील नांद्री गावातील 415, संग्रामपूर तालुक्यातील 90, खामगांव तालुक्यातील कंबेफळ गावातील 95 आणि मोताळा तालुक्यातील तरोडा गावातील 44 मेंढया जप्त करुन त्या हरास केल्या आणि मेंढपाळांवर केसेस दाखल केल्या. त्यांना "क" वर्गाचे पासेस न दिल्यामुळे आणि त्यांच्या मेंढ्या हरास केल्यामुळे त्यांच्यावर उपाशी मरण्याची वेळ आलेली आहे. पासेस न देण्याचा दुसरा एक परिणाम असा झाला की, आता मेंढपाळ शेतक-यांच्या शेतामध्ये मेंढ्या चारतात त्यामुळे गावोगावी दंगली होत आहेत. शेतक-यांचे पीक नष्ट होत आहे. एक विषय सुटत नाही तोच दुसरा प्रश्न निर्माण होतोय. हिवरखेड गावामध्ये धनगर आणि गावकरी यांच्यामध्ये दंगली झाल्या. अनेक लोक जेलमध्ये आहेत. त्यांना अजून जामीन मिळालेला नाही. ज्या वन विभागातील अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे हे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्या अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? पासेस न मिळाल्यामुळे बुलढाणा जिल्हयातील ज्या मेंढपाळावर केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत त्यांच्यावरील केसेस मागे घेण्यात येतील काय? आणि ज्यांच्या मेंढ्या हरास केलेल्या आहेत त्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : याबाबतीत दिरंगाई झालेली आहे. 23 डिसेंबर 2003ला जी.आर.काढून कामे वाटून दिलेली आहे. वन चराईचे क्षेत्र ठरविणे, बंदिस्त क्षेत्राची नागरिकांना माहिती देणे अशा प्रकारची कामे वाटून दिलेली आहेत. हे एवढे साधे आणि सोपे काम नाही. चार बैल म्हणजे एक युनिट समजले जाते. बैलांना चरण्यासाठी फ्री पासेस दिले जातात. त्यानंतर दुभत्या जनावरांना पासेस दिले जातात आणि त्यानंतर मेंढयासाठी पासेस दिले जातात.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : मेंढी हे दुभते जनावर आहे असे आपण समजत नाही काय ?

श्री. बबनराव पाचपुते : वन संरक्षक कायद्यामध्ये ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यासंदर्भातच मी सांगत आहे. या कायद्याप्रमाणेच आपणाला निर्णय घ्यावे लागतील. तरी देखील तीन महिन्याच्या ऐवजी एक महिन्यामध्ये चौकशी केली जाईल. 30 जानेवारी ही शेवटची तारीख असेल की, त्या तारखेला कोणत्या जनावराना चरण्यासाठी कोणते क्षेत्र निश्चित केलेले आहे ते ठरवून त्यानुसार पासेस देण्याची व्यवस्था केली जाईल.

... श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

14-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3O.1

SGB/ D/ KTG/ MHM/ 16:30

श्री.बबनराव पाचपुते........ लक्षवेधी सूचना क्र.8....

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चार प्रश्न विचारले आहेत. पास नसताना जनावरे चरण्यासाठी गेली हा गुन्हा झाला. तरी सुध्दा या लोकांचा सहानुभूतीने विचार करुन केसेस मागे घेण्याच्या संदर्भात विधी व न्याय विभागाशी चर्चा करावी लागेल. खात्याच्या वतीने आपल्या बाजूने विशेषत: धनगर समाजाच्या बाजूने भूमिका घेऊ. ज्या अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला आहे त्यांच्यावर कडक कारवाई करु.

प्रा.फौजिया खान : माननीय सभापति महोदय, यहां पर पास देने की बात हो रही है. यह एक सेंसिटिव मुद्दा है. इसलिए इसको कंसीडर करना जरुरी है. जहां तक गांव के जानवरों का सवाल है, माननीय मंत्री महोदय ने कहा कि क्षेत्र कम है और जानवर ज्यादा हैं. लेकिन मैं बताना चाहूंगी कि हमारे राज्य में मेंढी दूसरे राज्यों से भी आती हैं और अच्छे पैसे वाले लोग भी जानवरों को यहां पर चरने के लिए छोड़ देते हैं. वे न सिर्फ वहां पर जानवरों को चरने के लिए छोड़ते हैं बल्कि वन सम्पति का भी नुकसान करते हैं. उनको लकड़ी की जरुरत होती है इसलिए वे लोग वन सम्पत्ति को काटते हैं

सभापति महोदय, सलमान खान ने एक हिरण को मार दिया इसलिए उसको सजा हो गयी. मैं बताना चाहूंगी कि जानवर खत्म होने का मुख्य कारण उनकी रहने की जगह खत्म होना है. इसलिए इस बात पर हमें गंभीरता से सोचने की जरुरत है. इसके अलावा एक फॉडर प्लान बनाने की भी जरुरत है. एक बात यह भी हमें देखनी चाहिए कि जंगलों में आग लगने से भी जंगल की अच्छी घास जल जाती है. जंगल की घास न जले, घास को जलने से रोकने के लिए कोई उचित यंत्रणा सरकार के पास नहीं है. इसलिए हमें स्टाल फीडिंग का विचार भी करना चाहिए ताकि हम जानवरों को गांव में ही रख सकें और उनको वहीं पर चारा दे सकें.

माननीय अध्यक्ष महोदय, एक और बात का जिक्र मैं यहां पर करना चाहूंगी कि फारेस्ट डिपार्टमेंट के जिन अधिकारियों के पास गाड़ी होनी चाहिए, उनके पास गाड़ी नहीं हैं बल्कि जो लोग आफिस में बैठकर काम करते हैं, उन अधिकारियों के पास गाड़ी हैं. मेरा कहना है कि जो फील्ड आफिसर हैं या जो एक्जिक्युटिव स्टाफ है या जो आर.एफ.ओ. लेवल के अधिकारी हैं उनको गाड़ी देनी चाहिए या जो आफिस की गाड़ी हैं उनका इस्तेमाल करने की परमीशन.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजीया खान....

एक्जिक्युटिव स्टाफ को देनी चाहिए, तभी इस विभाग का काम अच्छी तरह से हो सकेगा.इस बारे में मंत्री महोदय, उत्तर देंगे, ऐसी मेरी विनती है.

श्री बवनराव पाचपुते : माननीय सभापति महोदय, पहले प्रश्न का उत्तर मैं यहां पर सॅजेशन फार एक्शन देना चाहूंगा और दूसरे प्रश्न का उत्तर मैं देना चाहूंगा कि सब अधिकारियों को गाड़ी देने के लिए हमारे विभाग के पास पैसा नहीं है. हां, जब्त की हुई जो गाड़ियां हैं, बोर्ड् की परमीशन लेकर उन गाड़ियों को इस्तेमाल करने का सुझाव जरुर हमारे सामने है.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी सन्माननीय वनमंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात त्यांना एवढा विश्वास आहे आणि त्यामुळे ...........

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पार्टीच्या अध्यक्षांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षांना गाड्या दिल्या. आमदारांचे पती सरकारी अधिकारी असूनही त्यांना गाडी देत नाहीत हे बरोबर नाही. पार्टीच्या जिल्हा कार्यकर्त्यांना गाडी देता, आमदारांच्या पतीला का देत नाही?

श्री.बबनराव पाचपुते : विचार करु.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय वन मंत्र्यांनी अधिका-यांच्या संदर्भात जी भूमिका मांडलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

प्रा. फौजीया खान : माननीय सभापति महोदय, माननीय सदस्य श्री गडकरी साहब ने यहां पर मेरे बारे में जो हेतु आरोप किया है, वह आरोप हाऊस की प्रोसिडिंग से निकाल देना चाहिए.

श्री नितीन गडकरी : माननीय सभापति महोदय, मैंने तो माननीय सदस्या की बाजू यहां पर रखी है. यदि मेरी बात गलत है तो जरुर रिकार्ड से निकाल दीजिए. मेरी कोई भी बात गलत नहीं है क्योंकि माननीय सदस्या के पति फॉरेस्ट डिपार्टमेंट में आफिसर हैं. दूसरी बात यह कि सरकार ने उनको गाड़ी नहीं दी है तीसरी बात यह कि कांग्रेस पार्टी के अध्यक्षों के पास गाड़ी है और माननीय सदस्या के पास गाड़ी नहीं है, इसमें से कोई भी बात झूठ नहीं है. इसलिए मेरी बात रिकार्ड से निकालने की जरुरत नहीं है.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणत असत की, "घोडयावर बसणा-या घोडेस्वाराची आपल्या घोडयावर पकड असली पाहिजे." या राज्यामध्ये आयपीएस अधिकारी मोठा की, आयएएस अधिकारी मोठा असा वाद चालला आहे. वन खात्याच्या कायद्यानुसार आयएफएस मोठा की, तुमच्या खात्याचा सेक्रेटरी मोठा असा वाद चालू आहे. या वादामुळेच सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांना या ठिकाणी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी लागली आहे. या विषयाच्या संदर्भात अगोदरच 2-4 जी.आर. निघालेले असतांना सुध्दा त्याची अजूनपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. जर जी.आर. निघून अंमलबजावणी होत नसेल तर तुम्ही या ठिकाणी कितीही स्पष्टीकरण दिले तर त्याचा उपयोग होणार नाही. खरे म्हणजे तुमच्या अधिका-यावर तुमचा धाक असला पाहिजे. यासंदर्भात 2-4 जी.आर. निघून जर त्याची अंमलबजावणी होत नसेल तर त्याची जबाबदारी कोणाची? त्यामुळे यासंदर्भातील जबाबदारी तुम्हाला घ्यावीच लागेल. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर सावंतवाडीत एक "वळणाचे" काम होते. हे काम बांधकाम खात्याने करण्याचे ठरविले. या कामासाठी ठेकेदारही नेमला गेला होता. हे काम करण्यासाठी ठेकेदार सर्व यंत्रसामुग्री घेऊन त्या ठिकाणी गेला असता त्या ठिकाणी तुमच्या फॉरेस्टच्या अधिका-यानी अडचण सांगून, नियम सांगून हे काम बंद पाडले जर बांधकाम आणि फॉरेस्टच्या खात्यामध्ये समन्वय नसेल तर कामे कशी होणार? त्यावेळेस मी फॉरेस्ट अधिका-याला सांगितले की, आपण हे "वळणाचे" काम बंद पाडू नका, आपले अशा प्रकारे

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी

वागणे योग्य नाही. त्यावेळी हा अधिका-याने माझी तक्रार तुमच्याकडे केली आणि सांगितले की, गुरुनाथ कुलकर्णी यांनी मला धमकी दिली. त्यामुळे यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, तुमच्व्या खात्यातील अधिका-यावर तुमची कमांड असली पाहिजे, अधिका-यांना धाक असला पाहिजे. त्यामुळे यासंदर्भात जे जी.आर. काढण्यात आलेले आहेत त्या जी.आर.ची अंमलबजावणी आपण दिलेल्या मुदतीत करणार आहात काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे माझे चांगले मित्र आहेत. त्यांचा अनुभव माझ्यापेक्षा फार मोठा आहे. त्यांची आक्रमकता, त्यांची काम करण्याची शैली, त्यांची मानसिकता याची मला पूर्ण जाणीव आहे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे वरुन नारळासारखे दिसत असले तर ते आतून फणसाच्या गरासारखे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे साहेबांकडे मेंढया आहेत की, नाहीत याची मला माहिती नाही, परंतु माझ्याकडे गाई बरोबर मेंढया सुध्दा आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले आहे की, तुमची अधिका-यावर कमांड असली पाहिजे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, माझ्या खात्यावर माझी चांगल्या प्रकारे कमांड आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये एकूण 56 टक्के वन आहे. तसेच नागपूरमध्ये सिव्हील कार्यालय सुध्दा सुरु करण्यात आलेले आहे. मी या ठिकाणी वर्षातून एकूण 44 बैठका घेतलेल्या आहेत. या ठिकाणी दर महिन्याला बैठकाही मी घेत असतो.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार )**

श्री.बबनराव पाचपुते.........

त्या मिटींगचे प्रोसिडींग झालेले आहे त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी देखील झालेली आहे. वन विभागाच्या संदर्भात सांगू इच्छितो की, कोणतीही जमीन कोणत्याही कारणासाठी घ्यावयाची असल्यास त्यासाठी प्रथम फॉरेस्ट कान्झर्व्हेटीव्ह ॲक्टची परवानगी घ्यावी लागते. आता आम्ही कितीतरी जमिनी मोकळ्या केलेल्या आहेत. प्रस्ताव न देता कोणतेही काम सुरु केले असेल आणि त्यास वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी हरकत घेतली असेल तर त्यांनी ती चूक केलेली नाही.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे औद्योगिक वसाहतीतील एम्को पेस्टीसाईडस कंपनीमध्ये झालेली दुर्घटना .

**मु.शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे औद्योगिक वसाहतीतील एम्को पेस्टीसाईडस कंपनीमध्ये झालेली दुर्घटना यासंबंधी श्री.भास्कर जाधव ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भास्करराव जाधव ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" खेड तालुक्यात जि.रत्नागिरी लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये दिनांक 28 नोव्हेंबर, 2006 रोजी वा त्यासुमारास एम्को पेस्टीसाईडस लिमिटेड कंपनीमध्ये गंजलेला रिॲक्टर कोसळून झालेली दुर्घटना, औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक कंपन्यामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी न घेतल्यामुळे वारंवार स्फोट होऊन जिवित व वित्त हानी होण्याची सुरु असलेले प्रकार, रासायनिक कंपनीने तसेच प्रदुषण महामंडळाने काळजी व सावधानता न घेणे, परिणामी तेथील कामगारांत व नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, अशाच दुर्घटना होत राहिल्यास लोटे, औद्योगिक परिसरात भोपाळ येथे झालेल्या दुर्घटनेसारखी दुर्घटना होण्याचा निर्माण झालेला धोका, हे स्फोट व दुर्घटना होऊ नयेत यासाठी कंपनीच्या चालकांनी व शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री.रविशेठ पाटील ( पर्यावरण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (डॉ.वसंत पवार )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्करराव जाधव : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, केवळ एम्को पेस्टीसाईडस् लिमिटेड कंपनीविरुध्द लक्षवेधी सूचना आणावी असा माझा हेतू नाही. रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यात लोटे औद्योगिक वसाहत आहे. त्याठिकाणी रासायनिक कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये वारंवार दुर्घटना होतात. कधी गॅस लिकेज होतो तर कधी स्फोट होऊन आग लागते, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होती. रासायनिक कंपन्यातील पाणी नदीत सोडल्यामुळे नदीतील पाणी दूषित होते. त्यामुळे नदीतील मासे मरतात. लोटे औद्योगिक वसाहतीमध्ये कलर केमिकल्स इंडस्ट्री, फिल्ड्रा केमिकल्स, एम्को पेस्टीसाईडस् इत्यादी अनेक कंपन्या आहेत. या कंपन्यातील दूषित पाण्यामुळे गेल्या दोन-तीन महिन्यांत मोठ्या प्रमाणावर मासेमारी झालेली आहे. या कंपन्यातील घनकचऱ्याची तळोदा येथे विल्हेवाट लावावयास पाहिजे,परंतु तसे होताना दिसत नाही. दूषित पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या मासेमारीला आळा बसण्याकरिता शासनाने ईटीपी प्लान्ट सुरु केलेले आहे, परंतु त्याठिकाणी दूषित पाणी सोडले जात नाही. त्यामुळे काही कंपन्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाने टाळे देखील लावलेले आहे. कंपन्यांची डिपॉझिटसुध्दा जप्त केलेली आहेत. सभापती महोदय, अधिवेशन जवळ आले की, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कंपन्यांवर कार्यवाही होती. एकदा अधिवेशन संपले की, कार्यवाही थांबते. सभापती महोदय, कारखाना अधिनियम 1978 च्या कलम 7 (2) (अ), महाराष्ट्र कारखाने ॲक्ट 1963 नियम 73 फॉलो केलेला आहे. या नियमांन्वये या कंपन्याविरुध्द कारवाई करण्यात येणार का ? त्याप्रमाणे दूषित पाण्यामुळे मासेमारींचे नुकसान होते त्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ? त्याठिकाणी श्री.फुलारे नावाचे अधिकारी चांगल्या प्रकारे नियंत्रण करीत होते. त्यांची तेथून बदली करण्यात आलेली आहे. तेव्हा त्याठिकाणी एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करुन तेथील शेतकरी आणि मासे व्यवसाय करणाऱ्यांचे शासन संरक्षण करणार आहे काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, एम्को पेस्टीसाईड कंपनीत प्लॅन्टमधील दुसऱ्या मजल्यावरील रिॲक्टर फ्लोरिंग सपोर्टसह पडल्यामुळे दुर्घटना झालेली आहे. दिनांक 17..11.2006 रोजी कंपनी बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याठिकाणी सी.ई.टी. प्लॅन्ट सुरु केलेला आहे. गाळ देखील काढण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर दुर्घटना घडत आहेत. त्याबाबत ताबडतोब ॲक्शन घेण्यात येऊन सदर कंपनी बंद करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्करराव जाधव : सभापती महोदय, लोटे परशुराम परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वसाहत आहे. त्याठिकाणी अनेक प्रकारच्या कंपन्या आहेत. त्याठिकाणी किती कंपन्यामध्ये अशाप्रकारचे स्फोट झालेले आहेत अशा प्रश्नाला आपणाकडून उत्तर येते की, या संदर्भात चौकशी करण्यात येईल. कारखाना बंद केलेला आहे. माझा प्रश्न आहे की, अशाप्रकारच्या दुर्घटनांमध्ये किती कारखाना मालकांवर खटले दाखल झालेले आहेत ? त्याठिकाणी ज्या विहिरी व तलाव आहेत त्याचे पाणी पिण्यालायक नाही याबाबत मंत्रिमहोदय खुलासा करतील काय ?

यानंतर श्री.पुरी.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, जे जे कारखाने दुषित पाणी सोडतात, त्यासंबंधीच्या मोजमापाची मानके आपल्याकडे आहेत. ज्यांनी अशाप्रकारे दुषित पाणी सोडले असेल त्यांच्यावर आपण ॲक्शन घेतो. ज्यांनी अशाप्रकारे दुषित पाणी सोडले असेल त्यांची आपण पाणी, वीज करुन त्यादृष्टीने कायदेशीर इलाज केला जातो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जरी या लक्षवेधी सूचनेमध्ये एका कंपनीचे नांव असले तरी ही लक्षवेधी सूचना केवळ एका कंपनीपुरती मर्यादित नाही तर ज्या 3-4 कारखान्यांची नांवे मी सांगितली, त्याठिकाणी मोठमोठे स्फोट झालेले आहेत. आज त्याठिकाणी सर्रास स्फोट व विषबाधा होत आहेत. त्याठिकाणी जे उप प्रादेशिक अधिकारी म्हणून श्री.फुलारे काम करीत आहेत, ते अतिशय चांगल्याप्रकारे काम करीत असताना व त्यांनी त्याठिकाणी ग्रामस्थांच्यावतीने चांगल्या प्रकारची मोहिम राबवलेली असतानाही आपण त्यांची दबावाखाली बदली केली. त्यांच्याठिकाणी आपण मुंबईच्या ऑफीसमधील खालच्या ग्रेडवाल्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. तेथील ग्रामस्थ जाऊन माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले व त्यानंतर त्यांनी याबाबतीत स्टे दिला. आपण त्याठिकाणी कोणताही अधिकारी नेमा, परंतु तो समकक्ष ग्रेडवाला असावा. याठिकाणी माझा प्रश्न असा आहे की, ज्या ज्या कंपन्यांमध्ये स्फोट झालेले आहेत, त्यांची पाहणी शासनाच्यावतीने अधिवेशन संपल्यानंतर केली जाईल का ? व यासंबंधी कारवाई करण्यात येईल का ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सूचना केल्याप्रमाणे त्यांना जो अधिकारी पाहिजे त्याप्रमाणे तो दिला जाईल. तसेच, औद्योगिक सुरक्षेच्या बाबतीत संचालकांनी जे निवेदन सादर केले, त्याप्रमाणे कारवाई करु. त्याठिकाणी संबंधित आमदार व मी स्वत: जाऊन कोणकोणते कारखाने प्रदुषण निर्माण करतात त्याबाबतीतची तपासणी करुन योग्य ती कारवाई करु.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, लोटे परशुराम परिसरामध्ये जे उद्योग आहेत, ते खास करुन केमिकल झोनचे आहेत. तेथील कंपन्यांच्या सांडपाण्यामुळे किंवा इतर गोष्टीमुळे त्या परिसरात फार मोठयाप्रमाणात प्रदुषण होऊन लोकांवर त्याचा विपरित परिणाम होत आहे, मच्छीमारीवरही त्याचा फार मोठा परिणाम होत आहे. या विषयासंबंधीची लक्षवेधी सूचना या सभागृहामध्ये वारंवार येत असून माननीय राज्य मंत्रिमहोदयांकडून पूर्वी त्यांनी जे उत्तर दिले, तेच





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

उत्तर आजही आलेले आहे. आज त्याठिकाणी अतिशय भयानक परिस्थिती असून याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. मागे याबाबतीत माननीय मंत्री, श्री.गणेश नाईक यांनी त्याठिकाणी जाऊन पाहणी करण्याचा कार्यक्रम ठरवला होता, परंतु तो नंतर झाला नाही. त्या पाहणीमध्ये कोकणातील विधान परिषदेतील सर्व सन्माननीय सदस्य व स्वत: माननीय मंत्रिमहोदय असे आम्ही पाहणी करणार होतो. आज त्या परिसरामध्ये फारच भयानक परिस्थिती आहे. त्याठिकाणी अशी पाहणी वगैरे काही ठरले की, आपले प्रदुषण खात्याचे अधिकारी त्याठिकाणी जातात, परंतु त्याठिकाणी कोणत्या भानगडी होतात, याची आपल्या सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे त्यावेळी जी पाहणी करण्याचे आपण कॅन्सल केले, त्यास आपण परवानगी द्यावी व माननीय राज्यमंत्री महोदयांनीही पाहणीच्यावेळी यावे, अशी माझी सूचना आहे.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली, ती मी मान्य करतो व हे अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब यासंबंधीची कार्यवाही केली जाईल.

---------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख.

**पृ. शी.** : अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्थायी करण्यासंबंधीची मॅग्मो संघटनेची मागणी

**मु. शी.** : अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्थायी करण्यासंबंधीची मॅग्मो संघटनेची मागणी याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (डॉ.वसंत पवार)** : मा□□य सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे ( नामनियुक्त ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवेत 6200 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे असून 3565 वैद्यकीय अधिकारी हे मागील 15 वर्षांपासून अस्थायी वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत आहेत.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते... (पुढे सुरु)

परंतु दुर्दैवाने हा विषय अन्य मार्गाने येऊ शकला नाही म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून का होईना हा विषय या ठिकाणी मी मांडतो. सरस्वती विद्यालय धोंडगाव, ता. समुद्रपुर, जि. वर्घा या या शाळेस शासनाची 1993 पासून मान्यता मिळालेली आहे. या शाळेमध्ये एक मुख्याध्यापक, तीन सहायक शिक्षक, आणि एक क्लर्क, तीन शिपाई, लॅब असिस्टंट अशाप्रकारे कर्मचारी वर्ग काम करीत आहे. 1993 साली ही शाळा विनाअनुदानीत होती. शासनाच्या निकषानुसार ही शाळा अनुदानास पात्र ठरली. 2000-2001 पासून या शाळेस अनुदान मिळण्यास सुरुवात झाली. 2005 नंतर जे कर्मचारी होते तेव्हा त्यांची सेवा 10 ते 15 वर्षे झालेली होती या शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांची संबंधित शिक्षणअधिकाऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन या सर्व कर्मचा-यांना मान्यता दिली होती. त्यांना पूर्णपणे वेतन मिळत होते. त्यानंतर 2005 मध्ये कार्यकारी मंडळ बदलले आणि कार्यकारी मंडळ बदलल्याबरोबर या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांकडे तीन-तीन लाख रुपयांची मागणी केली. परंतु संस्थेत काम करणारे कर्मचारी तीन-तीन लाख रुपये काही देऊ शकले नाहीत. त्यांनी मग शिक्षण अधिकाऱ्यांकडे तक्रार केली त्यांनी सुध्दा पैसे मागितले. त्यानंतर संस्थेमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना शिक्षण अधिकाऱ्यांनी काढून टाकण्याचे आदेश काढले. 11 ऑगस्ट, 2006 पासून हे सर्व शिक्षक बाहेर आहेत त्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी लगेच जाहीरात देण्यास परवानगी दिली आणि नवीन दहाच्या दहा कर्मचारी त्या ठिकाणी भरले आणि तातडीने त्यांना मान्यता दिली. तेरा-तेरा वर्षापासून काम करणारे कर्मचारी त्यामुळे आता बाहेर आहेत त्यांनी कुटुंबियांसह आत्महत्या करण्याची नोटीस दिलेली आहे त्यांनी मलाही पत्र दिलेले आहे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. पंधरा पंधरा वर्षे काम करुन केवळ तीन-तीन लाख रुपये संबंधीत अधिकाऱ्याला आणि संस्थाचालकांना देऊ शकलो नाही म्हणून त्या सर्वांवर उपासमारीची पाळी आली आहे. सभापती महोदय माझी आपणास एवढीच विनंती आहे की, उपरोक्त प्रकरणी मंत्री महोदयांना आदेश देऊन या कर्मचाऱ्यांचे प्राण वाचतील असे आपण पहावे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी यासंबधी लक्ष घालावे.

श्री. हसन मुश्रीफ : ही बाब मी तपासून बघतो.

3T-2...

**पृ.शी.**: कणकवली तालुक्याच्या शिरवळ व करुळ गावातील नालाबांध कामावर झालेल्या भ्रष्टाचाराबाबत.

**मु.शी.**: कणकवली तालुक्याच्या शिरवळ व करुळ गावातील नालाबांध कामावर झालेल्या भ्रष्टाचाराबाबत. श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. "कणकवली तालुक्याच्या शिरवळ गावातील गट नंबर 2 मध्ये नालाबंध कामावरील हजेरी पत्रक दिनांक 1.2.2004 ते 15.2.2004 मोजणी पुस्तक क्रमांक 82630 करुळ ता. कणकवली गट. नं.1 चा 5 माती नालाबांध कामाच्या 5.2.2004 ते 15.2.2004 मोजणी पुस्तक नं. 112335 वा हजेरीपत्रकाला असलेले बहुतांश मजूर हे एकाच नावाचे असणे, एकाच नावाच्या मजूराने एकाच दिवशी दोन गावांमध्ये काम केल्याचे दाखवून करण्यात आलेला भ्रष्टाचार, सदर काम हे गावातील लोकांच्या सहभागृहातून न होणे, या सर्व हजेरीपटाची तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तात्काळ निवेदन करावे."

कृषी विभागाच्या विभागातील भ्रष्टाचारासंबंधी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे. जिल्हापरिषदे मार्फत जिल्ह्यात नालाबांध, शेततळी अशाप्रकारची कामे करीत असताना दिनाक 5 जानेवारी 1994 रोजीच्या शासन निर्णय प्रमाणे लोक सहभागातून ग्रामपंचायती मार्फत कामे निवडण्यात येत असतात. परंतु या जिल्हयात जिल्हापरिषदेने ग्रामपंचायतींना विश्वासात न घेता शेततळी, नालाबांध या कामांना मंजूरी दिलेली आहे. असा माझा आरोप आहे जलसंधारण विभागाने आतापर्यंत नालाबांध किंवा शेततळी ही कामे करताना ग्रामपंचायतींना कधीही विश्वासात घेतलेले नाही. मी स्वतः अशाच एका कामाला भेट दिली त्यावेळी मला असे सांगण्यात आले की, या कामाला ग्रामपंचयातीच्या ग्रामसभेची मंजूरी घेण्यात आली असून सरपंचांनी या कामाला भेट दिलेली आहे. जेव्हा संबंधीत सरपंचांना भेटलो त्यावेळी मला असे समजले की, ग्रामसभेची मंजूरी घेण्यात आलेली नाही. तसेच सरपंचांनी या कामाला भेट दिलेली नाही हा विषय मी अनेक वेळा जिल्हापरिषदेच्या स्थायी समिती मध्ये मांडलेला आहे.

3T-3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषदेने चौकशी समिती नेमली होती तथापि या समितीचा अहवाल अद्याप आलेला नाही. कणकवली मधील करुळगांव आणि शिरवळ गांव या दोन गांवामधील अंतर वीस किलोमिटर आहे आणि तेथील हजेरीपट माझ्याकडे आहेत. या हजेरीपटावर असेलेले बहुतांश मजूर एकाच नावाचे आहेत व दोन ठिकाणी एकाच दिवशी दाखविलेले आहेत.

यानंतर श्री. रोझेकर.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

श्री.परशुराम उपरकर.........

अशा प्रकारे कृषि विभागामार्फत पाणलोट क्षेत्र विकासासाठी प्राप्त झालेला निधी वाया गेलेला आहे. कृषि विभागाचे अधिकारी आणि स्थानिक अधिकारी यांची जर लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी केली तर कोटयावधी रुपयांची मालमत्ता या अधिका-यांक डे सापडेल. यासंदर्भात जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती परंतु त्याची दखल घेण्यात आलेली नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, शासनाने याची गंभीर दखल घेऊन कृषि विभागाच्या माध्यमातून वरिष्ठ अधिका-यांची एक समिती नेमून या प्रकरणाची चौकशी करावी. धन्यवाद.

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, दखल घेण्यात येईल.

---

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधेयक क्रमांक 82 संबंधी

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 82-फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक चर्चेसाठी अगोदर घ्यावे, अशी माझी विनंती आहे. संबंधित मंत्रीमहोदय जरी उपस्थित नसले तरी हे बिल मी मांडणार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील तिन्ही बिलांवर आपण चर्चा करु शकत नाही. त्यासंबंधीच माझी हरकत आहे आणि मी त्यासंदर्भातच घटनात्मक मुद्दा या ठिकाणी मांडत आहे. या बिलांवर सभागृहात आता चर्चा करणे नियमबाहय ठरेल. कार्यक्रम पत्रिकेच्या भाग नऊमध्ये अ, ब व क येथे तीन बिले दाखविण्यात आली आहेत. सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 91-महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक हे पहिले बिल आहे, दुसरे बिल वि.स.वि.क्रमांक 96-महाराष्ट्र लॉट-यांवरील कर विधेयक हे आहे व तिसरे बिल सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 82-फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक हे आहे. यापैकी वि.स.वि.क्रमांक 91 वर सभागृहात चर्चा झाली व सभागृहाने ते मंजूरही केले आहे. ही अतिशय गंभीर बाब झाल्यामुळे ते बिल थांबविण्याची गरज आहे. कालच महाराष्ट्राच्या निवडणुक आयुक्तांनी मॉडेल कोड ऑफ कंडक्टनुसार आचारसंहिता लागू केली आहे. "Manual of Election Law and Model Code of Conduct" हे पुस्तक मी आणलेले आहे. यामधील काही विशिष्ट कलमे मी या ठिकाणी वाचून दाखविणार आहे. सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना निवडणूक आयुक्तांनी दिनांक 23 फेब्रुवारी 1996 रोजी एक पत्र पाठविले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Announcement of welfare measures etc." It is stated that "Sir, I am directed to invite your reference to paragraph VII (vi) of the model code of conduct for the guidance of political parties and candidates which is reproduced below:

"VII Party in Power. The party in power whether at the Centre or in the States concerned, shall ensure that no cause is given for any complaint that it has used its official position for the purpose of its election campaign, and in particular , (vi) from the time the elections are announced by the Commission, Ministers and other authorities shall not (a) Announce any

3 U-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Nitin Gadkari......

financial grants in any form or promises thereof, or (b) lay foundation stones etc. of projects or schemes of any kind, or (c) make any promise of construction of roads, provision of drinking water facilities, etc. or (d) make any ad hoc appointment in Government, Public Undertaking etc. which may have the effect of influencing the voters in favour of the party in power."

सभापती महोदय, मी अतिशय महत्वाची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे, कृपया आपण याकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे कारण यावर आम्हाला आपला निर्णय हवा आहे. "The Commission is aware that all prohibitions mentioned in the model code as quoted above regarding announcement of financial grants and other welfare measures will come into force only with the announcement of elections. The Commission, however, cannot remain a silent spectator to the steps taken by the ruling parties at the Centre and in some States, to influence the electors by way of announcement of various types of welfare measures and other concessions, as well as officially-sponsored image-building exercise,.."

या नंतर श्री. बोर्ले.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ........

I repeat this sentence. "The Commission, however, cannot remain a silent spectator to the steps taken by the ruling parties at the Centre and in some States, to influence the electors by way of announcement of various types of welfare measures and other concessions, as well as officially-sponsored image-building exercises,.." Further it is stated that "highlighting the achievements of the Governments at the Centre and the States through publicly-paid print or electronic media etc."

सभापती महोदय, बिलांच्याबाबतीत कायदेशीर भूमिका अशी आहे की, सत्तारुढ पक्षाला रुलींग पार्टी म्हणतात आणि विधिमंडळाला कायदे मंडळ असे म्हणतात. या विधिमंडळामध्ये कायदे पास करणे हा विधानमंडळाचा वैधानिक अधिकार आहे. दोन प्रकारची बिले सभागृहामध्ये येतात. विरोधी पक्षाकडून नॉन ऑफिशिअल बील येत असते आणि ऑफिशिअल बील सत्ताधारी पक्षाकडून येत असते. ऑफिशिअल बिलावर चर्चा करतांना आपल्या घटनाकारांनी एक मर्यादा ठेवलेली आहे की, बिलावर बोलतांना वेळेचे बंधन नसते. कारण बिलाचे रुपांतर कायद्यामध्ये होते आणि कायद्याचे समाज जीवनावर दुरगामी परिणाम होत असल्यामुळे आपल्या घटना तज्ज्ञांनी बिलाच्या बाबतीत पार्लमेंटकरिता आणि विधानमंडळाकरिता एक प्रोव्हिजन केलेली आहे. ती प्रोव्हिजन अशी आहे की, याबाबतीत कोणत्याही लोकप्रतिनिधीला आपले विचार जेवढा वेळ मांडावयाचे असतील तेवढा वेळ ते मांडता येतील, अशा प्रकारची त्यांना मुभा आहे. सभापती महोदय, गर्व्हमेंटचे निर्णय करायचे असतील, गर्व्हमेंटला कायदा पास करावयाचा असेल तर अनेक वेळा हे अधिकार कॅबिनेटला दिलेले आहेत. सभापती महोदय, कोणताही कायदा करण्याआधी तो विषय कॅबिनेटकडे जातो. ग्रुप ऑफ मिनिस्टरला आपण कॅबिनेट म्हणतो. कॅबिनेटमध्ये निर्णय झाल्यानंतर त्याचे कायद्यामध्ये रुपांतर करण्याकरिता ते बिलाच्या रुपाने विधिमंडळासमोर येते. विधिमंडळामध्ये बील मंजूर झाल्यानंतर त्याचे कायद्यामध्ये रुपांतर होते आणि कायद्यामध्ये रुपांतर झाल्यानंतर त्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे अधिकार त्या त्या विभागाला प्राप्त होतात. सभापती महोदय, माझ्या जवळ कॉन्स्टीटयूशन ऑफ इंडिया हे पुस्तक आहे आणि त्यामध्ये 324 हा चॅप्टर इलेक्शनचा आहे.

3V-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ........

"Superintendence, direction and control of elections to be vested in an Election Commission." It is stated that "The superintendence, direction and control of the preparation of the electoral rolls for, and the conduct of, all elections to Parliament and to the Legislature of every State and of elections to the offices of President and Vice-President held under this Constitution..." केंद्र सरकारचे इलेक्शन कमिशन वेगळे आहे आणि केंद्र सरकारच्या संदर्भात जेवढे अधिकार इलेक्शन कमिशनला आहे ते पॉवर ऑफ इलेक्शन कमिशनच्या अंतर्गत असून ते मी वाचून दाखवत नाही. सुप्रीम कोर्टाने जे जजमेंट डिलीव्हर केलेले आहे Three judge bench of Supreme Court has ellaborated legal and constitutional provisions of power of Election Commission and Code of Conduct that follows. या ठिकाणी सुप्रीम कोर्टाने इलेक्शन कमिशन, स्टेट आणि सेंट्रलच्या संदर्भामध्ये त्यांना आर्टीकल 324 च्या आधारावर त्यांचे अधिकार काय आहेत हे सांगितलेले आहे. सभापती महोदय, ज्यावेळी निवडणुका जाहीर होतात. त्यावेळी इलेक्शन कमिशनर मॉडेल कोड ऑफ कन्डक्ट ताबडतोब लागू करतात. त्याचा इफेक्ट असा असतो की, लोकप्रतिनिधींना, मंत्र्यांना सरकारी गाडया वापरता येत नाहीत, सरकारी गेस्ट हाऊसमध्ये राहता येत नाही. हे आपणा सर्वांना माहीत आहे. मी एकदा लघवी करण्यासाठी एका गेस्ट हाऊसमध्ये जात होतो तर मला असे सांगण्यात आले की, तुम्ही तेथे जाऊ नका कारण आचारसंहिता आहे. सभापती महोदय, निवडणुका जाहीर झाल्यानंतर सरकारमध्ये ज्या वेस्टेड पॉवर  आहेत त्या सर्व पॉवर स्टॉप करण्याचा अधिकार इलेक्शन कमिशनला आहे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. बोरले नंतर --- 17:10

श्री. गडकरी ....

म्हणून सभापती महोदय, आता महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत आणि निवडणूक आयुक्तांनी त्यासाठीचे कोड ऑफ कॉंडक्ट जाहीर केलेले आहेत. या ठिकाणी हे विधीमंडळाचे अधिवेशन चालू आहे. नॉन ऑफिशिअल विधेयके वगैरे करण्याला हरकत नाही. परंतु कोठल्याही प्रकारची घोषण करणे, कोठल्याही प्रकारचा निर्णय घेणे किंवा कायद्याचे विधेयक मंजूर करणे की ज्याचा परिणाम तमाम महापालिका क्षेत्रातील नागरिकांवर होणार आहे, त्यासाठी कोणतीही कृती सरकार करू शकत नाही. विशेष बाब म्हणून करावयाची असेल तर मला आठवते की, एकदा असाच प्रसंग उद्‌भवला होता. निवडणुका जाहीर झाल्या होत्या आणि निवडणुकीची आचार संहिता लागू झाली होती आणि त्या काळामध्येच 26 जानेवारीला ध्वजारोहण आणि वंदन करावयाचे होते. पण त्यावेळेस निवडणुकीची आचार संहिता लागू झालेली असल्याने निवडणूक आयुक्तांनी सांगितले होते की, मंत्र्यांना ध्वजारोहण करता येणार नाही. त्यावेळी मला वाटते श्री. मनोहर जोशी होते. त्यावेळेस कॅबिनेटने निवडणूक आयुक्तांना विनंती केली की, विशेष बाब म्हणून मंत्र्यांना ध्वजारोहण करण्याची परवानगी द्यावी. मग त्यांनी दिलेल्या परवानगीनुसार मी नागपूरचा पालकमंत्री होतो म्हणून मला नागपूरमध्ये ध्वजारोहण करता आले नाही तर मला परभणीमध्ये जाऊन तेथे ध्वजारोहण करावे लागले. तसेच सन्माननीय श्री.जगदीश गुप्ता यांना अमरावतीला ध्वजारोहण करता आले नाही. अशा प्रकारे अट घालून विशेष परवानगी तेव्हा निवडणूक आयुक्तांनी दिली होती आणि तत्कालीन मंत्र्यांना ध्वजारोहण करता आले. सभापती महोदय, आता तर आपल्यापुढे तीन विधेयके चर्चा आणि संमत करून घेण्यासाठी आहेत. त्या विधेयकांची व्याप्ती पाहता या विधेयकांचा परिणाम या महानगरपालिका क्षेत्रातील मतदारांवर होणार आहे. यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनासंबंधातील विधेयक देखील आहे. या विधेयकाच्या संबंधात तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या लातूर मध्येच दोन प्रकारची आंदोलने सुरू आहेत, उपोषण सुरू आहे. पुण्याला महापालिका आहे आणि तेथेही निवडणूक होणार आहे आणि तेथे संतमंडळींचा मोर्चा निघालेला आहे. नागपूरमध्ये देखील मोर्चा निघाला आहे. मुंबईला देखील या निमित्ताने सांकेतिक उपोषणाला काही लोक बसले आहेत. मी अशी 10 उदाहरणे आपल्याला देईन. नाशिक, पुणे, नागपूर, मुंबई, अमरावती या महानगरपालिका क्षेत्रात अंधश्रद्धा निर्मूलन विधेयकाच्या निमित्ताने मोठी चर्चा सुरू आहे. येथील मोठी संत, प्रवचनकार आणि तत्सम मंडळी याबाबत चर्चा करीत आहेत,

...... 3डब्ल्यू 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

आमच्याकडे देखील याबाबत चौकशी करीत आहेत. इतकेच काय पण माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे काही मंडळी फोन करीत आहेत की हे विधेयक ठेवू नका म्हणून. हे विधेयक पास करू नका म्हणून काही मंडळी उपोषण करीत आहेत तसेच हे विधेयक पास करा म्हणून देखील काहींचे म्हणणे आहे. सभापती महोदय, हे विधेयक पास करण्याचा अधिकार हा सरकारला आहे, ते मांडण्याचा अधिकार सरकारचा आहे आणि येथे त्यावर चर्चा करण्याचा अधिकार आमचा आहे आणि मग त्यावर मतदान होईल आणि ज्या बाजूला बहुमत असेल त्याप्रमाणे विधेयक संमत अथवा असंमत होईल. सभापती महोदय, यामध्ये प्रश्न असा आहे की, आपण निवडणूक आयुक्तांकडे या तीन विधेयकांबद्दल खास परवानगी मागितली आहे काय ? जेव्हा जेव्हा निवडणुकीची आचार संहिता लागू होते, मॉडेल कोड ऑफ कॉंडक्ट लागू होते तेव्हा अशा प्रकरणामध्ये कारवाई करावयाची झाली तर विशेष रूपाने परवानगी मागितली पाहिजे होती. त्याप्रमाणे आपण ती मागितली आहे काय ? नसेल तर या ठिकाणी एक वाचून दाखविले आहे. सभापती महोदय, येथे माझे लर्नेड फ्रेंड ॲडव्होकट श्री.गुरूनाथ कुलकर्णी बसलेले आहेत. या सभागृहामध्ये त्यांच्यासारखे विद्वान वकील सदस्य आहेत, शिवाय सन्माननीय श्रीमती दराडे देखील वकील आहेत. त्यांच्यासाठी मी पुन्हा ते वाचून दाखवितो. "The Commission is aware that all prohibitions mentioned in the model code as quoted above regarding announcement of financial grants and other welfare measures will come into force only with the announcement of elections. The Commission, however, cannot remain a silent spectator to the steps taken by the ruling parties at the Centre and in some States, to influence the electors by way of announcement of variious types of welfare measures and other concessions, as well as officially-sponsored image building exercise.

( यानंतर श्री. सरफरे .... 3एक्स 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

माझे सबमिशन असे आहे की, ही तीन विधेयके याठिकाणी संमत करणे ही ईमेज बिल्डिंग एक्सरसाईज आहे. आम्ही पुरोगामी आहोत, आम्ही कायदा करीत आहोत. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये तुम्ही आम्हाला मते द्यावीत अशाप्रकारची आपली ईमेज प्रोजेक्ट करण्याचा प्रयत्न या विधेयकामधून रुलिंग पार्टी करीत आहे. As far as model code of conduct is concerned, after the election is declared, the right of the Government ceases. Now, it is the privilege of the Election Commission to decide this matter. As far as my knowledge goes, there is no reference made to the Election Commission. आणि म्हणून पहिली गोष्ट अशी की, हे ईमेज बिल्डिंग प्रोसेस राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस या विधेयकामधून करीत आहेत. त्यांचा उद्देश असा आहे की, हे विधेयक आणल्यामुळे महाराष्ट्रातील दहा महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. राज्यामध्ये श्रध्दा आणि अंधश्रध्दा या विषयावर वादविवाद सुरु आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि त्यांचा पक्ष आणि भारतीय जनता पक्षाच्या विधेयकाला विरोध आहे. दुसरीकडे हे विधेयक मंजूर करावे अशी सताधारी पक्षाची भूमिका आहे...

**सभापती** : माननीय श्री. गडकरीजी आपण कॉंस्टिटयुशनल मुद्दा सांगितला, बाकीचे विधेयकाच्या अनुषंगाने...

श्री. नितीन गडकरी : मी बोलत नाही. मी फक्त एवढाच मुद्दा सांगतो. that "as well as officially-sponsored image-building exercise.." सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची की, हे सभागृह, कायदे मंडळ आहे.दुर्दैवाने या विधीमंडळामध्ये कायद्याची चर्चा होत नाही. आज सभागृहामध्ये एका चांगल्या विषयावर चर्चा सुरु आहे. आपण यासंबधी निर्णय करावा. आपण सार्वभौम सभापती आहात, आपण कोणत्याही पक्षाचे नाहीत, आपण इंडिपेंडंट आहात, आपण इम्पार्शल आणि फेअर निर्णय घेतला आहे. माझी आपणास विनंती आहे की, हे ऑफिशिअली स्पॉन्सर्ड ईमेज बिल्डिंग एक्सरसाईज आहे. जे अंधश्रध्दा विधेयकाच्या निमित्ताने राज्यातील डाव्या आणि पुरोगामी मते मिळविण्याकरीत या दहा महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये विधेयक मांडून मते मिळविण्याचा हा प्रयत्न आहे. हे निवडणुकीच्या आचारसंहितेला

..3X-2..

(श्री. नितीन गडकरी....)

छेद देणारे आहे. या संदर्भात मी निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्याबरोबर चर्चा केली. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी देखील चर्चा केली. त्यांना हा विषय आम्ही समजावून सांगितला. तेव्हा ते म्हणाले की, निश्चितपणे अशाप्रकारे विधेयक मांडल्यामुळे त्याचा जनतेवर प्रभाव होतो, ते योग्य नाही. पहिल्यांदा तुम्ही तुमच्या सभागृहामध्ये हा विषय मांडा. त्या ठिकाणी जर याबाबत निर्णय लागला नाही तर तुम्ही माझ्याकडे रेफरन्स द्या मी त्याबाबत योग्य निर्णय घेईन. माझ ी आपणास विनंती आहे की, या सभागृहातील निर्णयावर आमचा विश्वास आहे. कायदेशीर विश्वास असल्यामुळे ते तात्काळ नल अँड वाईड होईल, कॅन्सल होईल, परंतु मी ते करु इच्छित नाही. ते केल्यामुळे मला विजय जरी मिळाला तरी लोकप्रतिनिधी या नात्याने या सभागृहाच्या अधिकारावर इलेक्शन कमिशनकडे जाऊन मी स्थगिती आणली . ही गोष्ट माझ्या संवेदनशील मनाला पटत नाही. म्हणून आपणास विनंती आहे की, माननीय मंत्रिमहोदयांनी तीन विधेयके मांडण्यासाठी इलेक्शन कमिशनकडून परवानगी घेतली असेल आणि त्यांनी विशेष बाब म्हणून ती दिली असेलतर आमचे काही म्हणणे नाही. आम्ही आमचा आक्षेप मागे घेऊ. परंतु जर आपण इलेक्शन कमिशनकडून परवानगी घेतली नसेल तर दहा महानगरपालिकांच्या निवडणुकीमध्ये लोकमताला प्रभावीत करुन आपली ईमेज बिल्डिंग प्रोसेस करीत असतील तर हे मॉडेल कोड ऑफ कंडक्टच्या विरुध्द असल्यामुळे सकाळी संमत केलेले विधेयक आपण काढून टाका आणि ही तीन विधेयके आज सभागृहात आपल्याला मांडता येणार नाहीत. त्या विधेयकावरील कार्यवाही आपण स्थगित करावी. त्या विधेयकावर पुढील अधिवेशनामध्ये चर्चा होऊ शकते किंवा निवडणुकीची प्रक्रिया संपल्यानंतर आपण अध्यादेश काढू शकता. अध्यादेश काढण्यासाठी संविधानामध्ये दुसरा मार्ग आहे तो मी आपणास सुचवितो. तुम्ही इलेक्शन कमिशनकडे जावून हे विधेयक तातडीचे असल्यामुळे आम्हाला त्यावर अध्यादेश काढावयाचा आहे, त्यांची परवानगी घ्या. जर त्यांनी तुम्हाला परवानगी दिली तर तुम्ही काढू शकता. यामधील कायदेशीर प्रोसिजर लक्षात घेता या तीन विधेयकांवरील सभागृहामध्ये चर्चा घेऊ नये आणि मॉडेल कोड ऑफ कंडक्टचा भंग करण्याची संधी रुलिंग पार्टीला देऊ नये अशी माझी आपणास विनंती आहे.

..3X-3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी घटनात्मक मुद्दा उपस्थित केला. मी घटनेच्या पुस्तकाला हात लावीत नाही. कारण एखादी गोष्ट अशी आहे की, हे अधिवेशन माननीय राज्यपालांनी ठराविक कालावधीनंतर जाहीर केले. त्यानुसार या अधिवेशनाचा कालावधी आपण जाहीर केला. कामकाज सल्लागार समितीची पहिली बैठक हे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी झाली व त्यात कामकाजाचा दिनक्रम ठरला. त्याप्रमाणे या अधिवेशनामध्ये कोणकोणती विधेयके सादर करण्यात येणार आहेत त्यासंबंधीचा त्याठिकाणी निर्णय झाला.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (पुढे सुरू....

आता हे जाहीरपणे माहिती असताना, निवडणूक आयुक्तांनी महानगरपालिकेची निवडून जाहीर केली आणि त्या संबंधातील आचारसंहिता सुरू झाली. पण सभागृह चालू असताना, जो दिवसाचा कार्यक्रम आहे तो ठरलेला असताना, सभागृह सार्वभौम असताना, आचारसंहितेचे बंधन येऊ शकते काय ? अशी माझी शंका आहे, त्याचा कृपया खुलासा करावा.

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी आचारसंहिता लागल्यामुळे आता विधेयके मजूर करता येणार नाही असे सांगितले. सभागृह हे सार्वभाम आहे हे ते मान्य करतात. विधेयकामध्ये जर आमिष दाखविणारी बाब असेल तर ते समजू शकतो. बिलाच्या माध्यमातून लॉटरीवर कर लावायचा आहे, त्याला आचारसंहितेचे बंधन येईल असे मला वाटत नाही. तसे बंधन येण्याचे काहीही कारण नाही. जादूटोणा विषयाचे बील मंजूर करायचे नाही यासाठी कोणतीही कारणे विरोधी पक्षाकडून पुढे आणली जात आहेत. सकाळीच सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी विणकरांच्या व्हीआरएसचा मुद्दा उपस्थित केला आणि त्यासंबंधातील ऑर्डर मंत्रीमहोदयांनी आजच काढण्याचा आग्रह धरला. आता संध्याकाळी त्यांचे मत बदलले. याबाबत सभापती महोदय, आपले मत द्यावे अशी विनंती आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी मघाशी विणकरांच्या प्रश्नाच्या संबंधात संध्याकाळपर्यन्त ऑर्डर इश्यू कराव्यात, असा आग्रह धरला. त्याप्रमाणे ऑर्डर इश्यु केल्या. तो आचारसंहितेचा भाग होत नाही काय ? खरे तर नागपूर महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झालेली आहे. याच क्षेत्रामध्ये रहाणाऱ्या विणकर कामगारांच्या व्हीआरएसचा प्रश्न आहे. माझ ा मूळ प्रश्न असा आहे की, निवडणूक आयोग हे त्यांचे काम करेल] आपण आपले काम करावे. विधेयक पास झाल्यानंतर राज्यपाल, राष्ट्रपती यांच्या मंजुरीसाठी ते पाठविले जाते. आपणच आपल्या अधिकारावर गदा आणत आहोत की काय असे वाटावयास लागलेले आहे. निवणूक आयुक्तांना माहिती आहे की, 15 डिसेंबरपर्यन्त अधिवेशन चालणार आहे, याचा विचार करूनच त्यांनी महानगरपालिकांच्या निवडणका जाहीर करावयास पाहिजे होत्या. आता अधिवेशनाचे एक-दोन दिवस राहिलेले आहेत. एवढा अधिवेशनासाठी खर्च करतो आणि अधिवेशनामध्ये कायदा पास करत नाही हे बरोबर नाही. कायदा पास केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करायची की नाही याबाबतीत निवडणूक आयुक्तांचे मार्गदर्शन घेता येईल. या उपर कायद्याची व्यवस्था असेल तर आपण सांगावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आपल्यासमोर तीन विधेयके आहेत. ही तीनही विधेयके विधानसभेने मंजूर करून पाठविलेली आहेत. विधानसभेमध्ये विधेयक मंजूर करण्यामध्ये कोणाही सन्माननीय सदस्यांनी विरोध केलेला नाही, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, निवडणूक आयोगाने हे अधिवेशन चालू आहे, हे लक्षात घेणे गरजेचे होते, ते त्यांनी घेतलेले नाही. हे सभागृह सार्वभौम आहे. या अधिवेशनाचे नोटिफिकेशन माननीय राज्यपालांच्या, माननीय राष्ट्रपतींच्या परवानगीनेच निघालेले आहे. यामुळे निवडणूक आयुक्त विरूध्द कायदे मंडळ असा रोख असू नये. शेवटी सरकारला काही निर्णय घ्यायचे आहेत. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांनी मिळून विधानसभेमध्ये मंजूर केलेली विधेयके आहेत. विधानपरिषदेमध्ये वेगळे नवीन विधेयक मंजूर कयरतो अशातला भाग नाही. ही विधेयके विधानसभेकडून आलेली आहेत, ती कंटीन्यू प्रोसेस आहे. त्यामुळे ती प्रोसेस थांबविण्याचा अधिकार कोणाला नाही. सरकारला काम करण्याचा अधिकार आहे, त्याप्रमाणे त्यांनी काम करायलाच पाहिजे. म्हणून माझे मत आहे की, या विधेयकावर चर्चा झ ाली पाहिजे. या विधेयकाच्या संबंधाने निर्णय घेण्याचा अधिकार या सार्वभौम सभागृहाला आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो घटनात्मक मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे त्यामध्ये त्यांचे आणि राज्य निवडणूक आयोगाचे काय बोलणे झाले याची आम्हाला कल्पना नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी एक मुद्दा मांडला की, अधिवेशनामध्ये कोणती बिले घ्यावयाची, अधिवेशनाचा कार्यकाल किती असेल याबाबतची चर्चा कामकाज सल्लागार समितीमध्ये झालेली आहे आणि त्या अनुषंगाने या ठिकाणी ही विधेयके आलेली आहेत. समाननीय सदस्यांनी जादूटोणा संबंधीच्या विधेयकाच्या बाबतीत असा एक आक्षेप घेतला की, या माध्यमातून कोणावर तरी प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत. जादूटोणा संबंधीचे विधेयक या सदनामध्ये पहिल्यांदाच चर्चेला आलेले नाही. महाराष्ट्रामध्ये दोन्ही बाजूने या विधेयकाची चर्चा चालू आहे. गेली सहा महिने हे बिल सभागृहाच्या पटलावर आहे. मागच्या अधिवेशनामध्ये मुंबईमध्ये सुध्दा या विधेयकावर चर्चा केलेली आहे परंतु हे विधेयक कन्क्लुड होऊ शकले नाही. हे विधेयक इनकन्क्लुड आहे. मागच्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकावर भाषण केले. त्यांचे अर्धवट राहिलेले भाषण त्यांनी काल या सभागृहामध्ये पुढे सुरु केलेले आहे. आपला आदर ठेऊन मी सांगेन की, या विधेयकावर जी चर्चा चालू आहे ती आपण पूर्ण करावी. उद्या निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावयाची की, नाही हा वेगळा प्रश्न आहे. या सार्वभौम सभागृहाच्या संदर्भात तो प्रश्न येत नाही. या ठिकाणी चर्चा करावयाची असेल तर independent of approval of this House. The Government will reply it either to High Court or Supreme Court.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी घटनात्मक मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब हे विव्दान आहेत, खूप अभ्यासू आहेत आणि नेहमी संसदीय कामकाजात भाग घेत असताना त्यांची सर्व मांडणी आदर्शवत असते आणि त्यांचे अनुकरण करावे असे वाटत असते. परंतु मला सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा आदर राखून सांगावेसे वाटते की, त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय गैरलागू आहे. ही जी तीन विधेयके आहेत ती विधानसभेने पारीत केलेली आहेत आणि या ठिकाणी पुर:स्थापित झालेली आहेत. त्यामुळे ही काही नवीन गोष्ट होत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

सरकार नव्याने काही घोषणा करीत आहे, नवीन विधेयक आणू पाहात आहे, अशी कोणतीही घोषणा केलेली नाही. निवडणूक आयोग सर्वोच्च आहे अशी जी भूमिका सन्माननीय सदस्यांनी मांडली ती बरोबर नाही. या देशात कायदेमंडळ सर्वोच्च आहे. सुप्रीम कोर्टाने सुध्दा एखादा निर्णय दिला तरी त्याच्या विरोधात जाऊन कायदे मंडळाला आपला नवीन कायदा पारीत करता येतो. त्यामुळे या ठिकाणी निवडणूक आयोगाची चर्चा करणे सुध्दा गैरलागू आहे. त्यांनी त्यांचे काम केलेले आहे, आपण आपले काम केले पाहिजे. निवडणूक आयोगाने काय बंधने घातली हा त्यांचा मुद्दा आहे. या ठिकाणी जे काही मांडावयाचे त्याबाबत कायदेमंडळ सार्वभौम आहे. या ठिकाणी आपली मालकी आहे. निवडणूक आयोगाला किंवा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना जी टिप्पणी करावयाची असेल ती त्यांनी स्वतंत्रपणे करावी. यामध्ये निवडणूक आयोगाला ओढू नये. या ठिकाणी निवडणूक आयोग विरुध्द आपण असा संघर्ष ओढवून घेण्याची गरज नाही. ज्या तीन विधेयकांबाबत सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी आक्षेप घेतला ही बिले जुनी आहेत. ही विधेयके विधानसभेने पारीत केलेली आहेत. त्यामुळे ती विधेयके निवडणुका जाहीर झाल्या म्हणून थांबविण्याची आवश्यकता नाही. ती विधेयके आपण चालू ठेवली पाहिजेत. अकारण कायदेमंडळ विरुध्द निवडणूक आयोग असा संघर्ष आपण स्वत:हून ओढवून घेणे हे लोकशाहीला मारक आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. त्यांनी अकारण गैरसमज करुन घेतला आहे. त्यांचे काय बोलणे झाले याची वाच्यता या ठिकाणी करावयास नको होती. तो उल्लेख कामकाजातून काढून टाकावा. कारण ती सभागृहाच्या बाहेरची गोष्ट आहे. त्यांनी लेखी दिले असेल तर ते माहीत नाही. त्यांना त्या विषयावर या ठिकाणी बोलण्याचा अधिकार नाही. त्यामुळे जुन्या विधेयकावर जी चर्चा चालू आहे ती विधेयके निवडणूक जाहीर झाली म्हणून मागे घेतो असे केले तर तो आचारसंहितेचा भंग होईल. बहुजन समाजाची मते पाहिजे म्हणून असे केले असा त्याचा अर्थ होईल आणि त्याचा आपल्याला त्रास होईल.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 17:30

(श्री. कपिल पाटील पुढे सुरु...)

त्यामुळे आता मागे फिरणे हा आचारसंहितेचा भंग होईल... (अडथळा..) सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी इमेज बिल्डिंगचा मुद्दा उपस्थित केला. या विधेयकाच्या संदर्भात सांगायचे तर कायद्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे आणि ही प्रक्रिया थांबविली तर नक्कीच आदर्श अशा आचारसंहितेचा भंग होईल म्हणून आता आपणाला थांबता येणार नाही, एवढाच माझा मुद्दा आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांनी कॉन्स्टिट्युशनल प्रोव्हिजन्स वाचून दाखवून आजच्या विधानपरिषदेच्या कामकाजामध्ये जी विधेयके दाखविलेली आहेत ती आता पास करता येणार नाहीत, कारण 10 महानगरपालिकांच्या निवणुकांच्या संदर्भात आचारसंहिता जाहीर झालेली आहे, असे सांगितले. एकदा आचारसंहिता जाहीर झाली की कोणतेही नवीन काम होती घेता येत नाही. प्रथम मंजूर झालेले काम करायला हरकत नसते असा सर्वसाधारण रिवाज आणि पध्दत आहे आणि त्याप्रमाणे कायद्यामध्ये तरतूद आहे. त्यानुषंगाने त्यांनी जे योग्य नाही ते योग्य नाही असे सांगितले. आज ज्यांना ही विधेयके पास करावयाची आहेत त्यांचे म्हणणे एकच आहे की, एकदाचे या सभागृहामधून विधेयके पास करुन बाहेर जाऊया, मागाहून त्यासंदर्भात काय होईल ते बघून घेऊ. सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी सांगितले की, ही विधेयके विधानसभेमध्ये मंजूर होऊन विधानपरिषदेमध्ये आलेली आहेत. म्हणजे ती विधेयके पास करण्याची फॉर्म्यालिटी राहिलेली आहे. यामध्ये सत्य काय आणि असत्य काय, हे मला माहीत नाही. परंतु विधानसभेने मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेने मंजूर करायलाच पाहिजे असा नियम नाही, तशी कॉन्स्टिटयूशनल प्रोव्हिजन नाही. सभापती महोदय, विधानपरिषदेमध्ये स्वयं अर्थसहाय्यिता विद्यापीठ विधेयक मंजूर केल्यानंतर ते विधानसभेमध्ये गेले. विधानसभेने ते विधेयक पुन्हा संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविले. सयुंक्त चिकित्सा समितीने अहवाल दिल्यानंतर ते विधेयक परिषदेमध्ये आले. ते पुन्हा विधानसभेमध्ये गेले. आता ते विधेयक प्रलंबित आहे ही वस्तुस्थिती आहे. मला एक गोष्ट या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, अंधश्रध्दा निर्मूलन विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय काल पासून या सदनामध्ये बसलेले आहेत. हे विधेयक जेव्हा या सभागृहामध्ये आले

...2..

(श्री. मधुकर सरपोतदार...)

त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकाला विरोध करण्यासाठी काही घटनात्मक मुद्दे मांडले.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी काल निवडणुका जाहीर झाल्यामुळे आचारसंहिता जाहीर झालेली आहे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या मुद्यापुरतेच सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

...नंतर श्री. भोगले...

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : या विधेयकांबद्दलची चर्चा झाली त्या संदर्भात बोलत आहे, त्या बाहेर जाऊन मी काही बोललो नाही.

**सभापती** : त्या विधेयकांवर या क्षणाला चर्चा नाही, एका मुद्याकरीता चर्चा आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधेयके प्रलंबित राहतात की नाही हेच मला सांगावयाचे आहे. 1986 साली महिला आरक्षण विधेयक लोकसभेत 13 सप्टेंबर रोजी मांडले गेले. ते तेथेच थांबविले गेले. लोकसभा सदस्यांनी प्रतिक्रिया दिल्यानंतर आजपर्यंत ते विधेयक प्रलंबित आहे. लोकसभेला ते विधेयक सादर झालेले आहे. तसे याठिकाणी होऊ शकत नाही असा प्रकार नाही. अनेक दाखले देता येतात. असे अन्यत्र घडले आहे. लोकशाहीमध्ये हे घडू हे दाखविण्यासाठी अशी उदाहरणे दिली तर त्यात काही चूक आहे असे माझे मत नाही. हे कसे अवैध होईल, कायदेशीररित्या कसे चुकीचे होईल या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी यांनी मार्गदर्शन केले. सन्माननीय सभापती त्यांचा निर्णय घेणार आहेत, त्यांचा निर्णय आल्यानंतर त्यावर जी काही प्रतिक्रिया द्यायची ती देऊच. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सुध्दा कामकाजाचा क्रम ठरविला गेला आहे. या संदर्भात आपला निर्णय झाल्यानंतर मी कामकाजाच्या क्रमाच्या संदर्भात बोलणार आहे.

**सभापती** : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीनजी गडकरी यांनी याठिकाणी जो महत्वाचा मुद्दा मांडला, त्या मुद्याच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री उल्हास पवार, सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ, सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंत पवार, गुरुनाथ कुलकर्णी, कपिल पाटील, मधुकर सरपोतदार यांनी आपापल्या भावना मांडल्या. सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी सुध्दा सहभाग घेतला. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे मुद्दा मांडत असताना, त्यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील काही महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर केलेल्या आहेत आणि कालपासून या निवडणुकांच्या अनुषंगाने आचारसंहिता त्यांनी घोषित केलेली आहे. मला असे वाटते की, या अनुषंगाने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी याबाबत आपले विचार याठिकाणी मला मार्गदर्शनाच्या दृष्टीने मांडले आहेत. विधिमंडळाचे अधिवेशन आपण घेतो ते संविधानाच्या अनुच्छेद 174 प्रमाणे माननीय राज्यपालांना जे संविधानिक अधिकार आहेत, त्या अधिकाराच्या अखत्यारित आपण विधिमंडळाचे अधिवेशन घेत असतो. अशा पध्दतीने महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांना घटनेच्या अनुच्छेद 174 अन्वये जे संविधानिक अधिकार आहेत त्यानुसार हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..........

विधिमंडळाचे अधिवेशन आपण बोलावले आहे.  सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आणि अन्य सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या अधिवेशनाचा जो दैनंदिन कार्यक्रम आहे आणि कामकाज सल्लागार समितीने निश्चित केलेला जो कार्यक्रम आहे, त्या कार्यक्रमानुसार आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये ही तीन विधेयके चर्चेसाठी आहेत.  आज सकाळी जे विधेयक मंजूर झाले त्या विधेयकाचा सुध्दा समावेश आहे.  याठिकाणी राज्य निवडणूक आयोगाचे जे अधिकार आहेत त्याबाबत सुध्दा काही भाष्य करण्यात आले.  खरे म्हटले तर राज्य निवडणूक आयोगाला जे अधिकार आहेत त्या अधिकाराला कोणीही आव्हान दिलेले नाही.  म्हणून मला असे वाटते की, राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाराच्या अनुषंगाने जी चर्चा झाली ती चर्चा जर टाळता आली असती तर काही हरकत नव्हती.  भारतीय संविधानाप्रमाणे विधिमंडळाची दोन्ही सभागृहे ही सर्वोच्च आहेत.  ही सर्वोच्च लजिस्लेचर्स आहेत.  हे अधिकार भारतीय संविधानाप्रमाणे मिळालेले अधिकार आहेत.  विधिमंडळाचे घटनादत्त अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.  सभागृहातील सन्माननीय सदस्यांना मी एवढेच सांगेन की, अनेक वेळा असे अनेक प्रसंग आले, त्या वेळेला या सर्वोच्च सभागृहाचे अधिकार आहेत ते सर्वोच्च अधिकार टिकविण्याच्या दृष्टीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पीठासीन अधिकाऱ्यांना त्या त्यावेळी सहकार्य केले.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

म्हणून या ठिकाणी मी असे म्हणेन की, विधानमंडळाचे कामकाज कोड ऑफ कन्डक्ट नुसार होऊ शकते यामध्ये यत्किंचितही वेगळा संबंध येऊ शकत नाही. म्हणून यासंदर्भात मी असा निर्णय देतो की, ठरलेल्या कामकाज पत्रिकेप्रमाणे दाखविण्यात आलेली 3 विधेयके आणि अन्य उर्वरित कामकाज आता सुरु होईल. सकाळी एक विधेयक मंजूर झालेले आहे ते योग्य पध्दतीने मंजूर झालेले आहे असे सांगतो. आता कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या क्रमानुसार कामकाजाला सुरुवात होईल. आता विधेयकावरील चर्चेला सुरुवात करण्यात येत आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझ्या हक्कभंगाच्या संदर्भात मी आपल्याला विनंती केली होती. त्यानुसार निवेदन करण्याची मान्यता द्यावी..

**सभापती** : मी आता आपल्याला निवेदन करण्यास परवानगी देऊ शकत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत जे कामकाज दाखविण्यात आलेले आहे त्यासंदर्भात मी आपल्याला एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधकांचा विशेषाधिकार आहे. परंतु अंतिम आठवडा प्रस्ताव हा विधेयकानंतर चर्चेला येणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावाला पाठीमागे टाकून विधेयकाला प्रायोरिटी दिलेली आहे. यामुळे अंतिम आठवडा प्रस्तावावर प्रथम चर्चा होऊ द्यावी व ही चर्चा पूर्ण झ ााल्यानंतर आपण पुढील विधेयके चर्चेला घ्यावीत अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव बिलानंतर दाखविण्यात आलेला आहे. आमचा अंदाज असा होता की, दुपार पर्यंत विधेयके मंजूर होतील आणि किमान 4.00 वाजता अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधकांचा अधिकार आहे त्यामुळे विधेयकाच्या अगोदर अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु करावी व अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर बिलावर चर्चा सुरु करावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, आपल्या कार्यालयाने आजची जी कार्यक्रम पत्रिका तयार केलेली आहे ती पाहिल्यानंतर आम्हाला प्रथम आश्चर्य वाटले. एक तर आपण दोन आठवडयामध्ये अधिवेशन गुंडाळीत आहात. अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधकांचा विशेष हक्क आहे. विधेयकांवर चर्चा पूर्ण झाल्यानंतर, रात्री

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......

12.00 वाजता आम्ही अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करावयाची का? अंतिम आठवडा हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे, शस्त्र आहे. त्यामुळे आम्ही या अंतिम आठवडा प्रस्तावावर रात्री चर्चा सुरु करावयाची का? लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाच्या भावनांचा आदर केला जात असतो. त्यामुळे अंतिम आठवडा प्रस्ताव हा आमचा विशेषाधिकार आहे. घटनेने आम्हाला हा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर आपण विधेयकावर चर्चा करावी किंवा उद्या एक्स्ट्रा सिटींग घेऊन बिलावर चर्चा करावी.

श्री. जयंत पाटील : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब हे बिलावर ऑन लेग आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी बिलावर आपले विचार व्यक्त करण्यास सुरुवात करावी.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेत ज्या क्रमाने कामकाज दाखविण्यात आलेले आहे त्या प्रमाणे कामकाजाला सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे.

**सभापती** : संरक्षण देण्याचे काम सातत्याने पीठासीन अधिकारी करीत असतात. असे असतांनाही तुम्हाला असे का वाटावे?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला असे का वाटते याचे सगळयांनी आत्मपरीक्षण करणे जरुरी आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव मांडणे हा आमचा वैधानिक अधिकार आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सरकारला जर अंतिम आठवडा प्रस्ताव विथ्ड्रॉ करायचा असेल तर त्यांनी तो जरुर करावा.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, संसदीय लोकशाहीमध्ये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडणे हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे आणि हे तुम्हाला देखील चांगले माहीत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अंतिम आठवड्यावरील चर्चा रात्रौ 10-11 वाजता सुरु करायची काय ? म्हणजे सर्व मंत्री घरी गेल्यावर आम्ही फक्त येथील भिंती दरवाजांबरोबर बोलायचे काय ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण सकाळच्या विशेष सत्रामध्ये विधेयके चर्चेसाठी ठेवली. दुपारी 12.00 वाजता नियमित कामकाज सुरु झाले. त्यानंतर लक्षवेधी सूचना व इतर कामकाज घेतले. आपल्याला जर कंटयुनिटी ठेवायची होती तर दुपारी प्रश्नोत्तराच्या तासानंतर विधेयकावरील चर्चा पुढे सुरु करावयास पाहिजे होती, आम्हाला सुध्दा विधेयकावर चर्चा करायची आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण सकाळच्या सत्रात लॉटरी वरील कर हे विधेयक सुरु केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे "ऑन लेग्ज" आहेत. त्यांना या विधेयकावर अजून बोलायचे आहे. तेव्हा माझी विरोधी पक्ष नेते आणि सर्वांनाच विनंती आहे की, आपण प्रथम लॉटरीसंबंधीचे विधेयक मंजूर करुन घेऊ, त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्तावास सुरुवात करु.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, जादूटोणावरील विधेयक सातत्याने पेडींग आहे. हे विरोधी पक्षाचे अपत्य आहे.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला न्याय द्यावा. सरकार राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस पक्षाचे. मांडणारे मंत्रिमहोदय सत्ताधारी पक्षाचे मग मी बाप कसा ? असे पाप मी कधीही करणार नाही.

..2..

14-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4D-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन 1999 मध्ये युतीचे सरकार होते. त्यावेळी या विधेयकाचा मसुदा मंजूर झालेला आहे. त्यामध्ये 50 कलमे आहेत. ही कलमे आपण वाचली तर अंधश्रध्देचे मारेकरी कोण आहेत हे समजेल. त्यावर मला आता काही भाष्य करायचे नाही. समाज प्रबोधन करण्यासाठी सर्वांनी एकत्र यावयास पाहिजे. धोरणात्मक मुद्दे ठरवावे लागतील. राजकारणासाठी राजकारण करता कामा नये असे मला वाटते.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी कामकाजाच्या दृष्टीने अतिशय चांगल्या प्रकारच्या विधायक सूचना केल्या. त्याप्रमाणे अंतिम आठवडा प्रस्ताव हा विरोधी पक्षाचा अधिकार आहे, ही वस्तुस्थिती आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, अपत्य कोणाचे ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी मुलाच्या आईच्या चारित्र्यावर आरोप होत आहे.

**सभापती** : कामकाजाच्या संदर्भात मी असा निर्णय देतो की, लॉटरीसंबंधीचे जे बिल आहे, ते बिल आपण प्रथम पूर्ण करु. नंतर अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात करु व त्यानंतर राहिलेली जी दोन बिले आहेत ती आणि पुढील अन्य कामकाज पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करु. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लॉटऱ्यांवरील कर विधेयक.

L.A. BILL NO. XCVI OF 2006.

(A BILL TO PROVIDE FOR THE LEVY AND COLLECTION OF TAX ON THE LOTTERIES AND THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या बिलावरील भाषणास सुरुवात करण्यापूर्वी, मघाशी माझ्या नावाचा उल्लेख माननीय श्री.हंडोरे साहेबांनी केला, त्याबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, संभोगातून अपत्य निर्माण होते व बलात्कारातून पाप निर्माण होते, एवढेच आपण लक्षात ठेवावे.

सभापती महोदय, सकाळी या बिलाच्या संदर्भात बोलत असताना, ऑन लाईन हा विषय कसा आहे, हे मी सांगत होतो. ऑन लाईन लॉटरी आम्ही ताबडतोब बंद करु असे जर माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले तर त्यांचे मी अभिनंदनच करीन. जी ऑन लाईन लॉटरी निर्माण झाली ती कल्याणच्या मटक्यापेक्षाही भीषण आहे. सकाळी मी नमूद केले की, लॉटरी ॲक्ट 1998 मध्ये याबाबतीत सगळया प्रोव्हीजन्स आहेत. त्यामध्ये Section 5 मध्ये "Prohibition of sale of tickets" अशी तरतुद आहे. या सर्व महत्वांच्या मुद्दानुसार आपल्याला आपल्या राज्यातील ऑन लाईन लॉटरी ताबडतोब बंद करता येईल, अशाप्रकारची प्रोव्हीजन यामध्ये आहे. यासंबंधीची सविस्तर माहिती मला याठिकाणी द्यावयाची होती, परंतु माननीय मंत्रिमहोदयांची तशी इच्छा दिसत नाही. याठिकाणी क्लॉज 8 मध्ये असे म्हटले आहे की,"Offence to be cognizable and non bailable" अशी यामध्ये प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. 12 नंबरच्या क्लॉजमध्ये स्पष्ट शब्दात सांगितले आहे की,"Power of State Government to make rules." आपल्याला कोणत्या प्रकारचे रुल्स बनवता येतील याबाबतची तरतुद करण्यात आली आहे.

4E-3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सेक्शन 5 व 6 मध्ये असे आहे की, "Do not mention about on line lotteries, these lotteries can be banned in the state." असे स्पष्ट शब्दात केंद्र सरकारच्या लॉटरी ॲक्ट 1998 मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे.

याबाबतीतील सुप्रिम कोर्टाचे निर्णयही आहेत. सकाळी मी "जुगार" हा शब्द वापरला होता. राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने आपण जुगाराला प्रोत्साहन दिले. आपल्याकडे दोन रस्ते कमी येतील, दोन योजना कमी येतील, याबाबतीत आपण एक-दोन वर्ष थांबू. परंतु या जुगाराचे काय ? M/s B.R.Enterprise या केससंबंधी सुप्रिम कोर्टाने जे म्हटले आहे ते मी मेंशन करणार आहे.

नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

Shri Diwakar Rawate......

(A) Constitution of India Articles 301,19(1)(g),Sch.7,List 1, Entry 40,Sch.7, List 2, Entry 34 -- Free trade and commerce,--- Lottery -- Contains an element of chance-- It is gambling. Not therefore trade and commerce as contemplated by Art.301. Lottery which is res-extra commercium does not become commercium merely by putting on cloak of State authority and becoming a State lottery. Lotteries (Regulation) Act, 17 of 1998) S.5. Lottery contains an element of chance cannot therefore be trade and commerce. It is gambling Sale of Lottery makes gain, even though, by the State, could not be construed to be trade and commerce and even if could not be construed to be so, it cannot be raised to the status of 'trade and commerce' as understood at common parlance of 'trade and commerce' as used under Art.301. Hence, question of violation of either Articles 301 or 302 does not arise."

सभापती महोदय, मला या विधेयकाबाबत बऱ्याच बाबी सांगावयाच्या आहेत. माझ्याकडे सर्व जजमेंट आहेत. केंद्र सरकार व राज्यसरकाकडे पाठविलेली पत्रे आहेत. त्या पत्रामध्ये याबाबत काय करावे व काय करु नये हे सांगितले आहे. मार्टीन लॉटरी एजन्सी अंधेरी यांच्याकडे या लॉटरीची परवानगी घेतली असल्याचे समजते. त्यांच्या लॉटऱ्यांची विविध नावे आहेत. मेगा जयलक्ष्मी, मेगा पारसमणी, मेगा गोल्ड, मेगा 300, मेगा लकी सुपर, मेगा 500, मेगा पालो, मेगा मॅझीक, दर 15 मिनिटांनी या लॉटऱ्यांची सोडत निघत आहे. याबाबत मी राज्य लॉटरी संबंधीच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....(पुढे सुरु)

शासनाने त्यांना पत्र पाठविले आहे की, लॉटरी तिकीटावर सचिवांच्या सहयांची आवश्यकता नाही, कृपया या बाबीची नोंद घेण्यात यावी.

Govt. of India, Ministry of Home Affairs, dated 6th Feb. Smt. Kavita Gupta Director of Lotteries and Ex-Officio Joint Secretary. यांना पत्र लिहिलेले आहे, या पत्रात त्यांनी स्पष्ट शब्दात सूचना दिलेल्या आहेत. त्या मी वाचल्या आहेत.

या सर्व बाबींवरुन असे दिसते की आपण ही लॉटरी ताबडतोब बंद करु शकतो. इतर राज्यातील लॉटऱ्यांवर बंदी घालता येणार नाही परंतु महाराष्ट्रात इतर राज्यातील लोकांनी सुरु केलेल्या लॉटऱ्या बंद करता येतील, अशा प्रकारची तरतूद माझ्याकडे असलेल्या सरकारी कागदपत्रावरुन करता येऊ शकते.

माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, याप्रमाणे जुगारातून महसूल निर्माण करुन महाराष्ट्राचे भले करण्याची जबाबदारी आपणाला दिलेली नाही. शहर व ग्रामीण भागातील होतकरु व्यक्तींची आर्थिक कमाई या लॉटऱ्यावर उधळली जात आहे. मार्टीनसारख्या व इतर लॉटरी मालकांचा फायदा करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने या विधेयकाकडे पाहू नये, त्यांना नफेखोरी करण्यासाठी वाव देऊ नये असे वाटते.

लॉटरीपेक्षा वरळी मटक्यास परवानगी द्या, म्हणजे यातून महसूल येऊ शकेल, असे मला वाटते.

..... यानंतर श्री.रोझेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

ग्रामीण भागामध्ये काबाडकष्ट करुन मिळणारे पैसे दोन घास चटणी-भाकरीसाठी खर्च करण्याऐवजी अशा पध्दतीने लॉटरी व मटक्यावर उधळले जातात त्यामुळे एक प्रकारची दुरावस्था निर्माण झाली आहे. यातून कोण लोक गब्बर होतात, हे आपल्याला माहित आहे. त्यामुळे हा कायदा मंजूर करतांना केवळ राज्याला जुगारातून महसूल मिळविण्याचा उद्देश असता कामा नये हे लक्षात ठेवावे, एवढी विनंती करतो आणि मला या विधेयकावर माझे मत व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानतो व थांबतो. धन्यवाद.

--------------

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, लॉटरीवर कर बसविण्यासाठी व तो गोळा करण्यासाठी तसेच त्यासंबंधी व तदनुषंगिक तरतुदी करण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी ही एक प्रकारची हतबलता आहे, असे जे सांगितले आहे, ते बरोबर आहे. आज एकीकडे समाजामध्ये चंगळवाद फोफावतो आहे आणि दुसरीकडे लोकांना रोजगार उपलब्ध नाही. या दोन बाबी या सर्वांसाठी कारणीभूत आहेत. ग्रामीण भागात गेल्यानंतर आमच्यासारखा कार्यकर्ता जेंव्हा गावागावात फिरतो तेंव्हा गावात काही नसले तरी दोन गोष्टींची व्यवस्था सर्व गावांमध्ये असते. एक म्हणजे दारुचे दुकान आणि दुसरे म्हणजे लॉटरीचे दुकान. समाज कुठे भरकटतो आहे ? याची चिंता करण्याची गरज आहे. सरकारला महसूल मिळाला पाहिजे, सरकारी तिजोरीत निधी येण्यासाठी सरकारला विविध मार्ग चोखाळावे लागतात, हे सर्व आम्हाला मान्य आहे. परंतु, या ठिकाणी लॉट-यांना प्रतिबंध करण्याऐवजी आपण कराचा मार्ग अवलंबित आहोत. आपण भव्यतम सोडतीसाठी 10 लाख रुपयांचा कर लावणार आहोत. आपल्याला थेट कर लावता येणार नाही, हे आपण समजू शकतो. परंतु, यामधून नेमकी किती विक्री होणार ? आणि सर्वात मोठे बक्षिस कोणते ? यावर कराची रक्कम ठरवावयास हवी होती, असे मला वाटते. हल्लीच केईएम रुग्णालयातील एका स्वच्छकाला 3 करोड रुपयांचे बक्षिस लागले, तो एका रात्रीत करोडपती झाला. लॉटरी म्हणजे विनाकष्टाचा पैसा आहे. आता कुणालाही कष्ट करायला नको, विनाकष्टाने पैसे कसे मिळविता येतील, यामागे आजची तरुण पिढी लागली आहे आणि आज रोजगार उपलब्ध नसल्यामुळे दिवसभर लॉटरीच्या दुकानावर तरुण मुले रेंगाळत असलेली आपल्याला पहावयास मिळतील. मागे असा प्रकार सुरु झाला होता की, टी.व्ही.च्या माध्यमातून अश्लिल चित्रपट दाखविले जात असत, वयस्कांसाठी असलेले चित्रपट दाखविले जात असत. अशा पध्दतीने नवीन पिढी बरबादीच्या मार्गावर ढकलली जात आहे. त्यांच्यासमोर कोणताही चांगला आदर्श उभा रहात नाही. एका बाजूला चंगळवाद आहे, पब संस्कृती वाढत आहे. पुण्यामध्ये एवढे पब सुरु झाले आहेत की त्यांच्यावर कुणाचेही नियंत्रण नाही. पुण्यामध्ये आय.टी.इंडस्ट्रिज आल्या आहेत, परप्रांतातील तरुण नोकरीला आहेत, चांगला पगार हातात येतो आहे, आई-वडिल

..3..........

श्री.अरविंद सावंत...........

लांब रहात आहेत, अशा परिस्थितीत पुण्यामध्ये पहाटेपर्यन्त पब सुरु असतात, बॉल डान्स सुरु असतात, प्रचंड पैसे उधळले जातात. त्यामुळे सरकारने अशा प्रकारचे बिल आणतांना गांभीर्याने या सर्व बाबींचा विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी ऑनलाईन लॉटरीचा विषय निघाला. अजूनही ही लॉटरी सुरु आहे. ग्लोबलायझेशनच्या नावाखाली मॉल संस्कृतीने शिरकाव केलेला आहेच, आता कॅसिनो येतील. आता आपण एस.ई.झेड.करावयास चाललो आहोत, त्या ठिकाणी अशा पध्दतीचे नवीन उपद्व्याप सुरु होणार आहेत. अशा रितीने आपण तरुण पिढीला कोणता आदर्श देणार आहोत ? भारत हा एक वेगळा देश आहे, आपल्या लोकशाहीबद्दल जगात बोलले जाते, विविध संस्कृतीचे, भाषेचे लोक या ठिकाणी एकत्र राहतात, अशा प्रकारची एक वेगळी अनुभूती लोकांना मिळत असते. या संस्कृतीवर पुढील काळात अतिक्रमण होणार आहे आणि या मुळ संस्कृतीचा -हास होणार आहे. म्हणून यावर नियंत्रण आणण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. सरकारला महसूल मिळणार आहे म्हणून तुम्ही हे करणार आहात काय ? आपल्या राज्यात सिक्किम राज्याची लॉटरी सुरु झाली. त्यावेळी या खात्याच्या सचिव श्रीमती कविता गुप्ता होत्या. तेंव्हा मी लॉट-यांच्यासंदर्भात बोललो आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..........

लॉटऱ्यांवर शासनाचे नियंत्रण नाही. यातून शासनाला महसूल मिळेल. देशी दारुच्या विक्रीतून महसूल मिळतो. रोजगार हमी योजनेच्या पैशांचा भ्रष्टाचार होतो. महाराष्ट्रातील भुमिपुत्रांना त्याचा लाभ होतो काय ? खास करुन रोजगार हमी योजनेतून रस्त्यांची कामे केली जातात. त्या ठिकाणी काम करणारा माणूस त्या गावातील असला पाहिजे. परंतु त्या गावातील माणसाला रोजगार मिळत नाही. कॉन्ट्रॅक्टर आणि बाहेरचे लोक रोजगार घेऊन जातात. लॉट-यांमधून मिळणारा महसूल सत्कारणी लावला तर चांगले होईल. या महसूलातून रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर यातून लोक बाहेर पडतील, ते काम आपण करावे. आपल्या राज्यामध्ये खोटया नोटा छापण्यास देखील सुरुवात झालेली आहे. नाशिक येथे खोटया नोटा पकडण्यात आल्या. कष्ट न करता पैसे मिळविण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सरकारी अधिकारी देखील असे सांगतात की, तुम्ही असे वागा म्हणजे तुम्हाला यातून पैसे मिळतील. आपण कन्ट्रोल करण्याचा प्रयत्न करतो त्याचे मी स्वागत करतो आणि माझे भाषण संपवितो.

--------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 2 वर कलम 2 (च) मध्ये असे म्हटलेले आहे की, "प्रवर्तक याचा अर्थ, लॉटरी आयोजित करणारे, चालविणारे किंवा तिचे प्रवर्तन करणारे कोणत्याही राज्याचे वा संघ राज्यक्षेत्राचे अथवा कोणत्याही देशाचे सरकार असा आहे....." याचा अर्थ परदेशातील लोक आपल्या प्रांतात लॉटऱ्या चालवू शकतील काय ? तसेच, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील कलम 10 मध्ये असे म्हटलेले आहे की, "..... ज्या वर्षात योजनेचे निर्धारण राहून गेले आहे किंवा योजना निर्धारण योग्य असेल त्यापेक्षा कमी दराने तिचे निर्धारण करण्यात आले आहे, त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीत, कोणत्याही वेळी, विहित केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, अशा योजनेच्या संबंधात प्रवर्तकाकडून देय असलेल्या कराचे, आपल्या संपूर्ण निर्णयशक्तीनुसार निर्धारण किंवा पुनर्निर्धारण करण्याची कार्यवाही करता येईल." कर भरला नाही किंवा चुकीची माहिती दिली, खरी माहिती लपवून ठेवली तर आपण काय करणार आहात ? तसेच, पुष्ठ क्रमांक 6 वरील कलम 12 (2)(क) मध्ये असे म्हटलेले आहे की, "निर्धारण आदेशाविरुद्धच्या अपिलात त्याला ते करनिर्धारण कायम करता येईल, कमी करता येईल, वाढविता येईल किंवा रद्द करता येईल." या कलमामुळे भ्रष्टाचार करण्यासाठी फार मोठा वाव आहे. एवढे अधिकार तुम्ही अपिल अधिका-यांना देणार आहात ? कनिष्ठ अधिका-याने निश्चित केलेला कर त्याला जास्त वाटला तर तो माणूस वरिष्ठ अधिका-याकडे जाईल आणि खालच्या अधिका-याने केलेली आकारणी कमी करुन आणेल. याच कलमामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "परंतु, अपील प्राधिकरणाला, निर्धारण आदेश रद्द करता येईल आणि नव्याने निर्धारण करण्याकरिता ते प्रकरण निर्धारण प्राधिका-याकडे परत पाठवता येईल. त्यानंतर, निर्धारण प्राधिकारी असे निर्धारण करण्याची कार्यवाही सुरु करील आणि अशा निर्धारणाच्या आधारे देय कराची रक्कम निश्चित करील." मग कनिष्ठ अधिका-याला का अधिकार दिले ? प्रत्येक माणूस अपील करील की, जो कर लावला आहे, माझ्याकडून जी कराची वसुली केली जात आहे ती बरोबर नाही. तो माणूस वरिष्ठ अधिका-याकडे जाऊन वाम मार्गाने कर कमी करुन घेईल.

त्यानंतर पुढे कलम 12 (2) (ख) मध्ये असे म्हटलेले आहे की, "परंतु, अपील प्राधिकरण, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, निर्धारित कराची रक्कम

..3........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

वाढविणार नाही किंवा कराच्या परताव्याची रक्कम कमी करणार नाही." जो माणूस अपील करेल त्याला तुम्ही संधी देणार की, अन्याय कसा झाला ? अधिका-याने त्याला बोलाविले पाहिजे की, तु चुकीचे निर्धारण केले आहे, चुकीचा कर लावला आहे याबाबत तुझे काय म्हणणे आहे. म्हणजे त्याच्या म्हणण्याला काही अर्थ राहणार नाही असा मुद्दा आहे. आपण शास्ती व जप्तीमध्ये असे म्हटलेले आहे की, "सर्व लॉटरी तिकिटे व प्रवर्तक ज्यांच्यामार्फत लॉटरी योजना चालवीत असेल किंवा त्यांची खरेदी-विक्री करीत असेल अशी लॉटरी केंद्र व सर्व्हर जप्त करील." परप्रांतातील लॉटऱ्यांचे एकही सर्व्हर येथे मिळत नाहीत. त्यांचे सर्व्हर त्या त्या प्रांतात असतात. त्यांनी त्या ठिकाणी ठेवलेले सर्व्हर तुम्ही कसे जप्त करणार आहात ? येथे त्यांचे सर्व्हर नाहीत.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

पृष्ठ 7 वर (3) मध्ये आपण म्हटले आहे की, "प्रवर्तकाने कोणत्याही व्यवहाराचा तपशील लपविलेला आहे किंवा त्याने कोणत्याही व्यवहाराचा चुकीचा तपशील दिलेला आहे असे निदर्शनास आले तर, आयुक्त, त्या प्रवर्तकास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, त्या व्यवहारावर देय असलेल्या कराव्यतिरिक्त, त्याच्याकडून त्या व्यवहारावर देय असलेल्या रकमेच्या तिप्पट रकमेएवढी शास्ती लादील." सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, येथे आपण केवळ तिप्पटच शास्ती का लावत आहात ? ती दुप्पट वा चौपट, पाचपट का केले नाही? किंवा त्याने जे काही लपविले असेल त्याच्या प्रपोर्शनेट ठेवले असते तरी चालले असते. म्हणजे 100 रूपये लपविले असतील तर 10 रूपये, 1 हजार रूपये लपविले असतील तर 100 रूपये एवढा दंड असे आपण करावयास पाहिजे होते. तेव्हा यामध्ये लूटमार झालेली आहे त्याचा उल्लेख सन्माननीय सद स्यांनी केला आहेच. सभापती महोदय, पृष्ठ 7 वर पुढे आपण म्हटलेले आहे की, वरील सगळे अपराध वा त्यापैकी एखादा अपराध घडला असेल त्याच्याबाबतीत ..."परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला आणि असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही." सभापती महोदय, आपण हे असे म्हटलेले असल्याने तुमचा हा सगळा कायदाच फुसका ठरणार आहे. कोणीही आपल्याला सांगेल की, हे माझ्याकडून नकळत झालेले आहे. जसा अगोदर राजी होतो आणि नंतर नामानिराळा झाला त्यालाच राजीनामा म्हणतात. तेव्हा आपण जे काही अपराध या मध्ये सांगितले आहेत त्याबाबत उद्या कोणीही म्हणेल की, माझ्याकडून हे चुकून झाले आहे, चुकून चूक झाली आहे, तेव्हा मला माफ करण्यात यावे. तेवहा ही पळवाट यामध्ये कशासाठी ठेवली आहे ? सभापती महोदय, सर्वात मोठे म्हणजे महाराष्ट्रात मुंबईमध्ये गल्लीबोळामध्ये देखील आता ऑन लाईन लॉटऱ्या सुरू झालेल्या आहेत. या संदर्भात माझी लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चाही होती. आता परप्रांतातील लॉटरीवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध नाहीत. पण ऑन लाईन लॉटरी, झटपट लॉटरी, संगणकाद्वारे काढलेली लॉटरी हे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू झालेले आहेत. त्या मध्ये तर जो नंबर लागत नाही तोच काढला जातो. ज्यावर कमी पैसे लावले जातात. 10 डिजिट असतील तर 9 डिजिट हाऊसफूल लावतात आणि मग एकच नंबरावर पैसे लावले जातात आणि

...... 4आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

तोच नेमका नंबर काढला जात नाही. असेही प्रकार केले जातात. सभापती महोदय, आपण आश्वासन दिले होत. रेल्वे स्टेशन, शाळा, कॉलेजेस, हॉटेल्स, मॉटेल्स, गजबजलेल्या वस्त्या, गार्डन, प्लेग्राऊंडस् जवळ हे असणार नाही. पण आपल्या शिवाजी पार्क जवळ अशी किती केंद्रे आहेत ? सिद्धी विनायक मंदिराजवळ किती आहेत ? म्हणून माझी विनंती आहे की, कायद्याची अमलबजावणी करीत असताना आपण या सगळ्या गोष्टींकडे, ज्यातून झटपट श्रीमंत होता येते, शॉर्टकटने श्रीमंत होता येते आणि मग त्यातून वाम मार्गाने आपली मुले, तरूण वर्ग जाऊ लागला आहे आणि त्यामुळे अनेक संसार उद्ध्वस्त झालेले आहेत. यातून आपण अनेक अपप्रवृत्तींना प्रोत्साहित करतो आहोत एवढे सांगतो आणि पृष्ठ 7 वर शेवटच्या पॅरामधून आपल्याला काय म्हणावयाचे आहे ? एवढेच विचारतो. धन्यवाद.

****

....... 4आय 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 96 - महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर विधेयक, 2006 आपल्यासमोर चर्चेसाठी आलेले आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितले की, कल्याण मटका बरा पण ही झटपट लॉटरी योग्य नाही, हे खरोखर बरोबर आहे. मी हे यासाठी बोलतो आहे की, माझ्या शेजारीच अशा प्रकारची ऑन लाईन लॉटरी सेंटर्स आहेत आणि त्यामधून किती कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत हे मी पाहिले आहे आणि पाहतो आहे. संपूर्ण पगारच्या पगार ही मंडळी तेथे घेऊन येतात. सकाळपासून त्या केंद्रांमध्ये असतात आणि संध्याकाळी त्यांच्या हातामध्ये काहीही राहत नाही. संपूर्ण पगार ती माणसे या लॉटरीच्या नादाने गमावून बसतात. आपण या झटपट लॉटरी बंद करण्यासाठी केंद्र सरकारकडे जाऊन, राज्य सरकारांकडे जाऊन विशेष काही प्रयत्न करणार आहात की नाही ? का झटपट लॉटरी बंद करता येत नाही म्हणून हात झटकणार आहात ? ....

( यानंतर श्री. सरफरे .....4जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

सभापती महोदय, पृष्ठ 9 वरील मजकुराकडे मी मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. त्यामध्ये मला काही कळले नाही. माझ्या ज्ञानामध्ये भर पडावी म्हणून मी त्यांना विचारतो.याठिकाणी 18 नंबरचा क्लॉज आहे त्यात म्हटले आहे की,"जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल". म्हणजे आपण नेमके काय करणार आहात? आपण यामध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमाच्या तरतुदीव्दारे किंवा तदन्वये कोणत्याही प्रवर्तकाकडून देय असलेली व वसूलीयोग्य असलेली कर, शास्ती, व्याज यांची किंवा अन्य कोणतीही रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ, ती रक्कम जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल".म्हणजे आपण नेमके काय करणार आहात ते सांगणे आवश्यक आहे. त्याच्या खालच्या क्लॉजमध्ये आपापसातील वाद मिटविण्यासाठी "आपसमेळ" असा शब्द वापरला आहे. याठिकाणी असे म्हटले आहे की, "अपराधाबाबत आपसमेळ म्हणून एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढी रक्कम स्वीकारता येईल". याचा अर्थ असा की, अपराध संगनमताने मिटविणे म्हणजे भ्रष्टाचाराला वाव देणे असा होतो. याठिकाणी असे म्हटले आहे की, "आयुक्तास, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठीची कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, जिच्यावर त्या अपराधाबाबत दोषारोप करण्यात आला असेल त्या व्यक्तीकडून, अपराधाबाबत आपसमेळ म्हणून एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल एवढी रक्कम स्वीकारता येईल". तेव्हा "आपसमेळ" या शब्दाचा अर्थ काय? पैसे घेऊन आपसात कॉम्प्रमाईज करणे. आज बऱ्याच प्रकारचे पैसे वसूल केले जातात. तेव्हा हे पैसे कसले घेतले? नेमके कोणते पैसे वसूल करणार ? हे कृपया आपण स्पष्ट करुन सांगावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला एकच सूचना करावयाची आहे. पृष्ठ 6 वर म्हटले आहे की, "या अधिनियमान्वये काढलेल्या प्रत्येक मूळ आदेशाविरुध्द आयुक्ताकडे अपील करता येईल".त्याचा कालावधी आपण याठिक्‍ाणी दिला आहे. साधारणपणे आपल्याला सेल्स टॅक्स व इन्कम टॅक्समध्ये नव्याने अपिलाची संधी दिल्यानंतर अपिलाचा निर्णय लवकर लागत नाही म्हणून त्याठिकाणी ती रक्कम अडकून पडते . त्याबाबत माझी सूचना आहे की, अपील करण्यासाठी 60 दिवसांचा कालावधी दिला आहे तो आपण कमी केला पाहिजे. दुसरी सूचना अशी आहे की, पृष्ठ क्रमांक 10 वर "ख" मध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमाखाली दाखल केलेल्या अपिलासाठी, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, जर विवादास्पद रक्कम एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढया किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक लावावा लागेल, आणि अन्य कोणत्याही अपिलासाठी, शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढया किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक लावावा लागेल". माझ्या कल्पनेप्रमाणे बाकीच्या टॅक्सेससंबंधी अपिलात जातांना बऱ्यापैकी रक्कम, साधारणपणे 25 टक्के रक्कम अगोदर भरावी लागते. त्यानंतर अपिलात जावे लागते. याचा गैरफायदा दुसऱ्या लोकांनी घेता कामा नये याची खबरदारी घेतली पाहिजे. अशावेळी विवाद झाला तर तो अपिलात जाईल, व ती रक्कम पेंडींग राहील, वर्षानुवर्षे ती रक्कम तशीच चालत राहील. एवढया दोन सूचना करुन माझ ो भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (अर्थ मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, दीपक सावंत, संजय केळकर यांनी या विधेयकावर आपली मते व्यक्त केली. या विधेयकाच्या प्रस्तावनेमध्ये मी बरीचशी माझी मते व्यक्त केली आहेत. त्यामुळे अधिक वेळ न घेता माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्दयांबाबत स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करतो.

सभापती महोदय, आपण याठिकाणी कर विषयक विधेयक आणीत आहोत त्यामध्ये मूळ उद्देश असा आहे की, पर ड्रॉ टॅक्स, सिंपल टॅक्स आहे. त्यामध्ये कॉम्प्लिकेशन्स फारश्या नाहीत. आपल्या राज्यामध्ये मिझोरामची लॉटरी विकणारे घाऊक विक्रेते आहेत.त्या लॉटरीचे या राज्यात पुढील आठवडयात दहा ड्रॉ होणार असतील, त्यामध्ये आठवडयाचा, पाक्षिक, मासिक आणि बंपर ड्रॉ असतील तर त्याबाबत एक आठवडयाअगोदर त्यांनी आपला टॅक्स भरला पाहिजे. कॉम्प्युटींग ऑफ टॅक्स, यामध्ये कॉम्प्लिकेशन्स फार कमी आहेत. मिनी ड्रॉ वर आपला टॅक्स आहे, हा अतिशय सिंपल टॅक्स आहे. लॉटरी चालवितांना वेगवेगळे गुन्हे होतात, वेगवेगळया गोष्टी होत असतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (पुढे सुरू....

उदाहरण द्यायचे झाले तर मिझोरामच्या लॉटरीचे देता येईल. त्यांच्या विकल्या जाणाऱ्या लॉटरीवरील नंबर वेगळे असतात आणि आपल्याकडे विकल्या जाणा-या लॉटरीवरील नंबर वेगळे टाकलेले असतात, असा अनुभव आलेला आहे. उदाहरणार्थ सिक्कीममध्ये 4,9,8 हे नंबर लागले असतील तर येथे 4,9,8 चे बेटिंग होते, अशा आपल्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. ड्रॉमध्ये नक्की कोणते नंबर्स आलेले आहेत याबद्दल काही समजत नाही. असे परराज्यातील लॉटऱ्यांच्याबाबतीत अनुभव आलेले आहेत. आपला प्रमुख उद्देश असा आहे की, लॉटरीवर टॅक्स लावायचा आहे. आपल्या राज्यातील लोकांचे ॲडिक्शन कमी व्हावे म्हणून लमसम टॅक्स लावावा,असा उद्देश आहे. यामुळे आता लॉटरीची ड्रॉची संख्या 460 वर आलेली आहे. ही संख्या कमी झालेली आहे. ड्रॉची संख्या कमी झाल्यामुळे ॲडिक्शन कमी होईल,अशी अपेक्षा आहे व तशाप्रकारचा कर्नाटक राज्याचा अनुभव आहे. त्यांचा अनुभव लक्षात घेऊन आपणही तसे करतो आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी दारूचे जसे गुत्ते असतात, त्याप्रमाणे गावागावामध्ये लॉटऱ्यांचे बुथ असल्याचे सांगितले. ते कमी करावयाचे असेल तर डेटरन्ट टॅक्स आणावा किंवा लॉटरीचा विषय क्लोज करावा. महाराष्ट्रातील लॉटऱ्या या आपल्या बुथवर विकत नाहीत तर परराज्यातील लॉटऱ्या विकण्याची संख्या वाढविलेली आहे. त्यांच्या बोर्डावर महाराष्ट्र राज्याच्या लॉटऱ्यांची संख्या कमी झाली आणि वेगवेगळ्या राज्यातील लॉटऱ्यांची संख्या वाढली आहे. आपले टारगेट हे दुसऱ्या राज्यातील लॉटऱ्यांची संख्या कमी झाली पाहिजे हे आहे. आपण कायद्याने परराज्यातील लॉटरी बंद करू शकत नाही. लॉटरी ऑपरेटरमध्ये आणि त्या राज्याच्या लॉटरीमध्ये दोष निर्माण झाले तर त्याच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी परराज्यातील लॉटरी आपल्या बोर्डावर घेऊन विकू नये, आपल्या राज्यातील लॉटरी विकावी म्हणून आपण लमसम टॅक्स लावलेला आहे. यामुळे परराज्यातील लॉटरींची संख्या कमी होईल. परराज्यातील लॉटऱ्या या राज्यात कमी संख्येने ड्रॉ काढायला लागतील.

दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, यामध्ये कराची थकबाकी राहिली तर आपण जमीन महसुलाची थकबाकी म्हणून जमीन महसूल वसुलीचे प्रोसिजर लागू करतो आहोत. यामुळे आणि कराची वसुली व्यवस्थितपणसे होईल. दुसरे आपसमेळच्याबाबतीत काही गुन्हे झाले, त्यामध्ये काही दोष निर्माण झाले तर कमीत कमी 1 लाख रुपयापर्यन्तचा दंडाची तरतूद केलेली आहे. कमीतकमी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ MHM/

श्री.जयंत पाटील (पुढे सुरू....

1 लाख रुपयापेक्षा कमी नसेल एवढया रक्कमेची तरतूद केलेली आहे. हा लॉटरी ॲक्ट नवा आहे. हा कायदा आणत असताना आपला हा प्रयत्न आहे की, बाहेरच्या राज्यातील लॉटरींची संख्या कमी व्हावी. म्हणून आपण "सिंपल टॅक्स" पध्दती आणत आहोत. त्यांना कोर्टामध्ये कायदेशीरपणाने जाता येऊ नये, हा यामागचा उद्देश आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

सभापती महोदय, हे सर्व करीत असताना आपला महत्वाचा उद्देश आहे की, आपल्या राज्यातील नव्या पिढीच्या मनामध्ये वेगळ्या स्वरुपाची कल्पना येऊन ते अॅडीक्ट होऊ नयेत, केंद्र शासनाच्या 1998 च्या लॉटरी विनियमन कायद्यानुसार व त्यातील कलम 2 (बी) नुसार महाराष्ट्र राज्याची ऑनलाईन लॉटरी बेकायदेशीर नाही. यातील लॉटरीच्या व्याख्येनुसार लॉटरीचा प्रकार (Form) ठरविण्याची मुभा राज्यास असल्यामुळे त्यानुसार शासनाने ऑनलाईन लॉटरी सुरु केलेली आहे. तसेच यातील कलम 3 नुसार विहित केलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करुन ऑनलाईन लॉटरी चालविली जाते. नियम 4 (बी) नुसार ऑनलाईन लॉटरीच्या तिकिटावर महाराष्ट्र राज्य लॉटरीचे बोधचिन्ह व सचिव, वित्त विभाग यांची स्वाक्षरी छापलेली असते. तसेच ऑनलाईन लॉटरीच्या पध्दतीनुसार संबंधित तिकीट किरकोळ विक्रेत्याच्या संगणक चलित टर्मिनलवर थर्मल प्रिंटींगव्दारे ग्राहकाच्या मागणीनुसार छापल्या जातात. सदर प्रक्रिया निर्दोष असल्याबाबत राज्य शासनाने नेमलेले सिस्टीम ऑडीटर्स देखरेख करीत असतात व कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आल्यास त्याबाबत विभागास तात्काळ कळवितात.

श्री. दिवाकर रावते : आपण राज्याच्या ऑनलाईन लॉटरीचे ड्रॉ किती वेळा काढतो ?

श्री. जयंत पाटील : यामध्ये दोन प्रकार आहेत. एक म्हणजे पेपर लॉटरी आहे. पण हळूहळू इंटरनेटवर लॉटरी सेल करतो. त्यानंतर ऑनलाईन लॉटरी आहे. राज्यातील कोणत्याही टर्मिनलवरुन आपण ते नंबर फीड करु शकतो. त्याचे कुपन्स त्याला मिळतात. ऑनलाईन लॉटरीमध्ये दोन डिजीट ड्रॉ, तीन डिजीट ड्रॉ तसेच जनरल ड्रॉ आणि साप्ताहिक ड्रॉ असे प्रकार असतात.

श्री. दिवाकर रावते : मला जर ऑनलाईन लॉटरी लावावयाची असेल आणि मी सकाळपासून त्या ठिकाणी उभा राहिलो तर कितीवेळा लॉटरी लावू शकतो ?

श्री. जयंत पाटील : इंटरनेट लॉटरी पंधरा मिनिटांनी असते. या सगळ्या लॉटरीजना कॉम्पीट करणारी ऑनलाईन लॉटरी आली. त्यामध्ये दिवसभरात किती ड्रॉ अरेंज करतात हे माहीत नाही. परंतु ती संख्या बऱ्यापैकी असते असा अंदाज आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : मला आपल्याला कळकळीने सांगावयाचे आहे. ही लॉटरी महाराष्ट्र राज्याची आहे. इतर राज्याची लॉटरी आपल्याला बंद करता येत नाही परंतु महाराष्ट्र राज्याची लॉटरी आपल्याला बंद करता येईल. मग कशाला आपण हजारो, लाखो संसाराची माती करता ? ते पैसे कशाला राज्याला हवेत ? मी आपल्याला हात जोडून सांगतो. बाहेरच्या राज्याच्या लॉटरीच्या बाबतीत तुम्हाला अधिकार नाही पण आपल्या राज्याच्या लॉटरीच्या बाबतीत अधिकार आहे. परभणीचे सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. त्या ठिकाणी गाडीवर जुगार चालू झ ालेला आहे. अशी भयानक परिस्थिती आहे. यथा राजा तथा प्रजा या म्हणीप्रमाणे आपण लॉटरी सुरु केलेली आहे आणि राज्याला पैसे पाहिजेत म्हणून आपण लॉटरी लावली तर काय बिघडते असे लोकांना वाटते. राज्याची लॉटरी बंद करा. तो रेव्हेन्यू मिळाला नाही तर काय फरक पडतो ?

श्री. जयंत पाटील : राज्याची ऑनलाईन लॉटरी बंद झालेली आहे. इंटरनेटवर जे विकतात ते आपल्याच राज्याची लॉटरी विकतात असे नाही. त्या ठिकाणी सर्व राज्यांच्या लॉटऱ्या मिळतात. आपली ऑनलाईन लॉटरी बंद केली तरी सिक्किमची ऑनलाईन लॉटरी चालू आहे. बऱ्याच राज्यांच्या ऑनलाईन लॉटऱ्या या राज्यामध्ये चालू आहेत.

श्री. अरविंद सावंत : इंटरनेटवर लॉटरी मिळत असेल तर त्यांचे आय.पी.ए.शोधून ते ब्लॉक करता येतील. त्यांचा सोर्स कोठेही असला तरी महाराष्ट्रामध्ये इंटरनेटवर लॉटऱ्या मिळतात ते आपण ब्लॉक करु शकतो.

श्री. जयंत पाटील : कायद्यामध्ये आपण लॉटरीवर बॅन केल्याशिवाय दुसऱ्यांना रोखू करु शकत नाही.

श्री. अरविंद सावंत : आम्ही सातत्याने ऑनलाईन लॉटरीबाबत बोलत आहे.

श्री. जयंत पाटील : आपला जो उद्देश आहे तो या डिटरंट टॅक्समुळे सफल होणार आहे. सध्या जे अॅडीक्शन होते ते कमी होईल. आता महाराष्ट्रात 3 हजार ड्रॉ निघत असतील तर त्यांची संख्या 200 ते 400 पर्यन्त खाली येईल. त्यांना दर 15 मिनिटाला ड्रॉ परवडणार नाही. कारण प्रत्येक ड्रॉसाठी 50 हजार रुपये भरल्याशिवाय त्यांना ड्रॉ काढता येणार नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : मी इंटरनेटवरील लॉटरीबाबत विचारले होते.

श्री. जयंत पाटील : उदा. अरुणाचलची लॉटरी विकणारा एजण्ट आपल्याकडे असेल तर त्याने आपल्याला एका आठवड्यामध्ये तो जितके ड्रॉ काढील त्याचे लमसम पैसे राज्य शासनाला दिले पाहिजेत. त्याशिवाय तो ड्रॉ सेल करु शकणार नाही.

श्री. अरविंद सावंत : पेपर लॉटरीचे तिकीट मिळते ते त्या राज्याचा जो कोणी प्रवर्तक किंवा एजण्ट असेल त्याच्याकडून घेतले जाते. त्याच्याकडून आपण पैसे घेऊ शकतो. परंतु इंटरनेटवरुन जी डायरेक्ट लॉटरी येणार आहे ती लॉटरी तुम्ही ब्लॉक करु शकत नाही आणि त्यापासून तुम्हाला रेव्हेन्यू मिळणार नाही. शासनाने आपली ऑन लाईन लॉटरी बंद केली तशी इंटरनेटवरील लॉटरी देखील बंद करावी असा माझा मुद्दा आहे.

श्री. जयंत पाटील : हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर राज्याला लॉटरी ऑपरेटरकडून सर्व रेकॉर्ड मागवण्याचे अधिकार प्राप्त होतील आणि त्यांच्यावर व्हिजिलन्स ठेवण्याचे अधिकारही प्राप्त होतील.

श्री. मधुकर चव्हाण : विधेयकाच्या खंड 16मध्ये "अशी व्यक्ती या अधिनियमान्वये कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही" असे म्हटलेले आहे. अशा व्यक्तीस शिक्षा का करण्यात येणार नाही ?

श्री. जयंत पाटील : यामध्ये लहान लहान स्वरुपाचे अनेक गुन्हे होत असतात. आपला टॅक्सचा गुन्हा होत नाही. पण लॉटरी ऑपरेट करण्याच्या संदर्भात जो कायदा केलेला आहे त्याबद्दल त्याने काही एरर्स केल्या तर त्याबाबतीत माफी देण्याची तरतूद आहे. मानयर एरर्स् होऊ नयेत यासाठी ती तरतूद केलेली आहे. तेव्हा सभागृहाने हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 25 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006चे वि.स.वि.क्रमांक 96 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006चे वि.स.वि.क्रमांक 96 संमत झाले आहे.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती.

**मु.शी.**: राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय केळकर, परशुराम उपरकर,वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

राज्यात गेल्या 2-3 महिन्यात स्फोटकांचे साठे सापडणे, ही स्फोटके आणणारे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणारे आरोपी पकडले न जाणे, आरोपीवर 90 दिवसात आरोपपत्र दाखल न झाल्यामुळे निर्दोष सुटणे, परिणामत: बॉम्बस्फोट करण्यासाठी इतरांना प्रोत्साहन मिळणे, अतिरेक्यांच्या पाठिंब्यामुळे राज्याच्या विविध भागात दंगली होणे, लोकसंख्येच्या तुलनेत पोलीस स्टेशनची व कर्मचाऱ्यांची संख्या कमी असणे, त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेवर परिणाम होणे, अकार्यक्षम पोलीस अधिकाऱ्यांना बढती व कार्यक्षम अधिकाऱ्यांना दुय्यम दर्जाचे स्थान यामुळे प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्यांपवर अन्याय होणे, केंद्रीय गृहखाते व महाराष्ट्रातील गृह खाते यांचा परस्परांशी संबंध नसणे, कायदा व सुव्यवस्था व बॉम्बस्फोटासंबंधी गृह खात्यातील उच्चपदस्थ पोलीस अधिकारी, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री व काही मंत्र्यांमध्ये एकवाक्यता नसणे, देशाबाहेर फरार असलेल्या गुन्हेगारांनी मुंबईत येऊन दंगली भडकविणे, अतिरेक्यांनी मुंबईवर कब्जा केल्याची भावना निर्माण होणे, बॉम्बस्फोटात मृत झालेल्या तसेच जखमी झालेल्या व्यक्तींनी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य वेळेवर न मिळणे, बॉम्बस्फोटातील मृतांच्या आप्तांना शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणतेही ठोस धोरण नसणे, मुंबई-गोवा महामार्गावर अलिकडच्या काळात एस.टी.बसेस, खाजगी बसेसवर पडलेले दरोडे तसेच कोकण रेल्वेच्या गाडयांमध्ये घुसून प्रवाशांना लुटण्याचे वाढते प्रकार, मुंबईतील बँका व दुकाने लुटण्याचे वाढलेले प्रकार, वाढत्या वाहन चोऱ्या, एस.आर.ए.योजनेत गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा वाढता हस्तक्षेप, झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना धाकदडपशाहीने हुसकावण्याचे वाढते प्रकार, सरकारी व खाजगी जमिनीवर बनावट झोपडपट्टया दाखवून त्याचा एस.आर.ए.योजनेत समावेश करणे, दलित बांधवांनी केलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

आंदोलनात समाजकंटकांनी भाग घेऊन सार्वजनिक मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान करणे, या सर्व परिस्थितीमुळे राज्यातील आम जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात या राज्यातील कायदा व सुव्यवस्था यासंबंधीची चर्चा करण्याची पाळी आमच्यावर गेल्या अनेक वर्षापासून येत आहे. हा महाराष्ट्र खरोखरीच सुरक्षित आहे का? हा महाराष्ट्र आतंकवाद्यांचा अड्डा बनला आहे का? महाराष्ट्रामध्ये शेकडो किलो आरडीएक्स आणून ठेवले आहे का? कधीकधी या महाराष्ट्रातील सद्यपरिस्थिती पाहता महाराष्ट्र राज्य गवताच्या गंजीवर उभे आहे आणि एक ठिणगी पडायचा अवकाश इतकी स्फोटक परिस्थिती महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांमध्ये निर्माण झाली आहे. याची कारणे अनेक आहेत. 1993 साली या राज्यामध्ये बॉम्बस्फोट झाले. मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले. तेव्हापासून बॉम्बस्फोटाची मालिका या राज्यामध्ये सुरु झाली. 1993 पासून आजपर्यंत 100 पेक्षा अधिक बॉम्बस्फोटाच्या घटना या राज्यामध्ये झाल्या आणि शेकडो निरपराध लोक मारले गेले, हजारो कायमचे अपंग झाले, असंख्य संसार उजाडले गेले. परंतु एकाही दशहतवाद्याला आजपर्यंत शिक्षा झालेली नाही. मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटाचा खटला 13 वर्षे चालला. 13 वर्षानंतर अजूनही आरोपींचे गुन्हे सिध्द झाले असले तरी शिक्षा अद्याप व्हावयाची आहे. 13-13 वर्षे होऊनही बॉम्बस्फोटाच्या खटल्याचा निकाल लागत नसेल तर जनतेला न्याय कसा मिळणार?

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदया, घाटकोपरमध्ये बसमध्ये बॉम्बस्फोट झाला होता त्यामध्ये सुध्दा बरेच प्रवासी मृत्युमुखी पडले. हे बॉम्बस्फोट करणारे आतंकवादी पकडले गेले पंरतु सबळ पुराव्या अभावी कोर्टातून सुटले गेले. या बॉम्बस्फोटात पोलिसांनी जर पुरावे, साक्षी योग्य प्रकारे कोर्टाच्या समोर सादर केले असते तर बॉम्बस्फोटातील हे आंतकवादी सुटू शकले नसते. या घटनेच्या संदर्भात पोलिसांनी योग्य प्रकारे काम न केल्यामुळेच बॉम्बस्फोटातील आरोपी सबळ पुराव्या अभावी कोर्टातून मोकळे सुटले.

सभापती महोदया, 1993 च्या बॉम्बस्फोटानंतर 11 जुलै, 2006 रोजी मुंबईतील लोकल गाडयांमध्ये सायंकाळी 6.00 वाजेनंतर एकामागून एक असे 9-10 बॉम्बस्फोट, एक दोन मिनिटाच्या अंतराने झाले. हा जो दिवस होता तो खरे म्हणजे दुर्दैवी दिवस होता. या बॉम्बस्फोटात शेकडो प्रवासी मृत्युमुखी पडले, हजारो प्रवासी जखमी झाले. या बॉम्बस्फोटात 8 सप्टेंबर रोजी काही आरोपींना पकडण्यात आल्याचे नाटक पोलिसांनी केले. दिनांक 8 सप्टेंबर, 2006 रोजी मालेगाव येथील एका मस्जिदमध्ये बॉम्बस्फोट झाला व या बॉम्बस्फोटामध्ये सुध्दा चाळीस एक मुस्लीम बांधव मारले गेले. हा बॉम्बस्फोट कसा झाला यासंदर्भात एक चौकशी समिती नेमली गेली. मस्जिद आणि बॉम्बस्फोटाचे अंतर हे काही फार नव्हते. ज्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाला होता त्या ठिकाणी मी स्वत: भेट दिलेली आहे. हा बॉम्बस्फोट मशिदीच्या दरवाजावरच करण्यात आला होता. ज्या दिवशी हा बॉम्बस्फोट झाला त्या दिवशी या मस्जिद मध्ये "बडी रात" हा मुस्लीम बांधवाचा एक सण असतो. या कार्यक्रमासाठी संपूर्ण हिंदुस्थानच्या कानाकोप-यातून मोठया प्रमाणात मुस्लीम बांधव एकत्र जमत असतात. मुंबई, मालेगाव येथे जे बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये जे आरोपी पकडण्यात आलेले आहेत ते खरे आरोपी पकडण्यात आलेले नाही. सभापती महोदया, मालेगावच्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात तेथील पोलीस अधिकारी आणि गृहखात्याचे अधिकारी यांची एक समिति नेमली गेली. या समितीने या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात एक रिपोर्ट दिलेला आहे. त्या समितीच्या रिपोर्टमध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, अजून 6 किलो आरडीएक्स मालेगावमध्ये साठविलेले आहे. सभापती महोदया, मुंबई, मालेगाव येथे जे बॉम्बस्फोट झाले त्याची सूचना पोलिसांना नव्हती का? माझ्या हातात दिल्लीच्या आय.बी.चा रिपोर्ट आहे. दिल्लीच्या आय.बी. ने मुंबईच्या पोलीस कमिशनरांना दि. 18 जुलै, 2006 रोजी एक फॅक्स केला

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

होता व त्या फॅक्समध्ये स्पष्ट म्हटले होते की, "आतंकवाद्यांनी बॉम्बस्फोटाची तयारी केलेली आहे. "The Let has planned to target markets, public places and public transport system in major cities like Delhi, Mumbai and Kolkatta" सभापती महोदया, एवढेच सांगून ते थांबले नाही तर त्यांनी पुढे असे म्हटले होते की, "The Let interest in targeting IT industry has been revived and a fresh survey is to be undertaken to identify software industry targets in South India particularly Bangalore" सभापती महोदया, दिल्लीच्या आय.बी.ने हा फॅक्स मुंबई, कलकत्ता आणि मद्रासच्या पोलीस कमिशनरांना सुध्दा पाठविला होता. दिल्लीच्या आय.बी. ने स्पष्ट सांगितले होते की, " आतंकवादी केव्हांही बॉम्बस्फोट करु शकतात. त्यामुळे तुम्ही जागरुक राहिले पाहिजे. विद्युत प्रकल्प, ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात रहदारी आहे अशा ठिकाणी, इरिगेशन प्रोजेक्टवर आतंकवादी बॉम्बस्फोट करु शकतात" असे दिल्लीच्या आय.बी.ने सांगितले होते. सभापती महोदया, या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात मी ज्यावेळेस आरोप केला होता,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

त्यावेळी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी सांगितले की, आम्हाला अशाप्रकारचा फॅक्स आला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्हाला अशा आशयाचा कोणताही फॅक्स आलेला नाही. माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, "हो, आमच्याकडे अशा आशयाचा फॅक्स आलेला आहे." महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आणि मुंबईचे पोलीस आयुक्त यांच्यात समन्वय कसा आहे हे यावरुन दिसून येते. संवेदनशील विषयाबाबत राज्य सरकार आणि पोलीस दल किती असंवेदनशील आहे हे दिसून येते.

सभापती महोदया, नागपूर येथे राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यालयावर हल्ला होणार होता. त्या संदर्भातील सूचना नागपूर पोलिसांना मिळाली. त्यांनी तत्परतेने कार्यवाही करुन शंभर फुटाच्या अंतरावर त्या अतिरेक्यांची - दहशदवाद्यांची गाडी अडविली आणि त्यांना जागीच ठार केले. नागपूर पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पोलिसांची शान वाढविण्याचे काम नागपूरच्या पोलिसांनी केलेले आहे. पण त्या पोलिसांना राज्य सरकारने काय इनाम दिले ? उलट गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी नागपूरच्या पोलिसांसाठी दहा लाख रुपयाचें इनाम दिले. नागपूरचे पोलीस दल आणखी सक्षम करण्यासाठी दहा लाख रुपये दिले. जून महिन्यात ही घटना घडली, आता डिसेंबर महिना सुरु आहे. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले इनाम नागपूर पोलिसांना मिळाले नाही, परंतु गुजरात राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले दहा लाख रुपये सुध्दा त्यांना देण्यात आलेले नाहीत. मग हे पैसे गेले कुठे ? काल विधानसभेत औचित्याच्या मुद्याद्वारे हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी सरकार खडबडून जागे झाले आणि त्यांनी हे पैसे नागपूर पोलिसांनी दिले नसल्याचे कबूल केले. सरकार पोलीस विभागाबाबत इतके उदासीन का आहे ? या राज्यात हे काय चालू आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदया, मागील अधिवेशनात भिवंडी येथे दंगल झाली त्या संदर्भात सरकारच्या लॉ ॲन्ड ऑर्डर विषयी मी बोललो होतो. भिवंडी येथे दंगल का झाली ? खरे म्हणजे भिवंडी येथे ज्या ठिकाणी पोलीस चौकी उभी करायची होती ती जागा सरकारची, बांधकाम सरकारचे, मग या बांधकामास विरोध करणारे कोण ? माननीय उपसभापती यांच्या स्थानिक निधीतून तेथे पोलीस चौकीचे बांधकाम करण्यात येत होते. हे बांधकाम अडविण्यात आले. "यहाँ पोलीस चौकी नही चलेगी". त्यानंतर तेथे दंगल उसळली आणि एका गटाने दोन पोलिसांची निर्घृणपणे हत्या केली. त्याठिकाणी एक दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. काही पुढाऱ्यांचे नाव घ्यायला हरकत नाही. श्री.अबु आझमी यांनी त्याठिक्‌ाणी जाऊन मुक्ताफळे उधळली की मशिद, मदरसांमध्ये पोलिसांना पाय ठेवू देणार नाही, जर असे प्रकार झाले तर मुस्लिम तरुण आय.ए.एस.चे हस्तक होतील, 20 कोटी मुस्लिम रस्त्यावर उतरतील, मग त्यांना कोणीही रोखू शकणार नाही. महाराष्ट्रातील जनतेला अशाप्रकारे जर कोणी चॅलेंज देणार असेल आणि त्याची रिॲक्शन होऊन उर्वरित हिंदू समाज रस्त्यावर उतरला असता तर या राज्याची काय अवस्था झाली असती ? अशाप्रकारे चिथावणीखोर वक्तव्य करणाऱ्या श्री.अबु आझमी यांचेवर सरकारने कोणती कारवाई केली ? या संदर्भात झ ालेल्या चर्चेच्यावेळी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले होते की, "शासन कोणाचीही गय करणार नाही, कोणालाही पाठिशी घालणार नाही," मग श्री.अबु आझमी यांना का अटक झाली नाही ? सभापती महोदया, मॉसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न झ ाला. त्यावेळी सुध्दा अशाचप्रकारच्या धमक्या दिल्या गेल्या. या राज्यात काय चालले आहे ते समजत नाही. अशाप्रकारची वक्तव्ये करणाऱ्यांना बळ कोठून मिळते ?

सभापती महोदया, या राज्यात पश्चिम बंगाल, कलकत्ता येथून रोज मोठ्या प्रमाणावर बांग्लादेशी नागरिक येत आहेत. मुंबईची जमीन त्यांना मोकळे रान वाटत आहे.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

कोणीही यावे आणि आमच्या मुंबईमध्ये येऊन बसावे, कितीही दिवस रहावे ? हे काय चालले आहे ? त्यांना कोणीच पासपोर्ट विचारत नाही, कसलेही सर्टीफिकेट विचारत नाही, आयडेंटीटी कार्ड विचारत नाही. आज हिंदुस्थानला एकप्रकारे धर्मशाळेचे स्वरुप आले आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्र राज्यालाच टारगेट केले जात आहे. परंतु हे सर्व रोखण्यास कोणीही तयार नाही. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेधानामध्ये माहिती देण्यात आली की, देशामध्ये घुसखोरी करण्यामध्ये 1 कोटी बांगलादेशी होते. अशाप्रकारे जर बांगलादेशातून आतंकवादी शस्त्रास्त्रे आणत असतील, आरडीएक्स आणत असतील व...(अडथळा) सभापती महादेय, त्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये कारवाया सुरु राहणार असतील तर त्यातून महाराष्ट्रातील जनतेचे आरोग्य बिघडणार नाही का ? परंतु आपले पोलीस खाते कुठे आहे ? आपल्या पोलीस खात्याची शान-मान जगामध्ये आहे. एकवेळ महाराष्ट्राच्या विशेषत: मुंबईच्या पोलिसांची शान होती. परंतु गेल्या 5-7 वर्षापासून महाराष्ट्रातील वातावरण बिघडत आहे व पोलिसांची जी कर्तव्ये आहेत, ती आज धुळीला मिळाल्याचे आपल्याला दिसून येत आहेत. आज मुंबईमध्ये अशाप्रकारे आंतकवाद्यांकडून आरडीएक्स, शस्त्रास्त्रे पकडले जात आहेत. परंतु त्यासंदर्भात आपण किती लोकांना शिक्षा केल्या ? आज महाराष्ट्र आणि मुंबई आतंकवाद्यांनी, अतिरेक्यांनी आपला अड्डा बनवला असून तिकडे आपण हतबलतेने पाहत आहोत. आज महाराष्ट्रातील जनतेचे जनजीवन सुरक्षित नाही. आज महाराष्ट्र राज्यामध्ये ठिकठिकाणची दरोडयाचे प्रमाण वाढले आहे. याठिकाणी माननीय गृहमंत्री आपल्या उत्तरामध्ये सांगतील की, 1995 च्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. माननीय उपमुख्यमंत्री, नेहमीच आकडेवारी देतात. परंतु त्यांनी घोडा मारला म्हणून आपण रेडा मारणार आहात का ? माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आपण चांगले बोलता, चांगले वागता, चांगल्या पध्दतीने विचार करता, परंतु खरेच आपले विचार या राज्यामध्ये कार्यान्वित होतात का ? माननीय आर.आर.पाटील, गृहमंत्री झाले आणि या राज्यामध्ये बलात्काराचे प्रमाण वाढले, या राज्यामध्ये दलितांवरील अन्याय आणि अत्याचार वाढले. या राज्यामध्ये बलात्कार कोणी करावे ? शरमेने मान खाली घालावी, अशा गोष्टी आज पोलीस खात्याकडूनच होत आहेत. कुंपणच जर शेत खात असेल तर महाराष्ट्रातील जनतेने न्याय कोणाकडे मागावा ? मंत्रालयापासून केवळ 500 मीटर अंतरावरील मरिन ड्राईव्ह पोलीस चौकीमध्ये एका पोलीस हेड कॉन्सिस्टेबलने भर दुपारी 3.00 वाजता एका तरुण मुलीवर पोलीस

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

चौकीमध्ये कोंडून बलात्कार केला. असे जर ज्यांनी संरक्षण करावयाचे त्या पोलिसांकडून होत असेल तर न्याय कोणाकडे मागायचा ? एकामागोमाग एक अशा प्रकारची प्रकरणे घडत आहेत. सभापती महोदय, अशाप्रकारची घटना सांताक्रुझ स्टेशनवरही घडली. तसेच, माझ्या तालुक्यात काल संध्याकाळीच एक घटना घडली. माझ्या अकोला जिल्हयातील आसोला गावामध्ये श्रीमती राजकन्या पारसकर नावाच्या 28 वर्षीय महिला, नवऱ्याने सोडून दिल्यामुळे 2-3 महिन्यांपासून त्या गावात राहत होती. परंतु काल संध्याकाळी 6.30 वाजता तिला घरी एकटी पाहून तेथील पोलीस जमादार श्री.निरंजन, बक्कल नंबर 215 याने तिची असहयता पाहून, तिची गरिबी पाहून त्या महिलेवर दोन वेळा बलात्कार केला. ज्यावेळी त्या महिलेने आरडाओरड केली, त्यावेळी गावातील लोकांनी त्याचे कपडे उतरविले व त्याची गावामध्ये धींड काढली. त्यानंतर त्याला पोलीस स्टेशनमध्ये जमा केले. सभापती महोदय, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने समाधानाची गोष्ट आहे का ? अशाप्रकारचे वर्तन आज पोलिसांकडून वारंवार होत आहे. सभापती महोदय, वास्तविक ही घटना

नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...( पुढे सुरु )

सभापती महोदय, या ठिकाणी मी काही व्यावसायिक संस्थांची नावे आपल्याला वाचून दाखवितो. हॉटेल साई पॅलेस, रंगोली, साई डेअरी, तात्या सोसायटी असे काही प्रकल्प त्यांनी उभे केले. ती जमीन कोणाची होती ? ती जमीन सरकारची होती, अशाप्रकारे श्री. संतोष चौधरी यांनी बेनामी प्रॉपर्टी उभी करुन संपूर्ण भुसावळ शहराला वेठीला धरण्याचे काम केले. त्यांना जर पाठीशी घातले नसते तर कदाचित आज भुसावळची दंगल घडली नसती. भुसावळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद आहे. भुसावळ एक्सचेंज गुन्हा रजीस्टर नं. 146/1993 सालचा गुन्हा आहे. कलम नंबर 341, 323, 504 भारतीय दंडविधान गुन्हा क्रमांक 197, 147, 148, 149, 324 आर्म ॲक्टतर्फे गुन्हा दाखल झाला. गुन्हा क्रमांक 90/2147, 148, 149, 341, 506 गुन्हा क्रमांक 118/2001, 143, 147, 149, 232, 354, 506 गुन्हा क्रमांक 71/2004, 341, 323, 504, 506 भारती दंड विधान गुन्हा क्रमांक 21/2004, 143, 147, 148, 149, 395, 307, 323, 504, 506 बाजार पेठ पोलीस स्टेशमध्ये गुन्हा क्रमांक 89, 204 भारतीय दंड विधान 504, 506, अदखलपात्र गुन्हे जे आहेत ते वेगळेच आहेत, हे तर दखलपात्र गुन्हे आहेत. एवढे गुन्हे या आमदार महोदयांवर आहेत. त्यांचे दुसरे बंधु श्री. अनिल चौधरी यांच्यावर गुन्हा क्रमांक 52/92, 353, 323, 504 गुन्हा क्रमांक 90/2000 कलम 147, 148,149, 340, 576 भारतीय दंड विधान 118 गुन्हा क्रमांक 2001 कलम नंबर 143, 147, 149, 323, 504, 506 गुन्हा रजिस्टर नंबर 33/2000 सालचा 143, 147, 323, 504, 506 गुन्हा क्रमांक 88, 364, 143, 147, 148, 149, 323, गुन्हा क्रमांक 89/2000 सालचा 307, 323, 504 506 गुन्हा क्रमांक 21/2004, 143, 147, 148, 149, 315, 307, 323, 504, भुसावळ तालुक्यात गुन्हा क्रमांक 19/2004, 353, 332, 323, 504, 506, 186 भारतीय दंड विधान. इतके गुन्हे रजिस्टर झ ाले. त्या ठिकाणचा श्री. पातोडे नावाचा जो फौजदार आहे तो या सर्व दंगलीला जबाबदार आहे. या फौजदाराने हे सर्व गुन्हे पाठीशी घातले आहेत. त्याने जनतेचे संरक्षण केले नाही. गावामाध्ये अनैतिक धंदे चालू आहेत, अवैध दारु चालू आहे. गावामध्ये ब्राऊन शुगर विकली जाते. गावामध्ये नकली नोटा पकडल्या जातात, या सर्व धंद्याना संरक्षण देणारे अधिकारी श्री. पातोडे आहेत.

4S-2

श्री. पांडुरंग फुंडकर....

श्री. पातोडे यांच्याविरुध्द कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भारतीय जनता पार्टी, इतर सर्व दलित संधटनांनी कमीतकमी दोन हजार तक्रारी दाखल केल्या असल्या तरी उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी त्यांची बदली केलेली नाही. श्री. पातोडे यांनी पोलीस अधिकाऱ्यांना पत्र देऊन श्री. अनिल चौधरी, यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, असे कळविले आहे.

यानंतर श्री. रोझेकर...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

श्री.अनिल चौधरी हे राष्ट्रवादी काँग्रेसचे जळगाव जिल्हयाचे उपाध्यक्ष आहेत. त्यांना संरक्षण देण्यात यावे अशा प्रकारचे पत्र जिल्हयाच्या पोलीस अधिक्षकांना लिहिण्यात आले आहे. श्री.संतोष छबिलदास चौधरी व श्री.अनिल छबिलदास चौधरी यांच्यावर तडीपारीचा गुन्हा दाखल करावा अशा प्रकारचा प्रस्ताव जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे जिल्हा पोलीस उपअधीक्षकांनी पाठविला आहे. ते पत्र मी या ठिकाणी कोट करणार आहे. पत्र श्री.अरुणसिंह परिहार, पोलीस निरिक्षक, बाजारपेठ पोलीस स्टेशन, भुसावळ यांनी माननीय उपविभागीय दंडाधिकारी, भाग भुसावळ यांना उद्देशून लिहिले आहे. पत्रातील मजकूर पुढील प्रमाणे आहे. "पोलीस स्टेशन-भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन जिल्हा जळगाव, हद्दपार प्रस्ताव क्रमांक व कलम - 1/2004 मु.पो.अधिनियम कलम 56 ब प्रमाणे, निवेदक - पोलीस निरिक्षक, अरुणसिंह दिलीपसिंह परिहार, भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन, सामानेवालाचे नाव व पत्ता - संतोष छबिलदास चौधरी, वय 36, राहणार शनिमंदीर वॉर्ड, भुसावळ, खुलासा-यातील सामनेवाला हा आपल्या अधिकार क्षेत्रातील भुसावळ शहरातील न्यु एरिया वॉर्डात राहणार असून शरीराविरुध्दचे गुन्हे करण्याचे सवयीचा आहे. आपल्या हिंसक वृत्तीला व दादागीरीला प्रतिबंध बसु नये म्हणून राजकीय फायदा उचलण्यासाठी युतीचे (भाजपा-शिवसेना पक्षाचे) सरकार असताना शिवसेना या पक्षात होता. आता आघाडी सरकार काँग्रेस आय - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शासन) असल्याचा फायदा घेवून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेला आहे. सामनेवाला हा राष्ट्रवादी काँग्रेसचा नगरसेवक या पदावर कार्यरत असून सक्रिय कार्यकर्ता आहे. सामनेवाला हा आपल्या साथीदार व लहान भाऊ अनिल चौधरी, मावसभाऊ अशोक चौधरी, उमेश नेमाडे, संतोष उर्फ दाढी चौधरी अशांसह नेहमी लायसन्सधारी रिव्हाल्वर, तलवार, चॉपर, हॉकीस्टिक, लोखंडी चेनसारखी प्राणघातक शस्त्रे जवळ बाळगून सर्वसामान्य जनतेवर हल्ला करुन व धाकदपटशा करुन दहशत निर्माण करुन सार्वजनिक शांतता धोक्यात आणतात व आपले वर्चस्व निर्माण करतात. सामनेवाला हा भुसावळ शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती असल्याचा आव आणून वेळप्रसंगी शरीराविरुध्द व सार्वजनिक शांतताभंग करण्याचे म्हणजेच दंगलीसारखे गुन्हे तसेच सरकारी नोकरांवर कर्तव्य करीत असतांना मारहाण करुन त्याचेवर देखील दहशत निर्माण करण्याची सवय आहे. सुमारे सात आठ वर्षापूर्वी सर्वसाधारण भाजीपाल्याचा व्यवसाय करणारा आजमितीला अमाप पैसा संपत्ती जमा करुन लोकांवर दहशत निर्माण करीत असतो. त्याचे

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर............

शरीराविरुध्द गुन्हे करण्याचे वृत्तीला व दंगलीसारखे गुन्हे करण्याचे आणि अत्यंत धाडसी व दादागिरीच्या वृत्तीला लोक घाबरत आहेत. त्याचे वर्चस्वास घाबरुन सर्वसामान्य लोक त्याचेविरुध्द उघडपणे साक्ष अगर फिर्याद देण्यास धजावत नाहीत. यातील सामनेवाला (संतोष चौधरी) वरीलप्रमाणे दखलपात्र अदखलपात्र गुंन्हे दाखल असून त्याचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कार्यवाही इ ालेली असून देखील त्याचे वर्तनात काहीएक बदल झालेला दिसून येत नसून दिवसेंदिवस त्याची हिंसक वृत्ती व शरिराविरुध्द गुन्हे करुन दंगली करण्याची आणि त्यामुळे सार्वजनिक शांतता भंग केल्याचे वरील नमुद दाखल झोल्या गुन्हयावरुन सिध्द होत आहे. सामनेवाले याचे हिंसक वृत्तीस व दादागिरीस आळा घालणे जरुरीचे असल्याने त्यास वेळीच प्रतिबंध करणे जरुरीचे आहे. त्याचे दहशतीमुळे व घाबरुन उघडपणे कोणीही साक्षी अगर फिर्याद देण्यास धजावत नाही. त्यास कायद्याचे अजिबात भिती वाटत नाही. सामनेवाला राष्ट्रवादी पक्षाचा सक्रीय कार्यकर्ता असल्याने आगामी विधानसभा निवडणूकीत भुसावळ मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. त्यामुळे मतदान करतांना लोकांना धाकदपटशा, दादागिरी करुन मतदान करण्यास भाग पाडतील त्यामुळे त्याचे हातून काही दुष्कृत्य घडून सार्वजनिक शांतता धोक्यात येण्याची शक्यता आहे. सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचे काळात यातील जाब देणार भुसावळ शहरात किंवा जळगाव जिल्हयात राहिल्यास सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था निश्तिचपणे धोक्यात येईल याची संपूर्णपणे खात्री झालेली आहे. त्यामुळे सामनेवाल्यास वेळीच प्रतिबंध करणे अत्यंत जरुरीचे झालेले आहे. जाब देणार महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2004 काळात भुसावळ शहरात राहिल्यास सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था मोठया प्रमाणात धोक्यात येईल तसेच फ्री ॲण्ड फेअर ॲसेंब्ली इलेक्शन होऊ शकणार नाही याची खात्री झालेली आहे. निवडणुकीचे काळात सर्वसामान्य मतदारांना वेठीस धरण्याची शक्यता आहे तसेच पोलीस अधिकारी/कर्मचारी आणि पोलीस ऑफीसर व पोलींग कर्मचारी यांचेवर हल्ला करण्याची शक्यता आहे. तसेच पोस्ट इलेक्शन इफेक्ट म्हणून जाब देणाराकडून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होवून गंभीर स्वरुपाचे शरिराविरुध्दचे आणि दंगलीसारखे गुन्हे घडू नये करिता सदर सामनेवाला यास जळगाव, औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, धुळे, नाशिक या जिल्हयांतून तीन वर्षासाठी तडीपार करणेस विनंती आहे. सविनय सादर."

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .........

सभापती महोदय, एका पोलीस निरीक्षकाने अशा प्रकारचा रिपोर्ट उप विभागीय अधिका-यांना दिलेला आहे. श्री.अनिल चौधरी यांचे विरुध्द अशा प्रकारचा रिपोर्ट नगरपालिका निवडणुकीच्या आधी देण्यात आला की, या दोघांना तडीपार करावे. आमदाराला तडीपार करण्याची हिम्मत तुम्हाला होणार नाही. श्री.अनिल चौधरी याला ताबडतोब तडीपार केले नाही तर भुसावळ शहरामध्ये दंगल होण्याची शक्यता आहे अशा पद्धतीचे पत्र पोलीस निरीक्षकाने उप विभागीय अधिका-याला दिले आहे. आबासाहेब स्वच्छ आहेत. ते चांगले विचार मांडतात. ते कोणालाही पाठीशी घालत नाहीत. श्री.अनिल चौधरी आणि श्री.संतोष चौधरी कोण आहेत ? का गृहमंत्री त्यांना पाठीशी घालत आहेत ? कोणताही गुन्हा सुटलेला नाही. सर्व गुन्हे रजिस्टर झालेले आहेत. मग अशा माणसाला का पाठीशी घातले जात आहे ? पोलीस ठाणेदार श्री.पातोड यांना त्या ठिकाणचे आमदार श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, हा फौजदार येथे राहिला तर या ठिकाणी दंगली होतील, जाळपोळ होईल, वरली सट्टयाचे अड्डे वाढतील. ब्राऊन शुगरचे धंदे होतील. कालच तेथे शस्त्रसाठा पकडला गेला. अशा प्रकारे गुन्हे करणा-याला संरक्षण देऊन तुम्ही का पाठीशी घालत आहात ? तो आमदार आपल्याच पक्षात आहे. तुमच्या पक्षातील आमदार अन्याय, अत्याचार करीत असेल तर जनता कोणाकडे दाद मागेल ? जनतेने भुसावळच्या निवडणुकीमध्ये त्याचा पराभव केला. म्हणून 4 तारखेला तेथे दंगल झाली. श्री.संतोष चौधरी यांनी जाहीर केले की, माझा बंगला अतिरेक्यांनी जाळला. सभापती महोदय, घराला आग त्याच माणसाने लावली, बाजार लुटला, दंगल केली. त्याने आरोप केला की, विरोधी पक्षाच्या लोकांनी माझा बंगला जाळला. त्या बंगल्याचा 7/12 माझ्याकडे आहे. तो बंगला त्याचा नव्हता. जमावाने ज्या बंगल्याला आग लावली तो बंगला मे.बालाजी कन्स्ट्रक्शन, भुसावळ तर्फे नरेंद्र बिरदीचंद अग्रवाल यांचा होता. 7/12 चा गाव नमुना माझ्याकडे आहे. या जागेवर त्याने बंगला बांधला होता. श्री.संतोष चौधरी सांगतो की, माझा बंगला जाळला ? सभापती महोदय, मघाशी मी साई पॅलेस दूध डेअरीचे वर्णन केले. श्री.संतोष चौधरी यांनी बेनामी प्रॉपर्टी जमविलेली आहे. त्या प्रॉपर्टीला जमावाने आग लावती. जो बंगला बांधला होता तो दुस-याच्या जागेवर बांधलेला आहे. गुन्हे घडत आहेत आणि मंत्री महोदय सांगतात की, हे कायद्याचे राज्य आहे. मी कोणालाही पाठीशी घालत नाही अशा घोषणाही करतात. मग गृहमंत्री यांना का पाठीशी घालत आहेत ? त्यांच्यावर गुन्हे का रजिस्टर केले जात

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

नाहीत ? तडीपारचा गुन्हा रजिस्टर झालेला असतांना त्यांना तडीपार का केले नाही ? श्री.संतोष चौधरी हे भुसावळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत. म्हणून त्यांना हात लावला जात नाही. सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी एवढीच मागणी करणार आहे की, भुसावळ पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्यावर एवढे गुन्हे दाखल असतांना त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? श्री.अनिल चौधरी यांनी पोलीस संरक्षण मागितले नव्हते. तेथील ठाणेदार श्री.पातोड हे श्री.अनिल चौकरी व श्री.संतोष चौधरी यांच्या घरचे नोकर आहेत. श्री.अनिल चौधरी याने पोलीस संरक्षणाची मागणी केली नाही. तेथील ठाणेदार श्री.पातोडे यांनी संरक्षण मिळण्याबाबत पत्र लिहिलेले आहे ते पत्र मी वाचून दाखवितो. "विषय-श्री.अनिल छबिलदास चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस जळगांव जिल्हा उपाध्यक्ष यांना पोलीस संरक्षण पुरविण्याबाबत." आमदार संरक्षण मागतात. त्यांना गृहमंत्री संरक्षण देत नाहीत व घोषणा करतात की, मी सिक्युरीटी काढून घेणार आहे.

यानंतर श्री.सुंबरे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

अनिल चौधरी, ज्याच्यावर शंभर गुन्हे दाखल झालेले आहेत त्याला पोलीस संरक्षण मिळावे म्हणून पोलीस ठाणेदाराने पोलीस अधिक्षकाला पत्र लिहिले आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, "...श्री.अनिल छबिलदास चौधरी जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉँग्रेस जळगाव, राहणार न्यू एरियावॉर्ड, भुसावळ हे राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष असल्याने त्यांना नेहमी पक्षाचे कामासाठी बाहेरगावी फिरावे लागत असते. तसेच ते आमदार श्री.संतोषभाऊ चौधरी यांचे लहान भाऊ आहेत. त्यांनी भुसावळ नगर पालिकेत केलेल्या विकास कामांमुळे काही विरोधक लोक नाराज झालेले आहेत. तसेच विधानसभा निवडणूक वेळी त्यांनी सक्रीय सहभाग घेऊन त्यांचे भावास निवडून आणण्याकरिता मदत केल्यानेसुद्धा विरोधी पक्षाचे काही लोक दुखावलेले आहेत. तसेच लेवा पाटील समाजाचे लोक, मेहतर समाजाचे लोक हे त्यांचे कट्टर विरोधक झालेले आहेत. नगरपालिका निवडणूक वेळी त्यांचे विरूद्ध निवडणुकीत उभे असलेले श्री.संतोष शेलोडे, राहणार मामाजी टॉकीजजवळ, भुसावळ यांचेकडे रिव्हॉल्वर सापडल्याने भुसावळ शहर पोलीस स्टेशन भाग 6, गुरनं. 11/06, आर्म ॲक्ट कलम 3/25 तसेच भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशनला भाग 6, गुरनं 110/05 सावकारी कायदा कलम 33(अ)(ब)(क), 34 प्रमाणे दाखल गुन्हे दाखल आहेत. सदर निवडणूक वेळी त्यांचा पराभव झाल्याने ते कट्टर विरोधी झालेले आहेत. तसेच भुसावळ नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2006-07 च्या निवडणुका या वर्षअखेर होणार असल्याने सदर निवडणुकीची प्रक्रिया सुरू झालेली असून नुकतीच नगरपालिका बैठकीत आरक्षणाबाबत मिटींग झालेली आहे. सदर निवडणुकीत श्री.अनिल चौधरी हे नगर अध्यक्ष पदाची निवडणूक लढविणार असल्याने त्यांना संरक्षण पुरविणे गरजेचे झालेले आहे.

वरील कारणे व सध्याची राजकारणी परिस्थिती पाहता त्यांना संरक्षण पुरविले जाणे आम्हास गरजेचे वाटते. अन्यथा त्यांचेवर काही हल्ला वगैरे झाला तर मोठा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन भुसावळ शहराची शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्यांना यथायोग्य मार्गाने संरक्षण पुरविले जाणेस विनंती आहे. .... केशव एस पातोंड, पो.नि.बा.पेठ पो.स्टे.,भुसावळ. " सभापती महोदय, एका पोलीस ठाणेदार राजकारणात काम करणाऱ्या एखाद्या कार्यकर्त्याला त्याने न मागता संरक्षण द्यावे असे आपल्या वरिष्ठास म्हणजे पोलीस अधीक्षकास सुचवतो आहे. सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री असलेले

...... 4व्ही 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

श्री.आर.आर.पाटील हे अशा प्रकारे कोणाला पोलीस संरक्षण देण्याबद्दल फार कडक आहेत. रत्नागिरीचे नरेंद्र महाराज यांना पोलीस संरक्षण दिले जावे म्हणून 50 आमदारानी पत्र दिले पण माननीय मंत्री श्री.आर.आर पाटील हे त्यांना पोलीस संरक्षण देण्यास तयार नाहीत. परंतु हे राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष असलेल्या, ज्याच्या नावावर शेकडो फौजदारी गुन्हे असणाऱ्या एका गुंड प्रवृत्तीच्या इसमाला पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी करणारा आपला पोलीस ठाणेदार आहे त्याच्यावर त्यांनी काय कारवाई केली तर केवळ बदलीची कारवाई केली. बदली सुद्धा कोठे केली तर भुसावळहून जळगाव येथे बदली केली. तेव्हा या संबंधात विधानसभेमध्ये विषय आला असता, आणि तेथील सदस्यांनी मागणी केली असता सन्माननीय गृहमंत्री असलेल्या आर.आर.आबांनी जाहीर केले की, याबाबतीत पोलीस आयुक्तांकडून चौकशी करण्यात येईल म्हणून. पण शेवटी पोलीस आयुक्त हे देखील त्यांचेच आहेत, पातोंड हा पोलीस ठाणेदार काय आणि उपविभागीय अधिकारी काय, हे सारे तुमचेच आहेत, त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त देखील तुमचेच आहेत. म्हणून मी या निमित्ताने मागणी करतो की, भुसावळच्या प्रकरणाची सर्व प्रकारची न्यायालयीन चौकशी झ ाली पाहिजे. दूध का दूध आणि पानी का पानी होऊन जाऊ द्यात. नाही तरी आता आबासाहेब आपण न्यायाचा तराजू घेऊन बसला असाल तर मग या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे आणि या गुंड प्रवृत्तीच्या माणसांवर मोक्का लावावा. सभापती महोदय, ज्यावेळेस या माणसांवर तडीपारीची शिफारस केली होती त्यावेळी ती मान्य केली गेली नाही, ती अमलात आणली नाही. परंतु त्याचे बक्षिस देता ते बंदुकीचे संरक्षण दिले. खरे तर यांना आपण मोक्का लावला पाहिजे. समाजातील वातावरण दूषित करण्याचा जे प्रयत्न करतात, समाजा-समाजामध्ये विष ओतण्याचे, समाजासमाजामध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, समाजाला गुन्हेगारांकडून वेठीला धरण्याचा प्रयत्न करतात त्यांना आपण मोक्का लावला पाहिजे. ज्याच्या कारकीर्दीमध्ये हे सारे घडले आहे त्या पोलीस स्टेशनच्या ठाणेदारावर आपण निलंबनाची कारवाई केली पाहिजे. सभापती महोदय, दलित हत्याकांडासंबंधातील वगैरे आणखी अनेक मुद्दे माझ्याकडे आहेत. पण वेळ कमी असल्याने आणि आमचे सहकारी त्याबाबत बोलणार असल्याने मी त्यावर अधिक बोलू इच्छित नाही. मात्र या निमित्ताने मागणी करतो की, माननीय गृहमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये संतोष आणि अनिल चौधरी यांना पाठीशी न घालता, खऱ्या अर्थाने आपल्या

...... 4व्ही 3 ...

श्री. फुंडकर ....

हाती न्यायाचा तराजू घेऊन आपण बसला आहात तर, मोक्का लावावा, त्यांच्या साऱ्या भुसावळ प्रकरणी न्यायालयीन चौकशी करावी आणि या चौधरी बंधूंना सहाय्य करणाऱ्या पोलीस ठाणेदाराला निलंबित करावे एवढे सांगून मी भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

( यानंतर श्री. सरफरे ....4डब्ल्यू 1

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने मला सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, या प्रस्तावावर बोलण्याकरीता 11 माननीय सदस्यांनी आपली नावे दिलेली आहेत. आणखी 3 माननीय सदस्यांनी बोलण्याची इच्छा व्यक्त केली असल्यामुळे एकूण 14 माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे. प्रस्तावावरील चर्चा 6 वाजून 36 मिनिटांनी सुरु झाली आहे. तेव्हा ही चर्चा किती वेळ करावयाची, प्रत्येक माननीय सदस्यांना किती वेळ द्यावयाचा यासंबंधी आपण आता ठरवू या. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण पूर्ण केले. त्यांना आपल्याला थांबवावयाचे नव्हते, आणि थांबविणेही योग्य नाही, त्यांनी आपले भाषण संपविले आहे. तसेच, आपल्या भाषणामध्ये त्यांनी बरेच मुद्दे कव्हर केले आहेत.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदया, आपण प्रत्येक माननीय सदस्यांना 5-5 मिनिटांचा वेळ द्यावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, आम्हाला मान्य नाही. प्रत्येक माननीय सदस्यांना किमान 10 मिनिटे तरी बोलावयास मिळाली पाहिजेत...

**तालिका सभापती** : प्रत्येक माननीय सदस्यांना 10 मिनिटांचा वेळ दिला तर किती वेळ लागेल याचा आपण हिशेब करा. आपण एकमेकांचा वेळ घेऊ शकता.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदया, माझी आपणास विनंती आहे की, तीन आठवडयाचे अधिवेशन आपण दोन आठवडयामध्ये संपवीत आहोत. आम्हा विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आलेला अंतिम आठवडयाचा प्रस्ताव अतिशय महत्वाचा आहे. गृह खात्याशी संबंधित हा विषय असल्यामुळे आपण वेळेमध्ये कपात करु नये. सर्व माननीय सदस्यांना मनसोक्त बोलू द्यावे. सुरुवातीचे आठ ते दहा माननीय सदस्य बोलल्यानंतर आपण वेळ ठरवू या. कारण चर्चेमध्ये माननीय सदस्यांकडून नवीन मुद्दे आले पाहिजेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (पुढे सुरू..

नवीन विषय आले तर ते येऊ द्यावेत.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : नवीन मुद्दे यावेत या दृष्टीने सन्माननीय सदस्यांनी बोलावे. जे मुद्दे येऊन गेलेले आहेत ते पुन्हा सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये रिपीट करू नयेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, कायदा व सुव्यवस्थेसंबंधीचा प्रस्ताव दोन वर्षानंतर आज चर्चेला आलेला आहे.

**तालिका सभापती** : हा महत्वाचा विषय आहे, यात शंका नाही.

श्री.दिवाकर रावते : महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये तेच ते मुद्दे रिपीट करू नयेत एवढेच मला सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे आता बोलतील.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, या अधिवेशनाच्या सुरुवातीसच वर्तमानपत्रामध्ये दहशतवादाचा हल्ला हा विधिमंडळावर होऊ शकतो अशाप्रकारची बातमी आल्यानंतर त्या दृष्टीने विधान भवनाच्या परिसरात संरक्षण व्यवस्था केलेली आहे. हे पाहिल्यानंतर महाराष्ट्र कोणत्या उंबरठ्यावर उभा आहे हे समजते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये ज्या पध्दतीने पोलिसांचा गराडा चारी बाजूने पडलेला हे पाहिले तर कोणत्या विदारक परिस्थितून महाराष्ट्र जात आहे, हे कळते. सभापती महोदया, मध्यंतरी मे महिन्याच्या दरम्यान औरंगाबाद, मनमाड, नाशिक, मालेगाव या ठिकाणी स्फोटके मिळाली. त्यामध्ये 10 आरोपींना पकडले त्यामुळे पोलिसांना याचा मागोवा घेता आला. पोलिसांचे कौतुक झाले. स्फोटके कोठून आली, याचा मागोवा पोलीस घेत राहिले. ही स्फोटके कशी आली ? हा चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या पध्दतीने हे सगळे सुरु आहे ते पहाता, महाराष्ट्रापुरता प्रश्न राहिलेला आहे काय, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. दोन समाजाच्या घटकांमध्ये दंगली होतात. सामंजस्य निर्माण होते,परंतु सुरळित व्यवहार होतात, असे घडत नाही. त्यामधील तणाव सातत्याने वाढत जातो. दहशतवादाची व्याख्या वेगळी करावी लागेल. इशान्येकडील राज्यांमधील जम्मू-काश्मीर, पंजाब मध्ये दहशतवाद पूर्णपणे गाडला गेलेला आहे. तसाच तो पुढे सरकत सरकत गुजरात, महाराष्ट्रापर्यन्त पोहोचला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ MHM/ KGS/

श्री.अरविंद सावंत.....

मदरशाबद्दल बोलले तर धार्मिक भावना दुखावल्या जातात. कोणत्याही धर्माबद्दल बोणण्याची इच्छा नसते, वाद निर्माण करण्याची इच्छा नसते. मध्यंतरीच्या काळामध्ये एसएमएस आले. यामुळे काहींना आनंद होत होता. त्यामध्ये त्यांनी डिवचण्याचा प्रयत्न केला.

" Behind every bomb explosion there is a muslim."

" All muslims are not terrorist but why every terrorist is muslim."

काही लोकांना आनंद झाला असेल. बॉम्बस्फोटामध्ये शकील अहमद हा आरोपी पकडला. तो सीमीचा कार्यकर्ता आहे. मी 1996-97 मध्ये सभागृहामध्ये भाषण केले होते. जळगावमध्ये घटना घडलेली होती, त्यावेळेस मी मदरशाबद्दल बोललो. 2006 सालापासून तीच अवस्था आहे. मदरसा ते सीमी आणि सीमी ते लष्कर-ए-तोयबा. अशा पायऱ्या चढत गेल्या. रेल्वेतील बॉम्बस्फोट होण्यापूर्वी मॉ साहेबांच्या पुतळयाची विटंबना करण्यात आली, त्यानंतर भिवंडी येथे पोलिसांची हत्या झाली.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

मला कधी कधी समाजातील रचना कळत नाही. खैरलांजी येथील प्रकरण झाले पण प्रतिक्रिया एक महिन्यानंतर आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना झाली पण महाराष्ट्र उशिरा पेटला. महाराष्ट्र पेटत असताना या ठिकाणी वर्गवाद पेटला. पण ज्यावेळी भगवान बुध्दाच्या प्रतिमेची विटंबना झाली तेव्हा त्याची प्रतिक्रिया उमटली नाही. कारण हे करणारे कोण आहेत त्यावर ही प्रतिक्रिया अवलंबून आहे. भिवंडीमध्ये पोलिसांची हत्त्या झाली. दुर्दैवाने दोन्ही पोलीस बांधव हे दलित होते. त्याची प्रतिक्रिया उमटली नाही. म्हणजे करणारे कोण आहेत त्यावरुन प्रतिक्रिया उमटते. या घटनांचे विश्लेषण करीत असताना असे दिसते की, क्रिया आणि प्रतिक्रिया करणारे कोण आहेत त्यावर सर्व अवलंबून आहे. समाजामध्ये कशा पध्दतीने विघटन होत आहे हे यातून दिसते.

कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत बोलत असताना पोलिसांवर कारवाई करा असे आपण म्हणतो. मी याबाबत नंतर बोलणार आहे. 1992-93 पासून 2006 पर्यंत मी जळगाव जिल्ह्याचा आणि उत्तर महाराष्ट्राचा संपर्क प्रमुख म्हणून काम करीत होतो. श्री. संतोष चौधरी हे साधे शिवसैनिक होते. त्याला पक्षातून का काढले हे मी नंतर सांगतो. यांनी त्यांचे स्वागत केले. नाशिकमध्ये सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने एका आतंकवाद्याचे पक्षामध्ये स्वागत केले. तुम्ही काय करीत आहात हे तुमच्या लक्षात येत नाही. जम्मू काश्मीरमधून हा दशहतवाद खाली आलेला आहे. दहशतवाद हा दोन समाजात दुही आणि सुडाची भावना पसरवत ठेवतो. दंगलीमध्ये तसे होत नाही. दहशतवादामध्ये तसे घडते. इंग्लंडचे पंतप्रधान श्री. टोनी ब्लेअर यांनी मुस्लिमांबद्दल दहशतवादी असा शब्द वापरला. इंग्लंडमध्ये सर्व एशियन लोकांना दूर लोटण्याचे काम सुरु आहे. सर्व मुस्लीम आतंकवादी नाहीत. परंतु प्रत्येक आतंकवादी मुस्लीम का आहे असा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा दुर्दैवाने मुस्लीम समाजाने पुढे यावयास पाहिजे. एखादी घटना डेन्मार्कमध्ये घडते. त्या ठिकाणी महंमद पैगंबराच्या प्रतिमेची विटंबना झाली. पैगंबराचे छायाचित्र आम्ही आजपर्यंत पाहिलेले नाही. त्यांचे होर्डीन्ग नाही किंवा जाहिरात कोठे लावलेली नाही. परंतु एका क्षणात मोठ्या प्रमाणावर लोक जमा होतात. हे कम्युनिकेशन कोठले आहे ? हे कम्युनिकेशन इतर धर्मात कोठेच नाही. हे कम्युनिकेशन त्याच ठिकाणी कसे ? कोणत्या माध्यमातून हे कम्युनिकेशन केले जाते ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ KTG/

श्री. अरविंद सावंत ....

कोणते माध्यम वापरले ही चिंतेची बाब आहे. दुर्दैवाने त्यांच्या अशिक्षितपणाचा, त्यांच्या बेरोजगारीचा, जे गरीब मुस्लीम आहेत, ज्यांना आपल्या पोटाची भ्रांत आहे त्यांच्या गरिबीचा फायदा घेतला जातो. तुम्ही मदरसे काढता. तुम्ही उर्दू शाळा काढा. तुम्ही शिवसेनेला सारखे टोमणे मारता. आमचे सरकार असताना अनेक उर्दू शाळा काढल्या. हज इमारतीचे निर्माण आमच्या सरकारने केले. आमचे सरकार असताना वांद्रे येथे मुस्लीम धर्मियांचा मोठा धार्मिक कार्यक्रम झाला. मी एक उदाहरण सांगतो. वांद्रे येथील काही मुस्लीम बांधव माननीय शिवसेनाप्रमुखांकडे गेले. त्यांनी सांगितले की, तुमच्या मनातील भावना मला समजतात. आम्हाला खरोखरच वाटते की, हे घडता कामा नये. साहेबांचे त्यांच्याशी बोलणे झाल्यानंतर त्या मुस्लीम बांधवांनी सांगितले की, साहेब, तुम्ही जे करीत आहात ते राष्ट्रभक्तांसाठी करीत आहात. एखादा अब्दुल हमीद असतो की ज्याचे ताईत गळ्यामध्ये घालून फिरावेसे वाटते. परवा पुण्यामध्ये एका उद्यानाच्या उद्‌घाटनासाठी गेलो होतो. चार एकरमध्ये शिवसेनेच्या नगरसेवकाने उद्यान तयार केले आहे. त्या उद्यानाचे नाव "शेख अब्दुल हमीद उद्यान" असे ठेवले आहे. तो देशासाठी शहीद झाला. तो ज्यांच्याविरुध्द लढला त्यांच्याविरुध्द आमचा लढा आहे. त्या लढाईत आम्हाला तुमची साथ पाहिजे. तुम्ही आम्ही खांद्याला खांदा लावून दहशतवाद गाडला पाहिजे. दुर्दैवाने सारे जग असे म्हणते की, दशहतवादाची सुरुवात पाकिस्तानात आहे. या देशाच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांची हत्या झाल्यानंतर आगडोंब उसळला होता. ते स्वाभाविक होते. त्यावेळी असा मोठा वटवृक्ष उन्मळून पडल्यानंतर धरतीला हादरे बसणारच. ती एक शक्ती होती. ज्यावेळी शिखांवर हल्ले झाले त्यावेळी कोपरगावच्या शीख कुटुंबावर हल्ला होत असताना एका शिवसैनिकाने त्यांना वाचवले. नंतर तो शीख शिवसेनेमध्ये आला. आज तो कोपरगावचा शहरप्रमुख आहे. आम्ही जात, धर्म, प्रांत पाहात नाही. त्यांची शक्ती किती आहे,त्यांची संख्या किती आहे हे पाहात नाही.

यानंतर श्री. शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 19:35

(श्री. अरविंद सावंत...)

त्याची राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा पाहून आम्ही त्याला पद दिले. पण तुम्ही असे करीत नाही. तुम्ही मात्र विघटनवादाचे सर्व मार्ग अवलंबिता. महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण देश एकसंध राहावा यादृष्टीने आपणाकडून प्रयत्न होताना दिसत नाहीत. (बेल वाजविण्यात येते) तालिका सभापती महोदया, मला बोलण्यासाठी आणखी 10-15 मिनिटांचा अवधी हवा आहे.

तालिका सभापती महोदया, हा दहशतवाद हळू हळू अंडरवर्ल्डकडे गेला. 1993मधील बॉम्ब स्फोट अंडरवर्ल्डने कसे केले हे सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. त्या अंडरवर्ल्डमध्ये आपापसात गट पडले तर ते एकमेकांविरुध्द लढतील पण राष्ट्रासाठी आणि देशासाठी कधीही लढणार नाहीत. दाऊद इब्राहीम याला तुम्ही अटक कशी कराल ? पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष सांगातात की, तो कोठे आहे हे माहीत नाही. पण तो कोठे आहे, हे सगळयांना माहीत आहे. लादेनचा गुरु तोरवी. या तोरवीतून लादेन निर्माण झाला. या लादेनने सर्व जगाला वेठीस धरले. तुम्हाला त्या लादेनचा अभिमान वाटला आणि त्याचे फोटो घेऊन तुम्ही रस्त्यावर आलात. परंतु त्यावेळी कोणीही मुस्लिम बांधवाने रस्त्यावर येऊन सांगितले नाही की, तुम्ही हे करता ते चुकीचे आहे. हे करु नका. हे चांगले नाही. लादेन आपला आदर्श होऊ शकत नाही. आपला आदर्श अब्दुल हमीद आहे, असे सांगायला कोणीही मुस्लिम नेता पुढे आला नाही याचे दुःख होते. आता जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये नवनवीन गोष्टी येऊ लागल्या आहेत. (बेल वाजविण्यात येते.) मुंबई, पुणे, नाशिक हा गोल्डन ट्रॅन्गल झाला. परंतु मुंबई, मालेगाव, औरंगाबाद हा बॅड ट्रॅक झाला. आपल्याकडे जवाहरलाल नेहरु बंदरावर शस्त्रास्त्रे उतरली. कालपर्यन्त एखाद् दुसरे शस्त्रास्त्र येत होते. आता कंटेनरने शस्त्रास्त्रे येऊ लागली आहेत. कालपर्यन्त फक्त अंमली पदार्थांची तस्करी होत होती. आता शस्त्रात्रे आणि आरडीएक्सची तस्करी व्हायला लागली आहे. ही तस्करी देखील कंटेनरमधून व्हायला लागली आहे. गृह खात्याचा कुणाला धाक आणि भय राहिले नाही. कुठे तरी एखादा शस्त्रास्त्रांचा साठा पकडल्यानंतर तुम्ही आपली पाठ थोपटून घेता. पण ही शस्त्रास्त्रे, आरडीएक्स आणण्याचे धाडसच कसे होते ? या महाराष्ट्रामध्ये यासाठी फ्लड गेटस् कसे निर्माण झाले, हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीवरील मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा पासून हे सर्व प्रकार सुरु होतात. अंतुलेंच्या राज्यामध्ये काय काय होत होते त्याची आपण

...2..

(श्री. अरविंद सावंत...)

माहिती घ्यावी. खुद्द पोलीस अधिकारीच म्हणतात की, पाकिस्तानची आयएसआय गुप्तहेर संघटना आणि लष्कर-ए-तोयबा यांच्यापासून महाराष्ट्राला, देशाला निश्चितच धोका आहे. दहशतवादाची पाळेमुळे ही आपल्या राज्यामध्ये खोलवर रुजत गेलेली आहेत. आयएएस, सिमी किंवा लष्कर-ए-तोयबाशी जे जे संबंधित आहेत ते मुंबईतील नागपाडा, नंतर भिवंडी, मुंब्रा, कौसा, पडघा त्यानंतर मालेगाव, परभणी, नांदेड याठिकाणीच कसे राहातात ? ही ठिकाणे या दहशतवाद्यांची आयडेण्टिफाईड डेस्टिनेशन्स आहेत काय ? ते तेथेच कसे राहातात ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ 19:40

श्री.अरविंद सावंत........

दादरला का नाही सापडत? सभापती महोदया, हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणून इंदिरा गांधींच्या वेळेला रॉ होती. त्या रॉ ने त्या काळात कॉम्बॅट ऑपरेशन्स स्क्वॉड स्थापन केले होते. त्यातून त्यांनी दहशतवादाला दाबले होते. दुर्दैवाने श्री.गुजराल हे पंतप्रधान झाले आणि त्यांनी ते स्क्वॉड रद्द केले. कालांतराने पाकिस्तानचे गोडवे गायला सुरुवात केली. मालेगाव येथील अपघातानंतर लोक रस्त्यावर आले. मुंबईत स्फोट झाल्यानंतर दंगली घडल्या नाहीत म्हणून मालेगावमध्ये स्फोट करण्यात आले. परंतु बॉम्बस्फोट करणारे पुन्हा मुस्लिम निघाले. अन्यथा यापेक्षा आणखी काय घडले असते? या वेगळया शक्ती आहेत. आज जे राष्ट्रभक्त मुस्लिम आहेत त्या सर्वांनी एकत्र आले पाहिजे. याठिकाणी पोलीस खात्याला जी ट्रिटमेंट मिळते ती सुध्दा चिंताजनक आहे. राज्याला आज 75 हजार पोलिसांची गरज आहे. श्री.अरविंद इनामदार या माजी पोलीस अधिकाऱ्यांनी एक चांगला लेख लिहिला होता. पोलीस खात्याला सापत्नभावाची वागणूक दिली जाते. साधी तलाठ्याची वेतनश्रेणी सुध्दा पोलिसाला दिली जात नाही आणि त्यांच्याकडून कामाची अपेक्षा करता? 14-14 तास डयुटी करावी लागते. रस्ता हेच त्यांचे कार्यालय झाले आहे. गेल्या 4-5 वर्षात एकही सुट्टी मिळालेली नाही. त्यांनी एक सुंदर गोष्ट सांगितली. पुराणातील एक गोष्ट आहे. उत्तान नावाच्या राजाला दोन राण्या होत्या. सुरुची आणि सुनिति. सुरुची ही लाडकी राणी होती. तिला उत्तम नावाचा मुलगा होता. राजाने उत्तमला मांडीवर घेतले. सुनितीचा मुलगा ध्रूव तेथे गेला. परंतु राजाने ध्रुवाला मांडीवर घेतले नाही. तो आपल्या आईकडे गेला आणि त्याने सांगितले, वडिलांनी मला मांडीवर घेतले नाही.......(अडथळा)....तो राजा उत्तमाला मांडीवर घेत नाही......(अडथळा).....सभापती महोदया, हा विषय मी अतिशय गांभीर्याने मांडतो आहे. काल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले, सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या इंटिग्रिटीला कोणी चॅलेंज करु शकत नाही. परंतु दुर्दैवाने ते गटांगळया खात आहेत. ते सिन्सिअर आहेत. His sincerity can not be challenged. But, sincerity must deliver results and if fails to deliver the results then the hon. minister has to rethink as to what he is doing. पोलिसांना तुम्ही किती छळता? 14-14 तास डयुटी करावी लागते. त्यांच्या गुणवत्तेमध्ये फरक पडावयाचा असेल तर त्यांना 8 तासाची डयुटी द्या. 75 हजार पोलीस हवे आहेत. आमच्या व्ही.आय.पी.ना पोलीस

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ 19:40

श्री.अरविंद सावंत......

संरक्षण. श्री.अनिल चौधरी या व्ही.व्ही.आय.पी.ना 2-2 कार्बाईनचे संरक्षण. राष्ट्रवादी पक्षाचे जळगाव जिल्हयाचे ते उपाध्यक्ष आहेत. सभापती महोदया, मी परवा सुध्दा सांगितले की यांचे कोणकोणते धंदे आहेत? अवैध मटका, जुगार, अंमली पदार्थ, बनावट दारु, बनावट नोटा, अनेक तडेपारीच्या नोटीस एवढे दिलेल्या माणसाला हे राज्य शासन संरक्षण देते. आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयात एवढा छळ झाला व दहशत होती. एस.पी.दहशतवादी. तरी कारवाई नाही. दहशत माजविणाऱ्यांवर कारवाई नाही. श्री.संतोष चौधरी यांच्याकडे रिव्हॉल्वरचे लायसन्स आहे. कालची एक घटना सांगतो. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याच्या घरात शस्त्रे सापडली. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते अशोक पितांबर चौधरी यांच्या घरावर पोलिसांनी छापा घातला असता रामपुरी चाकू, कुकरी जप्त केली. आरोपी फरार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते आणि दंगलीतील आरोपी श्री.पवार यांच्या पिस्तुलाचा बोगस परवाना पोलिसांनी जप्त केला. ही कारवाई एलसीपी पोलीस निरीक्षक श्री.वाय.डी.पाटील यांच्या निरीक्षणाखाली करण्यात आली.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

या चौधरी विरुध्द अनेक गुन्हे आहेत. यासंदर्भात पोलीस विभागीय अधिकारी श्री. गौर यांनी सांगितले की, भुसावळ शहर शांत रहावे, शहरात शांतता व सुव्यवस्था रहावी म्हणून त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांना जळगाव, धुळे आणि औरंगाबाद येथून हद्दपार करावे अशा प्रकारची शिफारस करुन सुध्दा त्यांना अजून सुध्दा गृहखात्याने हद्दपार केले जात नाही. मला तर यासंदर्भात असे म्हणावेसे वाटते की, "आबा बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले." खरे म्हणजे आपण गुन्हेगारांना उमेदवारी दिलेली आहे. आमच्याकडूनच तुमच्याकडे गांधी गेलेले आहेत. त्या ठिकाणी गेल्यानंतर ते आधुनिक गांधी झालेले आहेत. ते तिकडे गेल्यानंतर स्पिरुचीलाईज द पॉलिटिक्स करीत आहे. आता ते मुन्नाभाई झालेले असून आता ते लगे रहो म्हणत सत्तेवर आलेले आहेत. या आधुनिक गांधीनी सांगितले आहे की, "तुमच्याकडे दंडूका असेल तर आमच्याकडे तलवार आहे". भुसावळ आणि जळगावमध्ये वातावरण खराब करण्यात आलेले असून आमचा गोवेकर बेपत्ता होऊन एक वर्ष होऊन गेले आहे तरी त्यांचा अद्यापर्यंत तपास लागलेला नाही. त्यामुळे गोवेकरांच्या संदर्भात न्यायालयीन चौकशी व्हावी तसेच संतोष चौधरी व अशोक चौधरी यांना मोक्का लावावा अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त): सभापती महोदया, सभागृहाचे विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

अंतिम आठवडा प्रस्तावाचे स्वरुप हे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या संबंधी आहे. या प्रस्तावावर इतर सन्माननीय सदस्यांनी देखील आपले विचार व्यक्त केलेले आहेत. गेल्या अनेक वर्षामध्ये अनेक विषयावर अंतिम आठवडा प्रस्ताव आलेला आहे. परंतु या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या, आदिवासी बालकांचे कुपोषण, दलितांचे, अल्पसंख्याकांचे, मागासवर्गाचे प्रश्न, बॉम्बस्फोटाचे प्रश्न असे विविध विषय या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये देण्यात आलेले आहेत. अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने चांगले प्रश्न उपस्थित केल्याबद्दल मी विरोधी पक्ष नेत्यांचे अभिनंदन करतो.

शेतक-यांच्या आत्महत्या, दलितांवर झालेला गोळीबार, शेतक-यांवर केलेल्या गोळीबारामुळे शेतक-यांच्या झालेल्या हत्या हे विषय सुध्दा या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

जातीय आतंकवाद, जातीय अतिरेकी राज्यात दिवसेंदिवस वाढत आहेत.त्यामुळे गृह विभागाच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह उभे राहिलेले आहे. सन्माननीय गृहमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे आपली भूमिका अत्यंत प्रामाणिकपणे मांडतात, परंतु त्यांची भूमिका प्रत्यक्ष व्यवहारात दिसत नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, यामध्ये अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. गृह विभागात काम करणारे जे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी आहेत त्यांची काय अवस्था झालेली आहे ? मला वाटते याची न्यायालयीन चौकशी करण्याची गरज आहे. निदान त्यामुळे राज्यातील जनतेला पोलिसांची अवस्था समजून येईल. केवळ ग्रामीण भागात दलितांवर, आदिवासींवर व ओबीसींवर अत्याचार होतो असे नाही तर शासन आणि प्रशासनामध्ये काम करणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांवर देखील सातत्याने अन्याय होत असतात. या संदर्भात शासनाने एक श्वेतपत्रिका काढावी अशी मी मागणी केली होती. सभापती महोदया, बॉम्बस्फोटाची चर्चा करण्यात आली. "रॉ" चा उल्लेख करण्यात आला. "रॉ" ही केंद्र सरकारची संस्था आहे. मी राष्ट्रभक्त मुसलमानांचा आदर करतो. मी राष्ट्रभक्त हिंदूचा सन्मान करतो. राष्ट्रभक्ताला कोणतीही जात वा धर्म नसतो. राष्ट्रभक्ती दाखविण्याचा प्रसंग येतो त्यावेळी खरे राष्ट्रभक्तीचे स्वरुप उघड होत असते. या देशातील हिंदू, शीख, मुसलमान हे राष्ट्रभक्त आहेत अशाप्रकारचा उल्लेख करुन कोणीही राष्ट्रभक्त होत नाही आणि असे सांगण्याचा प्रयत्न करणे देखील योग्य नाही. कारण राष्ट्रभक्ती दाखविण्याचा प्रसंग येतो त्यावेळी ती दिसून येते. मध्यंतरी "रॉ" या संस्थेने एक रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टमध्ये देशाच्या विरुध्द ज्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनी आपल्या देशाची गुपिते हेरगिरी करुन शत्रू राष्ट्राला दिली त्यांची नावे होती. या लिस्टमध्ये एकही मुसलमान नव्हता, एकही शीख नव्हता. देशभक्तीच्या, राष्ट्रभक्तीच्या गप्पा मारल्या जातात. हा "रॉ"चा रिपोर्ट आहे तो मी सांगत आहे.

सभापती महोदया, इंग्रजांच्या काळात अब्दुल हमीद व अशपाक खान हे भगतसिंग बरोबर हसत हसत फासावर गेले. स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणखी अनेक जणांची नावे घेता येतील. या थोर नेत्यांचा राष्ट्रभक्तीचा प्रवाह येथे वाहत आहे.या प्रवाहास कोणीही नासविण्याचा प्रयत्न करु नये.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

सभापती महोदया, अलिकडच्या काळात राज्यात अनेक प्रकारच्या दंगली झाल्या. संपूर्ण राज्यात एक अस्वस्थता आणि अशांतता पसरलेली आहे. या राज्यातील जनता असुरक्षित आहे का ? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सर्व परिस्थितीस कोण जबाबदार आहे ? एक प्रकारे ही शासनाची जबाबदारी आहे. शासनाचा एक भाग म्हणून गृह विभागावर जबाबदारी आहे. पोलिसांना देखील अनेक ताणतणावांना सामोरे जावे लागत आहे. त्यांना रात्रंदिवस काम करावे लागत आहे. दुसऱ्यांच्या रक्षणासाठी स्वत:च्या संसाराकडे ते बेफिकीरीने पाहत आहे. सभापती महोदया, मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, गणवेषामध्ये असलेली जातीयवादी प्रवृत्ती ही कोणत्याही आतंकवाद्यापेक्षा जास्त खतरनाक असते.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, एसआरएच्या योजना बिल्डरांनी आणि गुंडांनी बळकावल्या आहेत की काय अशाप्रकारचे वातावरण मुंबई नगरीमध्ये निर्माण झालेले आहे. आज त्याठिकाणचे बिल्डर बोगस झोपडपट्टीधारक निर्माण करीत आहेत. बिल्डर सरकारच्या जागा बळकावून त्याठिकाणी मोठमोठया इमारती उभ्या करुन अशाप्रकारे खंडणीचे नवीन प्रकार सुरु आहेत की काय अशाप्रकारची गंभीर परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. आज झोपडपट्टीमध्ये राहणारी ही गोरगरीब मंडळी असून आपल्या आयुष्याची सर्व कमाई खर्च करुन त्यांनी आपली छोटीशी झोपडी, छोटेसे घरकूल उभे केलेले आहे. परंतु हे बिल्डर लोक अशापध्दतीने या झोपडपट्टीतील लोकांना त्रास देत असून त्यांचे अधिकार हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. गुंडगिरी, दादागिरी करुन गुंडांच्या माध्यमातून तेथील अधिकृत झोपडपट्टीधारकांना हुसकावून लावण्यास भाग पाडत आहेत. अशाप्रकारे आज एसआरए योजनेच्या बाबतीत सर्रास चालू आहे. हे सर्व प्रकार पोलीस खात्याला, त्यांच्या अधिकाऱ्यांना माहीत असूनही ते याबाबतीत कुठल्याही प्रकारची कारवाई करीत नाहीत. त्यामुळे सरकारचे, गुंडांचे आणि, बिल्डरांचे साटेलोटे तर नाही ना अशाप्रकारची चर्चा आज महाराष्ट्रात चालू आहे. सभापती महोदय, खैरलांजी येथे हत्याकांड झाले. दलितांवर हल्ला करणे हा आपल्या राज्यातीलच नव्हेतर देशातील सर्व जातीय शक्तींचा स्थायीभाव झालेला आहे. सभापती महोदय, ज्यावेळी मुंबईतील रेल्वे लोकलमध्ये बॉम्बस्फोट झाला, त्यावेळी माझ्या मोबाईलवर एक एसएमएस आला. तो असा आहे की, "All the Muslims are not terrorists but why all the terrorists are Muslims" ज्यांनी हा एसएमएस पाठविला, त्याचा मोबाईल नंबर माझ्या मोबाईलवर आला. त्या एसएमएसला मी असे उत्तर दिले की, "सर्व हिंदू हे जातीयवादी नसतात, परंतु सर्वच हिंदू जातीयवादी का असतात ?" असे उत्तर मी पाठविले. सभापती महोदय, आज दलितांवर हल्ला करणे हा जातीय शक्तींचा स्थायीभाव झालेला आहे. परंतु त्याबाबतीत सरकार आमचे संरक्षण करु शकत नाही, आज पोलीस आमचे संरक्षण करीत नाहीत, माननीय गृहमंत्री आमचे संरक्षण करीत नाहीत. तेव्हा ही दलित मंडळी अगदी अगतिक होऊन आपले स्वत:चे संरक्षण करीत आहे. ज्यावेळी खैरलांजीचे प्रकरण घडले त्यावेळी लोकांच्या भावनेचा उद्रेक झाला. एवढेच नव्हेतर, ज्यावेळी बुध्दाच्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची

..2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

विटंबना होऊन दलितांच्या श्रध्दास्थानावर वार केला जातो व त्याबाबतीत पोलिसांची जी अनास्था दिसून येते तेव्हा त्या पोलिसांच्या विरुध्दचा असंतोष उफाळून येतो, अशाप्रकारचे चित्र आपण पाहिलेले आहे. अशाप्रकारचे चित्र आपण खैरलांजी येथील दलितांवर ज्या सामुहिक सहभागातून जे कृत्य झाले आणि ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची विटंबना झाली, त्यावेळी संपूर्ण राज्यामध्येच नव्हेतर इतरही राज्यामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. खैरलांजीचे प्रकरण दडपून टाकायचे म्हणून त्यांच्या आंदोलनाला विरोध करायचा म्हणून व खैरलांजीचा निखारा विझवायचा म्हणून दलितांचे आंदोलन सॅबॉरेज करण्याचा प्रयत्न करण्यात आला. याचे उत्तर उद्या मिळणार आहे. सभापती महोदय, याठिकाणी भूसावळच्या प्रकरणाचा उल्लेख झाला. भूसावळप्रमाणेच राज्यातील इतर ठिकाणीही अशाच प्रकारची परिस्थिती आहे. आज नागपूर शहरामध्येही गुंड प्रवृत्तीचे लोक आहेत. सर्वच ठिकाणी अशाप्रकारची परिस्थिती आहे. त्यांच्या काळातही अशीच परिस्थिती होती. ज्यांच्याकडे गृह खाते असते, त्यांच्याकडे संपूर्ण ॲण्टी इलिमेंटस्चे प्रकार होतात.

नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जोगेंद्र कवाडे ..... (पुढे सुरु)

ही प्रवृत्ती तेव्हाही होती आजही आहे, हे चित्र बदलले पाहिजे, आम्ही कोणाला संरक्षण दिले पाहिजे ? कोणाला साथ दिली पाहिजे ? जो रंजलेला व गांजलेला आहे किंवा ज्याला खऱ्या अर्थाने तुमच्या सहानुभूतीची गरज आहे, त्यांना तुम्ही साथ दिली पाहिजे. त्यांना तुमच्या धनदौलतीची, सत्तेची, खुर्चीची नाही, तर त्याला तुमच्या प्रेमाची व सहानुभूतीची गरज आहे. त्यांच्या सहानुभूतीचे देखील आपण रक्षण करु शकत नाही, ही खरी आमच्या राज्याची शोकांकिका आहे. मी अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये उल्लेख करीत आहे की, या राज्यातील कायदा व सुव्यवस्था ही अधिक खंबीर झाली पाहिजे. कायदा सुव्यवस्था मेंटेंन करण्याच्या नावाखाली पोलीस खात्याकडून आंदोलनकर्त्यांवर अन्याय, अत्याचार व जुलूम इंग्रजाच्या काळात झाले नसतील एवढे केले जात आहेत. आपल्या देशात त्यांच्याकडे सुडाच्या भावनेतून पाहिले जात आहे. ही सुडाची भावना गृहखात्यातून संपली पाहिजे, तेव्हा खऱ्या अर्थाने या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होईल, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. मला सभापती महोदयांनी बोलण्याची संधी दिली याबद्दल धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी मुद्दयांची पुनरावृत्ती न करता मी बोलणार आहे. सभापती महोदयांनी माझ्या भाषणातील काही बाबी लिहून घ्याव्यात, या बाबींचा समावेश उत्तरामध्ये आवश्यक असावा असे वाटते. भिवंडी येथे दंगल झाली, त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी असे जाहीर केले होते की, भिवंडी येथील सदरहू जमीन कोणाची आहे याची शहानिशा करण्यात येईल आणि नंतर त्या ठिकाणी पोलीस स्टेशन बांधण्यात येईल. याबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे ? भिवंडीतील जमीन कोणाचीही असली तरी तेथील पोलीस स्टेशनला विरोधच करणार, असे वक्तव्य श्री.आबू आझमी यांनी नुकतेच केले आहे. महाराष्ट्रामध्ये मुस्लीम बांधव आहेत, या सभागृहामध्ये आमच्या मुस्लीम बंधू-भगिनी बसलेल्या आहेत, पण कधीही या मुस्लीम बंधू-भगिनी बेजबाबदारपणे बोललेल्या नाहीत. मला आठवत नाही की, आपण सभागृहात पक्षअभिवेशाने कधी बोलले आहात. परंतु श्री.आबू आझमीसारखा माणूस शासनाला चॅलेंज करीत आहे. त्याबाबत काय झाले आहे ? याची माहिती उत्तरात देण्यात यावी. श्री.आबू आझमी यांना असे वाटते की, भिवंडीतील वादग्रस्त जमीन सरकारच्या मालकीची असली तरी जनतेचा विरोध असल्याने त्या जागेवर पोलीस स्टेशन उभारता कामा नये, समाजवादी पार्टीचे नेते खासदार श्री.आबू आझमी यांनी महाराष्ट्र टाईम्सशी बोलताना ठामपणे सांगितलेले आहे. मुस्लीम संघटनांनी वादग्रस्त जागेवरील हक्क आठ दिवसात पुराव्यानिशी सिध्द न केल्यास नियोजित जागेवर कोणत्याही परिस्थितीत पोलीस स्टेशन बांधण्यात येईल असे उपमुख्यमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जाहीर केले होते. याबाबत काय झाले हे सदनाला कळले पाहिजे. एक व्यक्ती जर धर्मांध होऊन विनाकारण शासनाला आव्हान किंवा चॅलेंज करीत असेल तर त्याची स्थिती त्या ठिकाणी काय असेल, हे मी आपणास सांगत आहे. पोलीस स्टेशन का बांधण्यात आले नाही ? कोणाच्या भितीमुळे बांधण्यात आले नाही ? कधी कधी मोठया अभिनिवेशाने आपण बोलत असतो. परवा माननीय गृहमंत्र्यांनी जाणूनबुजून डिवचण्यासाठी काही उल्लेख मुद्दामच केले आहेत. यामध्ये 1995 ते 1999 या युती सरकारच्या काळामध्ये किती सिव्हीलिएशन्सचा पोलीस गोळीबारात मृत्यू झाला आहे? त्यांच्या काळात किती मृत्यू झाले आहेत ? हे सांगितले. परंतु विद्यमान सरकारच्या काळातील आकडा सांगताना कौशल्याने तेथे

.....3



PNG/ KGS/ D/ MAP/ MHM/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..... (पुढे सुरु)

'नक्षलवादी' असे सांगितले आहे. परंतु त्यांनी सांगायचे टाळले की, पोलिसांना जास्त अधिकार देऊन सर्वात जास्त एनकाऊंटर युतीच्या काळात झाले आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निघाल्यानंतर तुमच्या व आमच्या राज्यात किती चांगली कायदा व सुव्यवस्था हे सांगताना फक्त आकडयांच्या खेळ करतात आणि मुद्दाम डिवचतात की तुमच्या राज्यातही असे झाले होते. आता मी 2005 या वर्षातील काही आकडेवारी वाचून दाखवितो. खून दाखल 212 उघड 164, खुनाचा प्रयत्न 135 - 120, दरोडे 46, जबरी चोरी 360, जबरी चोरीचा प्रयत्न 28.. खंडणी 210, घरफोडी 3171, चोरी 4176, मोटार वाहन चोरी 3494 यापैकी शोध 575, सोनसाखळी चोरी 1036 हे मुंबई शहराच्या बाबतीत आकडे आहेत.

यानंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण........

महाराष्ट्रासाठी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य, प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी या विषयावर चांगली मते मांडली. परंतु, त्यांनी ऑल हिंदू, ऑल मुस्लिम्स हा विषय काढण्याची गरज नव्हती. एकाही हिंदुने या मुंबई शहरात आरडीएक्स घेऊन निरपराध माणसांचा रक्ताचा सडा शिंपडलेला आहे, असे उदाहरण दाखवा. हा मुस्लिम आणि हिंदूंचा प्रश्न नाही.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : कृपा करुन हिंदू, मुस्लिम हा वाद या ठिकाणी आणू नका.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, का आणावयाचा नाही ? त्याविषयी का बोलावयाचे नाही ? जर बहुतांश आरोपी हे मुस्लिम समाजाचे असतील तर त्यात आमचा काय दोष आहे ? आणि त्याविषयी सन्माननीय सदस्य या ठिकाणी भूमिका मांडत असतील तर आपल्याला त्यासंदर्भात काही आक्षेप आहे का ?

**तालिका सभापती** : माझा कोणताही आक्षेप नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आपल्याला मान्य आहे ना ? मग सन्माननीय सदस्यांना आपले विचार कृपया मांडू द्यावेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, या ठिकाणी मला तो वाद आणावयाचा नाही. मी अगोदरच असे बोललो आहे की, हा प्रश्न हिंदू, मुस्लिम यांचा नाही. मुंबई शहरामध्ये बाबुलनाथ मंदिर असेल, सिध्दिविनायक मंदिर असेल अशी जी हिंदुंची देवस्थाने आहेत त्या ठिकाणी लष्करी छावणीचे स्वरुप का आलेले आहे ? अग्यारी, चर्च या ठिकाणी अशी परिस्थिती का नाही ? कारण एकही हिंदू माणूस इतर पवित्र देवस्थानांची विटंबना करणारे कृत्य करणार नाही. मात्र, आमचीच देवस्थाने अतिरेक्यांचे लक्ष्य ठरलेली आहेत, हे कशाचे लक्षण आहे ? हे प्रमाण तुमच्या राज्यात वाढलेले आहे. सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे हे ज्यावेळी उपमुख्यमंत्री होते त्यावेळी देवस्थानांना लष्करी छावण्यांचे स्वरुप आले नव्हते. या देशातील असोत की महाराष्ट्रातील देवस्थाने असोत, कोल्हापूरचे महालक्ष्मीचे मंदिर, तुळजापूरचे भवानी मातेचे मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर अशी जी हिंदुंची पवित्र स्थळे आहेत त्या ठिकाणी लष्करी छावणीचे स्वरुप का आलेले आहे ? ही अशी कायदा व सुव्यवस्था चांगली आहे ? अशा देवस्थानांमध्ये एक पोलीस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

ठेवतो, देवस्थानांची विटंबना करण्याचा, आरडीएक्सने बॉम्बस्फोट करण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही, अशी परिस्थिती तुम्ही का निर्माण करु शकला नाही ? कारण असे आहे की, विशिष्ट धर्माच्या लोकांनी काहीही केले तरी त्यांना क्लिन चिट मिळते, अशा गुन्हेगारांना फाशी देऊ नका म्हणून सगळे मुख्यमंत्री बेंबीच्या देठापासून टाहो फोडतील हे त्यांना माहित असते, म्हणूनच हे लोक असे कृत्य करण्यास धजावतात. तुळजापूर येथील भवानी मंदिरात, पंढरपूर येथील विठ्ठलाच्या मंदिरात गाभा-यात पोलिसांचा पहारा असतो. बडव्यांनी सांगितल्यानंतर सुध्दा पोलीस सांगतात की, तुम्ही तुमचे काम करा, आम्हाला आमचे काम करु द्या, विठ्ठलाला धोका आहे. मंत्रीमहोदय या ठिकाणी भाषणात आकडेवारी देतात, तुमच्या राज्यात एवढे गुन्हे होते, आमच्या राज्यात एवढे गुन्हे होते आणि या ठिकाणी गृहमंत्री सांगतात की, कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चांगली आहे. कशाला नाकाने कांदे सोलता ?

सभापती महोदया, आणखी एका गंभीर गोष्टीची नोंद घेणे अत्यंत जरुरीचे आहे. मुंबई शहरात बनावट नोटांचा व्यवहार करणा-या लोकांचा सुळसुळाट झाला आहे. अशी अनेक प्रकरणे झ ाली, परंतु त्यासाठी एखादी यंत्रणा उपलब्ध आहे का ? गेल्या चार अधिवेशनांमध्ये विरोधी पक्षाचे आमदार सांगत आहेत की, राज्य गुन्हे अन्वेषण विभागामध्ये डी.सी.पी.,अे.सी.पी.यांच्या नेतृत्वाखाली एखादा वेगळा सेल बनावट नोटांचा शोध घेण्यासाठी निर्माण करा.

सभापती महोदया, पोलिसांकडून आपण सगळया गोष्टींची अपेक्षा करतो. मी या ठिकाणी एका गोष्टीचा जरुर उल्लेख करणार आहे. माजी पोलीस महासंचालक, श्री.अरविंद इनामदार यांनी एक लेख लिहिला होता. या लेखाची गृह विभागाने दखल घेतली का ? माजी पोलीस महासंचालक, माजी पोलीस आयुक्त अशा माजी मान्यवर पोलीस अधिका-यांना विश्वासात घेऊन त्यांचा कधी आपल्या गृहमंत्र्यांनी उपयोग करुन घेतला आहे का ? माजी पोलीस अधिकारी श्री.वसंत सानप, श्री.अरविंद इनामदार, श्री.सोमण यांनी वेळोवेळी शासनाला अनेक सूचना केलेल्या आहेत. परंतु, या सगळया सूचनांना शासनाने केराची टोपली दाखवली. त्यांचा उपयोग करुन घेण्याऐवजी त्यांच्याविरुध्द त्यांना काय समजते असे जाहीर वक्तव्य करण्यात येते. हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .........

मुंबई शहरातील लोकसंख्या 1 कोटी 31 लाख आहे आणि पोलीस फक्त 38 हजार दिलेले आहेत. ही पोलिसांची स्थिती आहे ? पोलिसांना तुम्ही फसविता. त्यांना 1000 रुपये पगार वाढ देता आणि त्यांच्या हाती फक्त 500 रुपये देता. मुंबई शहरामध्ये तीन-साडेतीन महिन्यांपूर्वी जुलैमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर तुळशीच्या लग्नापर्यंत तुम्ही पोलिसांना रजा दिल्या नाहीत. तो आई-वडील, आजी-आजोबा आजारी असल्याची तार मागवितो आणि एक दिवस आपल्या गावी जाऊन मुला-बाळांना, नातवंडांना भेटून येतो. अर्थसंकल्पामध्ये तुम्ही आकडयांची जगलरी करता. आरोग्य विभागामध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे. अनेक विभागांमध्ये भ्रष्टाचार आहे. त्या पैशांचे योग्य नियोजन केले तर पोलिसांना आवश्यक असलेली वाहने, आधुनिक शस्त्रास्त्रे, पोलिसांच्या घरांचे प्रश्न, त्यांना आवश्यक असलेले मनुष्यबळ तुम्ही देऊ शकाल. ज्यावेळी तुम्ही या सर्व सुविधा त्यांना उपलब्ध करुन द्याल त्यावेळी त्यांची कार्यक्षमता वाढेल. मुंबई शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा फज्जा उडालेला आहे. महापुरुषांची नावे घेऊन कोणत्याही गोष्टी होत नाहीत. शपथ लेना तो सरल है पर निभाना कठीण है. बोलणे फार सोपे असते. मी अमुक करीन, तमुक करीन, असे बोलणे सोपे असते. परंतु घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होते काय ? परवा एक बातमी आली होती की, माननीय उपमुख्यमंत्र्यांकडे गेल्यानंतर एक वर्षापूर्वी जो गुन्हा दाखल केला नव्हता तो गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ही तुमची कार्यक्षमता ? गुन्हा दाखल करण्याकरिता उपमुख्यमंत्र्यांकडे जावे लागते ? एक महिन्यापूर्वी मिरज महानगरपालिकेतील श्री.जोशी नावाच्या कर्मचा-याचा खून झाला. खून झाल्यानंतर आत्महत्या दाखविण्यात आली. त्याची मोटर सायकल दोन किलोमीटरवर पडलेली होती. त्याचा देह पडलेला होता. पोस्ट मार्टेम रिपोर्ट होता. त्याच्या बायकोची जबानी घेतली नाही. पोलीस अधिका-यांनी तिला हाकलून लावले. काल मी सभागृहामध्ये माननीय गृहमंत्र्यांना पत्र दिले तेव्हा त्यांनी सांगितले की, गुन्हा दाखल करुन घ्या. तुमचा कसला पोलीस विभागावर कंट्रोल आहे ? कायदा व सुव्यवस्थेचा फज्जा उडालेला आहे. कोणती कार्यक्षमता सांगता ? बॉम्बस्फोटामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या चिंथडया तुम्ही बघितलेल्या नाहीत. सभापती महोदय, आम्ही के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. काय गुन्हा होता त्यांचा ? कोणाचा हात, कोणाचा पाय, कोणाचं आतड बाहेर आलेलं होत. 60 गोण्या माणसांच्या शरीराचे अवयव हॉस्पिटलच्या कोप-यामध्ये पडलेले होते. त्यापैकी एक तरी मिळाला

..2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

काय ? गुप्तचर विभागासाठी परवा पुरवणी मागण्यांमध्ये 12 कोटी रुपये मंजूर केले. कोणाचा नवरा, मुलगा, कोणाचे नातेवाईक, कोणाचे वडील गेले त्यांचा काय दोष आहे ? या सर्वांना वाचविण्यासाठी अनेक लोक प्रयत्न करीत असतात. ते कोणत्या पक्षाचे आहेत ? कोणत्या धर्माचे आहेत ? सभापती महोदय, मी सिद्धीविनायकाचा मुद्दा पुन्हा उपस्थित करीत आहे. संताप येतो आम्हाला. मी व्यक्तिभिनिवेशाने बोलत नाही. अमेरिकेमध्ये दोन टॉवर लादेनने पाडले ते बाबरी मस्जिद पाडल्याने पाडले ? अमेरिकेची 20 विमाने हवेमध्ये उडविण्याचा कट रचला गेला तो बाबरी मस्जिद पाडल्यामुळे रचला गेला ? हे प्रवृत्ती अशी आहे की इतर धर्मियांनी जगायचे नाही, इतर सर्व काफर ? आम्हीच जगले पाहिजे. सर्व जगाने भयभीत व्हावे अशी दहशत महाराष्ट्र राज्यात निर्माण झालेली आहे. या शासनाच्या राज्यात जाती धर्म न पाहता गुन्हेगाराविरुध्द कठोर कारवाई होत नाही. शासनाने ती कारवाई करावी. महाराष्ट्र राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा फज्जा उडालेला आहे. कायदा व सुव्यवस्थेची बंधने राहिलेली नाहीत एवढे बोलून मी माझे बोलणे संपवितो.

-------

यानंतर श्री.सुंबरे...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांच्या सुविधेसाठी मी प्रत्येक पक्षाने कोणत्या क्रमाने आपल्या सदस्यांना बोलण्याची संधी मिळावी हे दिलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखविते म्हणजे प्रत्येक सदस्याला समजून येईल की, भाषणासाठी आपला क्रमांक केव्हा येऊ शकेल. शिवसेना पक्षातर्फे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.दीपक सावंत आणि श्री.उपरकर यांची नावे आलेली आहेत. त्यानंतर भाजपा तर्फे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर, श्री.मोते, श्री.जगवानी, श्री.शेंडगे, श्री.जगदीश गुप्ता, श्री.मानकर यांची नावे आलेली आहेत. तसेच सत्तारूढ पक्षातर्फे या प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड, श्रीमती उषा दराडे आणि श्री. जामा यांची नावे आहेत. यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या भाषण करतील.

...... 5एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी येथे मांडलेला आहे. या प्रस्तावामध्ये जवळजवळ अतिशय महत्त्वाच्या अशा 11 मुद्द्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. मी प्रथमत: माननीय विरोधी पक्षनेत्यांचे अभिनंदन करते की, महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील जनतेच्या भावना आणि या अधिवेशनाकडे लोकांचे डोळे लागून राहिले आहेत की, काही ना काही लोकांचे म्हणणे या ठिकाणी नोंदविले जाईल आणि त्यातून त्यांचे प्रश्न सुटू शकतील, त्यांना काही मदत मिळू शकेल अशा मुद्यांचा ऊहापोह यात केला आहे. माझ्याकडे अशा तीन फाईल्स आहेत की ज्यामध्ये जवळपास 60-70 निवेदने आहेत आणि त्यांना नियम 93 अन्वये तसेच लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून सभागृहात उपस्थित करून मार्ग काढण्याचा मी प्रयत्न केला पण त्यापैकी अनेक विषय येथे उपस्थित करता न आल्याने त्यांच्या बाबतीत बोलावयाचे तर न्यायाची कत्तल करणेच येथे चालविले आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेबांनी मी सांगेन की, बसल्या बसल्या तुम्ही आता हसता आहात पण यातील एक एक केस जरी आपण वाचली तरी इतके संवेदनहीन भूमिका तुम्ही कशी काय घेऊ शकता याचेच मला आश्चर्य वाटते आणि यामध्ये आपल्या लोकशाहीचे कौतुक आपण करतो. बॉम्बस्फोट आणि लादेन यांचे नाव आले वा उल्लेख झाला की आपल्याला हसू येते. असो.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाने 26 ऑक्टोबर 2005 ते 25 ऑक्टोबर 2006 या कालावधीत अखंडित सेवेचे शताब्दी वर्ष साजरे केले. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील गुन्हेगारी 2005 - 'Crime in Maharashtra 2005' हा आठवा वार्षिक अहवाल सादर केला आहे. हा अहवाल जवळपास 250 पानांचा आहे त्यामुळे त्यामध्ये काही मी जाणार नाही. पण त्यातील काही टक्केवारी आणि निष्कर्ष मांडता येतील ते मी थोडक्यात मांडणार आहे. त्यात सरकारचा असा दावा आहे, आणि आपण नेहमी 1995शी तुलना करता परंतु 2004 च्या तुलनेमध्ये 2005 मध्ये भारतीय दंड विधानाखालील गुन्ह्यांमध्ये 6.1 टक्क्याने वाढ झालेली आहे. मालमत्तेच्या बाबतीतील गुन्ह्यांमध्ये 6.59 टक्क्यांनी वाढ झालेली आहे., बँक लुटीच्या घटनांमध्ये वर्षभरात 55 टक्क्यांनी वाढ झालेली असून बँक लुटीच्या 93 गुन्ह्यांपैकी 51 गुन्हे ग्रामीण भागातील आहेत. सराफा दुकानातील घरुोड्यांच्या गुन्ह्यांत 247.06 अशी प्रचंड वाढ झाली आहे तर चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्याच्या प्रमाणात घट झाली आहे. सीआयडीच्या पहिल्या पानावर हे

...... 5एच 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

सांगितले आहे. त्यानंतर हिंसामय गन्ह्यांमध्ये 2004 च्या तुलनेत 7.99 टक्क्यांनी वाढ झाली आहे. खुनाचा प्रयत्न 10.3 टक्के, बलात्कार 11.3 टक्के, अपहरण व पळवून नेणे 14.3 टक्के, दंगा 13.4 टक्के अशी सातत्याने वाढ झालेली आहे. आर्थिक गुन्ह्यात गतवर्षीच्या तुलनेत 2005 मध्ये 25.87 टक्क्यांनी वाढ झाली आहे. सायबर/संगणकीय गुन्ह्यांचा विचार करता माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत 52.74 टक्के वाढ असून आरोपींपैकी 84 टक्के आरोपी 18 ते 30 वर्षे वयोगटातील आहेत. सभापती महोदया, विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या संख्येत 2004 च्या तुलनेत 2005 मध्ये 15.48 टक्केनी वाढ झाली आहे. विनयभंग 14.02, बलात्कार 11.31 टक्के., पती-पतीच्या नातेवाईकांकडून होणारा अत्याचार 50.40 टक्के याप्रमाणे वाढ झालेली दिसते. अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचारांमध्ये, सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांना मी सांगू इच्छिते की, खुनाच्या बाबतीत 50 टक्क्यांनी तर बलात्कारामध्ये 31.75 टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही सारी वस्तुस्थिती मी सागते आहे. सभापती महोदया, हा अहवाल सीआयडीच्या कार्यालयात विकत मिळतो. 2005 मध्ये त्यांच्याच आकडेवारीनुसार यवतमाळ, अमरावती विभागामध्ये आत्महत्या मोठ्या प्रमाणात झालेल्या आहेत याची आपणा सर्वांनाच कल्पना आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ....5आय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

याची आपल्याला कल्पना आहे. आपण अशी अपेक्षा करु या की, ही वाढ झाली असेल तर न्याय मिळण्यात वाढ झाली काय?सन 2004 च्या तुलनेत 2005 मध्ये गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात 14.73 टक्क्यावरुन 12.54 टक्के घट झाली आहे. याबाबतीत न्याय मिळण्यामध्ये संपूर्ण देशामध्ये सर्वात शेवटचा क्रमांक पश्चिम बंगालचा आहे. आणि महाराष्ट्राचा क्रमांक शेवटून दुसरा आहे. ताब्यात घेतलेल्या ज्युवेनाईल जस्टीस केसेस 100 टक्के प्रलंबित आहेत. गेल्या वर्षभरामध्ये कोणत्याही ज्युवेनाईल जस्टीस केसमध्ये एखाद्याला समुपदेशन करुन सोडले असेल. परंतु न्यायालयामध्ये जाऊन त्याला न्याय मिळण्यासाठी 100 टक्के केसेस प्रलंबित आहेत. या आकडेवारीमधून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे महाराष्ट्राच्या पोलीस दलाचे नीतिधैर्य खच्ची झाले आहे. ज्या प्रमाणात गुन्हे होतात त्या प्रमाणात गुन्हे करणारे लोक, आणि पोलीस दल यांचे सक्षमीकरण करण्याची अतिशय गरज आहे.

दुसरा राजकीय हस्तक्षेपाचा प्रश्न सरळ दिसत आहे.त्याचे उदाहरण आपणास देईन. ॲड. उज्वल निकम यांच्यासंबंधी मी काल औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांच्यासारखे एक निस्पृह वकील बॉम्बस्फोटासारख्या खटल्यामध्ये सरकारची बाजू प्रभावीपणे मांडीत असतांना त्यांना नाशिक परिक्षेत्रातील उपसंचालक श्री. डी. डी. राठी यांनी दिनांक 8.9.2006 रोजी एक नोटीस पाठविली आणि सांगितले की, तुमच्यावर आम्ही कां कारवाई करीत आहोत. तुम्ही महाराष्ट्रातील कोठल्याही कोर्टामध्ये हजर होता कामा नये. अशी त्यांना नोटीस दिली, त्यानंतर माननीय गृहमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी ही नोटीस रद्द केली. परंतु अशी नोटीस बरोबर बॉम्बस्फोटाच्या खटल्याच्या वेळी देणाऱ्या या राठीचे अतिरेक्यांशी संबंध नाहीत कशावरुन? त्याचे साटेलोटे नाही हे कशावरुन? जेणेकरुन बॉम्बस्फोटाचा खटला निकाली आल्यानंतर हे राठी नोटीस देतात. एकीकडे ॲड. उज्वल निकम यांना एक न्याय आणि दुसरीकडे ॲड. माजिद मेमन यांना रेड कार्पेट घालून एन.सी.पी. मध्ये प्रवेश दिल्याचे आम्ही पाहिले आहे. इतकी भयानक गोष्ट एखादा राजकीय पक्ष कसा करु शकतो हे आम्हाला कळत नाही. याठिकाणी ठरवून अतिरेक्यांचे खटले घेणाऱ्या वकिलांना रेड कार्पेट ट्रिटमेंट आणि आमच्या उज्वल निकमांना मात्र नोटीस दिली जाते. असा सगळा उफराटा न्याय चालला आहे. आणि म्हणून आपल्याला असे चित्र दिसते की, बॉम्बस्फोटाचा तपास करणारे मुंबईचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनोद भट यांचा मृतदेह दादर रेल्वे स्थानकाजवळ दिनांक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

29 ऑगस्ट 2006 रोजी आढळून आला. श्री. विनोद भट यांच्या वाटयाला अशी अवहेलना आली याचे कारण काय असेल? ज्यामुळे श्री. विनोद भट यांनी अशाप्रकारे संशयास्पद बळी ठरले. सभापती महोदय, एका बाजूला अल कायदा आणि लष्कर ए तोयबा यांनी "डेथ मॅन्युअल" तयार केले आहे, याच्या आपण बातम्या वाचत आहोत. दुसरीकडे महाराष्ट्रात वेबसाईट हॅक होत आहेत., आणि पोलीस दल खिळखिळे झाल्याचे दिसून येत आहे.

सामान्य माणसांच्या कहाण्या सांगण्यासाठी मला अजिबात वेळ पुरणार नाही. तरीसुध्दा वानगीदाखल दोन-तीन उदहारणे देणे मला अत्यावश्यक वाटत आहे. परभणी येथे विद्या देशमुख हिचा खून झाला त्याबाबत सभागृहामध्ये माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आणि आम्ही सर्वांनी आवाज उठविला होता. दोन वर्षे हा आरोपी फरारी होता, आज 14 डिसेंबर असून गेल्या तीन वर्षामध्ये हा खटला अजून उभा रहात नाही, सारख्या तारखा पडत आहेत. हरणाबाई नावाच्या छोटया मुलीची विक्री झाली. त्या मुलीची एक मैत्रीण पळून आली. ही दुसरी मुलगी अजून सापडली नाही. आदिवासी आणि ठकार समाजाच्या लोकांनी त्याकरीता मोठा मोर्चा काढला होता. नगर जिल्हयातील अंबिकावर हल्ला करणारे आरोपी पॅरोलमधील गुन्हेगार होते. पुण्याच्या मंचर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री. सुभाष डौले यांनी श्रीमती शीतल पाटील या वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या महिलेला, जी स्वतः एम.पी.एस.सी. चे क्लासेस घेते, तिला 26.9.200 ते 28.9.2006 पर्यंत महिला पोलीस कॉस्टेबलकडे डांबून ठेवले. या डौल्यांना पुण्याच्या पोलीस अधिक्षकांचे संरक्षण आहे हे मला सांगावेसे वाटते . पुण्याच्या इंदापूर येथे भीमाई आश्रमशाळेच्या आवारात अत्याचार, बलात्कार झाले. रेल्वेमध्ये महिला सुरक्षित नाहीत, आणि मंत्रालयातही सुरक्षित नाहीत हे मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते. माझ्या माहितीप्रमाणे अनेक महिला आय.ए. एस. अधिकाऱ्यांनी माननीय मुख्यमंत्री व माननीय मुख्य सचिवांना जाऊन विंनती केली की, एक व्यक्ती स्वतःच्या सहाय्यक महिलेला काय काम सांगतें?

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरू...

मंत्रालयातील आय.ए.एस.महिला अधिकारी आपल्या महिला सहाय्यकाला स्टुलावर उभे राहून कॅलेंडर काढायला सांगतात. त्याच आय.ए.एस. महिला अधिकारी सांगतात की, आम्ही बेमुदत रजेवर जाऊ. मंत्रालयातील महिला सुरक्षित नसताना, तुम्ही कसल्या बातम्या छापून आणता याबद्दल आश्चर्य वाटते. खैरलांजी येथील महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत, चंद्रपूर येथील महिला सुरक्षित नाहीत, मंत्रालयातही महिला सुरक्षित नाहीत. बॉम्बस्फोट होत आहेत त्यामध्ये नागरीक सुरक्षित नाहीत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे बॉम्बस्फोटामध्ये सापडलेल्या लोकांचे पुनर्वसन झालेले नाही. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेचे राज्य नसून न्यायाचा कत्तलखाना चाललेला आहे याकडे लक्ष वेधावेसे वाटते. धन्यवाद.

--

श्री.पांडुरंग फुंडकर : याप्रस्तावावर अजून बऱ्याच सन्माननीय सदस्य बोलावयाचे आहेत. या चर्चेसाठी उद्या सकाळी विशेष बैठक घ्यावी.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सकाळी चर्चा घ्यायला हरकत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य उद्या सकाळी लवकर चर्चा घ्यायला हकत नाही असे सांगतात)

**उपसभापती** : सकाळी 9-30 वाजता घ्यावी काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य सकाळी लवकर चर्चा घ्यावी. आमची येण्याची तयारी आहे.)

**उपसभापती** : आता आपण फौजदारी प्रक्रियासंहिता विधेयक घेऊ

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे झाले पाहिजे. अंतिम आठवडा प्रस्ताव आपण अगोदर घेतला त्यावरील चर्चा अपूर्ण आहे. अजून दोन विधेयके आहेत, तीही पुढे ढकलणार असू तर सभागृहाच्या कामकाजाला काही अर्थ रहात नाही. आपण वैधानिक चर्चा, घटनात्मक मुद्यावर चर्चा करतो, हे सर्वोच्च सभागृह आहे. आपण जनतेमधून निवडून आलेलो आहोत, त्यामुळे सभागृह आपल्या कर्तव्यापासून लांब गेले तर जनता आपल्याला माफ करणार नाही. वेळ झाला तरी चालेल आपण ही चर्चा पुढे सरू ठेवावी.

**उपसभापती** : आता आपण प्रस्तावावरील चर्चा येथेच थांबवून ही चर्चा उद्या पुन्हा सुरु करु. आता फौजदारी संहिता विधेयक चर्चेला घेऊ.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. LXXXII OF 2006.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CIRMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)**

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 82 फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 82 फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, श्री.बद्रीभूषण दारक यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केलेली होती. त्या संदर्भात सरकारने अपील केले, ते सर्वोच्च न्यायालयाने कायम केले. यापूर्वी आपण 100 टक्के इ.जी.पी. आणि डी.जी.पी. प्रॉसिक्युटर्समधून भरत होतो आता जिल्हा सत्र न्यायालयाचे प्रोसिक्युटर भरण्याबाबत जनहित याचिका दाखल केलेली आहे. त्यामुळे कोर्टाने असा निर्णय दिला की, प्रोसिक्युटर्समधून इ.जी.पी., डी.जी.पी. नेमावेत...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

आणि त्यांच्याकडून काम करुन घ्यावे. आपल्याकडे प्रॉसिक्युटर्सची एकूण संख्या 311 आहे आणि मुंबईसह राज्याच्या 31 जिल्ह्यामध्ये एकूण 400 इ.जी.पी. आणि डी.जी.पी. लागतात. त्यामुळे आपण यामध्ये असा बदल केला आहे की, प्रॉसिक्युटर्समधून 50 टक्के आणि ज्यांची सात वर्षे वकिली झाली आहे अशा वकिलातून 50 टक्के घ्यावेत. त्यांच्या फेडरेशनचे अध्यक्ष श्री. उज्ज्वल निकम यांनी याबाबत सातत्याने आग्रह धरला होता. माननीय राज्यपालांनी अध्यादेश काढून त्यावर सही केलेली आहे. हे बिल सभागृहाने संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 82 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि. स. वि. क्रमांक 82 संमत झाले आहे.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MAP/

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक.

L. A. BILL NO. LXXXIX OF 2005.

(A BILL TO BRING SOCIAL AWAKENING AND AWARENESS IN THE SOCIETY AND TO CREATE A HEALTHY AND SAFE SOCIAL ENVIRONMENT WITH A VIEW TO PROTECT THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AGAINST THE EVIL AND AGHORI PRACTICES AND CUSTOMS THRIVING, ON IGNORANCE, AND TO COMBAT AND ERADICATE THE EVIL AND SINISTER PRACTICES AND AGHORI PRACTICES BORN OUT OF BELIEFS PROPAGATED IN THE NAME OF SOME SO CALLED DIVINE OR SUPERNATURAL OR MAGICAL POWERS OR EVIL SPIRITS COMMONLY KNOWN AS BLACK MAGIC BY QUACKS AND CONMEN WITH SINISTER MOTIVE OF EXPLOITING AND HARMING MENTALLY, PHYSICALLY AND FINANCIALLY THE COMMON PEOPLE IN THE SOCIETY AND THEREBY DESTROYING THE VERY SOCIAL FIBRE OF THE SOCIETY; AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.).

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MAP/

**सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89, महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयकाच्या संदर्भात या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी वैधानिक दृष्ट्या भाष्य केलेले आहे आणि ते ऑनलेग आहेत. या अनुषंगाने मी निर्णय देण्याच्या दृष्टीने माझ्याकडे आणखी काही सन्माननीय सदस्यांनी या बिलाच्या अनुषंगाने विचार मांडण्याच्या बाबतीत विचारणा केलेली आहे. मला त्यांनी लेखी पत्र दिलेले आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना बोलण्यास परवानगी दिलेली आहे. यानंतर श्री. कपिल पाटील यांनी आपले भाषण करावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ऑन लेग आहेत.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे भाष्य केले त्यासंबंधी मी अद्याप निर्णय दिलेला नाही. तत्पूर्वी मी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे म्हणणे ऐकून घेत आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयकाच्या संदर्भात काही घटनात्मक मुद्दे उपस्थित केले होते आणि हे विधेयक मांडण्यास त्यांनी आक्षेप घेतला होता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मुख्य मुद्दे असे होते की, या विधेयकामुळे धर्माचरणावर घाला येतो, आयपीसीच्या तरतुदीशी समांतर अशा तरतुदी या विधेयकामध्ये असल्यामुळे या विधेयकाची आवश्यकता नाही आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने जे निकाल दिलेले आहेत त्यामुळे हे विधेयक आपण या ठिकाणी मांडू शकत नाही. सभापती महोदय, घटनेतील 25व्या कलमाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केला. ते कलम मी वाचले आहे. मी ते पुन्हा याठिकाणी वाचून दाखवितो. सद्सदविवेकबुध्दीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रतिज्ञापन, आचरण व प्रसार यासंबंधीचे हे 25वे कलम आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे :-

"(1) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व अरोग्य यांच्या व या भागातील अन्य उपबंधांच्या अधीनतेने, सदसद्विवेकबुध्दीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुक्तपणे प्रतिज्ञापित करण्याच्या, आचारण्याच्या व त्याचा प्रसार करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.

(2) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, -

(क) धर्माचरणाशी निगडित असेल अशा कोणत्याही आर्थिक, वित्तीय, राजनैतिक वा अन्य धार्मिकेतर कार्याचे विनियमन करणा-या किंवा त्यावर निर्बंध घालणा-या ,

(ख) सामाजिक कल्याण व सुधारणा यांबाबत अथवा सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदू धार्मिक संस्था हिंदूंचे सर्व वर्ग व पोटभेद यांना खुल्या करण्याबाबत उपबंध करणा-या,

कोणत्याही विद्यमान कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही अथवा असा कोणताही कायदा करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही."





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

याचा अर्थ स्पष्ट आहे की, नागरिकांच्या सामाजिक स्वास्थ्याशी, सुधारणेशी, आरोग्याशी धर्माचरणाशी निगडित विषय असले तरी सुध्दा कायदे करता येतात. या देशाचा स्वातंत्र्योत्तर इतिहास असे सांगतो की, अशा प्रकारचे कायदे आपण केलेले आहेत. धर्माचरणाशी संबंधित कायदा करता आला नसता तर अस्पृश्यतेच्या विरोधातील कायदा आपण पास करु शकलो नसतो. धर्माचरणाशी संबंधित कायदा पास करता आला नसता तर स्त्रि-पुरुष यांच्यातील विषमता मिटविणारा कायदा आपण पास करु शकलो नसतो. धर्माचरणाशी संबंधित कायदा करता आला नसता तर संविधानाने जे मूलभूत अधिकार दिलेले आहेत त्यामधील सर्व नागरिक समान असून त्यांचे मूल्य समान आहे आणि त्यांना मताचा समान अधिकार आहे अशा प्रकारचा कायदा करु शकलो नसतो. घटनेने माणसाला मूलभूत अधिकार दिलेले आहेत. हे अधिकार सर्वोच्च असून त्यांना बाधा येईल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य करता येत नाही.

सभापती महोदय, या विधेयचा संबंध धार्मिकतेशी जोडलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी खंड 13चा - व्यावृत्तीचा- उल्लेख केला. मी त्याकडे येण्याआधी हे सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्री महोदय श्री.चंद्रकांत हंडोरे  यांनी हे विधेयक मांडलेले आहे, ते पुर:स्थापित झालेले आहे. हे आपण रेकॉर्डवर पाहू शकता.

... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी बोलण्यास सुरुवात करताना असे म्हटले की, हे विधेयक मांडले आहे. आत त्यांच्याच वक्तव्यामध्ये विधेयक मांडण्यापूर्वी अशा प्रकारचा उल्लेख झाला आहे.

**सभापती** : विधेयक पुर:स्थापित झाले आहे.

श्री.कपिल पाटील : विधिनियम 110 अन्वये एखाद्या विधेयकाच्या घटनात्मक वैधतेबद्दल एखाद्या सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला तर त्याबद्दल सर्वांगीण चर्चा सभागृहाला करता येते. माननीय सभापतींना परवानगी देता येते असे नियम सांगतो. सभापती महोदय, हे जे विधेयक आलेले आहे ते विधानसभेने पारित केलेले आहे. ते खूप पातळ झालेले आहे. अंधश्रध्दा विरोधी चळवळीतून आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधेयकाची घटनात्मक वैधता आहे का? हे विधेयक मांडता येणार नाही असे सांगितले. मुळात जो ड्राफ्ट आपल्यासमोर आहे तो इतका पातळ आहे, मी आपल्याला आठवण करुन देतो, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते युती सरकारच्या काळात मंत्रीमंडळात होते, त्यावेळी विधेयकाचा मसूदा मंजूर केला होता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधेयकाचा मसूदा, मंत्रीमंडळातील गोष्टी या ठिकाणी मांडता येणार नाहीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी पूर्वीचे रेफरन्स देऊन वाद निर्माण करु नये.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्य माझे ज्येष्ठ बंधू आहेत. मी त्यांचा आदर करतो. सार्वजनिक चळवळीत ते काम करतात. अनवाणी फिरुन शेतकऱ्यांची दु:खे त्यांनी जाणून घेतली आहेत. त्यांच्याबद्दल मला नितांत आदर आहे. सातत्याने मी त्यांच्याकडे आदराने पाहतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील याठिकाणी आपले विचार व्यक्त करीत आहेत. Hon.member, Shri Kapil Patil you will be on leg for this particular Bill.

सभागृहाची बैठक मी आता स्थगित करीत आहे. शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी सकाळी 9.30 ते 11.30 या वेळेत अंतिम आठवडा प्रस्तावावर उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे व मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण होईल. 11.30 ते 1.00 या वेळेत विधेयकाच्या अनुषंगाने चर्चा होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उद्या विधेयक चर्चेला घेता येणार नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये स्पष्ट ठरले आहे की, बुधवार आणि गुरुवार या दोन दिवशी विधेयके चर्चेला घेण्यात येतील. शुक्रवारी अशासकीय कामकाज घेण्यात येईल असे ठरले आहे.

**सभापती** : एक ते दीड तास विधेयकावर चर्चा करण्याची तयारी असेल तर सुरुवात करता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : आग्रह कशासाठी? माननीय उपसभापतींनी 9.30 ते 11.30 या वेळेत प्रस्तावावरील उर्वरित चर्चा घेण्याचे मान्य केले आहे. उद्या विधेयकाचा दिवस नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये जे ठरले आहे त्याप्रमाणे कामकाज झाले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते जे म्हणत आहेत ते बरोबर आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे आज विधेयके आणि अन्य कामकाज पूर्ण करावयाचे आहे आणि उद्या अशासकीय कामकाज पूर्ण करावयाचे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती** .....

आपण सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या संमतीने हे विधेयक येथेच थांबवू या. जर आपण हे विधेयक उद्या सकाळी 11.30 वाजता किंवा .....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे विधेयक आता आपल्याला घेता येणार नाही.

**सभापती** : सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या संमतीने कार्यक्रम पत्रिकेमध्ये आवश्यक त्या पध्दतीने आपण बदल करु शकतो. या पूर्वी अनेक वेळा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या विचाराने असे बदल केलेले आहेत. म्हणून मला असे वाटते की, उद्या सकाळी 9.30 ते 11.30 वाजेपर्यंत अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल. तसेच 11.45 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत विधेयक क्रमांक 89 वर चर्चा होईल आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे त्यावर ऑन लेग राहतील. त्यानंतर दुपारी 1.10 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये ज्या अर्धा तास चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत त्या अर्धा तास चर्चा आज आणि उद्याही घेण्यात येणार नसून हया अर्धा तास चर्चा अर्थसंकल्पिय अधिवेशनात घेण्यात येतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी सकाळी 9.30 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 46 मिनिटांनी, शुक्रवार दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजीच्या सकाळी 9.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली. )

-----------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही